**<u>सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत</u>**

**पृ.शी.**: शासकीय महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा कमी करण्यात येणे

**मु.शी.**: शासकीय महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा कमी करण्यात येणे या विषयावर डॉ. दीपक सावंत, डॉ. वसंत पवार, सर्वश्री मधुकर चव्हाण, संजय दत्त, अरविंद सावंत, डॉ. एन.पी.हिराणी, सर्वश्री श्रीकांत जोशी, एस.क्यु. जामा, दिवाकर रावते, अरुण गुजराथी, विनोद तावडे, सुरेश नवले, गुरुनाथ कुलकर्णी, दिलीपराव सोनावणे व सुभाष चव्हाण, वि.प.स. यानी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**तालिका सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी 1 तासा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

डॉ दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय मी नियम 97 अनवये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"एमसीआयने 2-3 दिवसापूर्वी जाहीर केलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या (एमडी/एमएस) 242 जागा कमी करण्यात येणे, सन 2001 मध्ये 1900 जागा असताना दरवर्षी एमसीआयच्या अटींची पूर्तता न केल्याने पदवीधर शिक्षकांच्या जागा दरसाल कमी होऊन आज 411 जागा उपलब्ध असणे, एमसीआयच्या अटींच्या अवलंबनाने संपूर्ण आरोग्य सेवा संकटात आलेली असणे, पदव्युत्तर शिक्षणाच्या जागा अशाच कमी होत राहिल्या तर एकूणच सरकारी रुग्णालयातील उपलब्ध अध्यापक, प्राध्यापक वर्गावरील ताण वाढणे, प्रति डॉक्टर रुग्णांचे प्रमाण वाढून त्यायोगे रुग्णांना उपचार व सुविधा अपु-या पडणे, गरीब रुग्णांना शासकीय रुग्णालयात पुरेशी सेवा मिळत नसल्याने त्यांना खाजगी रुग्णालयात जावे लागणे, एकूणच या प्रकारामुळे सामाजिक स्वास्थ्य धोक्यात येत असल्यामुळे या संबंधात करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...)

सभापती महोदय, या चर्चेसाठी आणखी 10 मिनिटे वाढवून देण्यात यावी अशी मी सुरुवातीलाच आपणास विनंती करीत आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

डॉ. दीपक सावंत : अतिशय महत्वाच्या प्रश्नावर या ठिकाणी चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. आज प्रत्येक वर्तमानपत्रामध्ये "मार्डचा" संप, "डॉक्टर संपावर" अशा प्रकारचे मथळे वाचावयास मिळतात. याचे कारण असे की, राज्य शासनाच्या अखत्यारित येणा-या वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर संपावर आहेत. तसेच सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अखत्यारित येणारे अस्थायी डॉक्टर्स संपावर आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था संपूर्णपणे कोलमडलेली आहे. या परिस्थितीला राज्य शासनाचा हलगर्जीपणा कारणीभूत आहे. आतापर्यन्त राज्य शासनाने वैद्यकीय शिक्षण आणि सेवा या विषयाकडे अगदी कॅज्युअल ॲप्रोचने पाहिलेले आहे. सभापती महोदय, गेल्यावर्षी मी हाच विषय या सभागृहामध्ये 93च्या सूचनेच्या माध्यमातून मांडला होता, लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या प्रश्नाकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधले होते. परंतु माझा लक्षवेध त्यांच्या पर्यन्त पोहोचला नाही. या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्येही या विषयावर चर्चा झाली. 31 मार्च ही शेवटची तारीख होती. तोपर्यन्त आपल्याला एमसीआय कडून पदव्युत्तर पदे आणि पदविका यांचे रेकगनिशन घेणे आवश्यक होते ते न घेतल्यामुळे आज हा प्रसंग आलेला आहे. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने राज्य शासनाला सांगितलेले आहे की, तुमच्या 242जागा कमी झालेल्या आहेत. या 242 जागा डिरेकग्नाईज्ड होणे हे महाराष्ट शासनाला आणि महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण खात्याला शोभणारे नाही. वैद्यकीय शिक्षण खात्याचे माननीय मंत्री महोदय हे डायनामिक आहेत. परंतु त्यांना ऊर्जेच्या संकटातून बाहेर पडता येत नसल्यामुळे कदाचित त्यांना या प्रश्नाकडे लक्ष देता आले नसावे असे मी समजतो. परंतु असे जरी असले तरी वैद्यकीय शिक्षण खात्यामध्ये डायरेक्टर आहेत, सचिव आहेत. त्यांच्याकडूनही फार मोठी अपेक्षा होती. माननीय मंत्री महोदय, वैद्यकीय शिक्षण खात्याचे सचिव हे जरी मेडिकल ग्रॅज्युएट नसले तरी देखील वैद्यकीय शिक्षण संचालक हे डॉक्टर आहेत, ते मेडिकल ग्रज्युएट आहेत, पोस्टग्रज्युएट आहेत. त्यांना तरी

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ SBT/ 10:00

(डॉ. दीपक सावंत....

या सर्व परिस्थितीची जाणीव असली पाहिजे. या अधिका-यांनी या प्रश्नाकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधावयास पाहिजे होते. आज परिस्थिती अशी आहे की, खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांनी पीजी संख्या वाढवून घेतली. त्यांना पोस्टग्रज्युएटचे रजिस्ट्रेशन मिळते, डिप्लोमा मिळतात. हे सर्व त्यांना का आणि कसे मिळते ? एमसीआयला जो काही पुरवठा करावा लागतो किंवा जे काही अर्थकारण करावे लागते ते कदाचित पूर्ण करता आले नसावे.

....नंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ (पूर्वी श्री. शिगम) 10:05

डॉ.दीपक सावंत ...

परंतु राज्यात तुमची सत्ता आहे, केंद्रात तुमची सत्ता आहे. राज्यात आणि केंद्रात या खात्याचे मंत्री तुमच्या पक्षाचे आहेत. मग अर्थकारण बाजूला करुन राज्य शासन एमसीआयवर दबाव का आणू शकत नाही असा प्रश्न मला विचारावासा वाटतो. सभापती महोदय, जर पदव्युत्तर आणि पदविका धारकांची पदवी त्यांना मिळाली नाही तर महाराष्ट्राच्या वैद्यकीय क्षेत्रात मोठा गोंधळ उडणार आहे. महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आरएमओ मिळणार नाहीत. कारण एमसीआयने मेडीकलच्या सीटस् आता कमी केलेल्या आहेत. आरएमओ, हाऊसमन मिळणारा नाहीत. काही प्रमाणावर इंटेनशीपवर देखील याचा परिणाम होणार आहे. पुढील पाच वर्षात येणारे डॉक्टर्स पी.जी.करुन सर्व्हीसमध्ये येणार नाहीत. कारण तुमची डिग्री ही महाराष्ट्रात रजिस्टर आहे. असे कारण शासन सांगणार आहे. एमएमसी मध्ये प्रोव्हीजन केलेली आहे आणि ॲक्ट तयार केलेला आहे. त्यामुळे हे डॉक्टर्स फक्त महाराष्ट्रातच प्रॅक्टीस करणार आहेत. तळयातील बेडकाप्रमाणे त्यांची अवस्था होईल. त्यांनी तळयातच रहावे काय ? पुढे जाऊ नये काय ? अशा प्रकारची वागणूक शासन का देत आहे हा माझा प्रश्न आहे. आपली जी डॉक्टर्स मुले आहेत त्यांनी महाराष्ट्राच्या बाहेर जगात जाऊन त्यांनी मोठया प्रमाणावर नांवलौकिक मिळवावा महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना जगाच्या पाठीवर अमेरिकेत, लंडनमध्ये डिमांड आहे. परंतु त्याची डिग्री एमसीआयकडून रजिस्टर झालेली नसेल तर तो डॉक्टर महाराष्ट्राच्या बाहेर जाऊ शकत नाही ऑपरेशन करु शकणार नाही, इंजेक्शन देऊ शकणार नाही, औषधे देऊ शकणार नाही.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना जाणीवपूर्वक सांगू इच्छितो की, आज पी.जी.डिग्रीची महाराष्ट्रात किंमत असली तरी महाराष्ट्राच्या बाहेर किंमत शून्य आहे. आज आपण पाहिले तर महाराष्ट्र शासनाचे वैद्यकीय शिक्षण खाते आपल्या पुस्तकात म्हणते की, विद्यार्थी ॲडमिशन देण्यापुरते हे खाते आहे. त्यांना ज्ञात केले होते. "Admission to Courses though recognised by Maharashtra Medical Council but....." आपण कबूल करीत आहात. एवढा निलाजरेपणा कशाला पाहिजे ? महाराष्ट्रातील मुलांनी छातीठोकपणे आणि गर्वाने सांगितले पाहिजे की एमसीआय रजिस्टर आहे. पण तुम्ही असे म्हणता की "...but not yet recognised by M.C.I. will not be taken up in the first round." कोर्सेसना ॲडमिशन मिळत नाही. शासन कबूल करते. एवढे निलाजरे सरकार कशाला पाहिजे ? एमसीआय रजिस्ट्रेशनची आवश्यकता आहे.....

.....2

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो शब्द वापरला आहे तो बरोबर वाटत नाही. दुसरा शब्द वापरा. उलट त्यांनी जो विषय मांडलेला आहे तो चांगला विषय आहे. प्रस्तावाविषयी कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. परंतु प्रेझेंटेशन करताना त्यांनी वापरलेला शब्द कानाला बरोबर वाटत नाही एवढेच मला म्हणावयाचे आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, अन्पार्लमेंटरी शब्द असेल तर कामकाजातून काढून टाका. यापेक्षा दुसरा कोणता शब्द वापरणार ? "Permission of Government of India will be sought to admit Candidates to such Courses and if permission is obtained from Government of India, admission will be taken in second round." याचा अर्थ सरकार कबूल करते की आमची मुले रजिस्ट्रेशनला पात्र नाहीत. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारित असलेल्या महाराष्ट्र राज्यातच प्रॅक्टीस करावी. सभापती महोदय, ज्यावेळी एखादा पी.जी.कोर्स सुरु करतो त्यावेळी केंद्र शासनाकडून त्यांना सेक्शन 10(अे) प्रमाणे परवानगी घ्यावी लागते. उत्तरामध्ये मंत्रीमहोदय सांगतील की ही महाविद्यालये 1934 पासून 1954 पासून महाविद्यालये सुरु आहेत. त्यांनी रजिस्ट्रेशनची काय गरज आहे ? ज्याप्रमाणे कंटीन्यू मेडिकल एज्युकेशन म्हणजे वैद्यकीय क्षेत्रात वारंवार रजिस्ट्रेशन घेणे, वारंवार इन्फ्रास्ट्रक्चर तपासून पाहणे, वारंवार प्रोफेसर आणि शिक्षकांची अर्हता तपासून पाहणे, वारंवार प्रोफेसर आणि विद्यार्थी यांचा गुणोत्तर काय आहे आणि त्यांचा रेश्यो काय आहे हे तपासून पाहणे हे देखील एमसीआयचे कर्तव्य आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.........

आता एमसीआयच्या नॉर्म्सप्रमाणे आपले कॉलेज अगोदर असेल, एमसीआय नंतर झाले असेल, परंतु हे त्याचे उत्तर होऊ शकत नाही. आम्ही कित्येक वर्षापासून आहोत, एमसीआय नंतर झाले अशा प्रकारचे उत्तर मंत्रीमहोदयांकडून अपेक्षित नाही. यासाठी काय लागते? What is the qualifying criteria to get the M.C.I. Registration? एमसीआयने याबाबत नियम घालून दिलेले आहेत. मी ते वाचून दाखवितो,"That the medical college/institution has a feasible and time bound programme to provide additional equipment and infrastructural facilities like the number of staff, space, funds, equipment and teaching beds etc. for starting these higher courses as laid down in the Medical Council of India Regulations." and " The nomenclature of post-graduate degree or diploma and super-speciality courses and teacher-student ratio shall be as laid down in the post-graduate Medical Education Regulations."

सभापती महोदय, आपण या नियमांचे पालन करतो का? कोणत्याही प्रकारे नियमाचे पालन केले जात नाही. आपल्याकडे यासाठी क्लिनिकल डिपार्टमेंट हवे असते. प्रशिक्षण देण्यासाठी किमान तीन पूर्णवेळ प्रोफेसर्स आवश्यक असतात. त्या त्या विषयाचे शिक्षक आवश्यक असतात. त्यापैकी 1 प्रोफेसर, 1 असिस्टंट असोसिएट प्रोफेसर, 1 रिडर असावा लागतो. हे इन्फ्रास्ट्रक्चर पाहिजे. 1:1 या प्रमाणात एक प्रोफेसर एकच विद्यार्थी घेतो. पूर्वी दोन विद्यार्थी घेण्याची परवानगी होती. परंतु एमसीआयच्या नॉर्म्सप्रमाणे एक शिक्षक आणि एकच विद्यार्थी असावा. ज्यावेळी हा बदल झाला त्यावेळी महाराष्ट्र शासनाने काय प्रयत्न केले? दोनपैकी एक विद्यार्थी कमी होत आहे. 2001 मध्ये किंवा 2002 मध्ये 1900 जागा होत्या. आज किती जागा झाल्या? 411 जागा झाल्या आहेत. हा डाऊनफॉल सुरु झाला त्यावेळी शासनाने लक्ष का दिले नाही? याकडे बघण्याचा शासनाचा जो दृष्टीकोन आहे तो मी पहिल्याच वाक्यात सांगितला आहे. त्यामुळे हा डाऊनफॉल सुरु झाला त्याकडे बघण्याचा मेडिकल एज्युकेशन आणि हेल्थ डिपार्टमेंटचा दृष्टीकोन प्रायॉरिटीचा नाही. शैक्षणिक अर्हता काय पाहिजे? त्या त्या विषयातील प्रोफेसर असेल, ज्याच्याकडे विद्यार्थी असेल, त्या विषयातील त्याची डिग्री एमसीआयकडे रजिस्टर्ड असली पाहिजे. आपल्याकडे अनेक





डॉ.दीपक सावंत.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रोफेसर्स असे आहेत, ज्यांनी 20-20 वर्षापासून एमसीआयकडे डिग्रीचे रजिस्ट्रेशन केलेले नाही. सायन हॉस्पिटलमध्ये मध्यंतरी डी.एम., पिडियॅाट्रिक पद होते. ते पद याच कारणासाठी रद्द झाले. डी.एम.ला जो शिकविणार आहे त्याच्याकडे अमुक विषयाचा अनुभव पाहिजे. विषय शिक्षकाला 8 वर्षाचा अनुभव असावा. किमान 5 वर्षे शिकविण्याचा अनुभव असावा. असोसिएट प्रोफेसर म्हणून अनुभव असावा. कमीत कमी लेक्चरर म्हणून अनुभव असला पाहिजे तरच तो पी.जी.चा शिक्षक होऊ शकतो. या संदर्भात या राज्यामधील वैद्यकीय महाविद्यालयातील त्या त्या विभागात रेसिडेन्ट डॉक्टर किती आहेत? रजिस्ट्रार किती आहेत? ट्युटर किती आहेत? डेमॉन्स्ट्रेटर, टेक्नीकल स्टाफ, पॅरामेडिकल स्टाफ, तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचारी किती आहेत? यावर प्रत्येक डिप्लोमाचे रजिस्ट्रेशन अवलंबून असते. मी जे काही सांगतो आहे ते माझे मत नसून या कागदपत्रामध्ये जे म्हटले आहे तेच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. वैद्यकीय शिक्षणमंत्री सांगतात की, 63 लाख रुपये भरले आहेत. आम्ही का एमसीआयकडे जायचे? एमसीआयने आमच्याकडे आले पाहिजे. परंतु यासाठी एक फॉर्म असतो, तो फॉर्म प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयाने भरुन देणे आवश्यक असते. त्यासाठी काही कालमर्यादा घालून दिलेली आहे " Forwarding of applications by Central Government to Medical Council of India for technical scrutiny-up to 31st July, Forwarding of recommendations of MCI which are for grant of only Letter of Intent-up to 15th September, Issue of Letter of Intent by Central Government-up to 15th October, Applicant institution to send its reply to Central Government requesting for Letter of Permission-up to 15th November."

(नंतर श्री.गिते....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

आणि शेवटची तारीख 31 मार्च असते. यासंदर्भात अनेक तारखा आहेत, परंतु त्या तारखा वाचून मी सभागृहाचा वेळ वाया घालवू इच्छित नाही. यासाठी किती फी असते ? आपण 62 लाख रुपये भरलेले असतील. नायर हॉस्पीटलने 10 लाख रुपये भरले असूनही त्यांना रजिस्ट्रेशन मिळाले नाही असेही ते सांगातात. पी.जी.डिग्रीसाठी 85 लाख रुपये फी आहे, ही खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांची फी आहे, याची मला माहिती आहे. आपल्याला फक्त अंडरटेकिंग घ्यावयाचे असते. अंडरटेकिंगमध्ये स्पष्ट म्हटले आहे की, Medical Colleges and Institutions who are governed by the State Government provided that they shall give undertaking to provide funds in their Plan Budget regularly till the facilities..." आज आपण वैद्यकीय महाविद्यालयांना 175 कोटी रुपये दिलेले आहेत. या पैशाचे काय केले जाणार आहे ? इन्फ्रास्ट्रक्चर कधी करणार आहात ? आज जागा रिकग्नाईजड्, डि-रिकग्नाईजड् झाल्या आहेत. आता इन्फ्रास्ट्रक्चर करणार,परंतु आजपर्यंत एम.सी.आय.ने ज्या ज्यावेळी जागा डि- रिकग्नाईजड् केल्या, त्या जागा कधीच रिस्टोअर होऊन आलेल्या नाहीत, हा इतिहास सांगतो आहे. आपल्याकडे जागा रि-रिकग्नाईजड् करण्याचे कारण म्हणजे अपूर्ण कर्मचारीवर्ग आहे. आज जे.जे. रुग्णालयात तृतीय आणि चतुर्थ श्रेणी कामगार कंत्राट बेसीसवर काम करीत आहेत. त्या कर्मचा-यांना सेवेत सामावून घेतले जात नाही. प्रोपेसर, असिस्टंट प्रोपेसर यांची बरीच पदे रिक्त आहेत. या रुग्णालयांमध्ये अपूर्ण उपकरणे आहेत. आपल्याकडे रेडिओलॉजिस्टचे 43 कोर्सेस होते. त्याच्यापैकी फक्त 16 कोर्सेस राहिले आहेत. गायकॉनॉजीची आपल्याकडे पी.एम.सी.46 कोर्सेस होते, त्यापैकी फक्त 14 कोर्सेस राहिले आहेत. गायकॉनॉजीचे पदवी आणि पदविकेचे 86 कोर्सेस होते. त्यात फक्त 55 कोर्सेस राहिले आहेत. पेडीअेड्रीकचे 57 कोर्सेस होते, त्याची संख्या 30 पर्यंत आलेली आहे. मेडीसीनचे 53 कोर्सेस होते, ती संख्या 34 वर आलेली आहे. सर्जरीचे 49 कोर्सेस होते ते 42 पर्यंत आलेले आहेत. ॲनॉस्थियाचे 93 कोर्सेस होते, त्यांची संख्या 73 एवढी झाली आहे. के.ई.एम.हॉस्पीटलमध्ये किती घट झाली त्याबाबतची देखील माहिती मी या ठिकाणी सांगतो. त्या ठिकाणी पी.जी.चे 118 कोर्सेस होते, ती संख्या 62 वर आली आहे. जे.जे. हॉस्पीटलमध्ये पी.जी.ची संख्या 82 वरुन 47 वर आली आहे. सर्वात दुर्देवाची गोष्ट म्हणजे आय.जी.एम.सी.नागपूर ही संख्या 48 वरुन 3 एवढी झाली आहे. गेल्या पाच वर्षात

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

आय.जी.एम.सी. नागपूरला किती पैसे दिले गेले, त्या पैशांचे काय झाले याचा आपण आढावा घ्यावा. इन्फ्रास्ट्रक्चरला पैसे देण्यात आले आहेत. पहिल्यांदा 20 कोटी रुपये दिले, दुस-यांदा 10 कोटी रुपये दिले आणि तिस-या वेळा 5 कोटी रुपये शासनाने आय.जी.एम.सी.नागपूर यांना दिले आहेत. त्यांना दिलेले पैसे कुठे गेले याचा शोध घेण्याची गरज आहे. आय.जी.एम.सी. मध्ये 48 कोर्सेस होते, आता फक्त त्या ठिकाणी 3 कोर्सेस सुरु आहेत. हे विदर्भातील एकमेव चांगले वैद्यकीय महाविद्यालय आहे. विदर्भ विभाग अतिसंवेदनशील आहे. मुंबईत गरीब माणसाला एका रुग्णालयात उपचार मिळाले नाहीत तर त्यास दुस-या रुग्णालयात उपचार मिळतात. विदर्भात पोस्ट ग्रॅज्युएट डॉक्टर नको आहेत काय ? जी.एम.सी.आंबेजोगाई येथे 33 कोर्सेस होते, आता तेथे 13 कोर्स फक्त सुरु आहेत. औरंगाबाद येथे 67 कोर्स होते, ती संख्या 30 वर आली आहे.मीरज जी.एम.सी. येथे 29 कोर्स होती ती संख्या 16 वर आली आहे. जी.एम.सी.नागपूर येथे 47 कोर्सेस होते ती संख्या 38 वर आले आणि बी.जे.मेडीकल,पुणे, ज्याला आपण आताच पैसे दिले. तेथे 67 कोर्सेस होते ती संख्या 51 वर आली आहे. हा एक मोठा डाऊन फॉल होत चालला आहे. हे अतिशय सूर्यप्रकाशाएवढे स्वच्छ गणित आहेत. हा डाऊन फॉल काही एका दिवसात झालेला नाही. मी हा प्रश्न या सभागृहात गेल्या तीन वर्षापासून उपस्थित करीत आहे. परंतु त्या प्रश्नाला शासनाकडून आतापर्यंत न्याय दिला गेला नाही. रेडिओलॉजिस्टचे कोर्सेस कॅन्सल होण्याचे कारण म्हणजे त्यासाठी एम.आर..आय आणि सिटी स्कॅन मशीन्स असणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी या मशिन्स असतील तर ही पदे का कॅन्सल झ ाली याचा खुलासा या ठिकाणी होणे आवश्यक आहे. त्यांनी त्यांच्या नॉर्मस्मध्ये म्हटले आहे की, एम.डी.मेडीसीनसाठी सुसज्ज आय.सी.यू.पाहिजे. रेडिओलॉॉजिस्टसाठी एम.आर.आय. आणि सिटी स्कॅन मशीन्स असणे आवश्यक आहे. म्हणजे आपल्याकडे रिक्वॉयरमेंट ऑफ ऑपरेटर्स आहेत. आपण काय म्हणतो की, एम.सी.आय.ने इन्स्पेक्शन केले नाही तर त्यात आमची काय चूक आहे? परंतु तशी परिस्थिती नाही. आपल्याला वैद्यकीय महाविद्यालय चालवावयाचे असेल, राज्यातील लोकांचे आरोग्य चांगले राखावयाचे असेल तर वैद्यकीय क्षेत्रातील मुले चांगल्या पध्दतीने शिकतील यासाठी शासनाने फॉलोअप करणे आवश्यक आहे. वैद्यकीय शिक्षण सचिवांनी याबाबतीत फॉलोअप व्यवस्थितपणे केलेला नाही असे माझे म्हणणे आहे...

यानंतर श्री. कानडे...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.........

दुसरी गोष्ट म्हणजे आपण आपल्या राज्यातून चार प्रतिनिधी एमसीआयवर पाठविले आहेत. त्यात डॉ. म्हैसेकर, नांदेड, डॉ. वसंत पवार जे आपल्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आहेत, डॉ. दळवी यांना आम्हीच पाठविले असून ते सिनेटचे सदस्य आहेत, मी देखील त्या सिनेटचा सदस्य आहे आणि सभापती महोदय आपण देखील सिनेटचे सदस्य आहेत. आणि चौथे नागपूरचे डॉ. वेदप्रकाश मिश्रा असे चार लोक एमसीआय रिप्रेझेन्टेटीव्ह म्हणून पाठविले आहेत.

महोदय, हॉस्पिटलमधील बेड स्ट्रेंथ किती असली पाहिजे, ओ.पी.डी. किती असायला पाहिजे, लॅबोरेटरीची फॅसिलिटी कशी पाहिजे, इक्विपमेंट कशा प्रकारे पाहिजे याचाही विचार करणे आवश्यक आहे. आज आपण काय करतो तर आपल्या राज्यात कॉलेज ऑफ फिजिशियन अँड सर्जन हे नाव माननीय मंत्री महोदयांनी ऐकलेच असेल. अशा कॉलेजमार्फत डिप्लोमा कोर्सेस चालविले जातात. हे कोर्सेस चालविले जात असताना तेथील मुलांना डिग्री मिळते. तीन हाऊस पोस्ट करायच्या, सीपीएसकडे रजिस्ट्रेशन करायचे आणि मग ती मुले डीजीओ होतात, कोणी डीसीएच म्हणजेच पिडियॅट्रिक, ऑप्थॅल्मॉलॉजी, पॅथॉलॉजी वगैरे डिप्लोमाधारक तयार होतात. अशा प्रकारे पॅरलल बॉडीज राज्यात सुरु आहेत. त्यात फक्त एमसीआयचे रजिस्ट्रेशन तीनच लोकांना असते परंतु हे डॉक्टर्स संपूर्ण महाराष्ट्रभर फिरत आहेत. अश प्रकारे बोगस पदव्युत्तर पदवीधर डॉक्टर आपण तयार करतो. कारण या लोकांना कुठल्याही प्रकारचा सर्जिकल अनुभव नसतांना, केवळ तीन कोर्सेस केलेले असतांना अशा डॉक्टर्सना आपण सर्जिकल करायला भाग पाडतो. नुकतेच उदाहरण परभणीला घडलेल्या प्रकाराचे देता येईल. परभणीला एका रुग्णाचे डोळे गेले. ज्या डॉक्टरने डोळयाचे ऑपरेशन केले होते त्या डॉक्टरची डिग्री कोणती तर डीओएमएस अशी होती. यासंदर्भात माननीय मंत्री महोदय संवेदनशील आहेत, याबद्दल वाद नाही. डीओएमएस डिग्री घेऊन, कुठलाही सर्जिकलचा अनुभव नाही अशा माणसाने डोळ्याचे ऑपरेशन केले आणि शासनाचा प्रोजेक्ट राबविला, अशा लोकांना ऑपरेशनची परमिशन आपण देतो पण ज्यांची खरोखरच समाजाला गरज आहे, समाजातील शोषित वर्गाला गरज आहे अशा डॉक्टर्सना मात्र बाजूला ठेवून दुसऱ्याच प्रकारचे डीएनबी, पॅरलल टू एमडी. एमएस., डायरेक्टर ऑफ नॅशनल बोर्डची, क्वॉलिफाईंग एक्झाम खूपच कठीण असते, पण नंतर ती मिळू शकते. परंतु छोट्या

........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .........

छोट्या 10-15 बेड असलेल्या हॉस्पिटल्समध्ये अशा प्रकारे डीएनबीचे कोर्सेस दिले तर विद्यार्थी काय शिकणार? आणि त्या सर्व पेशंट्सचे काय होणार हा तुमच्या आमच्या समोर महत्वाचा प्रश्न आहे. आपल्यासमोर सुध्दा असेल, हे मला माहीत आहे. ठीक आहे, डीएनबी इंटरनॅशनल रेकग्नाईज्ड कोर्स आहे पण जेथे इन्फ्रास्ट्रक्चर 10 बेडचेच आहे आणि येथे तुमच्याकडे 1200, 1500 पेशंट्स रोज बघण्याचे काम डॉक्टर्स करीत आहेत. कारण Practise is of trial & error method, आज मी तुम्हाला औषध दिले त्यातून बरे वाटले नाही म्हणून उद्या पुन्हा डोस वाढवून दिला आणि बरे वाटले, समजा माननीय मंत्री महोदयांना 500 मिलिग्रॅमने बरे वाटले, शेवटी अशा प्रकारे 10-15 बेडचे इन्फ्रास्ट्रक्चर असलेल्या ठिकाणी डीएनबी मार्फत कोर्सेस चालविणार, आपण सीपीएस कोर्सेसचे डॉक्टर्स चालविणार असाल तर त्यातून पास होऊन बाहेर आलेल्या डॉक्टर्सकडून क्वॉलिटी ट्रिटमेंटची अपेक्षा कशी करणार ? एका बाजूला आपण मेडिकल टुरिझम आणण्याचा आपण विचार करीत आहात आणि दुसया बाजूला अशा प्रकारे महाराष्ट्राची गळचेपी करण्याचा प्रयत्न होत आहे. जर अशा प्रकारे डीएनबीचे कोर्सेस चालू करावयाचे असतील तर ते शासनाच्याच हॉस्पिटल्समध्ये का सुरु करु नये? त्यांचा फायदा गरिबांनाही मिळू द्या, होऊ द्या गरिबांच्या मुलांना डॉक्टर. आज डीएनबी कोर्सेस खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये शासन देते. परंतु या कोर्सेससाठी खाजगी महाविद्यालयांचे भाव काय आहेत, 25-25 लाख रुपये भाव आहे. ते जरा पहा, सुपर स्पेशॅलिटीमधून पी.जी. चे भाव म्हणजे एक कोटीपासून 20 लाखापर्यंत, मग गरिबांची मुले कशी डॉक्टर होणार. आणि जे एक कोटी रुपये देऊन आदिवासी भागात कशाला जाणार ? तो म्हणणार की माझ्या बापाने माझ्यासाठी एक कोटी रुपये खर्च केले, मी कशाला आदिवासी भागात जाऊ, मी मुंबई, नागपूरसारख्या शहरातच राहणार, पॅथॉलॉजीची लॅब टाकणार आणि खोऱ्याने पैसे ओढणार. शेवटी ग्रामीण आरोग्याचा प्रश्न, पुढच्या पाच वर्षांनी मी त्यावेळेस असेन अथवा नसेन परंतु हा प्रश्न उभा राहणारच आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

16-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F-1

SGJ/ KTG/ SBT/ 10:25

डॉ. दीपक सावंत ....

दिवसेंदिवस सरकारी कॉलेजसचे सायफॉनिंग चालू आहे आणि खाजगी मेडीकल कॉलेजेसचा उध्दार चालू आहे. हा उध्दार का चालू आहे ? तर सगळी खाजगी मेडीकल कॉलेजस सत्ताधारी पक्षाची असल्यामुळे हे सर्व राजकारण चालू आहे असा मी आरोप केला तर तो चुकीचा होणार नाही. पण खरोखरच याविषयाकडे लक्ष देण्याची गरज आहे. आपण लातूरला कॉलेज काढले, अकोला येथे मेडीकल कॉलेज काढले, चांगली गोष्ट आहे. या ठिकाणी गरीबांची मुले जातील मेरीटोरीअस मुले जातील पण तितकीच अभिमत विद्यापीठे निर्माण होत आहेत, तितकीच प्रायव्हेट मेडीकल कॉलेजेस निर्माण होत आहेत. आता सगळी प्रायव्हेट मेडीकल कॉलेजेस अभिमत विद्यापीठाच्या नावाखाली, डीम युनिर्व्हसीटीच्या नावाखाली कॉलेजेस काढत आहेत परंतु या कॉलेजसच्या संदर्भात महाराष्ट्र शासन काहीही करु शकत नाही. इन्सपेक्शनला लोक गेले होते त्यावेळी या कॉलेजेसने या लोकांना कॉलेजेच्या दरवाजामध्ये सुध्दा उभे केले नव्हते. डीवायपाटील साहेबांनी तर दरवाजे बंद केले होते. हे अभिमत विद्यापीठ आहे, त्यांचे ते संस्थान आहे त्यामुळे या विषयाकडे अधिक बारकाईने लक्ष देण्याची गरज आहे. या प्रश्नाच्या रुपाने आज तुमच्या हॉस्पीटलमध्ये 60 बेड असतील तर पोस्ट ग्रॅज्यूएटला परवानगी मिळते. आऊट पेशंट डिपार्टमेंटमध्ये आपल्याला काही प्रश्न येणार नाही कारण आपल्याकडे खाजगी वैद्यकीय महाविद्यालयापेक्षा खूप पेशंट असतात. असे असतांनाही रजिस्ट्रेशन मिळत नाही. त्या लोकांकडे एमसीआयचे इन्सपेक्शन असेल तर ते डॉक्टर्संना जमा करतात, डॉक्टर्स त्यांच्याकडे पेरोलवर असतात. एमसीआयचे इन्सपेक्शन आहे या आणि 4 लाख रुपये घेऊन जा असे ते सांगत असतात. परंतु ते लोक त्याच कोर्सचे 40 लाख रुपये वर्षाच्या शेवटी घेत असतात. आज वैद्यकीय शिक्षणाचा बाजार मांडलेला आहे. वैद्यकीय शिक्षणामध्ये एवढा भ्रष्टाचार आहे की, तेलगी प्रकरण सुध्दा वैद्यकीय शिक्षणाच्या पुढे हतबल होईल अशी परिस्थिती आहे. आज आपल्या लॅबरोटरीमध्ये काहीही इक्वीपमेंटस् नाहीत. सुपरस्पेशालिटीसाठी ज्या टेस्ट लागतात त्या टेस्ट आपल्याकडे होत नाहीत. चिठ्ठी लिहून देतात की, अशा अशा टेस्ट तुम्ही बाहेरुन करुन घ्या. सीबीसी ईएसआरची टेस्ट होते परंतु बाकीच्या टेस्ट होत नाहीत. आपलयाला जी इक्वीपमेटस् पाहिजेत ती एक्वीपमेंटस् आपल्याकडे नाहीत. मी जाता जाता एवढेच सांगतो की, आपण 242 सीटस्चे काय करणार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

आहात ? माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्या पक्षाची सत्ता केंद्रात सुध्दा आहे. आपण स्वत: सर्वपक्षीय खासदारांना घेऊन माननीय रामदोस साहेबांची भेट घ्या, एमसीआयला कम्पेल करायला लावा. महाराष्ट्राच्या वाटयाला ज्या 1900 जागा होत्या त्या 1900 जागा मिळाल्याच पाहिजेत. त्यांच्याकडे दुसरी मागणी करा की, एक प्रोफेसर दोन विद्यार्थी असे स्पेशल सर्व राज्यांना द्या. जर शक्य नसेल तर तर एक एक डीएनबीचा स्टुडंट देखील घ्या. त्यांनी जर डीएनबीला कायद्याने परमीट केले तर या ठिकाणी एमडीएमएसचा कोर्स चालू आहे, ज्याप्रमाणे त्यांनी प्रायव्हेट मेडीकल कॉलेजेसंना दिले आहे त्या प्रकारे डीएनडी शासकीय मेडीकल महाविद्यालयांना दिले तर आपली स्ट्रेन्थ दोन होईल आणि प्रत्येक वर्षी एका फॅकल्टीचे दोन डॉक्टर्स बाहेर येऊ शकतील. त्यांनी 1-1, 2-2 वर्षे ग्रामीण भागात जाऊन सेवा करण्यासंदर्भात कम्पलशन करा. पहिल्यांदा सीपीएस बंद करा. या ठिकाणी मी जे मुद्दे मांडलेले आहेत ते मुद्दे आपण किती दिवसात पूर्ण करणार आहात ? आज वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर्संचा संप चिघळत चालला आहे. उद्या पासून हा संप अजून मोठया प्रमाणात होणार आहे. सगळया वृत्तपत्रांमध्ये यासंदर्भातील बातम्या भरभरुन येत आहेत. त्यामुळे मी आपल्याला हात जोडून विनंती करतो की, आपण महाराष्ट्रातील खासदारांचे एक शिष्टमंडळ केंद्रातील आरोग्य मंत्री श्री. रामदोस साहेबांकडे नेऊन त्यांची भेट घ्या आणि हा प्रश्न त्वरीत निकाली काढा एवढे सांगून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

---------------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेत भाग घेण्याकरिता मी येथे उभा आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी या विषयासंबंधी उत्तम विवेचन केलेले असल्यामुळे त्या मुद्यांची पुनरावृत्ती करावी या मताचा मी देखील नाही. या विभागाचे माननीय मंत्री महोदय सक्षम आहेत, तसेच तरुण व तडफदार आहेत. या विभागाची त्यांना उत्तम जाण आणि भान असल्यामुळे आमच्या भावना त्यांच्या कानापर्यत पोहोचाव्यात म्हणून भाषण करण्याचा माझा हट्टहास आहे.

सभापती महोदय, दिनांक 1 मे 1970 रोजी वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन विभागाची राज्यात स्थापन झाल्यानंतर मार्गदर्शकाच्या भूमिकेतून हा विभाग आतापर्यंत कार्य करीत आहे. हे मार्गदर्शनाचे काम करीत असतांना पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा जर कमी होत असतील तर ते मार्गदर्शकाच्या एकूण बुध्दिमत्तेला आणि मार्गदर्शनाला साजेसे आहे काय याचा विचार करण्याची वेळ आता येऊन ठेपलेली आहे. सर्वसाधारपणे आपण पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला पाहिजे व आपण या विषयातील तज्ज्ञ व्हावे असा सगळयाच विद्यार्थ्याचा कल असतो . एखाद्या रुग्णालयात गेल्यानंतर त्या रुग्णाला सुध्दा असे वाटते की, आपल्यावर उपचार करणारा डॉक्टर तज्ज्ञ असावा. त्या रुग्णाच्या नातेवाईकालासुध्दा असे वाटते की, आपण तज्ज्ञ डॉक्टरांकडे जावयास पाहिजे. पदव्युत्तर शिक्षण घेतल्याशिवाय तज्ज्ञता येत नाही. ग्रामीण भागात आदिवासी भागात तज्ज्ञ डॉक्टर्सनी जाणे आवश्यक आहे. तेव्हा या ठिकाणी जाण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टर्स निर्माण करावयाचे असतील, हे तज्ज्ञ डॉक्टर्स जर प्राप्त करुन घ्यावयाचे असतील तर त्यासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा आवश्यक आहे. आज महाराष्ट्राला तज्ज्ञ डॉक्टर्सची आवश्यकता आहे ती गरज भागविण्यासाठी या डॉक्टरांनी पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला पाहिजे. परंतु या जागा कमी होणार असल्यामुळे महाराष्ट्रापुढे यक्ष प्रश्न निर्माण होतो. त्यानंतर महाराष्ट्राच्या वाटयाला जे येणारे दुर्दैव आहे ते कोण टाळणार आहे ? आज विविध आजारावरील तज्ज्ञ डॉक्टर्सची आवश्यकता आहे. उदाहरणार्थ त्वचेचे तज्ज्ञ डॉक्टर, कान, नाक, घसा, इत्यादीचे तज्ज्ञ डॉक्टर्स इत्यादींची आवश्यकता आहे. अवयव अव्यंग ठेवण्यासाठी ते तज्ज्ञ डॉक्टर्स या अवयवावर उपचार करु शकतात . त्यामुळे या तज्ज्ञांची गरज असून ही गरज कशा प्रकारे भागविण्यात येणार आहे हा मोठा प्रश्न आपल्यासमोर उभा राहिलेला आहे.

प्रा.सुरेश नवले ....

सभापती महोदय, ज्या प्रमाणे एखादा अभंग, लावणी वा गाणे जर उत्तम करावयाचे असेल तर तबला वादक , हार्मोनियम वादक ,मृदुंग वादक आवश्यक आहे त्याप्रमाणे या विशेष विषयामध्ये डॉक्टर्स तज्ज्ञअसण्याची गरज आहे. या विषयाचा अभ्यासक्रम स्वत:च्या डोक्यात ठेवून तो अभ्यासक्रम प्राप्त करुन घेणा-या डॉक्टरांची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा जागा वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी एम.सी.आय.ला शासनाने अशी विनंती केली पाहिजे की पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ज्या जागा महाराष्ट्राच्या वाटयाला आलेल्या आहेत त्यातील काही जागा कमी केल्या आहेत परंतु या जागा कमी करता कामा नये. थोडया फार उणिवा असू शकतील. महाविद्यालयामध्ये ज्या काही उणिवा असतील त्या दूर करण्याचा महाराष्ट्र शासन निश्चितपणे प्रयत्न करणार आहे. त्या दृष्टीने शासनाने जरुर प्रयत्न करावेत परंतु या जागा एम.सी.आय.ने काढून घेतल्या आसतील तर एम.सी.आय.च्या सदस्यांना अशी विनती करावी की, आपण उदार मनस्क रहावे. महाराष्ट्रामध्ये आदिवासी भाग आहे तेथे काही ठिकाणी भूकबळीची संख्या उत्तरोत्तर वाढत आहे या सगळयावर प्रमाणशीर उत्तर शोधावयाचे असेल तर ग्रामीण भागामध्ये तज्ज्ञ डोक्टरांच्या सुविधा देण्याची गरज आहे असे मला वाटते त्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करावेत अनुशेषाचा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो . विदर्भातील काही जागा कमी झाल्या असतील,मराठवाडयातील वा खानदेशातील काही जागा कमी झाल्या असतील. महाराष्ट्रात काही भागात अनुशेष शिल्लक आहे तो दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे. त्यामध्ये आपला देखील सिंहाचा वाटा आवश्यक आहे. ही गोष्ट एम.सी.आय.च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे. महाराष्ट्र शासनाची जी डिझॉस्टर मॅनेजमेन्ट यंत्रणा आहे ती यंत्रणा यासाठी कामाला लागली पाहिजे अशा प्रकारचा मी आग्रह धरणार आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा कमी करणे हे महाराष्ट्रावर आलेले एक ंसकट आहे.हे संकट दूर करण्याकरता माननीय मंत्री महोदयांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे .द्रष्टेपणा आणि दूरदृष्टी माननीय मंत्रीमहोदयांकडे निश्चित आहे. महाराष्ट्रात त्यांनी या खात्याला चांगला आकार देण्याचा प्रयत्न देखील केलेला आहे तेव्हा पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जागा कमी होणार नाहीत.

एम.सी.आय. या जागा पुन्हा देण्याचा प्रयत्न करील या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करावे असा आग्रह मी या चर्चेच्या निमित्ताने धरणार आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. नवले ....

सभापती महोदय, एमसीआयने महाराष्ट्राच्या या जागा कमी केल्या आहेत तर त्या इतर राज्यांना दिलेल्या आहेत काय ? हाही प्रश्न यातून निर्माण होतो आणि तशा त्या दिल्या असतील तर कोठल्या राज्याला दिल्या आहेत याचेही उत्तर आले पाहिजे आणि नसेल तर एमसीआयला इतक्या तडकाफडकी हा निर्णय घेण्याची आवश्यकता का भासली हेही समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे, त्याचाही विचार येथे झाला पाहिजे आणि त्या संबंधात जरूर तर येथे मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. आज ग्रामीण भागात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या तज्ज्ञ डॉक्टरांची आवश्यकता आहे आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेले तज्ज्ञ डॉक्टर्स ग्रामीण भागात गेले पाहिजेत. आमच्या काळामध्ये अंबाजोगाईला प्राध्यापक आणि प्रोफेसर मंडळी बदली केल्यानंतर तेथे येत नव्हते. त्यांचे म्हणणे असे असायचे की, आमची मुंबई-पुणे या शिवाय ग्रामीण भागात जाण्याची इच्छा नाही. आमचे कुटुंब शहरात स्थिरस्थावर झालेले आहे. तेव्हा ही त्यांची मानसिकता असे. अगोदर कोट्यवधी रूपये दिल्यानंतर त्याच्या मनामध्ये येणारे विचार हे पुणे-मुंबई, दिल्ली, कलकत्ता या शहरांपुरतेच मर्यादित असणार, त्यांच्या मनामध्ये चंद्रपूर, गडचिरोली, धुळे या सारख्या ग्रामीण भाग, आदिवासी भागांचा विचार चुकूनही येणार नाहीत म्हणून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या निमित्ताने पदव्युत्तर शिक्षण मिळावे, विनासायास मिळावे म्हणून या जागा कमी होणार नाहीत या दृष्टीने आपण विचार करावा अशी आग्रहाची विनंती मी आपल्याला करतो. सभापती महोदय, या विषयावर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी प्रस्ताव आणून त्यावरील चर्चेत आम्हालाही सहभागी करून घेतले त्याबद्दल त्यांचे आणि आपण मला या चर्चेत बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आणि माननीय मंत्री महोदयांनी आमचे विचार शांतचित्ताने ऐकून घेतले त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो. धन्यवाद.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, अतिशय विस्तृतपणे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी हा प्रस्ताव आणून त्याबाबतचे त्यांचे विचार मांडले आहेत. मी केवळ या संबंधात माननीय मंत्री महोदयांना दोन तीन गोष्टींबाबत विनंती करणार आहे. तसे पाहिले तर हा विनंती करण्याचाही मुद्दा नाही. कारण आपल्यावर एमसीआय काही मेहरबानी करीत नाही. खाजगी महाविद्यालयांना त्यांच्याकडील पीजी आणि डिप्लोमा कोर्सेसना एमसीआय मान्यता कशी काय देते ? आणि महाराष्ट्र शासना सारख्या अतिशय प्रभावी अशा राज्याच्या कॉलेजांना मात्र त्यासाठी मान्यता देत नाही या मागील कारणे नेमकी काय आहेत हेही आपण येथे समजून घेणे आवश्यक आहे. तसेच आपल्या राज्यातील 422 जागा कमी केल्या आहेत तर अशाच प्रकारे एमसीआयने अन्य राज्यांमधील जागाही कमी केल्या आहेत काय ? हेही आपल्याला पहावे लागेल. सभापती महोदय, मार्ड ही जी संघटना आहे तिचे संप पाहिले तर या महाराष्ट्र राज्यातच विशेष करून मुंबई सारख्या शहरातच तिचे जास्त संप होतात, दक्षिणेकडील राज्यांमध्ये मात्र ते होत नाहीत, याचे कारण काय आहे ? याला दोन कारणे असू शकतात. एक तर सगळ्या सोयी तेथे मिळत नसतील आणि सभापती महोदय, मला हे मान्य आहे की, नामदार मंत्र्यांची काम करण्याची पद्धत मला माहिती आहे, ते प्रसंगी अधिकाऱ्यांनाही जाब विचारण्याची हिंमत ठेवतात. त्यांच्याकडे ऊर्जा खातेही असल्याने आणि विजेचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आणि गंभीर झालेला असल्याने त्याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. परंतु त्यामुळेच कदाचित कळत नकळत म्हणा वा वेळेअभावी, मनात नसतानाही प्रशासनाचे या वैद्यकीय शिक्षण खात्याकडे, विशेषत: या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत आहे का ? अशी एक शंका आमच्या मनात येते. उदाहरण म्हणून मी आपल्याला सांगेन की, मुंबईतील नागपाडा येथील पोलीस हॉस्पिटल आहे, त्याची आज काय स्थिती आहे त्याचे चित्रण आजच्या वर्तमानपत्रातून आलेले आहे. तेथे कोठल्याही प्रकारचे एमएस, एमडी डॉक्टर्स नाहीत. अगोदरच तज्ज्ञ डॉक्टरांकडे जाण्याची माणसाची स्वाभाविक मानसिकता असते. आपल्याला तज्ज्ञ, उत्कृष्ट डॉक्टरांची सेवा उपलब्ध व्हावी ही प्रत्येक रूग्णाची आणि त्याच्या नातेवाईकांची अपेक्षा असते, मानसिकता असते. या संदर्भात अतिशय विस्तृतपणे सन्माननीय सदस्य डॉ.सावंत यांनी हा विषय येथे मांडलेला आहे तो तितक्याच गांभीर्याने घेऊन त्यावर सखोल विचार करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा नेहमीच असे होत आले आहे की, महाराष्ट्र राज्य हे देशाला

...... एच 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

अधिक महत्त्वे नेहमीच देत आहे, आपण त्यामुळेच केंद्राशी संघर्ष करीत नाही. आणि तसा करणेही अनावश्यक आहे अन्यथा देश एकसंघ राहणार नाही, प्रादेशिकवाद अधिक फोफावला जाईल. पण असे असले तरी प्रत्येक वेळेला केंद्राशी नमून राहू नका. आता ही जी मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया आहे तिचे आपल्याबरोबर वागणे कसे आहे तेही लक्षात घ्या. मी सायन हॉस्पिटलमध्ये 7-8 वर्षे क्लेरिकल काम केलेले आहे त्यामुळे मला याची चांगली माहिती आहे की, कशा प्रकारे महाराष्ट्रातील रूग्णालयांना आणि सगळ्याच गोष्टींना केंद्रातील एमसीआयकडून त्रास दिला जातो. तेव्हा मला वाटते की, सन्माननीय सदस्य डॉ. सावंत यांनी अतिशय विस्तृतपणे, प्रभावीपणे, मुद्देसूत आणि अभ्यासूपणे आपल्यासमोर या विषयाचे विवेचन केले आहे त्याची गंभीर दखल घेऊन याला आपण प्रॉस्पेक्टिव नव्हे तर रिट्रॉस्पेक्टिव परिणाम असा देता येईल या दृष्टीने दिल्लीत आपण जाऊन या प्रश्नाची तड लावूनच परत यावे अशा प्रकारची विनंती करून सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव येथे मांडला आहे त्याला मी पाठिंबा देतो.

***

( यानंतर श्री.सय्यद जामा यांचे हिंदी भाषण श्री.तालेवार यांच्याकडे )

( यानंतर सौ.रणदिवे .....आय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा (विधानसभा द्वारा निर्वाचित): सभापति महोदय, सम्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत जी ने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयों में पोस्ट ग्रेज्युएट अभ्यासक्रम की 242 जगह कम किए जाने के संबंध में इस सदन में जो प्रस्ताव रखा है, उस पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ा हूं. डॉ. सावंत जी ने विभिन्न आंकड़े दिए हैं इसलिए मैं आंकड़े नहीं दूंगा क्योंकि यह सब को मालूम है कि कितनी सीटें कम हुई है. यह चिंता का विषय है, क्योंकि वर्ष 2001 से निरन्तर सीटें कम हो रही है. ऐसा लगता है कि सीटें कम करने का ट्रेंड होते जा रहा है. 2001 में 1900 सीटें थीं जो आज 2008 में 400 तक पहुंच गई है. क्या ऐसा तो नहीं है कि विद्यार्थियों का झुकाव प्राईवेट मेडिकल कॉलेजों की तरफ बढ़ गया है, क्या ऐसा तो नहीं है कि प्राईवेट कॉलेजों को फेवर करने के लिए शासकीय कॉलेजों की सीटें कम हो रही है ? मैं यह कहना चाहूंगा कि सीटें कम होने के कारणों का पता लगाया जाना चाहिए. ये जो सीटें कम होती जा रही है, इसे रोकने के लिए शासन ने क्या योजना बनाई है ? सीटें कम क्यों हो रही है, इसकी जांच होनी चाहिए क्योंकि यह निश्चित ही चिंता का विषय है. हमारा राज्य प्रगति कर रहा है. प्रति व्यक्ति आय बढ़ रही है. औद्योगिक विकास हो रहा है. ग्रोथ रेट बढ़ रहा है. हमारा राज्य आय. टी. में प्रगति कर रहा है. ऐसी स्थिति होने के बावजूद मेडिकल की सीटें कम क्यों हो रही है ? इसलिए इस मामले की जांच होनी चाहिए. नागपुर के आयजीएम कॉलेज में पहले 48 सीटें थीं जो घट कर 3 रह गई है. इस संबंध में सम्माननीय मुख्यमंत्री जी ने ध्यान दिया है और पहल की है. इस संबंध में बैठक भी ली गई है. नागपुर के मेडिकल कॉलेज को आधुनिक कॉलेज बनाने के लिए कोशिश की जा रही है लेकिन जो सीटें कम की जा रही है, उसे गंभीरता से लेते हुए तुरंत कदम उठाए जाने चाहिए. यह सवाल रुलिंग पार्टी या अपोजिशन पार्टी का नहीं है. यह हमारे राज्य का सवाल है. हमारे राज्य की प्रेस्टिज का सवाल है. क्योंकि हमारा राज्य एक प्रगतिशील राज्य है. हमारे राज्य के मेडिकल कॉलेजों में इक्विपमेंट, इन्फ्रास्ट्रक्चर और अन्य चीजों की कमी का जहां तक सवाल है, उसके बारे में ध्यान दिया जाना चाहिए और इस कमी को दूर किया जाना चाहिए. राज्य में डॉक्टर (मार्ड) अनिश्चित काल के लिए हड़ताल पर जाने वाले हैं. डॉक्टरों की हड़ताल से मरीजों को तकलीफ होती है. इसलिए मेरी सरकार से विनती है कि उच्च स्तर पर मार्ड के प्रतिनिधियों के साथ बैठक आयोजित की जाए और हड़ताल को रोकने की कोशिश की जाए. सरकार इस संबंध में तुरंत कदम उठाए और मेडिकल की सीटें कम न हो, इसके लिए तुरंत कदम उठाए जाए. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, पहिल्यांदा मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचे अभिनंदन करते. त्यांनी सदनामध्ये अत्यंत संवेदनशील आणि चांगल्या विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे.

सभापती महोदय, हा महाराष्ट्र राज्याच्या गौरवाचा प्रश्न आहे असे सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जामा यांनी सांगितले आहे. आपल्या राज्याच्या जागा कमी होणे चुकीचेच आहे. आपण महाराष्ट्र राज्य हे देशातील क्रमांक एकचे राज्य आहे अशा प्रकारचे स्वप्न पहातो, तेव्हा क्रीम ऑफ द सोसायटी सुध्दा आपणच असावयास पाहिजे. देशाला नव्हेतर जगाला लीड करणारे बुध्दीचे क्रीम देखील आपल्याकडेच असावयास पाहिजे.अशा परिस्थितीत आपल्या राज्यातील एम.डी.आणि एम.एस.च्या जागा कमी होणे हे आपल्या राज्याच्या गौरवाच्या परंपरेला कमीपणा देणारे आहे. म्हणून खरे म्हणजे आमच्या माननीय मंत्री महोदयांना याचा थोडासा राग आला पाहिजे की, हे असे होता कामा नये. एम.सी.आय.च्या अटींची पूर्तता झालेली नसेल तर ठीक आहे. या अटींची पूर्तता कशी करावयाची ते आपण पहावे. केंद्र शासनामध्ये आपले बरेच मंत्री महोदय आहेत. सन्माननीय सदस्यांनी देखील याबाबतीत सूचना केलेली आहे. केवळ या राज्यातील खासदारच नाहीत, अनेक मंत्री केंद्र शासनामध्ये कार्यरत आहेत. या सर्वांना घेऊन गेले पाहिजे आणि कोणत्याही परिस्थितीत आपल्या राज्याच्या कमी झालेल्या जागा पुन्हा मिळाल्या पाहिजेत. याठिकाणी असा उल्लेख करण्यात आला की, याबाबतीत बाकीच्या राज्यात काय परिस्थिती आहे ? तेथील जागा देखील कमी होत आहेत काय ? मला असे समजले आहे की, इतर राज्यातील जागा देखील कमी होत आहेत. परंतु इतर राज्यामधील जागा कमी होत आहेत, म्हणून आपणही अल्पसंतुष्ट होऊन आपली पाठ थोपटून घेणे बरोबर होणार नाही. इतर राज्यातील जागा देखील कमी होत असतील तर तसे का होत आहे ? याचाही अभ्यास करावयास पाहिजे. याबाबतीत आपण सर्व राज्यांचे नेतृत्व करावे आणि एम.सी.आय.च्या अटींची पूर्तता करण्याबाबतचा जो प्रश्न आहे, तो पूर्णपणे कसा दुरुस्त करता येईल यादृष्टीने विचार करावयास पाहिजे. तसेच काही विद्यार्थी कॉम्पनसेशनसाठी उच्च न्यायालयामध्ये गेले आहेत म्हणून त्याचा यावर परिणाम झालेला आहे काय ? असेही मला समजलेले आहे. परंतु प्रत्येकाचा उच्च न्यायालयामध्ये जाण्याचा अधिकार आहे आणि त्याचा यावर काही परिणाम होईल असे मला वाटत नाही. माननीय मंत्री महोदयांनी ही बाब तपासून घ्यावी. जर तेथे आवश्यक त्या सुविधा नसतील, प्राध्यापक नसतील, इन्फ्रास्ट्रक्चर नसेल तर आता त्यासाठी ...

. . . .आय-3



APR/ KTG/ SBT/ 10:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रडत बसण्याचे दिवस नाहीत. ती परिस्थिती आठ वर्षापूर्वी होती. आता राज्याकडे पैसे आहेत. या राज्याचे माननीय अर्थमंत्री सांगतात की, आता हे राज्य श्रीमंत झाले आहे. असे असेल तर ही परिस्थिती का निर्माण व्हावी ? असा प्रश्न आहे. याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी माननीय अर्थमंत्र्यांबरोबर चर्चा करावी आणि विद्यार्थ्यांना सर्व सुविधा कशा प्रकारे उपलब्ध करुन देता येतील यादृष्टीने प्रयत्न करावा अशी मला विनंती करावयाची आहे. राज्यात नव्याने पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याच्या बाबतीत शासनाने विशेष कार्यक्रम हाती ध्यावा अशा प्रकारची मी विनंती करते. महाराष्ट्र राज्य हे सर्व क्षेत्रात पुढे आहे. हे राज्य क्रीम ऑफ द सोसायटी असावे आणि हा क्रिम वैद्यकीय क्षेत्रामध्ये सुध्दा हा क्रीम या राज्यातच असावा आणि त्यासाठी अट्टाहासपूर्ण प्रयत्न करावा अशी माझी सूचना आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो ठराव आणलेला आहे, त्याचा गांभीर्याने विचार करण्यात यावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

----

. . . .आय-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत)** : मी याठिकाणी एकच सूचना करु इच्छितो की, आपल्या राज्यामध्ये मान्यता नसलेले अभ्यासक्रम सुरु आहेत. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र राज्याची जी प्रतिमा तयार होत आहे, ती बाब अतिशय गांभीर्याने विचारात घेण्यासारखी आहे. सन्माननीय सदस्यांनी अनेक अभ्यासक्रमांच्या बाबतीत उल्लेख केला. अनेक अभ्यासक्रम कमी देखील झालेले आहेत. खास करुन सन्माननीय सदस्यांनी नागपूरच्या संदर्भात उल्लेख केला की, तेथील अभ्यासक्रमांची संख्या 48 वरुन 3 पर्यंत आली आहे आणि ही गोष्ट महाराष्ट्र राज्याला, शासनाला भूषणावह नाही. म्हणून याबाबतीत खास करुन लक्ष द्यावे आणि सध्या प्राधान्यक्रम या विषयाला आहे की, विद्यार्थ्यांच्या ॲडमिशनसाठी तीन-चार दिवसाचा कालावधी शिल्लक राहिलेला आहे. त्यामुळे या विषयाला प्राधान्य देऊन यासाठी तातडीने काय करता येईल, याविषयी माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये उल्लेख करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील ( वैद्यकीय शिक्षणमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, यांनी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे.या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. मधु चव्हाण, प्रा. सुरेश नवले, श्री. सय्यद जामा व श्रीमती उषा दराडे यांनी त्यांची मते व्यक्त केलेली आहेत. तसेच इतर काही सन्माननीय सदस्यांना देखील या चर्चेमध्ये भाग ध्यावयाचा होता. परंतु ते सहभागी होऊ शकलेले नाहीत.

सभापती महोदय, या विषयासंदर्भात येथे काही सन्माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केलेली आहे. महाराष्ट्र राज्य हे शिक्षण क्षेत्रामध्ये अतिशय जाणीवपूर्वक प्रयत्न करणारे असे राज्य आहे. या राज्यामध्ये हा प्रश्न अचानकपणे सर्वांच्या समोर उभा राहिलेला आहे. पोस्ट ग्रॅज्युएशनच्या काही जागा कमी झालेल्या आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन, डीग्री, डिप्लोमा हे कोर्सेस करण्यासाठी एकूण जितक्या जागा आहेत त्या पैकी काही जागा रिकग्नाईज्ड आहेत व काही जागा अनरिकग्नाईज्ड आहेत. रिकग्नाईज्ड कोर्सेस म्हणजे नेमके काय आहे हे आपल्याला प्रथम जाणून घेणे आवश्यक आहे. 90 टक्केपेक्षा जास्त कोर्सेसच्या संदर्भात मेडीकल काऊन्सिल ऑफ इंडियाने सन 1992-93 मध्ये एक अमेंडमेंट केलेली होती. त्या पूर्वी म्हणजेच सन 1992-93 पूर्वी केंद्र शासनाच्या मान्यतेने या जागा सुरु करण्यात आल्या होत्या. सन 92-93 पूर्वी केंद्र शासनाच्या मान्यतेने सुरु झालेल्या कोर्सेसला आता पुन्हा नव्याने मेडीकल काऊन्सिल ऑफ इंडियाची मान्यता घेतली पाहिजे अशी भूमिका घेण्यात आली आहे. खरे तर सन 1992 -93 मध्ये या अनरेकग्नाईज्ड जागा आपल्याला बंद कराव्या लागल्या असत्या. परंतु त्यावेळी काही काळाकरीता या जागा पुलऑन केल्या गेल्या. तसेच मेडीकल काऊन्सिल ॲक्ट नुसार सुधारणा करण्यात आली होती. त्यानुसार या विद्यार्थ्यांना एमसीआयने मान्यता दिलेली नसली तरी देखील महाराष्ट्र मेडीकल काऊन्सिलने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे त्यांना राज्यामध्ये प्रॅक्टीस करण्याची देखील परवानगी देण्यात आली होती. मात्र या विद्यार्थ्यांना राज्याच्या बाहेर प्रॅक्टीस करता येणार नाही. ही बाब देखील खरी आहे. याच राज्यातील 3 विद्यार्थी हायकोर्टमध्ये गेले होते. त्यामुळे हा प्रश्न सर्वांच्या समोर आला. डॉ. सिध्दीकी, डॉ. अर्पणप्रिया, डॉ. जगदाळे यांनी हायकोर्टसमोर केस मांडली होती. ही परिस्थिती आजच उद्‌भवलेली आहे असे काही नाही. गेल्या 15 ते 16 वर्षापासून अनरेकग्नाईज्ड जागेवर या राज्यामध्ये प्रवेश दिले जात आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील..

सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, ज्या वेळी मी वैद्यकीय शिक्षण या खात्याचा चार्ज घेतला त्यावेळी हाच प्रश्न मी विचारला होता की, अनरेकग्नाईज्ड जागांवर आपण प्रवेश कसे काय देत आहोत ? त्यावेळी टिचींग पोस्ट, एमआरआय संदर्भातील बाबी तसेच इतर काही गोष्टी सांगण्यात आल्या होत्या. या सर्व गोष्टींची पूर्तता केल्याशिवाय मान्यता मिळणार नाही अशा प्रकारची माहिती देण्यात आली होती. यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न सुरु करण्यात आलेले आहेत. परंतु प्रत्येक वेळी काही ना काही कारणामुळे राज्याच्या बजेटमध्ये, वैद्यकीय शिक्षण विभागाला जेवढी तरतूद मिळावयास पाहिजे होती तेवढी तरतूद गेल्या दोन वर्षामध्ये मिळू शकलेली नाही. ही तरतूद या वर्षी मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येणार आहे. 3 वर्षापासून वैद्यकीय शिक्षणाची तरतूद वाढत आहे. आपण अर्थसंकल्प पाहिल्यास आपल्या लक्षात येईल की, नॉन प्लान व्यतिरिक्त प्लान खर्चामध्ये 20 कोटी पासून 60 कोटी रुपयांपर्यत व 60 कोटी रुपयांपासून आता 172 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. कोठल्याही परिस्थितीत शासकीय वैद्यकीय कॉलेजमध्ये सोयी सुविधा उपलब्ध करुन द्यावे हाच उद्देश यामागे होता. शासकीय वैद्यकीय कॉलेजमध्ये अंडर ग्रॅज्युएशन, पोस्ट ग्रॅज्युएशन,डीग्री, डिप्लोमा या कोर्सेकरिता असलेल्या जागांसाठी फॅसिलिटी देण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याचे काम शासनाने केलेले आहे. न्यायालयामध्ये ही बाब उपस्थित करण्यात आली होती. त्यावेळी विद्यार्थ्यांनी अशी मागणी केली होती की, अनरेकग्नाईज्ड कोर्सेसला प्रवेश दिलेला असल्यामुळे, प्रत्येक विद्यार्थ्याला 50 लाख रुपयांचे कॉंपन्सेशन देण्यात यावे.

यानंतर श्री. बरवड..

अशुद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ......

आता सरकारसमोर दोन प्रश्न होते. एक तर अनरेकग्नाईज जागांचे प्रवेश चालू ठेवावयाचे आणि कोर्टाचा निर्णय आल्यानंतर सगळ्यांना 50-50 लाख रुपये कॉम्पेंसेशन द्यावयाचे किंवा रेकग्नाईज जागांवरचे प्रवेश करावयाचे आणि अनरेकग्नाईज जागांवरचे प्रवेश सध्या काही काळासाठी डिफरकेशनमध्ये करावयाचे यासंदर्भात गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मेडिकल काऊन्सिल ऑफ इंडियाकडे प्रयत्न करावयाचे. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मेडिकल काऊन्सिल ऑफ इंडियाच्या लक्षात या बाबी आणून दिल्यानंतर, आजच मेडिकल एज्युकेशन खात्याचे सचिव दिल्लीला गेलेले आहेत आणि मेडिकल काऊन्सिल ऑफ इंडियाशी चर्चा करीत आहेत. ही सगळी बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. परंतु न्यायालयाने असा आदेश दिला की, आपण युनिव्हर्सिटी ऑफ मेडिकल हेल्थ, मेडिकल काऊन्सिल ऑफ इंडिया आणि गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र यांनी एकत्रित बसून आपण न्यायालयामध्ये प्रतिज्ञापत्र सादर केले पाहिजे. आता आपल्याकडे दोनच ऑप्शन्स आहेत. एक तर न्यायालयाचा निर्णय अजून प्रलंबित आहे. मेडिकल काऊन्सिल ऑफ इंडियाने अशी भूमिका घेतली की, आजपर्यंत सोळा सतरा वर्षे हे चालले आणि त्यामध्ये आम्ही फार काही टोकाची भूमिका घेतलेली नाही. आता न्यायालयाने ही बाब आपल्या निदर्शनास आणून दिलेली आहे. यामध्ये आता काही तरी कॉन्शस निर्णय करण्याची आवश्यकता आहे. आजच्या तारखेला जागा कमी झाल्या किंवा रद्द केल्या अशी परिस्थिती याच्यामध्ये नाही. यामध्ये आपण जे केलेले आहे त्यामध्ये ज्या रेकग्नाईज जागा आहेत त्याची पहिल्या टप्प्यामध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु केली. कारण आपल्याला माहीत आहे की, सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार पोस्ट ग्रॅज्युएशनच्या जागांचे स्टेट कोटा, ऑल इंडिया कोटा हे सगळे कोटे लक्षात घेतल्यानंतर 15 एप्रिलला त्याची प्रोसेस कोणत्याही परिस्थितीत सुरु व्हावयास पाहिजे. कदाचित आपण महिना दीड महिना पोस्ट ग्रॅज्युएशनची प्रवेश प्रक्रिया डिले करु शकलो असतो परंतु ते आपण केले नाही. कारण सुप्रीम कोटाच्या डायरेक्शन्स असल्यामुळे सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात आपल्याकडून कोणत्याही प्रकारची कृती घडू नये म्हणून आपण ज्या रेकग्नाईज जागा आहेत त्या जागांच्या संदर्भात प्रवेश प्रक्रिया सुरु केलेली आहे. यामध्ये दोन गोष्टी आहेत. यासंदर्भामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांशी सुध्दा बोलणे झाले.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

गेली तीन वर्षे मी सातत्याने मंत्रिमंडळामध्ये आणि सर्वत्र मेडिकल एज्युकेशन विभागासाठी जास्तीत जास्त बजेट कसे उपलब्ध होईल, या फॅसॅलिटिज कशा क्रिएट होतील यासंदर्भात सातत्याने आग्रह धरत आहे. आता बजेट कंस्ट्रेनमुळे आणि काही कारणांमुळे आमच्या काही गोष्टी जरी मागे राहिल्या तरी यातून मार्ग काढण्याच्या संदर्भात लवकर ही बाब मंत्रिमंडळासमोर घेऊन जात आहोत. ही बाब मंत्रिमंडळासमोर घेऊन गेल्यानंतर या सगळ्या कॉलेजेसमध्ये ज्या टिचिंगच्या डेफिशियंसीज असतील, ज्या इक्विपमेंटच्या डिफिशियंसीज असतील, कंस्ट्रक्शनच्या ज्या डेफिशियंसीज असतील त्या सगळ्या दुरुस्त करण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्याचा एक कालबध्द कार्यक्रम ठरवित आहोत. एकदा हा कालबध्द कार्यक्रम ठरविल्यानंतर यासाठी आवश्यक असणारा नियतव्यय उपलब्ध करुन देण्याची कमिटमेंट राज्य सरकारने दिली तर मग निश्चितपणे केंद्र सरकारकडे, मेडिकल काऊन्सिल ऑफ इंडियाकडे जाऊन आग्रह धरु. यामध्ये 16 वर्षे झाली आणि या 16 वर्षामधील काही कालावधी आपल्या सरकारचा आहे तसेच काही कालावधी आमच्या सरकारचा आहे. या सगळ्या गोष्टी आहेत पण यामध्ये जो एक लॅप्स आहे तो राहून गेलेला आहे. त्यामुळे आपल्याला या जागा रेकग्नाईज करावयाच्या असतील तर असलेल्या त्रुटी भरुन काढणे हा एक भाग आहे आणि त्रुटी भरुन काढेपर्यंत यामध्ये मेडिकल काऊन्सिल ऑफ इंडियाकडून एक्स्टेंशन मिळविणे हा दुसरा भाग आहे. यासाठी आवश्यकता वाटली तर सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे यामध्ये या राज्याकरिता आणि दुसऱ्या राज्यांकरिता अशा प्रकारचे नोटिफिकेशन केंद्र सरकाला काढावे लागले तरी तशा प्रकारची आग्रहाची विनंती निश्चितपणे केंद्र सरकारला करु. हा जो निर्णय आहे तो राज्य सरकारने सु-मोटो घेतलेला निर्णय नाही किंवा मेडिकल काऊन्सिल ऑफ इंडियाने कोणत्याही हेतूने घेतलेला निर्णय नाही. केवळ काही डॉक्टर्स कोर्टात गेल्यामुळे जी परिस्थिती निर्माण झाली त्यामुळे आज महाराष्ट्रासमोर ही परिस्थिती उभी राहिली आहे. मार्ड असेल, अंडर ग्रॅज्युएट किंवा सिनियर डॉक्टर्स असतील या सगळ्यांना या सभागृहाच्या माध्यमातून आग्रहाची विनंती आहे की, आपण संपावर जाऊन किंवा यासंदर्भात

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

कोणताही प्रोटेस्ट करुन यामध्ये विनाकारण हॉस्पिटलचे ॲडमिनिस्ट्रेशन डिस्टर्ब करणे, पेशन्ट्सची गैरसोय होईल असे वातावरण निर्माण होणे हे योग्य होईल असे मला वाटत नाही. यामध्ये मार्डने आपला नियोजित संप करण्याच्या संदर्भात सूचना दिलेली आहे. मार्डचे जे विद्यार्थी असतात ते पोस्ट ग्रॅज्युएट असतात.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

त्यामुळे त्यांच्यावर या निर्णयाचा परिणाम होणार नाही. परंतु अंडर पोस्ट ग्रॅज्यूएटस स्टुडंटसना पाठिंबा देण्याची जी भूमिका घेतलेली आहे ती भूमिका न्यायाच्या दृष्टीने बरोबर असली तरी, राज्य सरकारच्या बाजूने किंवा एमसीआयच्या बाजूने लॅप्स असले तरी त्यामुळे आजची परिस्थिती निर्माण झालेली नाही. या सर्व जागा रिकग्नाईज करण्यासाठी केंद्र सरकारकडे कॉंक्रीट कार्यक्रम घेऊन प्रयत्न करीत आहोत. त्याबाबतची सर्व आकडेवारी माझ्याकडे आहे. याही वर्षी काही कोर्सेस रिकग्नाईज करण्याच्या संदर्भामध्ये शासनाने एमसीआयकडे अर्ज केलेला आहे, त्यासाठी त्यांच्याकडे पैसे भरलेले आहेत. त्यांच्याकडून इन्सपेक्शनची टीम आल्यानंतर त्या कोर्सेसना मान्यता कशी मिळवावयाची यासाठी प्रयत्न करीत आहोत. म्हणून राज्य सरकार ने जो प्रयत्न केला पाहिजे त्यात कोणतीही कसूर ठेवलेली नाही. मग केंद्र सरकारच्या स्तरावर आवश्यकता वाटल्यास माननीय पंतप्रधानां भेटून विनंती करण्यात येईल. केंद्रीय आरोग्य मंत्री श्री.रामदास यांना विनंती करु. दिल्लीत महाराष्ट्रातील सर्व केंद्रीय मंत्री आहेत. महाराष्ट्रातील सर्व खासदार आहेत. माननीय मुख्यमंत्री आणि आम्ही तेथेपर्यंत जाऊन निश्चितपणे मार्ग काढण्याचा प्रयत्न करु.

सन्माननीय सदस्यांनी बाकीच्या सर्व गोष्टी सांगितल्या आहेत. माझी त्याला तयारी आहे. पण सीपीएस, डीएनबी यासंबंधी काय करु शकतो, रुल्स ऑफ रेग्युलेशन काय आहेत, कशाला परवानगी आहे, कशाला परवानगी नाही, त्या सर्व गोष्टी नियमानुसार तपासून घेऊ, आवश्यकता वाटल्यास या सभागृहातील माननीय सदस्यांबरोबर एखादी बैठक घेऊन त्यासंबंधी आपल्या काही सूचना असतील त्याचा विचार करुन त्याच्यातून मार्ग काढण्याचा आम्ही जरुर प्रयत्न करु. परंतु यावर्षी राज्य सरकारने कधी नव्हती इतकी 172 कोटींची तरतूद वैद्यकीय शिक्षण विभागासाठी केलेली आहे. त्याच्यातून मार्ग काढण्यासाठी वेळ लागेल. परंतु या सर्व विद्यार्थ्यांनी संप पुढे ढकलावा, स्थगित करावा आणि सरकारला मदत करावी. संप करुन त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यासंबंधी राज्य सरकार आणि वैद्यकीय शिक्षण विभाग गंभीर आहे. राज्यातील जागा कमी करुन दुस-या राज्याला दिल्या असा प्रश्न नाही. जागा देण्यासंबंधी किंवा खाजगी संस्था चालल्या पाहिजेत आहेत म्हणून या जागा कोणी तरी कमी करण्याचा प्रयत्न करीत आहे असेही नाही. याचे एकमेव कारण असे आहे की, गेल्या काही वर्षात या सर्व क्षेत्रामध्ये गुंतवणूक न

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

झाल्यामुळे ज्या त्रुटी राहिल्या, त्या त्रुटीमुळे स्टॅण्डर्ड ऑफ एज्यूकेशन असण्याच्या दृष्टीकोनातून आपल्याकडे काही अडचणी उभ्या राहिलेल्या आहेत. तरी सुध्दा स्टेट एमसीआयच्या नियमामध्ये सुधारणा करुन सरकारने या डॉक्टर्सना प्रॅक्टीस करण्याची परवानगी दिलेली आहे. जरी तो केंद्राचा कायदा असला तरी शासनाने सुधारणा करुन त्यांना सवलत दिली आहे. न्यायालयाचा 4-8 दिवसानंतर निर्णय लागेल. न्यायालयाचा निर्णय लागल्यानंतर त्याचे काही रिफरकेशन्स असतील ते पाहू. शासन केंद्र सरकारकडे प्रयत्न करणे सोडणार नाही. माझ्या दृष्टीकोनातून या सर्व अडचणीतून मार्ग निघू शकेल आणि तो मार्ग काढण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. म्हणून सगळयांनी या प्रश्नासाठी सहकार्याची भावना ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि रजा घेतो.

डॉ.दीपक सावंत : मंत्रिमहोदयांनी आता सांगितले की, 3 लोक कोर्टामध्ये गेले म्हणून हा प्रश्न निर्माण झाला आहे. हे 3 लोक 2008 मध्ये कोर्टात गेले आहेत. परंतु या प्रश्नाला 19 वर्षे झाली आहेत. मी गेली 3 वर्षे सातत्याने हा प्रश्न उपस्थित करीत आहे. त्यांनी दुर्दैवाने कालबध्द कार्यक्रम दिलेला नाही. एमसीआयने मार्डच्या लोकांना संप मागे घ्यावा असे सांगितले आहे. कोर्टाचा निर्णय 8 दिवसात लागणार असेल तर पुढील 15 दिवसामध्ये 2001 मध्ये 1900 सीट होत्या, त्या रिस्टोअर करण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाशी चर्चा करुन एमसीआयकडे गेले पाहिजे. आपण 4 प्रतिनिधींना महाराष्ट्रातून निवडून देतो, त्यांची जबाबदारी नाही काय ? पुढील 8 दिवसाच्या संदर्भात आपण आश्वासन देणार काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : विधानसभेचे अधिवेशन 25 तारखेला संपणार आहे. अधिवेशन संपल्यावर 28 तारखेला वर्किंग डे आहे. त्यादिवशी मी दिल्लीला जाईन. सध्या संसदेचे अधिवेशन सुरु आहे. त्यामुळे सर्व संबंधित लोक भेटू शकतात. दरम्यानच्या काळामध्ये एमसीआयचे चेअरमन आणि सर्व सदस्यांबरोबर चर्चा करण्यात येईल आणि प्रवेशासाठी दुसरा राऊंड करावयाचा असेल तर त्यासाठी अजूनही महिना दीड महिन्याचा कालावधी आहे. रिकग्नाईज कोर्सेसचे प्रवेश सुप्रीम कोर्टाच्या डायरेक्शन्सप्रमाणे असल्यामुळे ते सुरु राहू द्यावेत.

नंतर श्री.गिते........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

त्या जागा टाईम बाऊन्ट कालावधीत रिस्टोअर करण्याचा निश्चितपणे आपण प्रयत्न करु.

**तालिका सभापती** : साधारणत: या 1900 जागा आहेत.

श्री. दिलीप वळसे पाटील : सन्माननीय सदस्यांनी 1900 जागाचा उल्लेख केला. परंतु 1900 जागा कधीच नव्हत्या. त्या प्रत्यक्षात 1100 जागा होत्या. 1100 जागांपैकी शासन, कॉर्पोरेशन, खाजगी वैद्यकीय महाविद्यालये ज्यांचे प्रवेश शासनाच्या प्रोसेसप्रमाणे होतात. त्या जागा 826 आहेत आणि मान्यताप्राप्त 194 अशा एकूण 1020 जागा त्यामध्ये कमी झाल्या आहेत. मीरज मध्ये जागा कमी झाल्या आहेत. आय.जी.एम.सी.च्या काही जागा आहेत. लातूर, अकोला आणि कोल्हापूर येथे तीन नवीन वैद्यकीय महाविद्यालये काढण्यात आली . त्यामुळे कर्मचारी इकडे तिकडे झाल्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

डॉ.दीपक सावंत : आय.जी.एम.पी.च्या 45 जागा कमी झाल्या आहेत. के.ई.एम.हॉस्पीटलच्या 56 जागा कमी झाल्या आहेत. जे.जे.हॉस्पीटलच्या 35 जागा कमी झाल्या आहेत. बी.एम.सी.च्या 32 जागा कमी झाल्या आहेत. मीरज मेडीकल कॉलेजमधील 13 जागा कमी झाल्या आहेत. आंबेजोगाईच्या वैद्यकीय महाविद्यालयातील 20 जागा कमी झाल्या आहेत. जी.एम.सी.नागपूरच्या 9 जागा कमी झाल्या आहेत. औरंगाबाद वैद्यकीय महाविद्यालयातील 9 आणि पुणे वैद्यकीय महाविद्यालयाच्या 16 जागा कमी झाल्या आहेत.

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ सकाळी 11.00 वाजेपर्यंत होती. परंतु ही चर्चा पूर्ण होईपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. दिलीप वळसे पाटील : मी सन्माननीय सदस्यांना मघाशीच सांगितले आहे की, याबाबतची आपण एकत्र बसू आणि चर्चा करु. आपल्या काही सूचना असतील त्या पुन्हा ऐकून घेतल्या जातील. कारण याबाबतीत पुढे येण्याचा आपण प्रयत्न करु. कारण या राज्याचा हिताचा हा विषय आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय असे म्हणाले की, डॉक्टरांचा संप चालू आहे. हा विषय ऐरणीवर आल्यासारखा झाला आहे. राज्यातील पोस्ट ग्रज्युएट डॉक्टरांवर अन्याय होतो आहे अशी एक प्रकारची त्यांच्यामध्ये भावना निर्माण झाली आहे. या

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

विषयाला महाराष्ट्रातील सर्व जनतेची सहानुभूती आहे. वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या आपल्या पाल्याचे भविष्यात काय होणार असा प्रश्न पालकांमध्ये निर्माण झाला आहे. अधिवेशन 25 मार्च पर्यंत आहे. परंतु अधिवेशन कालावधीत महाराष्ट्रातील अनेक माननीय मंत्री महोदय अनेक वेळा दिल्ली येथे जातात. मी माननीय महसूल मंत्र्यांविषयी बोलत नाही. माननीय श्री. अशोक चव्हाण आज दिल्लीमध्ये आहेत. त्यांना कामधंदा नाही म्हणून दिल्ली येथे जातात काय याची मला माहिती नाही. हा अत्यंत तातडीचा विषय आहे, शासकीय रुग्णालयांमध्ये गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.त्यामुळे हा विषय घेऊन आपण तातडीने दिल्ली येथे गेलात तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला तर जनतेमध्ये आपल्या विषयी चांगला मॅसेज जाईल. सरकार एवढे दक्ष आहे की, अधिवेशन चालू असताना देखील हा विषय सोडविण्यासाठी दिल्ली येथे गेले..

श्री. दिलीप वळसे पाटील : वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव दिल्ली येथे गेले आहेत. आज सायंकाळपर्यंत ते तेथे आहेत. या संदर्भात काय मार्ग निघतो याची आपणाला सायंकाळपर्यंत माहिती मिळेल. आवश्यकता असेल आणि सन्माननीय सदस्यांनी मला नियम 93 खाली या ठिकाणी अडकवून ठेवले नाही तर मी उद्या दिल्ली येथे जाईन.

डॉ. एन.पी.हिराणी : मी वाहतुकीत अडकल्यामुळे या महत्वाच्या चर्चेत पूर्णपणे सहभाग घेऊ शकलो नाही. मला माननीय मंत्री महोदयांना एक, दोन प्रश्नाच्या बाबतीत माहिती विचारावयाची आहे. या विषयाच्या बाबतीत सुध्दा विदर्भावर मोठया प्रमाणात अन्याय होत आहे. पोस्ट ग्रज्युएटीच्या जागा विदर्भात मोठया प्रमाणात कमी झाल्या आहेत. त्याची कारणे शोधली तर असे लक्षात येते की, आय.जी.एम.सी.मध्ये इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध नाही. तसेच जागेची कमतरता आहे. कन्स्ट्रक्शन करण्यास त्या ठिकाणी वाव नाही. हॉरिजंटली आपण जाऊ शकत नाही. व्हर्टिकली गेल्याशिवाय त्या ठिकाणी काम करता येत नाही. शासनाने कबूल केले आहे की, आम्ही व्हर्टिकल प्रमाणे जाऊन त्या ठिकाणी सोय करु. परंतु त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची सोय झालेली नाही. 1900 वरुन 411 जागा झाल्या आहेत. दरवर्षी हा प्रश्न सभागृहात चर्चेला येत असतो. या विषयाच्या बाबतीत इन्फ्रास्ट्रक्चर हे अत्यंत महत्वाचे आहे. त्या ठिकाणी निवासी वैद्यकीय अधिकारी नसतील तर रुग्णांची व्यवस्थित काळजी घेतली जात नाही. त्या ठिकाणी एकटे प्रोफेसर काम करु शकत नाहीत. त्यांच्यावरील कामाचा लोड वाढेल. हे

3...



ABG/ KGS/ KTG/ SBT/ KTG/ प्रथम श्री. खंदारे 11:00

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. हिराणी...

प्रोफेसर सेवा सोडून निघून जातील अशी भयानक परिस्थिती त्या ठिकाणी निर्माण होईल. पोस्ट ग्रज्युएशनसंदर्भात इन्फ्रास्ट्रक्चर आपण गेली अनेक वर्षे डेव्हलप करु शकलो नाही ही एक शोकांतिका आहे. या विषयाच्या बाबतीत शासनाने अत्यंत गंभीरपणे तातडीची पाऊले उचलून इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करणे आवश्यक आहे. जो पर्यंत इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप होत नाही तो पर्यंत हा प्रश्न सुटू शकत नाही. इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटची कामे शासनाकडून तातडीने हाती घेण्यात येतील काय ?

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, आयजीएमसी च्या संदर्भात व्हर्टीकल एक्सपान्शन करण्यासाठी निविदा प्राप्त झालेल्या आहेत. राज्य शासनाने या मेडिकल कॉलेजच्या बांधकामासाठी स्पेशल केस म्हणून 2.5 एफएसआय देण्याची भूमिका घेतलेली आहे. बांधकामाच्या संदर्भातील एक दोन छोटया-मोठया गोष्टी सोडल्या तर याबाबतीत एक आठवडयात निर्णय घेऊन मेडिकल कॉलेजच्या व्हर्टिकल एक्सपान्शनच्या कामाला सुरुवात करण्यात येईल.

**तालिका सभापती** (श्री. अरविंद सावंत) : ही अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.45 वा. भरेल.

( सभागृहाची बैठक 11 वाजून 6 मिनिटांनी स्थगित झाली. )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ **स्थगितीनंतर** 11:45

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

नियम 289 च्या प्रस्तावासंबंधी

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंबंधी नियम 289 अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. थोडक्यात त्यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. सुदैवाने महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. यावर्षी महाराष्ट्रामध्ये खताचा प्रचंड तुटवडा निर्माण झालेला आहे. प्राप्त झालेल्या माहितीनुसार केंद्र शासनाने अर्थसंकल्पात खत कारखान्यांना सबसिडी देण्यासाठी 90 हजार कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केलेली असताना फक्त 31 हजार कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. 60 हजार कोटी रुपयांची तरतूद झालेली नाही. त्यामुळे खत कारखान्यांनी खताचे उत्पादन बंद केले आहे. चार खत कारखाने बंद झालेले आहेत. मागील तीन वर्षात खत कारखान्यांना सबसिडी न देता त्यांना पोस्टाचे बॉण्ड देण्यात आले. सबसिडीचे अनुदान रोख स्वरुपात दिले गेले नाही. त्यामुळे त्यांचे व्याजाचे नुकसान होत आहे. परिणामी कारखान्यांनी खताचे उत्पादन बंद केलेले आहे. राज्याची खताची जी गरज आहे त्यापैकी 10 टक्के खत आलेले आहे. 21 मे पर्यंत राज्यातील काही शेतकरी पेरणीपूर्व खत आपल्या घरात आणून ठेवतात. 7 जून रोजी पेरणीला सुरुवात होते. परंतु फक्त 10 टक्के खत आलेले आहे. 20:20:0 डीएपी, युरिया खत कमी प्रमाणात आलेले आहे. भारत सरकारची जी आय.पी.एल.कंपनी आहे त्या कंपनीकडे राज्य सरकारला खताची नोंदणी करावी लागते. गुजराथ, मध्यप्रदेश, पंजाब, हरियाणा आदी राज्यांनी नोंदणी करुन पैसे भरले आहेत. परंतु महाराष्ट्र सरकारने एक नवा पैसा आय.पी.एल.कंपनीकडे भरलेला नसल्यामुळे खत उपलब्ध झाल्यानंतर त्या राज्यांना प्राधान्याने पुरवठा केला जाईल. महाराष्ट्राला विलंबाने खत पुरवठा होईल. मागील वर्षी देखील हाच प्रकार घडला होता. आर.सी.एफ.कंपनीने 20:20:0 प्रकारच्या खताचे उत्पादन बंद केले आहे. सबसिडीचा विषय हा अत्यंत गंभीर बनला आहे. मागील वर्षी फक्त 5 टक्के खताचे उत्पादन केलेले होते. त्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. खरीपाचा हंगाम समोर आलेला आहे. शेतकऱ्यांना रासायनिक खत मिळाले नाही तर पेरणी करता येणार नाही. म्हणून या गंभीर विषयावर सभागृहात चर्चा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

झाली पाहिजे. महाराष्ट्र सरकारने खताच्या मागणीपोटी 300 कोटी रुपये भरणे आवश्यक होते. परंतु एक नवा पैसा भरलेला नाही. अशा परिस्थितीत खत मिळणार कुठून? कंपन्यांनी खताचे उत्पादन बंद केले आहे. हा चिंतेचा विषय बनलेला आहे. या विषयावर चर्चा झाली पाहिजे. सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन या राज्यातील अन्नदाता शेतकऱ्यांची खताची मागणी लक्षात घेऊन या विषयावर चर्चा झाली पाहिजे. महाराष्ट्रामध्ये फक्त 10 टक्के खताचा साठा आलेला आहे. खतासाठी यापुढे संघर्ष निर्माण होणार आहे. व्यापारी अडचणीत येणार आहेत. शेतकरी रस्त्यावर येणार आहेत. मागच्या वर्षाप्रमाणे युरियाचे खताची वाहतूक करणारे ट्रक लुटले जातील. अशा परिस्थितीत या गंभीर विषयावर सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला सारुन चर्चा व्हावी अशी मी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मागणी करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी तातडीच्या विषयासंबंधी चर्चा व्हावी अशी मागणी केली आहे. आजपर्यंत या सदनामध्ये शेतकऱ्यांसाठी आपण जी न्यायभूमिका घेतली त्यामुळे आपल्यासमोर ही भूमिका मांडण्यास आम्हाला अधिक बरे वाटते. आपण या विषयाची तातडी समजू शकता. खतासंबंधी जी लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला आली होती त्यावेळी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, मिश्र खतामध्ये होत असलेली भेसळ लक्षात घेता मिश्र खतावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी उठून बोलले होते की, माझ्या शेतात मी कोठून खत आणू, इतकी गंभीर परिस्थिती आहे. आज राज्यात नेहमीपेक्षा फक्त 10 टक्के एवढाच कोटा आलेलाआहे आणि मे महिना सुरु झाल्यानंतर शेतकरी खताचा साठा आपल्या घरात करुन ठेवतात त्यावेळी तर आणखीच गंभीर परिस्थिती निर्माण होणार आहे. म्हणून माननीय मुख्यमंत्री सुध्दा सभागृहात उपस्थित आहेत व त्यांनी या गंभीर परिस्थितीचा विचार करावा, अशी मी विनंती करतो. हा प्रश्न केवळ खतांच्या बाबतीत मर्यादित नाही तर लगेच बी-बियाण्याचाही विषय पुढे येणारच आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, आयपीएल कंपनीकडे पैसे भरलेले नसल्यामुळे त्या कंपनीकडून खताचा पुरवठा होऊ शकणार नाही. त्यामुळे आणखीच भयावह परिस्थिती राज्यात निर्माण होणार आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांच्या बाबतीत आपल्या राज्यात काय परिस्थिती आहे हे आपणा सर्वांनाच माहीत आहे. या परिस्थितीचा विचार करता यासंबंधी तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे.

श्री. पाशा पटेल : महोदय, आमच्या जिल्ह्यात जवळपास 50 हजार टन खताची गरज असते परंतु फक्त 5 हजार टन इतकाच साठा आम्हाला मिळणार आहे त्यामुळे शेतकरी अस्वस्थ आहे. अन्नधान्य आम्हीच पिकवितो, वाटल तर त्याला भाव देऊ नका पण अगोदर आम्हाला माल तर पिकवू द्या. अन्यथा शेतकरी......अडथळा ..........अशा प्रकारे मी शासनाला धोक्याचा इशारा देत आहे, त्यातून तुम्हाला सावध व्हावयाचे की नाही हा आपला प्रश्न आहे. म्हणून सभागृहासमोरील सव्र कामकाज बाजूला करुन या महत्वाच्या विषयावर चर्चा घडवून आणावी, अशी मी विनंती करतो.

श्री. विलासराव देशमुख : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अतिशय महत्वाचा विषय सभागृहात उपस्थित केला आहे आणि ही गोष्ट खरी आहे की, केंद्रशासनाने सुध्दा विशिष्ट प्रकारची खते उपलब्ध करुन देऊ शकणार नाही असे राज्याला कळविले आहे. आणि राज्य शासनाने स्वतंत्रपणे बाहेरुन ही खते आयात करावीत, अशाही सूचना शासनाला दिलेल्या आहेत. त्यानुसार राज्य शासनाने एमएआयडीसीला परवानगी दिली असून त्यांच्या मार्फत ही सर्व खते आयात करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. इतर बाबतीत जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यासंदर्भात केंद्रीय कृषी मंत्री सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. तरी देखील यासंदर्भातील निवेदन शासनाच्या वतीने उद्याच सभागृहात केले जाईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**यवतमाळ जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती माध्यमिक आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांच्या वेतन अनुदानाबाबत**

**(1) * 37395 श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे : दिनांक 23 नोव्हेंबर, 2007 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक 21 नोव्हेंबर, 2007 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक 34360 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) यवतमाळ जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळातील शिक्षक कर्मचाऱ्यांचे माहे ऑक्टोबर, 2007 चे वेतन देयक जिल्हा कोषागार कार्यालय, यवतमाळ येथे दिनांक 30 नोव्हेंबर, 2007 रोजी सादर केले आहे काय,

(2) असल्यास, माहे नोव्हेंबर, 2007 ते फेब्रुवारी, 2008 च्या वेतनाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) व (2) यवतमाळ जिल्ह्यातील विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांच्या आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे फेब्रुवारी, 2008 पर्यंतचे वेतन अदा करण्यात आले आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : महोदय, यवतमाळ जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आश्रमशाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांच्या वेतनासंबंधीचा हा प्रश्न असून या आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांचे 12 महिन्यांचे वेतन वर्षातून तीन ते चार वेळा म्हणजेच तीन तीन महिन्यातून एकदा असे एकत्रित वेतन शिक्षकांना देण्यात येते. ही पध्दती थांबली पाहिजे आणि दर महिन्याच्या एक तारखेलाच त्यांचे वेतन खात्यावर जमा झाले पाहिजे. एक तारखेला शक्य नसल्यास दोन तीन दिवस मागे पुढे परंतु दर महिन्याला जमा झाले पाहिजे. आता देखील माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे की, फेब्रुवारी, 2008 पर्यंतचे वेतन देण्यात आलेले आहे. परंतु केवळ प्रस्ताव पाठविणे म्हणजे वेतन देणे असे नव्हे तर त्या शिक्षकांच्या प्रत्यक्ष खात्यावर जमा झाले पाहिजे. हा प्रश्न केवळ यवतमाळ जिल्ह्यापुरता मर्यादित नाही तर संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, फेब्रुवारी, 2008 मध्ये वेतन अदा केल्याचे उत्तरात म्हटले त्यानुसार किती शाळांना हे वेतन अदा केले आणि प्रत्यक्षात कोणत्या तारखेला शिक्षकांच्या खात्यावर जमा झालेले आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 37395** .......

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यार्थ्यांच्या 70 आश्रमशाळतील शिक्षकांचे पगार फेब्रुवारी पर्यंत करण्यात आलेला असून 70 शाळांच्या शिक्षकांची माहिती येथे देण्यास बराच वेळ जाईल त्यामुळे मी ही सर्व माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, फेब्रुवारी पेड इन मार्च या महिन्याचा पगार किती तारखेला खात्यात जमा झालेला आहे?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, 31.3.2008 रोजी या शिक्षकांचे पेमेंट करण्यात आलेले आहे.

श्री. विक्रम काळे : व्हीजेएनटीच्या आश्रमशाळेतील शिक्षकांचे पगार 10 तारखेला होत असतात परंतु या शिक्षकांना पगार महिना संपून जातो तरी मिळत नाही असा प्रकार वर्षभरापासून सुरु आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, व्हीजेएनटी आश्रमशाळेतील शिक्षकांचे पगार जास्तीतजास्त 10 तारखेला होण्यासाठी शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : 70 व्हीजेएनटी आश्रमशाळेतील शिक्षकांचे पगार फेब्रुवारी महिन्यात करण्यात आलेले असून या संदर्भातील सर्व माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, व्हीजेएनटी आश्रमशाळेतील शिक्षकांचे पगार 3-3,4-4 महिन्यातून एकदा होत असते. अशा प्रकारे एकदम पगार दिला तर एकदम एवढी रक्कम हातात येते व त्याचा हिशोब ठेवणे यांना सोपे जाते त्यामुळे व्हीजेएनटी आश्रमशाळेतील शिक्षकांचे पगार दर महिन्याच्या ठरावीक तारखेत होण्यासाठी म्हणजे 1 ते 10 तारखेमध्ये होण्यासाठी शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या विभागाची जबाबदारी तात्पुरती माझ्याकडे आलेली आहे. या विभागाच्या अनेक तक्रारी राज्य शासनाकडे आलेल्या आहेत. अनेक आश्रमशाळांना मंजुरी देण्यात आलेली असून ब-याच वर्षापासून या आश्रमशाळेत शिक्षक काम करीत आहेत. परंतु बजेट रिलीज करतांना प्रत्येक वेळी विलंब लागतो. शिक्षकांचे पगार वेळेवर होण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने सेटअप बसवलेला असल्यामुळे त्यांना कोणत्याही अडचणी येत नाहीत. शालेय

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 37395** .......

श्री. विलासराव देशमुख....

शिक्षण विभागाने जी पध्दत डेव्हलप केलेली आहे तशी व्यवस्था या विभागासाठी करण्याबाबत सूचना द्याव्या लागतील. व्हीजेएनटी आश्रमशाळेतील शिक्षकांचे पगार वेळेवर करण्यासाठी आपल्याला शालेय शिक्षण विभागासारखी वेगळी व्यवस्था करावी लागणार आहे. शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर आश्रमशाळेच्या शिक्षकांचे पगार वेळेवर होण्यासाठी मी स्वत: लक्ष घालणार आहे.

----------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कल्याण रेल्वे स्टेशन परिसरातील वाहतूकीचा प्रश्न सोडविण्यासाठी सॅटीस प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत**

**(२) * ३८८५३ श्री. शरद रणपिसे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुधाकर गणगणे : दिनांक २३ नोव्हेंबर, २००७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक २१ नोव्हेंबर, २००७ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक ३५३३० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे स्टेशन परिसरातील सॅटीस प्रकल्पाप्रमाणेच कल्याण रेल्वे स्टेशन परिसरातील वाहतूकीचा प्रश्न सोडविण्यासाठी सॅटीस प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून मागणी व पाठपुरावा केला जात असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प अहवाल माहे जानेवारी, २००८ मध्ये अपेक्षित आहे, हे देखील खरे आहे काय,

(३) सदर प्रकल्प एमएमआरडीएच्या अनुदानातून पूर्ण करण्यात येणार आहे, हे देखील खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पातील महत्वाच्या बाबी कोणत्या आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय.

(२) सदर प्रकल्पाकरीता सल्लागाराची नेमणूक कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने केली असून त्याचा अहवाल महानगरपालिकेकडून अपेक्षित आहे.

(३) सदर प्रकल्प हा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणार असून त्यास आर्थिक अनुदान मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून देण्यात येईल.

(४) सदर प्रकल्पात कल्याण स्टेशनच्या पश्चिमेला उन्नत पादचारी मार्ग (स्काय वॉक) बांधणे प्रस्तावित आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, या प्रकल्पासाठी जो सल्लागार नेमला होता त्यांनी आपला अहवाल शासनाला दिलेला आहे काय? कल्याण-डोंबिवली महापालिकेस त्यांनी एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवडयात अहवाल सादर केलेला आहे अशी माझी माहिती आहे. या आठवडयात महानगरपालिका हा अहवाल एमएमआरडीएला सादर करील अशीही माझी माहिती आहे. त्यामुळे या अहवालात कोणत्या शिफारशी सादर करण्यात आलेल्या आहेत याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. तसेच कल्याण स्टेशनच्या परिसरात नेहमी वाहतुकीची कोंडी होत असते त्यामुळे या ठिकाणची वाहतुकीची कोंडी सोडवण्यासाठी टाईम बाऊंड कार्यक्रम आखला जाणार आहे काय?

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 38853** .......

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, एमएमआरडीएच्या वतीने एमएमआर रीजन मधील रेल्व स्टेशन्संना सॅटीस आणि रेल्वे ट्रॅफिक इम्प्रुव्हमेंट स्कीमच्या माध्यमातून 50 स्टेशन्स घेण्यात आलेली आहेत. या योजनेत कल्याण स्टेशनचा सुध्दा अंतर्भाव आहे. या कामाचे कन्सलटंट श्री. भोबे यांनी 32.47 कोटी रुपयांचे एस्टिमेट तयार केलेले आहे. या ठिकाणी जनरल अरेंजमेंट ट्रॅफिक रिपोर्ट एक आठवडयाच्या आत सबमीट केला जाईल असे कमिशनरांनी सांगितलेले आहेत. तसेच 100 टक्के निधी एमएमआरडीए कडून मिळेल. कल्याण स्टेशनवर वाहतुकीची मोठया प्रमाणात कोंडी होत असते. ही कोंडी दूर करण्यासाठी 600 मिटर लांबीचा आणि 4 मिटर रुंदीचा एक पादचारी पूल येथे केला जाणार आहे.

-----

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औरंगाबाद जिल्ह्यात शाळांना संगणक व संगणक प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३) * ३७८४५ श्री.विक्रम काळे , श्रीमती उषाताई दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात ६०४ शाळांना ३ कोटी २० लक्ष रुपयांचे संगणक व संगणक प्रयोगशाळा जिल्हा परिषदेने उपलब्ध करुन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विज जोडणी नसतांनाही शाळांना संगणक देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तद्नुसार विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण मिळावे म्हणून शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ,प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता** : (१) होय, सन २००४-०५ यावर्षी ही घटना झालेली आहे.

(२) काही शाळांना विज जोडणी नसतांना संगणक देण्यात आल्याचे तपासणीमध्ये निदर्शनास आले आहे.

(३) संगणक पुरविलेल्या शाळांमधील शिक्षकांना संगणकाचे प्रशिक्षण घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांनुसार, प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिक्षकांनी त्या त्या शाळेतील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण द्यावयाचे आहे.

श्री.विक्रम काळे :सभापती महोदय, ज्या शाळांना वीज पुरवठा करण्यात आलेला नाही अशा शाळांना २००४-२००५ सालात संगणकाचे वाटप करण्यात आलेले होते. या संगणकाचे वाटप करुन आता तीन वर्षे होऊन गेलेली आहेत. मला माननीय मंत्री महोदयांना दोन स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचे आहेत. आतापर्यंत ज्या शाळांना संगणकाचे वाटप केलेले आहे त्याना वीज पुरवठा केलेला आहे काय आणि ज्या शाळांना संगणक दिले होते त्या शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षित केले आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, २००४-२००५ या कालावधीमध्ये ६०४ उच्च प्राथमिक शाळांना सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाअंतर्गत संगणकाचे वाटप करण्यात आलेले आहे. ग्राम शिक्षण समितीने हा निर्णय घ्यावयाचा असून ६०४ शाळांसाठी ग्राम शिक्षण सभेने ५० हजार रुपयास एक संगणक या प्रमाणे संगणक घेण्याचा निर्णय घेतला आहे . त्यावेळी. आठ शाळांना विद्युत पुरवठा करण्यात आलेला असून ११४५ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या शाळांमध्ये संगणक देण्यात आलेले आहेत म्हणून त्यांना वीज पुरवठा केला पाहिजे असे नाही तर महाराष्ट्रातील सर्वच शाळांना वीज पुरवठा करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी वीज पुरवठा केला जावा अशा प्रकारे हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे. त्यामुळे सर्व शाळांमध्ये विद्युत पुरवठा करणे आवश्यक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३७८४५ श्री.दिवाकर रावते ...

आहे.या शाळांना दिवसा वीज लागते तेव्हा सर्व शाळांना तातडीने वीज पुरवठा करण्यासंबंधीचा कार्यक्रम अंमलात आणणार आहात काय , कोणत्या पध्दतीने हा कार्यक्रम अंमलात आणला जाणार आहे त्याच प्रमाणे किती कालावधीमध्ये संपूर्ण राज्यातील वसतीगृहे आणि आश्रमशाळा सहित सर्व शाळांना विद्युत पुरवठा करण्यात येणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सर्व शाळांना तातडीने विद्युत पुरवठा करण्यासंबंधी सूचना देण्यात आलेल्या आहेत पुढील वर्षी शाळा सुरु होण्यापूर्वी हे काम पूर्ण होईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या शाळांना संगणकाचे वाटप करण्यात आलेले आहे परंतु अजूनही किती शाळा संगणकाविना आहेत.? त्याचप्रमाणे एक संगणक ५० हजार रुपयाला खरेदी करण्यात आल्याचे माननीय मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. बाजार भावा पेक्षा ही किंमत जवळजवळ दुप्पट आहे. आमदार निधीतून ज्यावेळी संगणक दिले जातात त्यावेळी सुध्दा बाजार भावापेक्षा दुप्पट किंबहुना तिप्पट किंमतीला संगणक दिले जातात. तेव्हा संगणकाचे वाटप करीत असतांना रेट कॉन्ट्रॅक्ट व्हेरिफाय करण्यात येणार आहे काय ? त्याचप्रमाणे सध्या दुप्पट किंमतीला हे संगणक खरेदी करण्यात आलेले आहेत त्या किंमतीमध्ये दोन संगणक खरेदी करता येतील तेव्हा रेट कॉन्ट्रॅक्ट व्हेरिफाय करण्यात येणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत ५० हजार रुपयाप्रमाणे ंसगणकासाठी शाळेला अनुदान दिले आहेत. या कार्यक्रमाअंतर्गत अकरा साहित्य खरेदी करण्याचे ठरलेले असून ग्राम शिक्षण समितीने यासंबंधीचा निर्णय घ्यावयाचा असतो ग्राम शिक्षण समितीने ६०४ संगणक खरेदी करण्याचा ठराव केला होता व त्याप्रमाणे संगणक खरेदी करण्यात आले आहेत. या संगणकाची किंमत जास्त आहे किंवा नाही याची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल त्याचप्रमाणे ज्याचे रेट कॉन्ट्रॅक्ट कमी दराचे असतील त्यांच्या मार्फत संगणकाची खरेदी करण्यात यावी अशी सूचना दिली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**झोपडपट्टी पुनर्विकास मंडळाचे मुख्यअधिकारी श्री.चंद्रशेखर यांना पदावरुन दूर केल्याबाबत**

**(4) * 37542 श्री. मधुकर चव्हाण, श्री. विनोद तावडे, श्री. संजय केळकर, श्री. रामनाथ मोते** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नुकतीच नेमणुक झालेले झोपडपट्टी पुनर्विकास मंडळाचे मुख्यअधिकारी श्री.चंद्रशेखर यांनी झोपडपट्टी पुनर्विकासाच्या सुमारे 105 योजना नामंजूर केल्या, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, त्यामुळे श्री.चंद्रशेखर यांना त्यांच्या असलेल्या पदावरुन दुर करण्यात आले, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, श्री.चंद्रशेखर यांनी पुनर्विकासाच्या योजना नामंजूर करण्यामागची कारणे कोणती ?

**श्री.विलासराव देशमुख** : (1) हे खरे नाही.
(2) हे खरे नाही.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, म्हाडाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी असलेल्या श्री.चंद्रशेखर यांच्या बाबतीतील हा प्रश्न आम्ही विचारलेला आहे तो प्रशासकीय माहिती मिळावी म्हणून नाही तर हे एक सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे पद आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील म्हाडाच्या संदर्भात रस घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू केलेला आहे आणि त्यातच धारावीचा पुनर्विकास योजना ही कोट्यवधी रूपयांची असल्याने त्याला आणखी महत्त्व आलेले आहे. त्यासाठी तेथे पूर्वी श्री.चक्रवर्ती म्हणून वेगळे अधिकारी होते. आता माननीय मुख्यमंत्र्यांनी झोपडपट्टी पुनर्विकासाबाबत एक चांगला निर्णय घेऊन 245 ऐवजी 360 चौ.फूटाची जागा देण्याचे जाहीर केले आहे. त्यानंतर म्हाडाच्या योजना, गृहनिर्माणाची सर्वंकष योजना आहे. तर अशा या तिन्ही योजना श्री.चंद्रशेखर प्रभावीपणे सांभाळू शकतील काय ? हाही प्रश्न निर्माण झालेला आहे. सध्या त्यांच्या जागी दुसरा कोणी अधिकारी आहे की नाही ? तेथील दैनंदिन कामकाज, भ्रष्टाचाराची प्रकरणे, जनतेच्या तक्रारी असतील त्याबाबत कोण काम पाहत आहे ? तेथे श्री.चंद्रशेखर आहेत की त्यांचा राजीनामा आपण स्वीकारलेला आहे ? त्यांचे पद हे जनतेशी संबंधित असलेले, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे पद असल्याने ही तिन्ही पदे एकाच माणसाकडे असल्यास तो त्यांना प्रभावीपणे न्याय देऊ शकेल काय ? त्यासाठी ते काम करू शकतील काय ? याबाबत म्हाडामध्ये आज त्यांची नेमकी स्थिती काय आहे ?

..... एस 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37542 ....

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, एसआरए योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे पूर्वी श्री.देवाशीष चक्रवर्ती होते आणि त्यांची नेमणूक निवडणूक अधिकारी म्हणून झाली त्यामुळे त्यांचे पद रिक्त झाले. त्यांना त्या पदावरून काढून टाकले असे म्हणणे म्हणूनच योग्य होणार नाही. निवडणूक आयोगाने त्यांची नेमणूक केली आणि त्यांनी तो पदभार स्वीकारलेला आहे. त्यामुळे त्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.चंद्रशेखर यांच्याकडे त्या पदावर नवीन माणसाची नियुक्ती होईपर्यंत आपण दिलेला होता. आता त्या पदावर श्री.श्रीकांत सिंग हे नियुक्त झाले आहेत त्यामुळे केवळ म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून तेथे आता श्री.चंद्रशेखर काम करीत आहेत.

***

....... एस 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पंढरपूर (जि.सोलापूर) शहरातील झोपडपट्टीतील नगरपालिकेच्या सार्वजानिक शौचालयांची झालेली दुरावस्था**

**(5) * 40191 श्री.सय्यद पाशा पटेल** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पंढरपूर (जि.सोलापूर) शहरातील झोपडपट्टीतील नगरपालिकेच्या सार्वजनिक शौचालयांची अपुरी देखभाल व पाण्याच्या टंचाईमुळे दुरावस्था झाली असून, जवळपास 90 टक्के शौचालये वापराअभावी बंद अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, 2008 च्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत अनेक तक्रारी तेथील नागरिकांनी केल्या असल्याचेही उघडकीस आले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा कार्यान्वित आहे,
(4) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1), (2), (3) व (4) नगरपरिषदेची सार्वजनिक शौचालये चालू स्थितीत असून त्यांचेसाठी पाण्याची व्यवस्था आहे. तथापि, सुलभ इंटरनॅशनल या संस्थेच्या अधिपत्याखालील शौचालयांची देखभाल व दुरुस्ती अभावी दुरावस्था झाली आहे. याबाबत नगरसेवक व नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या अनुषंगाने शौचालयाच्या दुरावस्थेबाबत पंढरपूर नगरपरिषदेने सुलभ इंटरनॅशनल संस्थेस कळविले आहे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, पंढरपूर सारख्या तीर्थक्षेत्र असणाऱ्या शहराशी संबंधित असा हा प्रश्न आहे. संपूर्ण देशातील वारकरी येथे येत असतात आणि या गावातील सगळ्या शौचालयांची अवस्था अत्यंत वाईट अशी झालेली आहे आणि हे येथे मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. वास्तविक पाहता किमान जी आपली धार्मिक स्थळे आहेत तेथे तरी अशी सार्वजनिक शौचालये, स्वच्छतागृहे यांची व्यवस्था चांगली असली पाहिजे, ठेवली गेली पाहिजे. तेव्हा किती दिवसात येथील सगळी शौचालये दुरूस्त केली जातील आणि शासनाने तेथील शौचालयांची दुरावस्था असल्याचे मान्य केलेले आहे तर असलेल्या सार्वजनिक शौचालयांपैकी किती सध्या नादुरूस्त आहेत आणि चालू अवस्थेत किती आहेत ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी आवर्जून पंढरपूर संबंधात प्रश्न विचारल्याबद्दल मी प्रथमत: त्यांना धन्यवाद देतो. मी येथे सांगू इच्छितो की, पंढरपूर येथे कार्तिकी एकादशी आणि आषाढी एकादशीला मोठी यात्रा भरते ही वस्तुस्थिती आहे आणि त्यामुळे तेथे जी काही सार्वजनिक शौचालये वा स्वच्छतागृहांची व्यवस्था आहे त्यांची

..... एस 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 40191 ....

आकडेवारीनिशी माहिती द्यावयाची तर मी सांगेन की, तेथे 365 शौचालये ही नगरपालिकेच्या मालकीची आहेत आणि त्यातील 60 बंद आहेत आणि 305 चालू आहेत. बंद असलेली 60 शौचालये ताबडतोब सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत कारण त्यांच्या बजेटमध्ये देखील त्यासाठी तरतूद आहे तसेच सुलभ इंटरनॅशनलच्या वतीने तेथील 305 शौचालयांचे बांधकाम केलेले होते आणि त्यांचे मेंटेनन्स देखील त्यांच्याकडेच करार करून दिलेले आहे. सुलभ इंटरनॅशनल, कलेक्टर आणि नगरपालिका असा थ्रीपार्टी करार याबाबत झालेला होता. मात्र या बाबत असे झालेले आहे की, अषाढी आणि कार्तिकी यात्रांच्या काळात सुलभ इंटरनॅशनलकडून या शौचालयांची देखभाल दुरूस्ती केली जाते व बाकीच्या काळामध्ये त्यांच्याकडून योग्य तो मेंटेनन्स न ठेवला गेल्यामुळेच त्यांची आज दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे मूळ करारानुसार वर्षभराचा मेंटेनन्स त्यांनी करावा अशी तरतूद असतानाही त्यांनी त्या तरतुदीनुसार काम केलेले नाही. तेव्हा हा करार रद्द करण्याचा अधिकारही करारातील तरतुदीनुसार आपल्याला आहे. त्यामुळे आजच्या या चर्चेच्या निमित्ताने हा करार रद्द करण्यात येईल आणि ही सगळी शौचालये नगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात येतील आणि नगरपालिका तसेच खाजगी संस्थांकडून ही शौचालये दुरूस्त करून लोकांच्या उपयोगात आणण्याच्या दृष्टीने सूचना दिल्या जातील.

***

( यानंतर सौ. रणदिवे ... टी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.40191 . . . .

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी पंढरपूरला जाऊन, तेथील परिस्थिती पाहून याठिकाणी चांगला प्रश्न उपस्थित केला आहे, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. माझा प्रश्न असा आहे की, पंढरपूर शहरामध्ये शौचालयातील सांडपाण्याची व्यवस्था कशा प्रकारे केलेली आहे ? तेथे सेफ्टी टँक बसविण्यात आलेले आहेत काय? हे सांडपाणी नाल्यामध्ये, चंद्रभागेमध्ये सोडले जात आहे काय ? कारण जेथे नद्या, नाले आहेत, त्यामध्ये सांडपाणी सोडावयाचे अशी महाराष्ट्रातील पध्दत आहे. म्हणून मी यासंदर्भात प्रश्न विचारलेला आहे. तसेच जर याठिकाणी सेफ्टी टँक बसविले असतील तर ते किती वर्षांनी साफ केले जातात ? कारण सध्या तेथे सार्वजनिक शौचालयांच्या बाबतीत दुरावस्था निर्माण झालेली आहे म्हणून तेथील नगरपालिकेने सांडपाण्याच्या बाबतीत कोणत्या प्रकारची व्यवस्था केलेली आहे ? त्या साठी कोणती पध्दत राबविली जात आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, याठिकाणी बहुतांशी ठिकाणी सेफ्टी टँक आहेत. पण त्याठिकाणी आपल्या नॉर्म्स् प्रमाणे त्याची वेगळया पध्दतीने व्हिलेवाट केली जात असली तरी सुध्दा याबाबती नगरपालिकेला सूचना दिल्या जातील.

-----

. . . .टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी असतानाही त्यांचा होत असलेला सर्रास वापर**

**(6) * 40280 श्री.राजन तेली , श्री. संजय दत्त , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील** : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी असतानाही त्यांचा सर्रास वापर होत असून पालिकेने गेल्या महिन्याभरात या विरोधात केलेल्या धडक कारवाईत दोन टन प्लास्टिक जप्त केले असून त्यास दंड म्हणून 11 लाख रुपये वसूल केल्याची घटना दिनांक 31 जानेवारी, 2008 रोजी किंवा त्यासुमारास आढळून आलेली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, नवी मुंबईमध्ये सर्रास प्लास्टिकच्या पिशव्या आढळून येत असून त्यावर आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कार्यवाही झाली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.रविशेठ पाटील, श्री.गणेश नाईक यांच्याकरिता** : (1) होय.

(2) सदर कार्यवाही महाराष्ट्र प्लास्टिक पिशवी (कॅरी बॅग्ज) (उत्पादन व वापर) नियम 2006 अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांतर्गत करण्यात आलेली आहे.

(3) महाराष्ट्र प्लास्टिक पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज) (उत्पादन व वापर) नियम 2006 मध्ये प्रभावी अंमलबजावणीसाठी सुधारणा करण्यात आल्या असून त्याद्वारे मुंबई, ठाणे व नवी मुंबईसह राज्यात नियमांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा सक्षम करण्यात आली आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, याबाबतीत एका वर्षामध्ये किती लोकांवर कारवाई करण्यात आली आहे ? तसेच या माध्यमातून किती दंड वसूल करण्यात आला आहे ? माननीय मंत्री महोदयांनी तिसऱ्या क्रमांकाच्या उत्तरामध्ये शेवटी असे सांगितले आहे की,"राज्यात नियमांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा सक्षम करण्यात आली आहे." माझा प्रश्न असा आहे की, या यंत्रणेचे स्वरुप काय आहे ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, जुलै 2005 मध्ये अतिवृष्टी झाल्यानंतर मुंबई आणि महाराष्ट्र राज्यामध्ये पूर समस्या निर्माण झाली. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्लास्टिक पिशवी (कॅरी बॅग्ज) (उत्पादन व वापर) नियम 2006 करण्यात आला. या नियमांच्या अंतर्गत विशेष पथके तयार करण्यात आली. त्यादृष्टीने महानगरपालिका, नगरपालिकांना सूचना देण्यात आल्या. या पथकाने 2006 पासून दि.15-4-2008 पर्यंत 13 लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. नवीन मुंबई, ठाणे येथे यासाठी पथके स्थापन केली आहेत. तसेच मुंबईमध्ये जवळजवळ 2 कोटी 2 लाख

. . . .टी-3



APR/ 12:10

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

रुपयांचा दंड वसूल केला आहे आणि 213 कारखाने बंद करण्याच्या बाबतीत सूचना दिलेल्या आहेत.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सध्या किरकोळ व्यापाऱ्यांकडे 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या विक्रीस असल्याचे, त्याचा वापर होत असल्याचे आढळून येत आहे हे खरे आहे काय ? असल्यास, 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर कोणती ठोस कारवाई करण्यात येणार आहे ? तसेच या पिशव्यांच्या वापरावर संपूर्णत: बंदी कधीपर्यंत येणार आहे ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, आपण महानगरपालिकचे आयुक्त, तसेच जिल्हाधिकारी, उद्योग आणि प्रदूषण नियंत्रण बोर्डाचे अधिकारी इ.अधिकाऱ्यांनी त्या-त्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना, अधिकाऱ्यांना या नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सूचना दिलेल्या आहेत आणि याबाबतीत कडक कारवाईचे धोरण आखलेले आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. आपण जर मुंबईतील रेल्वे ट्रॅकच्या बाजूला किंवा इतर ठिकाणी जाऊन पाहिले तर असे दिसेल की, या प्लास्टिकच्या पिशव्यांमुळे तेथे भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि त्याची 25 जुलै 2005 रोजी जबरदस्त किंमत द्यावी लागली आहे. परंतु माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत व्हेग स्वरुपामध्ये उत्तर दिलेले आहे. याठिकाणी तिसरा प्रश्न असा विचारलेला आहे की,"असल्यास, राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, नवी मुंबईमध्ये सर्रास प्लास्टिकच्या पिशव्या आढळून येत असून त्यावर आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?" या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"महाराष्ट्र प्लास्टिक पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज) (उत्पादन व वापर) नियम 2006 मध्ये प्रभावी अंमलबजावणीसाठी सुधारणा करण्यात आल्या असून त्याव्दारे मुंबई, ठाणे व नवीन मुंबईसह राज्यात नियमांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा सक्षम करण्यात आली आहे." सदरहू यंत्रणा कोणती आहे ? त्यामध्ये एकंदर किती स्टाफ आहे ? यासंबंधात कडक कारवाई करणार आहात काय ? तसेच हा कायदा अपूरा आहे असे आपल्याला वाटते काय ?

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 12:15

ता.प्र.क्र. 40280..

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पुरेसा स्टाफ नसल्याने महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हाधिकारी यांना पूर्णपणे अधिकार देण्यात आलेले आहेत. तसेच त्यांच्यातर्फे कारवाई करण्याचे संकेत देखील त्यांना दिलेले आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरामध्ये, महानगरपालिका, नगरपालिका व इतर प्राधिकरण यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. परंतु कारवाई होत नाही त्यामुळेच हा प्रश्न निर्माण झालेला आहे. आपण मुंबईमध्ये कोणत्याही क्षणी गेलात व खरेदी केली तर विक्रेता त्याच्या खिशातून पिशवी काढतो व आपल्याला देतो. परंतु अशा ठिकाणी धाड टाकल्यानंतर आपल्याला काही सापडत नाही. सध्या अतिशय सर्रासपणे पिशव्यांचा वापर केला जात आहे. अनधिकृत झोपडपट्टया पाडल्या नाहीत तर तेथील विभागीय अधिकाऱ्याला सस्पेंड करु असे आपण सांगितले जाते. खरे तर अशा प्रकारे कोणालाही सस्पेंड केले जात नाही. परंतु अशा प्रकारे प्लॅस्टिकच्या पिशव्यांच्या बाबतीत संबंधित विभागीय अधिकाऱ्यांवर शासनाकडून कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, छोटे उद्योगधंदे करणारे, भाजीपाला विकणारे जे किरकोळ विक्रेते आहेत त्यांच्यावर आपल्याला कारवाई करता येत नाही. हे लोक गरीब असतात त्यामुळे त्यांना एवढा मोठा दंड करता येत नाही.

श्री. दिवाकर रावते : गरिबांनी पिशव्यांचा वापर करावा असा संदेश यामुळे जनतेमध्ये पोहचत आहे.

श्री. रविशेठ पाटील : सर्वांवर कारवाई करण्यात येईल.

----------------

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**शहापूर (जि.ठाणे) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत**
**आदिवासी मुलींची छळवणूक केल्याबाबत**

**(७) * ३९८१५ श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील** : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील जिल्हापरिषदेच्या शाळेत माहे जानेवारी, २००८ च्या पहिल्या आठवड्यात इयत्ता ७ वी तील ७ आदिवासी विद्यार्थीनींचे भर वर्गात कैचीने केस कापले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेबाबत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,
(३) नसल्यास, गुन्हा दाखल न करण्याची कारणे कोणती,
(४) या अघोरी कृत्याबद्दल संबंधीत शिक्षकाविरुध्द संबंधीत खात्यामार्फत कारवाई करण्यात आली आहे काय ?

**श्री. हसन मुश्रीफ ,प्रा.वसंत पुरके यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शहापूर जि. ठाणे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील एका आदिवासी मुलीने डोक्याला तेल न लावल्याने तेथील शिक्षिकेने त्या मुलीचे कैचीने केस कापले. अशी तक्रार श्रीमती सखुबाई भस्मा या महिला कार्यकर्तीकडे करण्यात आली होती. त्यानंतर आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी शहापूर व पंचायत समिती अधिकारी यांनी देखील त्या शाळेस भेट देऊन या गोष्टीची शेरेबुकामध्ये नोंद घेतली. ही गोष्ट खरी आहे काय ? या बाबत चौकशी योग्य प्रकारे न झाल्यामुळे, याबाबत फेर चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, तशी वस्तुस्थिती नाही. त्या शाळेतील दोन ते तीन मुली शाळेमध्ये केस व्यवस्थित विंचरुन येत नव्हत्या. त्यामुळे त्यांना शिस्त लावण्याकरिता, ज्या मुली केस विंचरुन येणार नाहीत त्यांचे केस मी कैचीने कापून टाकीन असे तेथील शिक्षक सांगत होते. शिक्षकाने केवळ असा उल्लेख केलेला आहे. तसे काहीही केलेले नाही. याबाबत चौकशी करण्यात येईल.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, या ठिकाणी तीनही प्रश्नांचे उत्तर "नाही " असे देण्यात आले आहे. हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. राज्य शासनाने तीनही प्रश्नांचे उत्तर नाही असेच दिलेले आहे. कात्रणाच्या आधारे आम्ही प्रश्न विचारतो. त्यावेळी ते प्रश्न आमच्या दृष्टीने महत्वाचे असतात. या प्रश्नांकरिता हजारो रुपये खर्च होत असतात. माझा प्रश्न असा आहे की,..

..२..

ता.प्र.क्र. ३९८१५...

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या संदर्भात माझ्याकडे लेखी माहिती आहे.

( काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात. )

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, या ठिकाणी शासन जबाबदारीने उत्तर देत आहे प्रश्नांना उत्तरे देण्याची शासनाची जबाबदारी आहे. आपल्यावर आम्ही आरोप केलेला नाही किंवा आक्षेपही घेतलेला नाही.

**सभापती :** सन्माननीय सदस्य ज्या वेळी येथे एखादा प्रश्न विधान मंडळाकडे विचारण्याकरिता देतात त्यावेळी त्याचा अर्थ असा असतो की, तो प्रश्न वस्तुस्थितीवर आधारीत आहे. असे असताना त्याबाबत सखोल माहिती घेतली पाहिजे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय राज्य शासनाच्या वतीने प्रत्येक ठिकाणी नाही असे उत्तर दिलेले आहे. ते उत्तर चुकीचे आहे. याबाबत विचारलेला प्रश्न तरी चुकीचा असेल किंवा दिलेले उत्तर तरी चुकीचे असेल. या पैकी नेमकी काय चूक आहे ?

**सभापती :** सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले आपण आता नवीन नाही. एखाद्या सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या माहितीप्रमाणे प्रश्न विचारला आहे. या प्रश्नाची पूर्ण माहिती घेतल्यानंतर असे दिसून आले आहे की, त्या ठिकाणी तशी वस्तुस्थिती दिसत नाही.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 39815 ........

**सभापती** ......

आपण त्यावर काही भाष्य करणे योग्य नाही म्हणून तेवढा भाग मी कामकाजातून काढत आहे.

प्रा. सुरेश नवले : यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी भूमिका स्पष्ट करावी.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, ही बाब देखील गंभीर आहे. कारण वस्तुस्थिती नसताना असत्य तक्रार करणे, एखाद्या वर्तमानपत्रामध्ये असत्य बातमी येणे आणि ती बातमी विश्वासार्ह आहे असे समजून सन्माननीय सदस्य प्रश्न देतात. त्यावर हजारो रुपये खर्च होतात, ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये काही शिक्षकांची बदनामी होण्याचाही प्रकार होतो. या शिक्षकांनी मुलींना शिस्तीमध्ये यावे म्हणून सांगितले. मुलींनी शिस्तीमध्ये यावे, दोन वेण्या असाव्यात, मुलींनी चांगल्या वर्तणुकीमध्ये यावे म्हणून शिक्षकांनी त्यांना सांगितले. अशा प्रकारे असत्य तक्रार करुन सभागृहाचा वेळ जात असेल तर ही बाब बरोबर नाही. आम्ही याची निश्चित दखल घेऊ.

**सभापती** : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, आपल्या सभागृहातील जे परंपरेला धरुन आणि रुढ संकेत आहेत त्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी एखादा प्रश्न विचारला, एखादी माहिती दिली किंवा एखादी वस्तुस्थिती सांगितली तर ती गृहीत धरुन त्या अनुषंगाने त्याबाबतीत पुढे कार्यवाही करावयाची असते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने शासनाने त्याबाबत माहिती घेऊन जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये तीनही प्रश्नांना "नाही" असे उत्तर दिलेले आहे. असे असले तरी सुध्दा सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आणि अन्य सन्माननीय सदस्यांचा जो हक्क आहे, त्यांच्याकडे उपलब्ध असणाऱ्या माहितीच्या संदर्भात जो हक्क आहे त्या हक्कावर बाधा येऊ नये. शेवटी जर उत्तर दिले नाही तर सन्माननीय सदस्य असे म्हणणार की, प्रश्न स्वीकारलेला आहे पण सरकारने उत्तर दिलेले नाही, हे बरोबर नाही. शासनाने उत्तर बरोबर दिलेले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांचा जो मूलभूत हक्क आहे तो शाबूत ठेऊन याबाबतीत आपण बघू. आपण म्हणता त्या पध्दतीने एखादा अकारण गैरसमज झाला तर तो टाळण्याचा प्रयत्न करु परंतु सन्माननीय सदस्यांचा जो हक्क आहे तो तसाच अबाधित ठेऊ.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 39815 ........

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांचा तरी हक्क शाबूत राहिला पाहिजे.

**सभापती** : सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे रुढी, परंपरेनुसार असणारे जे हक्क आहेत ते त्याच पध्दतीने शाबूत राहतील. सन्माननीय सदस्यांनी एखादी गोष्ट विचारत असताना ती अचूक आहे काय हे पाहण्याचा जरुर प्रयत्न करावा.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या सदनासमोर जो मुद्दा आला त्याबद्दल माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, ती वर्तमानपत्रात आलेली बातमी होती. जो प्रश्न विचारला गेला आहे तो कोणत्या तरी बातमीच्या आधारावर विचारला गेला आहे. प्रत्येक वेळी प्रत्येक सन्माननीय सदस्य माहिती घेण्यासाठी टोकापर्यंत पोहोचू शकत नाही. अशा प्रकारे बातमी आली तर त्याचा खुलासा पाठवून या प्रश्नाच्या संदर्भात तशा पध्दतीचे जर उत्तर आले, हे खरे नाही, याबाबतचा खुलासा संबंधित वर्तमानपत्राकडे पाठविला आहे असे जर उत्तरामध्ये लिहिले तर या ठिकाणी गडबड होणार नाही. वर्तमानपत्राच्या कात्रणाच्या जोरावर प्रश्न विचारतो त्याबाबत जी टीका होते ती अनाठायी आहे. आपल्याकडे पर्सनल रिलेशन डिपार्टमेंट आहे. यासंदर्भात तशा पध्दतीचे उत्तर दिले तर सभागृहामध्ये गोंधळ होणार नाही. याची काळजी शासनाने घेण्याची आवश्यकता आहे. शासन ती काळजी घेणार काय ?

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी ज्या पध्दतीने विचार केला त्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, आपल्या लोकशाहीचे जे चार स्तंभ आहेत त्यातील मिडिया हा एक स्तंभ आहे. त्यांनीही ती काळजी घ्यावी. सन्माननीय सदस्यांनीही एखादी गोष्ट विचारत असताना त्याबाबतीत खात्री करुन घेण्याचा प्रयत्न करावा. सन्माननीय सदस्यांनी एखादी बाब या ठिकाणी विचारली तर ती बाब खरी आहे किंवा वस्तुस्थितीला धरुन आहे असे गृहीत धरुन त्याबाबतीत उत्तर देण्याचे काम त्या त्या विभागाकडून होते. त्या पध्दतीने या ठिकाणी उत्तर दिलेले आहे.

----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईत गोवंडी, देवनार येथील डंपिग ग्राऊंडवर जमा होणारा ई - कचरा**

**(८) * ३८२३२ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुधाकर गणगणे , श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गोवंडी, देवनार, डंपिग ग्राऊंडवर दरवर्षी १९ हजार टन ई कचरा जमा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी अद्याप कोणतीही प्रभावी उपाययोजना मुंबई महापालिकेकडे नाही आणि या गंभीर समस्येबाबत राज्यशासनही गंभीर नसल्याचे दिनांक १ जानेवारी, २००८ रोजी वा त्या सुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या कचऱ्यातील रासायनिक घटकापासून गंभीर स्वरुपाच्या प्रदूषणाचा फटका मुंबईला बसण्याची भिती पर्यावरण तज्ञांकडून व्यक्त केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत महानगरपालिका वा राज्य सरकारने कोणता कृती कार्यक्रम आखला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे**, **श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : 1) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नियुक्त केलेल्या मे.आय.आर.जी.सीस्टीम साऊथ एशिया प्रा.लि.या संस्थेने दिलेल्या अहवालात मुंबई शहरामध्ये अंदाजे 11 हजार मे.टन इतका ई कचरा जमा होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

2) , 3), 4) व 5) ई कच-याच्या विल्हेवाटीच्या पध्दतीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका दक्ष असून याबाबत आवश्यक तो अभ्यास महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे. ई कच-यामध्ये लेड, कॅडमियम, मर्क्यूरी इत्यादी रासायनिक द्रव्य असल्यामुळे या कच-याच्या विल्हेवाटीसाठी वापरल्या जाणा-या विहित प्रक्रियांमुळे प्रदूषणाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो असे मे.आय.आर.जी.सीस्टीम साऊथ एशिया प्रा.लि. या संस्थेने दिलेल्या अहवालात नमूद केले आहे. ई कच-याच्या संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ई कच-याची उत्पत्ती स्थाने, ठरीव प्रमाण, संकलन आणि विल्हेवाटीच्या पध्दती शोधून काढावयाच्या विविध पैलूचा अभ्यास करण्यासाठी एक तज्ज्ञ समितीची स्थापना केलेली आहे. सद्यःस्थितीत ज्या पध्दतीने सुक्या कच-याची विल्हेवाट लावण्यात येत आहे त्याच पध्दतीने ई कच-याची देखील विल्हेवाट महानगरपालिकेकडून लावण्यात येत आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, ई कचरा हा विशेषत: संगणक आणि इलेक्ट्रॉनिक्स टाकाऊ वस्तूंपासून निर्माण होत असतो. या कच-यामध्ये विविध रासायनिक द्रव्ये असल्यामुळे सध्या या कच-याची विल्हेवाट लावत असताना त्यातून प्रदूषणाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. यासंदर्भात मे.आय.आर.जी.सीस्टीम साऊथ एशिया प्रा.लि.या कंपनीने अहवाल सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने प्रदूषण टाळून कच-याची विल्हेवाट लावण्यासंबंधी शासन कोणती उपाययोजना करीत आहे ? याबाबत तज्ज्ञ समितीची नेमणूक केव्हा करण्यात आली आणि त्या समितीमध्ये कोणकोण सदस्य आहेत, या समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38232....

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. एन्व्हायर्नमेंटल प्रोटेक्शन ॲक्टमध्ये यासंबंधी गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. म्युनिसिपल सॉलिड वेस्ट, हॅजर्डस्ट वेस्ट मॅनेजमेंट ॲण्ड हॅण्डलींग रुल्स यामध्ये गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. परंतु अलिकडील काळामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रीकल वस्तूंचा वापर वाढला आहे. त्याच्यातून ई कचरा निर्माण होतो. यामध्ये टीव्ही, रेफ्रिजरेटर, कॅल्क्यूलेटर, मोबाईल या सर्व गोष्टी येतात. त्यासाठी शासनाने 2-3 पावले उचलली होती. त्या अनुषंगाने मे.आय.आर.जी.सीस्टीम साऊथ एशिया प्रा.लि.या संस्थेकडे हा विषय दिला होता. या सर्व कच-यासंबंधी अभ्यास करण्यासाठी त्यांना नेमले होते. लाईफ सायकलचा अभ्यास करण्याचे काम त्या संस्थेला होते त्याप्रमाणे त्यांनी अहवाल दिलेला आहे. हा केंद्र सरकारचा कायदा आहे. केंद्र सरकारने ई कच-यासंबंधी अलिकडे नियमांचे प्रारुप तयार करुन सूचना व हरकती मागविल्या आहेत. त्यासंबंधीचे अंतिम प्रारुप केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांकडे तातडीने पाठविण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने शासनाने 2 पावले उचलली आहेत असे मी म्हटले होते. एक म्हणजे त्या संस्थेचा अभ्यास आणि दुसरे म्हणजे पर्यावरण विभागाच्या नियमांचे प्रारुप. त्याला अनुसरुन पुढील काळामध्ये उपाय करण्याचे नियोजन करण्यात येईल. परंतु आज ही वस्तुस्थिती आहे की, सध्या केंद्र सरकारचे प्रदूषण नियंत्रण मंडळ आहे, त्यांच्या परवानगीने पुनर्प्रक्रिया केली जाते. यामध्ये घातक मेटल आहे, त्याच्यावर पुनर्प्रक्रिया करण्याचे काम केले जाते आणि बाकीचे मटेरियल डम्पिंग ग्राऊंडमध्ये टाकले जात आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी अतिशय चांगला प्रश्न उपस्थित केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. केंद्र सरकारने या कच-यासंबंधी कायदा केलेला आहे असे माननीय मंत्रिमहोदयांनी आताच सांगितले आहे. माझी अशी माहिती आहे की, केंद्र सरकारचा कायदा पूर्ण स्वरुपात तयार झालेला नाही. महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य आहे. आपल्याकडे प्रचंड आयटी पार्कस् होत आहेत आणि पुढे होतील. हे लक्षात घेऊन आपल्याकडील ई कच-याविषयी विधिमंडळात कायदा तयार करणार काय ? कारण सध्या केंद्रीय कायदा असला तरी राज्य सरकार कायदा करु शकते. मी या विषयाचे अशासकीय विधेयक आणले होते. तेव्हा शासन यासंदर्भात कायदा करणार आहे काय ?

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38232...

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हा एन्व्हायर्नमेंटल प्रोटेक्शन ॲक्ट केंद्र सरकारचा आहे. त्या अनुषंगाने मी सांगितले होते की, 3 रुल्स देखील त्यांचेच आहेत. त्यांनी घन कच-यासंबंधी नियमावली केली आहे. बायो-मेडिकल कच-यासंबंधी नियमावली केली आहे. ई कच-यासंबंधीचे रुल्स जवळजवळ अंतिम टप्प्यामध्ये आहेत. ते सर्व नियम स्वीकारुन त्या अनुषंगाने ज्या तरतुदी किंवा सूचना असतील त्यांचे तंतोतंत पालन करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारच्यावतीने कार्यवाही केली जाईल.

श्री.सय्यद जामा :सभापति महोदय, अभी मंत्री महोदय ने कहा कि नियम बनाए जाएंगे. हर साल करीब 12 हजार टन ई-कचरा जमा होता है. इस कचरे को डिसपोज करने के लिए क्या कारखाने के मालिकों, कंपनी के मालिकों पर जिम्मेदारी डाली गई है ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 38232....

श्री. राजेश टोपे : आज ही वस्तुस्थिती आहे की, डिस्कार्डेड टी.व्ही. रेफ्रिजरेट यासारख्या वस्तू इ- कच-यामध्ये समाविष्ट होतात. ट्रेडर्स लोक या वस्तू विकत घेऊन त्यामधील वापरता येण्यासारखा भाग पुन्हा वापरतात आणि जे भाग वापरता येण्यासारखे नसतात ते एमएसडब्ल्यू साईटवर टाकले जातात. असे करणे योग्य नाही. अशा प्रकारच्या सर्व कच-याची विल्हेवाट लावण्याचे काम महानगरपालिकेचे आहे. तेव्हा ज्या ज्या ठिकाणाहून अशा प्रकारचा कचरा निर्माण होतो त्यांचे रजिस्ट्रेशन करण्याच्या सूचना महानगरपालिकेला देण्यात येतील. आज ट्रेडर्स अशा वस्तू बायबॅक स्कीममधून परत घेतात. त्यातील काही भागांचा पुनर्वापर करतात आणि काही भाग डंपिंग ग्राऊंडवर टाकतात. अशा प्रकारचा घातक कचरा डंपिंग ग्राऊंडवर गेला तर ते आरोग्याला अतिशय घातक आहे. म्हणून जेथे जेथे ई-कच-याचा स्त्रोत आहे, जे ट्रेडर्स् आहेत त्या सर्वांचे रजिस्ट्रेशन करण्याच्या सूचना महानगरपालिका देण्यात आलेल्या आहेत. याबाबतीत एखादी प्रायव्हेट एजन्सी नेमून जे ड्राफ्ट रुल्स तयार झालेले आहेत त्यातील तरतुदीप्रमाणे या कच-याची विल्हेवाट लावण्याच्या सूचना महानगरपालिकेला देण्यात येतील.

श्री. सुभाष चव्हाण : अशा कच-याची प्रदूषणविरहीत पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात येणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : होय.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील ग्रामीण भागात विशेषत: कोल्हापूर जिल्ह्यात रेशनवरुन दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी असलेल्या योजनेंतर्गत व अंत्योदय योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या धान्याचा पुरवठा मागणीपेक्षा कमी होत असल्याबाबत**

**(९) * ३९२१७ श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. गुरुमुख जगवानी , श्री.सय्यद पाशा पटेल** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागात विशेषत: कोल्हापूर जिल्ह्यात रेशनवरुन दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी असलेल्या योजनेंतर्गत व अंत्योदय योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या धान्याचा मागणीपेक्षा कमी पुरवठा होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीएवढा पुरवठा करु शकत नसल्याचे शासनाचे म्हणणे असल्याने दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या महागाईत, जगण्यासाठीचा आधार ठरणाऱ्या या धान्यापासून लाभार्थी वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे नियोजन शासनाकडून चुकीचे होत असल्याने सदर योजनेचा लाभ लाभार्थ्यांना मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना नियोजनबध्द चालविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.सुनील तटकरे** : (१) अशी वस्तूस्थिती नाही. राज्यात लक्ष्य निर्धारित सार्वजानिक वितरण व्यवस्थेअंतर्गत माहे डिसेंबर, २००७ ते मार्च, २००८ या कालावधीत बीपीएल लाभार्थ्यांसाठी गहू व तांदुळाबरोबरच काही प्रमाणात बाजरी व मक्याचे नियतन देण्यात आले होते. कोल्हापूर जिल्ह्यात बाजरी व मक्याची उचल न करण्यात आल्याने मागणीपेक्षा पुरवठा कमी पडला आहे.

राज्य शासनाची या संदर्भातील विनंती मान्य करून केंद्र शासनाने राज्याला बाजरी व मका या भरडधान्याऐवजी गव्हाचे नियतन मंजूर केले असून बीपीएल लाभार्थ्यांना गहू उपलब्ध करून देण्यात येत आहे.

अंत्योदय योजनेअंतर्गत गहू व तांदुळाचे संपुर्ण नियतन मंजूर करण्यात आले आहे.

(२) व (३) हे, खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : हा रेशन दुकानावरुन धान्य घेणा-या गरीब लोकांचा प्रश्न आहे. प्रश्न भाग (1)च्या उत्तराला "अशी वस्तुस्थिती नाही. राज्यात लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत माहे डिसेंबर 2007 ते मार्च, 2008 या कालावधीत बीपीएल लाभार्थ्यांसाठी गहू व तांदुळाबरोबरच काही प्रमाणात बाजरी व मक्याचे नियतन देण्यात आले होते.... बाजरी व मका या भरड धान्याऐवजी गव्हाचे नियतन मंजूर केले असून बीपीएल लाभार्थ्यांना गहू उपलब्ध करुन

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देण्यात येत आहे." अशा प्रकारचे उत्तर देण्यात आलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, ही बाजरी आणि मका निकृष्ट दर्जाचा असल्यामुळे लोकांनी घेतला नाही हे खरे आहे काय ? केन्द्र सरकारकडे पुन्हा मागितलेला गहू हा लाल गव्हापैकी आहे काय ? रेशन दुकानावरील धान्य तसेच बीपीएलखालील लोकांना देण्यात येणारे धान्य यामध्ये फरक आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : उपलब्ध करुन देण्यात आलेल्या बाजरी आणि मक्याचा दर्जा उत्तम होता. परंतु लोकांनी ते घेण्यास नकार दिला. देण्यात आलेले धान्य एफअेक्यू दर्जाचे आहे. त्यामुळे गव्हाच्या दर्जाबाबत लोकांची कोणतीही तक्रार नाही.

श्रीमती अलका देसाई : मुंबई शहर व उपनगरामध्ये बीपीएलमधील लोकांना कोणत्याही प्रकारचे धान्य मिळत नाही हे खरे आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : हे खरे नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : या प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये विसंगती आहे. आजच्या "लोकमत" या वृत्तपत्रामध्ये अशी बातमी आलेली आहे की, राज्यातील अेपीएल मधील 1 कोटी 90 लाख इतक्या लाभार्थींना सार्वजनिक वितरण प्रणालीतून 66 लाख 50 हजार क्विंटल धान्य मिळायला हवे शासनाने त्यांना फक्त 1 लाख क्विंटल धान्यचा पुरवठा केलेला आहे.

.....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.39217...

श्री. पांडुरंग फुंडकर...

म्हणजे मागणीच्या केवळ 1.06 टक्के धान्याचा पुरवठा होतो आहे ही गोष्ट खरी आहे काय ? नसेल तर बुलढाणा, वाशिम जिल्हयाची माहिती मी सादर करतो. म्हणून माझा पुन्हा तोच प्रश्न आहे की, मागणीच्या केवळ 1.06 टक्के एवढाच धान्य पुरवठा होतो आहे ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न विचारला आहे, तो या प्रश्नाशी निगडीत नाही. त्यांनी लोकमत या वृत्तपत्राच्या आधार घेऊन ए.पी.एल.च्या धान्याच्या बाबतीत सांगितले. लक्ष निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत बी.पी.एल.कार्ड धारकांना देण्यात येणारे धान्य व्यवस्थित रित्या पुरविले जाते आहे काय असा प्रश्न विचारण्यात आला आहे. बी.पी.एल.कार्डधारकांना व्यवस्थितरित्या धान्य पुरविले जात आहे असे मी या ठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो. ए.पी.एल.च्या धान्याच्या मागणी प्रमाणे आज पुरवठा होत नाही ही वस्तुस्थिती खरी आहे. याचे कारण असे की, दोन वर्षापूर्वी आपल्याला मागणीप्रमाणे धान्य पुरविण्यात येत होते.परंतु त्यावेळी त्याची उचल होत नसल्यामुळे केंद्र सरकारने ए.पी.एल.धान्याचा कोटा कमी केलेला आहे. तो धान्य पुरवठा पूर्ववत व्हावा म्हणून राज्य सरकारकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.

प्रा.शरद पाटील : बाजरी आणि मका उत्कृष्ट प्रतीचा उपलब्ध करुन दिला होता अशी माननीय मंत्री महोदयांनी माहिती दिली आहे. तांदूळ आणि गहू कमी असल्यामुळे बाजरी आणि मका घेण्याची सक्ती दुकानदार करीत होते ही वस्तुस्थिती आहे काय ? दुकानदाराने अशा प्रकारची सक्ती करु नये यासंबंधी शासनाकडून काही सूचना देण्यात येतील काय ?

श्री. सुनील तटकरे : ही वस्तुस्थिती खरी आहे की, तांदूळ आणि गहू याचे नियतन कमी करुनच तेवढया प्रमाणात बाजरी आणि मका उपलब्ध करुन देण्यात आला होता. आपण केंद्र सरकारकडे मागणी केली आहे. केंद्रीय कृषि मंत्री माननीय श्री. शरद पवार यांनी गहू आणि तांदूळ या धान्याचा कोटा पूर्ववत करुन दिलेला आहे. त्यामुळे अशा प्रकारची सक्ती असण्याचे काहीही कारण उदभवणार नाही.

----------------

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ब्रिमस्टोवॅड च्या ८५० कोटींच्या कामांना मंजूरी देण्याचा**

**मुंबई महापालिका स्थायी समितीने घेतलेला निर्णय**

**(१०) * ३८६९९ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुरेशदादा देशमुख :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रिमस्टोवॅड च्या ८५० कोटींच्या कामांना मंजूरी देण्याचा निर्णय मुंबई महापालिका स्थायी समितीने दिनांक ९ जानेवारी, २००८ रोजी वा त्या सुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पास मंजूरी देण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) या प्रकल्पाअंतर्गत ८५० कोटी रूपयांमधून कोणती कामे करून घेण्यात येणार आहेत,

(४) सदर कामे कधीपर्यंत पूर्ण होणार आहेत त्याचा तपशील देण्यात येईल काय ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय.

स्थायी समितीच्या दिनांक ९ जानेवारी, २००८ च्या बैठकीमध्ये ब्रिमस्टोवॅडच्या रुपये ८१४ कोटींच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

(२) ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत प्रमुख नाल्यांच्या रुंदीकरणाचे काम हाती घेण्यासाठी प्रथम नाल्यांच्या/नद्यांच्या दोन्ही बाजूस असलेल्या झोपड्यांचे स्थलांतर टप्प्याटप्प्याने करण्याचे प्रस्तावित असल्याने सदर कामे मंजूर करण्यास थोडा विलंब झालेला आहे.

(३) या प्रकल्पांतर्गत बृहन्मुंबईतील मोठ्या नाल्यांची रुंदी व खोली वाढवून त्यांना संरक्षक भिंती बांधण्याचा कामांचा अंतर्भाव आहे.

(४) ही कामे, कामांच्या व्याप्तीनुसार टप्प्याटप्प्याने २०१० सालापर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, या उत्तरात असे लिहिले आहे की, बिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत प्रमुख नाल्यांच्या रुंदीकरणाचे काम हाती घेण्यासाठी प्रथम नाल्यांच्या, नद्यांच्या दोन्ही बाजूस असलेल्या झोपडयांचे स्थलांतर टप्प्याटप्प्याने करण्याचे प्रस्तावित असल्याने सादर कामे मंजूर करण्यास थोडा विलंब झालेला आहे. या प्रकल्पांतर्गत येत असलेल्या झोपडयांचे स्थलांतर झाले आहे काय ? तसेच ती झोपडपट्टी २००० च्या पूर्वीची आहे काय ? त्या झोपडपट्टीमध्ये मोठे वर्कशॉप आणि दुकाने आहेत. त्या लोकांना देखील दुसरीकडे जागा उपलब्ध करुन देण्यात येणार

३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी......

आहे काय ? २०१० पर्यंतची कालमर्यादा पूर्ण झाली नाही तर करारात काही तरतूद करण्यात आली आहे काय ? जर या तरतुदीचा भंग करण्याचे काम झाले असेल तर संबंधितावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री. जवेरी यांनी पी.ए.पी.च्या अनुषंगाने प्रश्न विचारला आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, एकंदर पी.ए.पी. १५७२० हे टोटल सर्व्हेच्या माध्यमातून काढण्यात आले आहेत. आतापर्यंत या पी.ए.पी.ना शिफ्ट करण्याच्या दृष्टीने ३४१४ सदनिका विकत घेण्यात आल्या आहेत. त्यासाठी ४६ कोटी रुपये खर्च झाला आहे. १२०० पी.ए.पी. शिफ्ट करण्यात आले आहेत. उर्वरित १४९२७ सदनिका विकत घेण्याच्या दृष्टीने तरतूद करण्यात आली आहे. या सगळया पी.ए.पी.ना शिफ्ट करण्याचे काम सायमलटेनियसली करण्यात येईल. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, या प्रोजेक्टसाठी १८०० कोटी रुपये खर्च येणार आहे. १८०० कोटी रुपयांमध्ये वर्कस् वरील खर्च, कन्स्ट्रक्शनवरील खर्च रुपये १२०० कोटी रुपये एवढा आहे. १०० टक्के केंद्र सरकारकडून अनुदान मिळणार आहे. उर्वरित ६०० कोटी रुपये पुनर्वसनासाठी खर्च येणार आहे. हा प्रोजेक्ट दोन फेज्मध्ये पूर्ण करण्यात येणार आहे. पहिला फेज ३५७ कोटी रुपयांचा आहे. या प्रोजेक्टवर आतापर्यंत १३५ कोटी रुपये खर्च झाला आहे. यामध्ये जवळपास २० कामे प्रस्तावित आहेत.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ SBT/ 12:40

ता.प्र.क्र. 38699 पुढे सुरु....

श्री. राजेश टोपे...

सभापती महोदय, फेज-2 मध्ये 843 कोटी रुपये एकंदर खर्च येणार आहे. यातील 38 कामांपैकी 27 कामांची वर्क ऑर्डर देण्यात आलेली आहे. यातील पहिला हप्ता म्हणून केंद्र शासनाकडून 400 कोटी रुपये मिळालेले आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, शहरामध्ये एकूण जे काही नाले आहेत ते रेल्वेच्या कलवर्ट मधून जातात. रेल्वेचा प्रश्न आला की केंद्र सरकारचा संबंध येतो. म्हणून केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी शासन कोणती पावले उचलणार आहे ? पूर येतो त्यामुळे या प्रकल्पाला अडथळा येण्याचा धोका आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ब्रिमस्टोवॅड प्रकल्पामध्ये प्रामुख्याने नाला खोलीकरण, नाला रुंदीकरण, संरक्षक भिंत बांधणे ही कामे केली जातात. मेजर नाला प्रकल्पामध्ये 200 कि.मी.पर्यंत कामे केली जाणार आहेत. मायनर प्रकल्पामध्ये म्हणजे 5 कि.मी.च्या आतील एकूण 130 अंडरग्राऊंडची कामे केली जाणार आहेत. रेल्वेच्या संदर्भात जे काही अडथळे निर्माण होतील त्याबाबत निश्चित प्रकारे बैठका घेऊन हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनाच्या वतीने पावले उचलली जातील.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आताच मंत्रीमहोदयांनी सांगितले की, मिठी नदीवरील झोपडपट्टयांच्या पुनर्वसनासाठी 600 कोटी रुपये लागणार आहेत. मिठी नदीच्या काठावरील झोपडयांचे पुनर्वसन चालू आहे. यासंदर्भात मंत्रीमहोदयांनी सभागृहात उत्तर देताना सांगितले होते की, 2000 नंतरच्या झोपडयांचे पुनर्वसन करणार नाही. पर्यायी जागा देण्यासाठी शासन बांधील नाही. या 600 कोटी रुपयांपैकी मिठी नदीच्या काठावरील झोपडपट्टयांचे पुनर्वसन करण्यासाठी किती रक्कम खर्च केली जाणार आहे ? त्याचप्रमाणे किती सालापर्यंतच्या म्हणजे 1995, 2000 वा 2008 पर्यंतच्या झोपडयांचे पुनर्वसन होणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, यासंबंधीच्या आकडेवारीमध्ये मी जाणार नाही. परंतु 2000 अगोदरच्या झोपडयांना सुरक्षितता देण्याच्या दृष्टीने शासनाने निर्णय घेतलेला आहे. 1995 च्या अगोदरचा कायदा आहे. परंतु शासनाचे 100 टक्के असे धोरण आहे की, 2000 पर्यंतच्या झोपडयांना संरक्षण देण्यात येणार आहे. मॅटर सबज्युडीस आहे. त्यादृष्टीने कारवाई केली जात

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38699 पुढे सुरु...

श्री. राजेश टोपे ....

आहे. मिठी नदीवरील झोपडयांचे पुनर्वसन करताना 2000 पूर्वीच्या ज्या झोपडया आहेत त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाच्या वतीने निश्चित प्रकारे पावले उचलली जातील.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ज्याठिकाणी नाले आहेत त्या नाल्यावर जर अतिक्रमण केले तर महानगरपालिकेच्या कायद्याप्रमाणे ही अतिक्रमणे दूर करण्याची कायदेशीर कारवाई महानगरपालिका करु शकते. अतिक्रमणे निष्कासित करु शकते. आता 2000 सालापर्यंतच्या झोपडयांचे पुनर्वसन शासन करणार आहे. परंतु पुनर्वसन झाल्यानंतर पुन्हा झोपडया उभ्या राहणार नाही यादृष्टीने प्रिव्हेंटीव्ह ॲक्शन शासन कोणती घेणार आहे ? भविष्य काळात झोपडया उभ्याच राहू नयेत यादृष्टीने शासन काय उपाययोजना करणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, 2000 सालानंतरच्या झोपडया निष्कासित करण्याची कारवाई केली जाईल. मिठी नदीवरील झोपडया हटविताना फेज-1 मध्ये नाला रुंदीकरण, नाला खोलीकरण, सुरक्षा भिंत अशी कामे होणार आहेत. झोपडया उभ्या राहिल्या तर निश्तिच प्रकारे सहाय्यक महापालिका आयुक्तांना जबाबदार धरले जाईल. कोणत्याही प्रकारे 2000 नंतरच्या झोपडपट्टयांना काढून टाकण्याची कारवाई केली जाईल. यासंबंधात अधिकाऱ्यांवर जबाबदारी फिक्स केली जाईल आणि जे अधिकारी जबाबदारी पार पाडणार नाहीत त्यांच्यावर निश्चित प्रकारे कारवाई केली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गुरु-ता.गद्दी सोहळ्यासाठी मनमाड शहराला निधी मंजूर करण्याबाबत**

**(११) * ४०७२९ श्री. दिवाकर रावते , श्री. मधुकर सरपोतदार , श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड शहरात होणाऱ्या गुरु-ता.गद्दी सोहळ्यासाठी यावर्षी देशभरातून लाखो शिख धर्मीय येणार असून त्यासाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर तात्काळ निधी मंजूर करावा अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुरु-ता.गद्दी सोहळ्यासाठी शासनाने आर्थिक मदत जाहिर केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एकूण किती मदत जाहिर केली आहे त्यापैकी किती रक्कम तेथील प्रशासनाकडे सूर्पूत केली आहे,

(४) असल्यास, गुरु-ता.गद्दीसाठी केंद्र शासनानेही मोठी रक्कम दिली आहे, हे खरे आहे काय ?

**श्री.विलासराव देशमुख** : (१) मनमाड येथील गुरुद्वाराचे महत्व लक्षांत घेता तेथे नांदेड येथील गुरु-दा-गद्दी सोहळ्यासाठी येणारे भाविक मोठ्या प्रमाणात येण्याची शक्यता असल्याने विशेष निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी प्राप्त झाली आहे.

(२) व (३) सन २००७-०८ या आर्थिक वर्षात तिर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत मनमाड येथील विकास कामांकरीता विशेष बाब म्हणून एकुण ६.२५ कोटी इतका निधी वितरीत केला आहे.

(४) मनमाड येथील विविध विकास कामे अंर्तभूत असलेल्या ३९.९३ कोटी रुपयांचा प्रस्ताव UIDSSMT या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडे पाठवला आहे.

**उपसभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

------

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांनी माननीय राज्यपालांना सादर केलेले अनुक्रम दिनांक 11 जानेवारी 2002, 11 एप्रिल 2002, 16 डिसेंबर 2002, 6 फेब्रुवारी 2004 व दिनांक 30 जून 2005 चे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : विशेष अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहातील कामकाजाचे चित्रीकरण करण्यासंबंधी

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाचे आणि लक्षवेधी सूचनेवरील चर्चेपर्यंतच्या कामकाजाचे दूरदर्शन वृत्तांत दाखविण्यासाठी चित्रीकरण करण्यात येत आहे. परंतु कालपासून सभागृहात चित्रीकरण करणारे दूरदर्शनचे प्रतिनिधी दिसून आलेले नाहीत. मी काल देखील हा प्रश्न उपस्थित केलेला होता. त्यावेळी उद्या सभागृहाला यासंबंधी अवगत केले जाईल असे सांगण्यात आले होते. या संदर्भात माहिती उपलब्ध झाली आहे का?

**उपसभापती** : अजूनही माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु एका तासाच्या आत सभागृहाला माहिती दिली जाईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "बाराव्या वित्त आयोगांतर्गत नगरपरिषद, खामगाव यांना प्राप्त झालेल्या मंजूर अनुदानातून रस्त्यांची कामे घेण्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात येणे, यात अनेक कामे मंजूर होणे, सदर कामाच्या निधीचा अपव्यय होत असल्याने त्यावर कार्यवाही होण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी "महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ यांचे दिनांक 2.12.2006 च्या पत्रान्वये महानगरपालिकेला शहर बस वाहतूक हस्तांतरित केल्यानंतर राज्य परिवहन महामंडळ पुनश्च बस सेवा चालविल्या जाणार नाहीत असे स्पष्ट नमूद केल्यामुळे नागरिकांना वेठीस धरण्याचा चालविलेला प्रकार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, रामनाथ मोते, संजय केळकर, शरद पाटील, जयंत प्र.पाटील, दिलीपराव सोनवणे, गुरुमुख जागवानी यांनी "सन 2008-09 या शैक्षणिक वर्षात जि.प.प्राथमिक शिक्षक सेवक प्रक्रियेमध्ये आंतरवासिताधारक डी.एड विद्यार्थ्यांचा समावेश करणे, दिनांक 1.4.2008 रोजीच्या शासन निर्णयानुसार जुन्या डी.एड धारकांचा यात कोणताही विचार न होणे, त्यामुळे या सर्व जुन्या डी.एड धारक विद्यार्थ्यांनी दिनांक 11.4.2008 पासून सुरु केलेले आमरण उपोषण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील यांनी "ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यात आसे या गावात एका महिलेने विचित्र मुलाला जन्म दिल्याने सदर मूल साक्षात राक्षस जन्माला आला असल्याची अंधश्रध्दा मनात आल्याने त्यास घरच्या लोकांनी गळफास लावून ठार केल्याची दिनांक 13.4.2008 रोजी उघडकीस आलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये

...4....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**............

सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "मंगळवेढा, जि.सोलापूर येथील पोलीस उपनिरीक्षक अंबादास यादव यांनी पोलीस ठाण्यात जबाबासाठी आलेल्या 16 वर्षाच्या एका मुलीवर बलात्कार करण्याचा प्रयत्न करणे, सदर प्रकरण दडपून टाकण्यासाठी मुलीच्या पालकांना पैशाचे आमिष दाखविल्यामुळे महिलांमध्ये गृह खात्याविषयी पसरलेले भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. आजच्या इतर सर्व सूचनांना दालनात अनुमती नाकारण्यात आली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आज नियम 93 च्या सूचनांवरील निवेदने चर्चेला घेण्यात येणार नाहीत. परंतु मला एक बाब आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. मागील आठवड्यात माननीय सभापतींनी नियम 93 वरील सूचनेच्या अनुषंगाने आदिवासींच्या जमिनीबाबत दोन-तीन दिवसात शासनाने निवेदन करावे असे निदेश दिले होते. या संदर्भात माननीय सभापतींच्या दालनात बैठक झाली. त्या बैठकीला माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते उपस्थित होते. विरोध करणाऱ्यांचे म्हणणे होते की, आदिवासींच्या जमिनी खरेदी करु नये. शासनाने मान्य केले नाही, माननीय सभापतींनी मान्य केले नाही. खेर्डी प्रकल्पामध्ये 1000 हेक्टरपेक्षा अधिक जमीन खरेदी केली जात आहे. त्यामध्ये 37 आदिवासी कास्तकारांच्या जमिनी आहेत. त्यांच्या जमिनीची खरेदीच होत नाही. त्यांचे म्हणणे असे आहे की, जमिनीच्या कागदपत्रावर 'अहस्तांतरणीय' असा शिक्का मारुन दिला आहे. आदिवासींना प्रोटेक्शन म्हणून हा निर्णय घेतला आहे. परंतु प्रकल्पाकरिता जमिनी संपादित होणार असतील तर त्यांचे म्हणणे आहे की, आमचा का छळ करीत आहात. दोन-तीन दिवसात निवेदन करावे असे माननीय सभापतींनी म्हटले होते. निवेदन झाले नाही. आपण मुदत वाढवून दिली आहे. माननीय सभापतींना या संदर्भात उद्या निवेदन करण्यासंबंधी मी विनंती केली असती.

(नंतर श्री.खर्चे...

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख.......
कारण त्यावेळी दोन तीन दिवसात निवेदन करण्यासंबंधीचे आदेश माननीय सभापतींनी दिले होते. परंतु मी अशी विनंती करणार आहे की, माननीय सभापतींनी असे आदेश दिले हे खरे असेल तर आपण शासनाला स्पष्ट सूचना द्याव्यात की, उद्याच शासनाने यासंबंधीचे निवेदन करावे.

**उपसभापती** : शासनाने यासंदर्भात उद्याच सभागृहात निवेदन करावे, असे मी निदेश देत आहे.

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, नियम 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने शासनाने कोणती ॲक्शन घेतली याची माहिती सभागृहात द्यावी असे आदेश माननीय सभापतींनी यापूर्वी दिले होते. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्या म्हाडासंबंधीच्या सूचनेवर दोन दिवसात निवेदन करावे असे आदेश दिले होते. त्याचप्रमाणे दिनांक 19 मार्च, 23 मार्च आणि 24 मार्च रोजीची मिळून एकूण 11 निवेदने करावयाची बाकी आहेत. त्यापैकी एकही निवेदन सभागृहात करण्यात आलेले नाही. म्हणून माझी विनंती आहे की, ही निवेदने येत्या दोन-तीन दिवसात करण्याबाबत शासनाला सूचना देण्यात याव्यात.

**उपसभापती** : सभागृहात जेवढी निवेदने करावयाची आहेत ती सर्व निवेदने शासनाने येत्या दोन तीन दिवसात करावीत.

-------------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : म्हाडाच्या मुंबई मंडळाने बांधलेल्या घरांच्या
विक्रीसाठी होत असलेला विलंब

मु.शी. : म्हाडाच्या मुंबई मंडळाने बांधलेल्या घरांच्या विक्रीसाठी होत असलेला
विलंब याबाबत श्री.संजय दत्त वि.प.स. यांनी दिलेली विशेष
उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

महोदय, "म्हाडाच्या मुंबई मंडळाने त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये प्रतिक्षानगर, सायन, गोरेगाव, विक्रोळी ठिकाणी सर्वसामान्य गोरगरीब व मध्यम वर्गीयांसाठी सदनिका बांधलेल्या आहेत. मुंबईमध्ये दरवर्षी सरासरी 25000 घरांची गरज असताना यावर्षी केवळ 1500 घरे बांधण्यात आली आहेत. ही घरे बांधून वर्ष उलटून गेलेले आहे. त्यामुळे ही घरे जर योग्य वेळेत आणि पावसाळयापूर्वी विक्री झाली नाही तर पावसाळ्यात गळण्याची आणि इमारतीचे बाह्य स्वरुप खराब होण्याची शक्यता आहे. या घरांची विक्री करण्यासाठी म्हाडाच्या वतीने सर्व तयारी झालेली आहे. गोरगरिबांना परवडतील अशा किंमतीत अल्प उत्पन्न गटातील या घरांकडे जनता डोळे लावून बसलेली आहे. असे असताना ही घरे काही ठराविक लोकांसाठी देण्याचे धोरण आहे, अशी जनतेमध्ये चर्चा आहे. तरी सर्वसामान्य जनतेस या घरांची विक्री करण्यासाठी म्हाडाकडून जाहिरात देण्याची आवश्यकता आहे. मात्र त्यास गेली दीड वर्ष विलंब झाला आहे." अशा प्रकारे गोरगरिबांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या आणि महत्वाच्या प्रश्नाबाबत विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

----------

...........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मराठवाड्यातील मुलांना आय.टी. शिक्षणासाठी इतरत्र जावे लागणे

मु.शी. : मराठवाड्यातील मुलांना आय.टी. शिक्षणासाठी इतरत्र जावे लागणे याबाबत श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचनादिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

"मराठवाड्यात आजघडीला अभियांत्रिकीची किमान 15 महाविद्यालये असून या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता पुणे, मुंबई, बँगलोर शहराकडे धाव घ्यावी लागणे, मराठवाड्याची राजधानी म्हणून औरंगाबाद शहरात इंडियन इन्स्टिटयुट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे केंद्र असावे या आशयाची मागणी असून त्याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, सदर केंद्राकरिता केवळ 100 एकर जमिनीची आवश्यकता असताना सदर जमीन न मिळणे, त्यामुळे मराठवाडा विभागातील मुलांना आय.टी.शिक्षणाकरिता इतरत्र जावे लागणे, याबाबत औरंगाबाद येथे इन्स्टिटयुट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे केंद्रासाठी जमीन उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

महोदय, मराठवाड्यात आजघडीला अभियांत्रिकीची किमान 15 महाविद्यालये असून या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता पुणे, मुंबई, बँगलोर शहरांकडे धाव घ्यावी लागते. मराठवाड्याची राजधानी म्हणून औरंगाबाद शहरात इंडियन इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे केंद्र असावे या आशयाची मागणी असून त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. सदर केंद्राकरिता केवळ 100 एकर जमिनीची आवश्यकता असताना सदर जमीन न मिळणे, त्यामुळे मराठवाडा विभागातील मुलांना आय.टी. शिक्षणाकरिता इतरत्र जावे लागणे, याबाबत औरंगाबाद येथे इंडियन इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या केंद्रासाठी जमीन उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. या अनुषंगाने शासनाने ताबडतोब 100 एकर जमीन उपलब्ध करुन द्यावी अशी मी विनंती करतो.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राहुरी कृषी विद्यापीठासाठी प्रकल्पग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना नोकरीच्या सवलतीपासून वंचित ठेवणे

मु.शी. : राहुरी कृषी विद्यापीठासाठी प्रकल्पग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना नोकरीच्या सवलतीपासून वंचित ठेवणे याबाबत श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचनादिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

"राहुरीच्या (अहमदनगर) महात्मा फुले कृषी विद्यापीठामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्याने अनेक शेतकरी प्रकल्पग्रस्त झाले असून त्यांना तसे दाखले देण्यात येणे, मात्र त्यांना प्रशासनाने नोकरीच्या सवलतीपासून वंचित ठेवलेले आहे. जमिनीच्या बदल्यात शेतकऱ्यांच्या मुलांना प्राधान्याने नोकरीत सामावून घेतले जाईल असा आदेश काढूनही अद्याप त्यांना नोकरीत घेतलेले नाही. जवळजवळ प्रकल्पग्रस्त म्हणून 750 कुटुंबांना दाखले देण्यात आलेले आहेत. प्रशासनाने 3700 जागा मंजूर केल्या, त्यात प्रकल्पग्रस्तांची दिशाभूल करण्यात आल्यामुळे त्यांच्यात असंतोष पसरलेला आहे. त्यांना नोकरीत सामावून न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नाबाबत तातडीने निवेदन करावे, ही विनंती."

महोदय, राहुरी कृषी विद्यापीठासाठी 6 गावच्या जवळपास 735 शेतकऱ्यांची 8000 एकर जमीन शासनाने संपादित केली आहे. विद्यापीठाने गेली 37 वर्षे या प्रकल्पग्रस्तांना नोकरी देतो म्हणून झुलवित ठेवले. विद्यापीठामध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षित जागा क वर्ग व ड वर्ग या संवर्गाच्या 3746 पदे मंजूर असून त्यापैक 4448 पदे रिक्त आहेत. विद्यापीठाने प्रकल्पग्रस्तांना नोकयादिल्या परंतु फक्त 200 प्रकल्पग्रस्तच शिल्लक राहिले आहेत. यापूर्वी त्यांनी 187 प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या दिल्या असे सांगितले पण प्रत्यक्षात मात्र त्यात 40 ते 45 प्रकल्पग्रस्तच नाहीत अशांनाही विद्यापीठाने नोकऱ्या दिल्या आहेत. म्हणून या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून माझी विनंी आहे की, जे मूळ प्रकल्पग्रस्त आहेत त्यासाठी तेथे आंदोलने झाली. अशा प्रकारे

......5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

आंदोलने झाल्यानंतर 86 पदे भरतो असे सांगण्यात आले परंतु अद्यापही ही पदे भरली नाहीत. म्हणून जी रिक्त व मंजूर पदे आहेत ती तातडीने भरावीत आणि ज्या अधिकाऱ्याने खोट्या कागदपत्रांच्या आधारे प्रकल्पग्रस्त समजून अशा नोकऱ्या दिल्या त्यांच्याविरुध्द कारवाई करावी, अशी माझी विनंती आहे.

--------------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नायगाव, जि. नांदेड येथील दर्गा ईनामी जमिनीबाबत जिल्हा प्रशासनाने घेतलेला निर्णय

**मु. शी.** : नायगाव, जि. नांदेड येथील दर्गा ईनामी जमिनीबाबत जिल्हा प्रशासनाने घेतलेला निर्णयाबाबत श्री. पाशा पटेल, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, ता.नायगाव-खैरगाव, जि. नांदेड येथील गट नं. 448, 449 ही जमीन कलशाहवली दर्ग्याची जमीन आहे. या जमिनीच्या खिदमतगाराने ही जमीन परस्पर श्री. संजय बेळगे व देविदास विश्वंबर यांना विकली. या जमिनीची विक्री झाल्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्याची विनंती मी जिल्हाधिका-यांना पत्राद्वारे केली व हे प्रकरण उघडकीस आले. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर उपजिल्हाधिकारी नांदेड यांनी तहसिलदारांच्या माध्यमातून चौकशी केली व या चौकशीमध्ये असे ठरले की, सदरील जमीन दर्ग्याची असून जो व्यवहार झालेला आहे तो रद्द झालेला आहे. परंतु सदर जमीन खरेदी करणा-याने अप्पर जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे पुन्हा अपील केले व म्हणणे न ऐकता निकाल दिला गेला असे निवेदन केले गेले व या प्रकरणाला त्यांनी पुन्हा अँटीस्टेटस्को दिला. 7/12 वर पुन्हा एकदा जमीन खरेदी करणा-याचे नाव आले. यानंतर अप्पर जिल्हाधिका-यांनी अंतिम सुनावणी 8.11.2007 रोजी दिली आणि सांगितले की, सदर जमिनीच्या खरेदी-विक्रीचा प्रकार चुकीचा असून मी हा सर्व व्यवहार रद्द करीत आहे. अशा पध्दतीचा निकाल अप्पर जिल्हाधिका-यांनी दिला. 8 दिवसातच खरेदी दाराने आपले नाव 7/12 च्या उता-यावर लावून घेतले. या लोकांनी पुन्हा औरगांबाद येथील अॅडीशनल कमिशनरांकडे अपील केले व अॅडीशनल कमिशनरांनी 29.4.2008 पर्यंत अॅटीस्टेटस्को दिला. परंतु जमीन खरेदी करणा-याने सदर जमीन साफसूफ करुन बांधकामाची तयारी सुरु केली आहे. सदर जमीनीची खरेदी विक्री होत नाही अशी माहिती असतांना देखील संबंधित अधिकारी झिकझॅक करीत आहेत. जमीन विकणारे, जमीन खरेदी करणारे आणि संबंधित अधिका-यांवर शासन कारवाई करणार का अशी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करतो.

----------

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महिला व बालकल्याण विभागाच्या योजना चांगल्या पध्दतीने होणे

**मु. शी.** : महिला व बालकल्याण विभागाच्या योजना चांगल्या पध्दतीने होण्याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्या श्रीमती उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, महिला आणि बालकल्याण विभागाच्या योजना चांगल्या पध्दतीने कार्यान्वीत होणे बाबत, महिला सामाजिक समता परिषद ही संस्था अनेक वर्षापासून प्रयत्न करते. या संस्थेने महिला व बालविकास संचालनालय, पुणे यांना निवेदन मागणी केली आहे की, महिला आणि बालविकास विभागाच्या महिलांच्या विविध वैयक्तीक लाभाच्या योजना/प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षण लाभार्थी यांना योजनांचा लाभ घेण्यासाठी 15000 /- रु. चे आतील उत्पन्नाची अट ठेवलेली आहे. या विभागाने ठेवलेली मर्यादा 30, 000 रु. पर्यंत वाढवावी लागेल. परंतु महिला व बालविकास संचालनालयाच्या टायपिंग, कंप्युटर व इतर जे प्रशिक्षणाचे कोर्सेस आहेत त्यावर मर्यादा येते. यामध्ये डिस्क्रीमिनेशन असे आहे की, जिल्हापरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या योजना आहेत त्यांना 25000/- रु. पर्यंतची अट आहे. तसेच स्टेटच्या ज्या महिला व बालकल्याणाच्या योजना आहेत त्यामध्ये 15000/- रुपयाची अट ठेवलेली आहे. एकाच राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिला-बालकल्याणासाठी वेगळी मर्यादा आणि स्टेटच्या महिला-बालकल्याणासाठी वेगळी अट ठेवली आहे. त्यामुळे 15000/- ची अट आहे ती शिथील करुन ती 30,000/- पर्यंत करावी व जिल्हा परिषदेमध्ये जी 25000/- रु. ची अट आहे ती 30,000 पर्यंत वाढवावी. असे जर झाले तर ज्या गरीब महिला आहेत त्यांना या योजनांचा फायदा घेता येईल अशा प्रकारचा विशेष उल्लेख मी आपल्या परवानगीने मांडलेला आहे.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....CC-3

**पृ. शी.** : बीयूएमएस परीक्षेत चार विद्यार्थ्यांनी परीक्षा नियमांचा भंग केल्याचा विद्यापीठाचा आरोप.

**मु. शी.** : बीयूएमएस परीक्षेत चार विद्यार्थ्यांनी परीक्षा नियमांचा भंग केल्याचा विद्यापीठाचा आरोप याबाबत श्रीमती फौजिया खान वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ, नाशिकने नोव्हेंबर-डिसेंबर 2007 मध्ये बीयूएमएस प्रथम वर्षाची घेतलेली परीक्षा, मुहम्मद रमझान कमरोद्दीन अन्सारी, घुरफान अली कमरोद्दीन अन्सारी, फातिमा फिरदोस तौहिद अन्सारी व साना फिरदोस एजाज अहमद हया विद्यार्थ्यांनी अरेबिक विषयाचा सोडविलेला पेपर उत्तर पत्रिकेमध्ये सदरील विद्यार्थ्यांनी उभ्या रेषा मारुन परीक्षा नियमांचा भंग केल्याचा विद्यापीठाने त्यांच्यावर ठेवलेला आरोप, आरोपाची चौकशी करण्यासाठी विद्यापीठाने नेमलेली चौकशी समिती, या समितीने विद्यार्थ्यांची बाजू न ऐकून घेता केलेली चौकशी आणि दिलेला अन्यायकारक अहवाल, हया पेपरमध्ये चार पैकी केवळ एक विद्यार्थी ग्रेस मार्क्सवर उत्तीर्ण होणे तर उर्वरित तीन विद्यार्थी अनुत्तीर्ण होणे, आपण उत्तर पत्रिकेत कुठलीही खाडाखोड केली नसल्याचे संबंधित विद्यार्थ्यांनी दिलेले शपथपत्र, या संपूर्ण प्रकरणात विद्यापीठ घेत असलेली पूर्वग्रहदूषित भूमिका, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करुन शहानिशा करण्याची असलेली आवश्यकता, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता तातडीने कार्यवाही होण्याची गरज "

सभापति महोदय, महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ, नाशिक द्वारा नवम्बर-दिसम्बर 2007 में बी.यू.एम.एस. के प्रथम वर्ष की ली गई परीक्षा में अल्पसंख्यक समुदाय के 4 विद्यार्थियों पर हुए अन्याय के बारे में यह प्रश्न है. विद्यार्थियों द्वारा परीक्षा देने के बाद उनकी उत्तर पुस्तिका में रेखा खींची गई. विद्यार्थियों का कहना है कि यह रेखा हमने नहीं खींची है और यह कैसे हुआ हमें मालूम नहीं. उन 4 विद्यार्थियों को फेल कर दिया गया. बाद में इन्वेस्टीगेशन टीम वहां पर गई और इन्वेस्टीगेशन टीम के निर्णय के अनुसार 3 विद्यार्थियों को फेल कर दिया गया और 1 विद्यार्थी को ए.टी.के.टी. में पास कर दिया गया. विद्यार्थियों का कहना है कि इन्वेस्टीगेशन टीम

........CC 4

16-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC 4

SGJ/ SBT/ KTG/ 12:55

. . . . श्रीमती फौजिया खान

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ने उनको बुलाकर कोई प्रश्न नहीं पूछा, जबकि नैसर्गिक न्याय के हिसाब से उनसे भी बातचीत करनी चाहिए थी और अगर इस तरह से हुआ है तो विद्यार्थियों को सही न्याय नहीं मिला है, ऐसा मैं समझती हूँ. इसलिए मैं इस पूरे प्रकरण की उच्च-स्तरीय चौकशी की मांग इस विशेष उल्लेख के माध्यम से करती हूँ.

. . . . . .

...नंतर गायकवाड़

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : श्रीवर्धन तालुक्यातील दिघी सागरी हद्दीतील हरवीत गावात आदिवासी मुलीवर केलेला सामुदायिक बलात्कार
मु.शी : श्रीवर्धन तालुक्यातील दिघी सागरी हद्दीतील हरवीत गावात आदिवासी मुलीवर केलेल्या सामुदायिक बलात्काराबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

द

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधान सभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते . :-

" श्रीवर्धन तालुक्यातील दिघी सागरी हद्दीतील हरवीत गावातील एका 14 वर्षीय अल्पवयीन आदिवासी मुलीवर याच समाजातील तीन तरुणांनी दिनांक 13.4.2008 रोजी वा त्या सुमारास सामुदायिक बलात्कार करणे, बलात्कारित मुलीने दिघी सागरी पोलीस ठाण्यात तक्रार केल्याने तिन्ही आरोपींना पोलिसांनी केवळ अटक करणे, त्यांच्यावर पुढे कोणतीच कडक कारवाई न करणे, आरोपींना कोणतीही दहशत न बसणे, त्यामुळे आरोपी गावात मोकाट फिरणे, यामुळे या परिसरातील विशेषत: स्त्रिया, मुली यांच्यात निर्माण झालेले भितीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत आसलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया "

ज्या मुलीवर बलात्कार करण्यात आला होता तिला न्याय मिळावा अशी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे शासनाला विनंती करीत आहे.

---

**उपसभापती** : यानंतर शासकीय विधेयके घेण्यात येतील.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : उच्च न्यायालय ( खंड न्यायपीठाव्दारे रिट अर्जाची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र अपिलांची पध्दती रद्द करणे) ( सुधारणा ) विधेयक

L.C. BILL NO. XI OF 2008

( A BILL TO AMEND THE MAHARASHTRA HIGH COURT (HEARING OF WRIT PETITIONS BY DIVISION BENCH AND ABOLITION OF LETTERS PATENT APPEALS) ACT, 1986.)

श्री हसन मुश्रीफ ( विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय,सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 11 - महाराष्ट्र उच्च न्यायालय ( खंड न्यायपीठाव्दारे रिट अर्जाची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र ( लेटर्स पेमेन्ट ) अपिलांची पध्दती रद्द करणे ) अधिनियम, 1986 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, रिट पिटीशनच्या संदर्भात सिंगल जज्जच्या बेंचने निर्णय दिल्यानंतर डिव्हीजन बेंच समोर जावे लागत होते त्यामध्ये आता दुरुस्ती करण्यात येत असून सिंगल जज्जच्या बेंचने निर्णय दिल्यानंतर आपण सुप्रीम कोर्टात जाऊ शकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 11 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे .

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी : श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XII OF 2008

( A BILL FURTHER TO AMEND SHREE SIDDHI VINAYAK GANPATI TEMPLE TRUST (PRABHADEVI) ACT, 1980.)

श्री हसन मुश्रीफ ( विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 12 - श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, 1980 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प..वि.क्रमांक 12 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 13:05

**पृ.शी.** : मुंबई न्यायालय - फी (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. IX OF 2008

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY-COURT FEES ACT, 1959.)

श्री. हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 9 - मुंबई न्यायालय-फी अधिनियम 1951 यात आणखी सुारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, हे विधेयक यासाठी आपण आणले आहे की, जे चेक दिले जातात आणि ते न वटता परत येतात तेव्हा त्याबाबत तक्रार करताना जी फी आकारली जात होती ती कमी होती. ती जास्तीत जास्त क1 लाख पन्नास हजार रूपये इतक्या रकमेस अधीन राहून प्रत्येक 10 हजार रूपयांसाठी किंवा त्याच्या भागासाठी 200 रूपये इतकी जादा न्यायालय-फी आकारण्याचे आपण यात प्रस्तावित केलेले आहे. म्हणजे केवळ फीच्या रकमेत दुरूस्ती आपण यात केलेली आहे. तरी आपण हे सुधारणा विधेयक विचारात घेऊन संमत करावे अशी मी आपणास विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे, आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि. क्रमांक 9 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 9 संमत झाले आहे.

***

..... इइ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत,
मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत,
मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहिशा करण्याबाबत,
मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि
महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. IV OF 2008

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PARAGANA AND KULKARNI WATANS (ABOLITION) ACT, 1950, THE BOMBAY SERVICE INAMS (USEFUL TO COMMUNITY) ABOLITION ACT, 1953, THE BOMBAY MERGED TERRITORIES MISCELLANEOUS ALIENATIONS ABOLITION ACT, 1955, THE BOMBAY INFERIOR VILLAGE WATANS ABOLITION ACT, 1958 AND THE MAHARASHTRA REVENUE PATELS (ABOLITION OF OFFICE) ACT, 1962.)

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 4 - मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम, 1950, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम,1953; मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम,1955; मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम,1958 आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम,1962 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, हे सुधारणा विधेयक आपण यासाठी आणले आहे की, ज्या वतनाच्या जमिनी होत्या त्या खरेदी करण्यासाठी संबंधित कलेक्टरची किंवा सक्षम अधिकाऱ्याची परवानगी लागत होती. त्यासाठीची तरतूद 2002 मध्ये आपण केलेली होती. ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर सौ. रणदिवे .... एफएफ 1 ...

APR/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 13:10

डॉ.राजेंद्र शिंगणे . . . .

ही तरतूद करीत असताना, पूर्वी संबंधित वतनामध्ये ज्या जमिनी खरेदी केल्या होत्या. त्यावेळेस त्यांचा प्रश्न शिल्लक होता. त्या जमिनी अगोदर खरेदी झालेल्या होत्या. त्यांची नोंद होत नव्हती. त्या बेकायदेशीर होत्या. त्यांना 25 हजार रुपयांचा दंड केला होता. त्यामुळे या विधेयकाव्दारे त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी दि.6-5-2000 च्या अगोदर यासंबंधात जे व्यवहार झालेले आहेत, त्याबाबतीत संबंधितांनी पुरावे आणून दिले किंवा खरेदीखताची नक्कल किंवा इतर काही पुरावे आणून दिले तर त्या जमिनीची देखील नोंद करण्याच्या बाबतीत तरतूद आजच्या या अधिनियमाव्दारे संबंधित पाचही वतनामध्ये करीत आहोत. म्हणून शेतकऱ्यांच्या संबंधात अतिशय चांगल्या प्रकारचे विधेयक येथे आणलेले आहे. माझी अशी विनंती आहे की, सभागृहाने त्याला मान्यता द्यावी.

प्रश्न प्रस्तुत झाला.

. . . .2एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी गरिबांच्या हिताच्या नावाखाली शेतकऱ्यांची जी अडवणूक झालेली आहे, ती दूर करण्याची भावना व्यक्त करीत असताना शेतकऱ्यांची लूट करणारे विधेयक मांडण्यात आलेले आहे हे मी प्रथम नमूद करु इच्छितो.

सभापती महोदय, मुळामध्ये मुंबईमध्ये जी जमीन आहे, ती कुलकर्णी वतनाखालील नसून ती फजलदार कायद्याखाली येते आणि त्याबाबतीत मी नंतर बोलणारच आहे. 1950 मध्ये या सदनामध्ये कुलकर्णी वतने नाहिशी करण्याचा पहिला कायदा झाला. त्यावेळी कै.मोरारजी देसाई हे मुख्यमंत्री होते. त्या कायद्याच्या माध्यमातून जशी हिंदुस्थानामध्ये संस्थाने विलीन केली, तशी या वतनांच्या बाबतीत भूमिका मांडण्यात आली. ही भूमिका काय होती ? मुळामध्ये महाराष्ट्राच्या बाबतीत वतने हा वेगळा विषय आहे. पूर्वी हिंदुस्थानामध्ये इंग्रजांनी वतने वाटली आणि त्या जमिनीची देखभाल करण्यासाठी कुलकर्णी वतने, पोलीस पाटीलकी निर्माण केली. त्यांच्या अधिपत्त्याखाली 15-20 गावे आणि मग कुलकर्णी यांनी संबंधितांना पाटीलकी दिली. त्यानुसार कुलकर्णी यांनी शासनाच्यावतीने या जमिनीचा शेतसारा वसूल करावयाचा आणि तो शासनाला इमाने इतबारे द्यावयाचा. खरे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी ही गोष्ट अत्यंत बारकाईने हेरली आणि त्यांनी त्या काळामध्ये ग्रामीण भागामध्ये जे सुभेदार होते, ते नष्ट केले. परंतु इंग्रज आल्यानंतर त्यांनी जे पुन्हा सुरु केले. परंतु देशामध्ये इंग्रजानी वतने दिली असली तरी, ही वतने देण्याची पध्दत आपल्या महाराष्ट्र राज्यामध्ये पेशव्यांच्या काळामध्ये सुरु झाली. म्हणून या राज्यातील वतनांच्या बाबतीतील इतिहास 200 वर्षापूर्वीचा आहे, इंग्रजांच्या अगोदरचा आहे. वतनामध्ये दिलेल्या काही जमिनी सरकारी आहेत, खाजगी नाहीत. पण त्यावेळी संबंधितांना त्या सांभाळण्यासाठी दिल्या होत्या. परंतु 7/12 वर सरकारी जमीन "वतन" असे लिहीलेले गेले आणि ते पिढयानपिढया पुढे सुरु राहिले.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

श्री. मोरारजी देसाई त्यावेळी मुख्यमंत्री होते. त्यानंतर कॉंट्रॅक्ट लॅंड, कूळ कायदा हा विषय आला. कूळ नष्ट करावयाची होती. परंतु त्यानंतर ती द्यावयाची कोणाला ? त्याचे अधिकार कोणाला आहेत, ही जमीन सरकारजमा होणार आहे काय ? असे विविध पैलू यामध्ये आहेत. हे सर्व कायदे वाचण्यासारखे आहेत. त्यावेळी हे विधेयक श्री. भाऊसाहेब हिरे यांनी मांडले होते. त्यावेळी व्यक्त झालेल्या भावना आपण आता अभ्यासू शकतो. कूळ कायदा नाहीसा करण्यात आला . त्यामध्ये दोन प्रकारच्या जमिनी होत्या. भाडेकराराची म्हणजेच लिज कराराची जमीन व दुसऱ्या प्रकारची जमीन म्हणजे बक्षीस वतनांची जमीन. खोतीचा कायदा रद्द करण्यात आला होता. त्या खोतांचे जे कूळ होते त्यास कूळ कायद्याप्रमाणे जमीन मिळाली . हा कायदा रद्द झाल्यानंतर ग्रामीण भागामध्ये, 7/12 व 6/12 चा उतारा आला. महसुली विभागामध्ये हा कायदा आणल्यानंतर या विभागाकडून नक्की काय केले जाणार आहे ते मी आपल्याला पुढे सांगणार आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये असे म्हटले आहे की, "भोगवटादाराला, कृषिसंबंधी प्रयोजनासाठी हस्तांतरित करता येईल आणि अशा हस्तांतरणासाठी जिल्हाधिकाऱ्याची किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्याची पूर्वमंजुरी किंवा ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असणार नाही आणि अशी हस्तांतरित करण्यात आलेली जमीन, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 याच्या तरतुदीनुसार, अशा हस्तांतरित भोगवटादाराकडून, नवीन व अविभाज्य शर्तीवर ( भोगवटादार वर्ग -दोन ) धारण करण्यात येईल, अशी तरतूद करण्यात आलेली आहे. असा भोगवटा, उक्त सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर, अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या 50 टक्के इतकी रक्कम शसनाला प्रदान करुन, जुन्या शर्तीमध्ये ( भोगवटादार वर्ग-एक) रुपांतरित करता येईल ". परंतु हे बिल मांडताना असे सांगितले नाही. याबाबत पुढे मी बोलणार आहे. या निमित्ताने जमीन हस्तांतरण हा विषय अतिशय गंभीररीत्या मांडला जाणार आहे.

सभापती महोदय, महसुली खात्यामध्ये अनेक त्रुटी आहेत. या सगळया त्रुटी मी येथे सांगत बसलो तर त्यास 5 -6 तास लागतील. कालच मला तंबी मिळालेली आहे. त्याचा उहापोह मी नंतर करणार आहे. मुंबई परागणा हा शब्द येथे वापरला गेला. तसेच मुंबई शहरामध्ये

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

फजलदारी कायदा आहे. सन 2005 मध्ये लँड टेन्युअर ॲबोलिशन या कायद्याची अंमलबजावणी झ ााली. भायखळा, माजगाव ,मलबार हील, खंबाला हील या विभागामध्ये भाडेपट्टयाने सरकारच्या जमिनी दिलेल्या आहेत. जमिनी अभिहस्तांतरीत करीत असताना या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे याचे स्पष्टीकरण यामध्ये नसल्यामुळे गडबड निर्माण झालेली आहे.

यानंतर श्री. बरवड..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

सभापती महोदय, यामध्ये बी 1 जे आहे ते भाडेपट्टयाच्या बाबतीत आहे आणि बी 2 जे आहे ते भाडेपट्टयास जी पर्यायी जमीन उपलब्ध करुन दिलेली आहे त्यासंदर्भात आहे. आपली जमीन सरकारी कामकाजाकरिता घेतली तर आपल्याला पलीकडील पर्यायी जमीन दिली जाते त्यासंदर्भात हे आहे. जसे धरणग्रस्तांच्या बाबतीत करतो त्या पध्दतीने शहरातील जमीन घेतली असेल तर त्याबदल्यात उपनगरामध्ये पर्यायी जमीन दिली अशा पध्दतीचे हे आहे.. अशा ज्या जमिनी आहेत त्यांची नोंद सरकारी जमीन म्हणून आहे. ज्याला ती जमीन दिली त्याच्या नावावर जमीन आहे परंतु मूळ रेकॉर्डला जमीन सरकारची आहे. या बदलून दिलेल्या जमिनीच्या संदर्भात काही बाबतीत 99 वर्षाची लीज असते, काही बाबतीत 999 वर्षाची लीज असते तर काही ठिकाणी परपॅच्युअल लीज असते. हे सगळे ठीक आहे. पण मला सरकारच्या धोरणातील गणित अजून कळलेले नाही. मुंबई शहरामध्ये आता शेती नाही. म्हणजे कोणत्याही जमिनीचा एन.ए. करावा लागत नाही. परंतु उपनगरामध्ये सुध्दा आता शेती नाही तरी सुध्दा मुंबईतील प्रत्येक जमिनीचा एन.ए. करावा लागतो. एन.ए. ची परवानगी घ्यावी लागते. ती परवानगी जिल्हाधिकारी देतात. आज बृहन्मुंबईमध्ये आपण एमएमआरडीएबाबत बोलतो. त्यांच्या विकासाची कक्षा आता कल्याण-डोंबिवलीपासून रायगड पर्यंत गेलेली आहे. मुंबई शहराच्या उपनगरामध्ये आजही आपली जी जमीन आहे ती बिगरशेती करुन घ्यावी तरच पुढची परवानगी मिळेल अशी जाचक अट का ठेवली ? ती अट का काढली जात नाही ? मुंबई शहरात ही अट नाही. मुंबईमध्ये शेती नाही. मुंबई शहराच्या पलीकडे मुंबई उपनगर तसेच ठाणे शहर, नवीन मुंबई हे इतके सलग झाले आहे की ते कोठे वेगळे करावयाचे हे ओळखता येत नाही. तरीही आमच्या उपनगरामध्ये बिगरशेतीचा परवाना घेणे ही बाब का करावी लागते ? चेंबूर भागामध्ये ज्या जमिनी आहेत तो आणखी गमतीचा भाग आहे. उपनगरांमध्ये पूर्वी आपला चटईक्षेत्र निर्देशांक 0.50 होता. या सगळ्या जमिनी सरकारी आहेत. या फजलदारी जमिनी आहेत. तो निर्देशांक नंतर 0.75 झाला. त्यानंतर तो निर्देशांक 1 झाला. टीडीआर 1:1 म्हणजे एफएसआय 2 झाला. त्यामुळे या जमिनीची पूर्वी जी किंमत होती ती कित्येक पटीने वाढली. जमिनीची उपलब्धता, जमिनीची आवश्यकता या सगळ्या परिस्थितीमुळे या जमिनीला सोन्याचाही

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

पलीकडे प्लॅटीनमचा भाव निर्माण झाला. या आपल्या सरकारी जमिनी आहेत. त्या ठिकाणी श्री. संगीतराव नावाचे जिल्हाधिकारी होते. जे लीज ॲग्रीमेंट होते सगळे पडून होते. सरकारला काही उत्पन्न येत नव्हते. त्यांनी लीज ॲग्रीमेंटमधील कलम 75 आणि 76 लागू करण्याचे ठरविले. हे कलम त्यामध्ये होतेच परंतु त्यांनी ते कलम शोधून काढले. प्रत्येक अधिकारी आपापल्या पध्दतीने कसा काम करीत असतो त्याचा हा भाग आहे. हस्तांतरण करण्यायोग्य आणि हस्तांतरण करण्याची परवानगी लागणाऱ्या जमिनी याची कॅटेगरी त्यांनी तयार केली. जे जुने करारपत्र होते ते त्यांनी काढले. ज्याला आपण अनर्जित उत्पन्न म्हणतो ते 50 टक्के मिळाले पाहिजे. तो भरणा जिल्हाधिकाऱ्यांकडे भरावयाचा असतो. त्यांनी ज्या इनामी जमिनी होत्या, ज्या फजलदारी जमिनी होत्या त्यांच्या बाबतीत नोटिसेस काढल्या की, आपण जिल्हाधिकाऱ्यांकडे पेसे भरले पाहिजेत. मघाशी मी चटईक्षेत्र निर्देशांकाबद्दल बोललो. त्याचा उल्लेख या ठिकाणी येतो. 0.50 असलेले चटईक्षेत्र 1 झाले आणि टीडीआर 1:1 म्हणून एफएसआय 2 झाला. त्यामुळे या जमिनीची किंमत कित्येक पटीने वाढली.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

म्हणून मग अनार्जित उत्पन्न आहे ते आजच्या बाजार भावाप्रमाणे 50 टक्के भरले पाहिजे असे श्री.संगीतराव यांनी आदेश निगर्मित केले. त्यांनी वाईट केले असे मी म्हणणार नाही. कारण कायद्याच्या तरतुदीप्रमाणे त्यांनी ते काम केले. पण ही लढाई न्यायालयामध्ये गेली. न्यायालयामध्ये गेल्यानंतर न्यायालयाने सर्व अभ्यास करुन असे मत नोंदविले की, एवढया जुन्या जमिनी आहेत, बी 1, बी 2 च्या आहेत, सरकारने जमिनी घेतल्या म्हणून पर्यायी जमिनी म्हणून दिलेल्या आहेत. मग त्यावर यांचा अधिकार काय ? अधिकार असला तरी सरकारने उत्पन्नाच्या दृष्टीने केलेला कायदा आहे तो योग्य की अयोग्य आहे ? या मुद्याला धरुन सर्व विकासक न्यायालयामध्ये गेले. बाजार भावाप्रमाणे 50 टक्के अनार्जित उत्पन्न भरावे असा जो जिल्हाधिका-यांचा आदेश होता त्या आदेशाला कोर्टाने स्थगिती देताना असे सांगितले की ते योग्य की अयोग्य हा निर्णय घेतलेला नाही. त्या विकासकाचा दस्तऐवज, कन्व्हेयंस should be registered, तो नोंदवून घेतलाच पाहिजे. उद्या कोर्टाचा निर्णय लागेल तो मला लागू असेल अशाप्रकारचे त्याच्याकडून हमी पत्र भरुन घ्यावे व 50 हजार रुपये डिपॉझिट भरुन घ्यावे, असे सांगितले. या जमिनींच्या संदर्भात अनार्जित उत्पन्नाच्या हस्तांतरणासाठी बाजार भावाप्रमाणे लाखो रुपये द्यावे लागत होते त्याला कोर्टाने स्थगिती दिली. हे आदेश आले. मग लीज, लिव्ह अॅण्ड लायसन्सच्या सर्व जमिनींचा विषय चालू असताना श्री.विश्वास पाटील नावाचे नवीन जिल्हाधिकारी आले. ते महाराष्ट्राचे सिध्दहस्त लेखक, मूर्तिमंत इतिहास डोळयासमोर उभा करणारे आहेत. त्यांची 'संभाजी' ही कादंबरी अतिशय वाचनीय आहे. पानिपतकार म्हणून त्यांचे नाव प्रसिध्द आहे. ते आय.ए.एस.आहेत पण इतिहासामध्ये वावरता वावरता ते शासनामध्ये अधिकारी पदावर काम करीत होते, शासन कसे चालते त्यांना स्पष्ट दिसत होते. माझे ते मित्र आहेत, लेखक आहेत म्हणून मित्र आहेत, शासनाचे अधिकारी म्हणून नाही. त्यांच्या लिखाणाबद्दल माझ्या मनामध्ये आदर आहे. पण शासकीय अधिकारी म्हणून त्यांचा दुसरा चेहरा कसा आहे ते सांगतो. त्यांनी 'झाडाझडती' नावाचे पुस्तक लिहिले. ते पुस्तक वाचण्यासारखे आहे. मी ते पुस्तक अनेकांना

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

वाटतो. सभापती महोदय, मी दुसरे एक पुस्तकही विकत घेऊन वाटत असतो. राजीव गांधींच्या असासिनेशनबद्दल मूळ इंग्रजी पुस्तक आहे त्याची मराठी आवृत्ती निघाली आहे. त्या शोधपथकाचे जे अधिकारी होते त्यांनी अतिशय सुंदर पुस्तक लिहिले आहे. राजीव गांधींच्या खूनाच्या संदर्भातील ते पुस्तक आहे. पोलीस अधिका-यांनी किती दक्ष आणि काटेकोरपणे काम करावयाचे म्हटले तर किती चांगले काम करु शकतात, पोलीस अधिका-यांकडे किती ताकद असते, ते त्या पुस्तकातून वाचनात आले. मला ते खूप भावले. त्यामुळे मी एखाद्या चांगल्या अधिका-यांना सांगतो की, पोलिसांकडे किती ताकद आहे ते जाणून घेण्यासाठी ते पुस्तक वाचावे. तुम्ही कोण आहात ते तुम्हाला कळेल. चिरीमिरी खाऊन दोन मिनिटांची मौजमजा करण्यापेक्षा तुमच्यावर देशाची किती जबाबदारी आहे ते कळेल. तसेच हे 'झाडाझडती' पुस्तक आहे. महाराष्ट्र शासनाच्या विविध पातळीवर होणा-या भ्रष्टाचाराचा पर्दाफाश करणारे श्री.विश्वास पाटील तेथे आले. श्री.विश्वास पाटील यांच्यातील अधिकारी जागा झाला आहे. त्यांनी लावण्यवती नावाची सुंदर कादंबरी लिहिली आहे. त्यांनी मला 'संभाजी' आणि 'लावण्यवती' या दोन्ही कादंब-या भेट म्हणून दिल्या होत्या. त्यांनी मला एकदा या दोन्ही कादंब-या वाचल्या आहेत काय, असे विचारल्यावर मी म्हटले की, मला दुसरी कादंबरी आवडली आहे. सभापती महोदय, आपण श्री.विश्वास पाटील यांचे साहित्य वाचले आहे की नाही हे मला माहीत नाही.

**उपसभापती** : मी श्री.विश्वास पाटील यांनाच वाचले आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 13:30

(श्री. दिवाकर रावते....)

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे)**

सभापती महोदय, याबाबतीत काहीच अधिकार राहिलेले नाहीत म्हणून तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. विश्वास पाटील यांनी जिल्हाधिकारी म्हणून नाही तर डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट म्हणून आदेश काढले. ही गोष्ट माननीय महसूल मंत्र्यांना माहीत असेल की प्रत्येक जिल्हाधिकारी हा डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार असतो. जिल्हाधिकारी आणि डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार यांचे अधिकार वेगवेगळे आहेत. त्यांनी सब-रजिस्ट्रारला आदेश काढले की, माझी परवानगी घेतल्या शिवाय कोणत्याही दस्तैवजांची नोंदणी करु नये. या आदेशाविरुध्द विकासक कोर्टात गेले. कोर्टाने श्री. विश्वास पाटील यांनी काढलेल्या आदेशाला स्थगिती दिली. सभापती महोदय मुंबई परगणा व कुळकर्णी वतनाच्या कायद्याच्या संदर्भात अशा प्रकारची तफावत दिसून येते. या विधेयकामुळे भविष्यात होणा-या परिणामांबाबत मी आपणास सांगत आहे. ब-1, ब-2 हे जमिनीचे 2 प्रकार दिलेले आहेत. 7/12ला सरकारी वतनांमध्ये यांची नांवे आहेत. सिटी सर्व्हेमध्ये देखील ब-1, ब-2 असेच आहे. कॉलम -1 मध्ये सरकारी जमीन पट्टा असे लिहिलेले आहे. या दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये कन्व्हेयन्स करीत असताना, कन्व्हेयन्स असाईन्मेण्ट किंवा डीड ऑफ ट्रान्स्फर करीत असताना वर्षानुवर्षे होत असलेले मागचे बदल नोंदणे आवश्यक होते. सुरुवातीला 1950मध्ये मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबतचा कायदा करण्यात आला. त्यानंतर 1953मध्ये मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबतचा कायदा करण्यात आला. 1955 मध्ये मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबतचा कायदा करण्यात आला. 1958मध्ये मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबतचा कायदा करण्यात आला आणि 2002मध्ये महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. हे करीत असताना तुम्ही उपनगरे विचारात घेतली आहेत की नाहीत याबाबतीत स्पष्टता नाही. आता यापूर्वीचे सर्व रेग्युलराईज करण्याच्या संदर्भात हे विधेयक आणलेले आहे. हे सर्व करीत असताना महसूल खात्याची अशी दुर्दशा झालेली आहे की त्या खात्याचे कोणावरही नियंत्रण राहिलेले नाही. रजिस्ट्रेशनची तीन कार्यालये होता होता तीन वर्षे गेली. पदोन्नती, नियुक्ती, बदली हा फार मोठा गंभीर विषय आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 13:30

(श्री. दिवाकर रावते....)

मुंबईच्या रजिस्ट्रेशन कार्यालयामध्ये कोणाला आणावयाचे, उपनगरामध्ये जिल्हाधिकारी म्हणून कोणाला आणायचे.... कोणावर आरोप करावयाये असतील तर त्यासाठी नोटीस द्यावी लागते. मी नोटीस दिलेली नसल्यामुळे मी आरोप करीत नाही आणि ते आता या सभागृहात देखील नाहीत.... माननीय सभापतींनी संरक्षण दिले तर या सभागृहाच्या माध्यमातून खूप काही चांगले करता येईल. हा संरक्षणाचा विषय आहे. सभापती महोदय, मुंबईचा प्रश्न अतिशय गंभीर झालेला आहे. वर्षानुवर्षे अशी प्रथा होती की, एकदा कन्व्हेयन्स झाले की ते दस्तऐवज सिटी सर्व्हेकडे जात होते, तेथे त्यांची नोंदणी होत होती व तेथून ते दस्तऐवज पुण्याला जात होते. सिटी सर्व्हेवर ज्यांच्या नावाने कन्व्हेयन्स झालेले असेल त्यांच्या नावांची नोंद होत होती.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदया, 1995 नंतर सिटी सर्व्हे विभागाकडे कागदपत्रे रजिस्ट्रेशन करण्यासाठी पाठविणे बंद झाले. मी नवीन कायद्याच्या तरतुदीनुसार एखाद्या मालमत्तेचे हस्तांतरण करताना डाक्यूमेंट रजिस्ट्रेशन करावयास गेलो तर कलम 230 (ए),कलम 37 (ए) याप्रमाणे कार्यवाही केली जाते. आता यूएलसी कायदा रद्द झाला आहे. बाजारमूल्य कायद्याप्रमाणे मालमत्तेचे व्हॅल्यूएशन केले जाते, ही सर्व प्रक्रिया पूर्ण होत नाही तोपर्यंत सिटी सर्व्हे कार्यालयाकडे दस्तऐवज जात नाहीत. ते दस्तऐवज नोंदणीसाठी तशीच पडून असतात. या गोष्टीचा परिणाम असा झाला आहे की, सिटी सर्व्हेच्या प्रॉपर्टी रकॉर्डवर नाव येणे बंद झाले. आता तोच विषय पुढे आला आहे. तुम्ही नावे रेग्युलाईज करण्यासाठी प्रयत्न करीत आहात. पूर्वीची नावे सगळी गेलेली आहेत. मागचे काय झाले त्याबाबतीत आपण आता पुरावे मागत आहात. समाजकार्य करुन मला जवळपास तीस वर्षाचा कालावधी झाला आहे. या विषयावर नेहमी बोलतो आहे. याबाबतीत किती गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे त्याविषयी मी उदाहरण देणार आहे... मला मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रातील जमिनीचे दर माहिती आहे. श्री. विश्वास पाटील यांच्या सारख्या झाडाझडतीच्या भूमिकेत शिरल्यावर मी बरीच काही माहिती या विषयी सांगू शकतो. परंतु मुंबईसह राज्यात जमिनीचे दर काय आहेत याची मी कशाला माहिती सांगू. त्यांनी या विभागात कसा भ्रष्टाचार होतो ही गोष्ट सांगितली. ते प्रत्यक्ष अनुभवयाला मिळावे म्हणून ते त्या भूमिकेत शिरतात. त्यांना काय अनुभव आले आहेत यासंबंधीची मला माहिती प्राप्त झाली आहे. परंतु त्यांना काय अनुभव आले या विषयी मी माहिती सांगू शकत नाही. कारण थोडेसे मित्रत्व सांभाळावे लागते. सध्या मालमत्तेच्या संबंधी नोंदी नसल्यामुळे बी-1 आणि बी-2 नुसार या मालमत्ता बेनामी म्हणून नोंदल्या जातात. पूर्वीच्या वेतनाच्या जमिनी, इनामी जमिनी इत्यादी जमिनी बेनामी म्हणून नोंदविण्यात आल्या आहेत. खाजगी जमिनीच्या बाबतीत हा प्रकार चालू आहे. मालमत्तेचे डाक्यूमेंट नोंदणी करताना शासनाला नोंदणी शुल्क मिळते. त्यासंबंधी मुद्रांक शुल्क मिळते. ज्या जमिनी नोंदणी पूर्ण झाल्या नाहीत त्या कधी लक्षात येतात ? मी स्वत: राहतो त्या ठिकाणच्या जमिनीच्या संदर्भात 1976 साली सब डिव्हीजन झाले आहे. यासंबंधीची जी काही कागदपत्रे होती ती त्या कार्यालयास सादर करुन त्यावर सही शिक्का घेतलेला आहे. मी मुंबईत राहतो ती जमीन पोर्तुगीजांनी त्या मालकांना दिली आहे. त्या जमिनीचे कन्व्हेयन्स झाले, त्याचे सब डिव्हीजन झाले. 1976 साली सर्व कागदपत्रे मी स्वत: जाऊन जिल्हाधिकारी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

कार्यालयाकडे दिली होती. दीड वर्षापूर्वी माझ्या इमारतीखाली आपल्या विभागाचे अधिकारी वाजत गाजत जमिनीचा लिलाव करण्यासाठी आले. मी त्यांना विचारले की, काय भानगड आहे ? त्या अधिका-यांनी आम्हाला सांगितले की, तुम्ही जमिनीचा कर भरलेला नाही. आम्ही त्या अधिका-यांना सांगितले की, आम्ही जमिनीचा कर भरलेला आहे. आम्ही कराच्या रुपाने पैसे भरलेले आहेत. दोन्ही प्लॉटचे वेगवेगळे पैसे भरले जात आहेत. जिल्हाधिका-यांचे टॅक्सचे एक बील येते. दुस-या प्लॉटचे बील वेगळे येते. तुम्ही कोणाच्या जमिनीचा लिलाव करण्यास निघाला आहात म्हणून मी माहिती घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे गेलो. त्या ठिकाणी आम्हाला सांगितले गेले की, सर्व्हे क्रमांक 230 च्या सब डिव्हीजनचा हा लिलाव आहे. आपण दोन्ही प्लॉटधारकाकडून कर घेत आहात असे आम्ही सांगितले. आमच्या रेकॉर्डला ते वेगळे आहेत., हे प्लॉट तर एकत्र नाहीत. यासंदर्भात एक नवीन अर्ज केला आहे. आठ दिवसापूर्वी मी जिल्हाधिकारी यांना भेटून आलो. या जमिनी बाबतच्या प्रकरणाची कागदपत्रे सादर करुन तीस वर्षे झाली. तीस वर्षांनी पुन्हा अर्ज केले. पूर्वीचे अधिकारी निवृत्त होऊन नवीन अधिकारी आले आहेत. त्यांना सांगितले जाते की, यांचे काम लवकर करुन टाका. मी माझे स्वत:चे उदाहरण देत आहे. सब डिव्हीजनचे रेकॉर्ड हा विषय वेगळा झाला....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

महसूल खाते भूखंड लोकांच्या नावावर चढविण्यासाठी दक्षता घेत नसून भूखंड लोकांना देण्यामध्ये दक्षता घेत आहे. जमिनीसंदर्भातील कर जिल्हाधिकाऱ्यांकडे भरावयाचा असतो. हा कोणाच्या नांवे वसूल करायचा ? सरकारच्या नांवाने वसूल करण्यात येतो. हा कायदा येथे आणला आहे तो जमीन नांवावर करण्याकरिता आणला आहे. जमिनी रेग्युलराईज करण्याकरिता कायदा आणला आहे. दुर्देवाने मुंबई शहराची परिस्थिती कशी आहे ते मी आपल्याला सांगतो. आता सहावा वेतन आयोग येणार आहे. कर्मचारी आयोग लागू करण्यासाठी उभे राहतील. गडगंज पगार मिळेल. हरकत नाही. आनंद आहे. काम करणार तर पैसे मिळाले पाहिजेत. परंतु टेबलवरील फायली हलतच नाहीत. एका आयएएस अधिकाऱ्याकडून दुसऱ्या आयएएस अधिकाऱ्याकडे आणि त्याच्याकडून तिसऱ्या आयएएस अधिकाऱ्याकडे फायली फिरत आहेत. निर्णय होत नाही. महसूल खाते किचकट आहे. परंतु लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. लोकांच्या राहत्या जमिनीचा विषय आहे. आज मुंबईच्या सरकारी कार्यालयात कोणताही नकाशा मागायला गेलात तर तुम्हांला लेखी पत्र दिले जाते की 1970 पासून नकाशे तयार करणारी यंत्रणा रद्द झालेली आहे. मराठवाडयातील शेतीच्या चाऱ्या उद्ध्वस्त झाल्या. सर्वेक्षण करण्याबाबत तत्कालीन सिंचनमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांनी प्रस्ताव आणला होता. परंतु चाऱ्या नष्ट झाल्या. 1970 पासून मुंबईतील नकाशे देण्याची यंत्रणा बंद झाली. एखाद्याने नकाशा मागितला तर शहराचे भूमापन अधिकारी पत्र देतात की आमच्याकडे जे नकाशे उपलब्ध आहेत ते फाटलेल्या अवस्थेत आहेत त्यामुळे ते नकाशे आम्ही तुम्हांला देऊ शकणार नाही. कशासाठी हे अधिकारी त्याठिकाणी बसले आहेत ? नागपूरला सॅटेलाईटच्या माध्यमातून नकाशे तयार करण्याचे काम दोन वर्षापूर्वी दिलेले आहे. अजून ते नकाशे आलेले नाहीत. शेतकऱ्यांच्या हिताचे प्रश्न मांडणारे हे सरकार मुंबई शहराच्या नकाशाच्या संदर्भात 1970 पासून नकाशे मिळत नाहीत ते फाटलेल्या अवस्थेत आहेत असे लेखी पत्र देतात. महसूल खाते सेवा देण्याकरिता आहे. परंतु ती सेवा उपलब्ध होत नाही. नागपूरला नकाशे सॅटेलाईटवरुन काढून दिले जाणार होते दोन वर्षे झाली परंतु नकाशे मिळाले नाहीत. ती व्यथित होऊन हे बोलत आहे. पणनमंत्री गेल्या अधिवेशनात बोलले होते की, सॅटेलाईटच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार पश्चिम विदर्भातील या या जिल्हयामध्ये प्रत्यक्ष एवढा कापूस खरेदी झाला. सॅटेलाईटच्या माध्यमातून मिळालेल्या माहितीनुसार 80 टक्के कापसाची लागवडच झालेली नव्हती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.......2

श्री. दिवाकर रावते ....

शेतकऱ्यांनी बोगस पैसे घेतले. शेतकरी बदमाष आहेत, चोर आहेत. सॅटेलाईटच्या माध्यमातून माहिती मिळाली की 80 टक्के कापूस बोगस आहे. शेतकऱ्यांच्या बाबतीत सॅटेलाईटच्या माध्यमातून एवढी पटकन माहिती मिळते तर मुंबई शहराच्या नकाशांच्या संदर्भातील माहिती सॅटेलाईटच्या माध्यमातून का उपलब्ध होत नाही? पाटबंधारे मंत्री श्री. अजित पवार यांच्या खात्यामध्ये सॅटेलाईटच्या माध्यमातून सर्व्हे केलेला आहे की......

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

या जिल्हयात पाण्याचा साठा कुठे आहे? पाणी कुठे उपलब्ध होणार आहे? कुठे उपलब्ध होणार नाही? कुठे बोअर घेतली तर पाणी मिळेल आणि कुठे घेतली तर पाणी मिळणार नाही याबाबत सर्व्हे झालेला असताना जमिनीच्या संदर्भातील सर्व्हे उपलब्ध झालेला असताना, हवामानाच्या माध्यमातून, जमिनीच्या संदर्भातील अनेक बाबी सॅटलाईटच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या असताना दोन वर्षे होऊनही मुंबईतील जमिनींचे नकाशे मात्र उपलब्ध होत नाहीत. शेतकऱ्यांना पटकन नकाशे मिळतात. हा प्रश्न शासन कधी सोडविणार आहे? कसा सोडविणार आहे? आज मुंबईचा चेहेरामोहरा तुमच्या नकाशावर नाही. कोणती जमीन कायदेशीर आहे किंवा कोणती जमीन बेकायदेशीर आहे हे नकाशाच्या आधारे सांगता येते. आज गुगल अर्थ या वेबसाईटवरुन तुमच्या माझ्या घराची खिडकी दिसू शकते. एवढे तंत्रज्ञान विकसित झालेले असताना शेतकऱ्यांसाठी खूप काम झाले, परंतु मुंबईच्या नकाशाच्या संदर्भात निर्णय होत नाही. करोडो रुपये शासनाला मुंबईच्या जमिनीच्या माध्यमातून मिळत आहेत. या जमिनीमध्ये किती भूखंड आहेत? एन.ए.ची परमिशन देताना किती एन.ए.परमिशन दिल्या जातात? उपनगरामध्ये एकूण 4 डिव्हीजन आहेत. या चार डिव्हीजनमध्ये प्रत्येक महिन्याला किमान 20 ते 25 एन.ए.परमिशनचे अर्ज येतात. याचा दर काय आहे? या संदर्भात कादंबरी लिहावी लागेल. किमान 50 हजार रुपये ते जास्तीत जास्त 5 लाख रुपये असा परमिशनचा रेट आहे. किती चौरस मीटर जमीन आहे त्यावर हा दर अवलंबून आहे.

सभापती महोदय, 2002 व 2006 नंतर महानगरपालिका, टाऊन प्लॅनिंग, रेल्वे इ.संस्थांकडून उपलब्ध झालेल्या जमिनी आहेत त्याची शासनाकडे नोंद नाही. मुंबईमध्ये एवढा घोळ निर्माण झालेला आहे. मुंबईमध्ये नाले बुजविले जातात, नवीन नाले निर्माण केले जातात याची नोंद होते. नकाशे तयार करण्याचे काम नागपूरच्या संस्थेकडे दिले. ते कधी पूर्ण होणार आहे? मुंबई परगण्यामध्ये किती बी-1, बी-2 जमिनी आहेत हे सांगणार आहात की नाही? बिनशेती प्रकरणाचा मुंबई शहराबाबत जो प्रश्न निर्माण झालेला आहे तसा तो उपनगराबाबत देखील जाहीर केला जावा म्हणून बिल आणण्यात यावे. मुंबई शहरामध्ये जमिनीबाबत एन.ए.ची आवश्यकता भासत नाही. डायरेक्ट एन.ए.टॅक्स वसूल केला जातो. प्रत्येक वर्षाला जिल्हाधिकाऱ्यांच्या तिजोरीत करोडो रुपये जमा होत आहेत. मुंबई शहरामध्ये या जमिनीचा वापर एन.ए.पर्पजसाठी

..2..

श्री.दिवाकर रावते.........

करीत आहात म्हणून शासनाला टॅक्स भरावा लागतो. विधानभवन या इमारतीच्या जागेचा सुध्दा एन.ए.टॅक्स घेतला जात असावा. मुंबई उपनगरामध्ये 50 हजार ते 5 लाख रुपये जमा करण्याचे सूत्र कशासाठी ठेवले आहे? पोस्टींग होण्यासाठी किती पैसे दिले जातात? पैसे कोण घेतो? किमान एक कोटी रुपये दर आहे. या संदर्भातील माहिती पटलावर ठेवली तर आनंद होईल. उघड्या डोळयाने अंधत्व स्वीकारुन तुम्ही चालत असाल तर गांधारीच्या भूमिकेत तुम्ही आहात.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ..........

गांधारी देखील पट्टीच बांधायची तशी पट्टी मी बांधायचे ठरविले. मला नजर दिली आहे पण तरीही मी पट्टीच बांधणार आहे.

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : पुरुषप्रधान संस्कृतीचा कोप म्हणून गांधारीने ही पट्टी आपल्या डोळयावर बांधून ठेवली होती.

श्री. दिवाकर रावते : महोदया, पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीचे फार माहात्म्य सांगितले आहे. त्यावर अडीच तासाची चर्चा ठेवली तर भरपूर बोलता येईल. माननीय सभापती महोदया, जमिनीच्या संदर्भात आज जे आज चालले आहे ते सर्व होत असताना बिनशेती परवान्यासाठी शहराप्रमाणेच उपनगरासाठी सुध्दा ताबडतोब मदत करावी. आपल्याला असे केले तरी त्यातून उत्पन्न येणारच आहे. बिगर शेती परवान्यासारखे अशा प्रकारे उत्पन्न जमवून नको त्यांना कुरणे उपलब्ध करुन दिली. ग्रामीण भागात ज्याप्रमाणे रान डुकरांचा त्रास आहे त्यापेक्षा या बिलातील परिस्थिती वेगळी नाही. जसा रान डुकरांचा प्रश्न आहे तसाच प्रश्न हरणांचाही निर्माण होत आहे. परंतु वन्य जीव संरक्षक कायद्यामुळे त्यांना मारता येत नाही.

महोदय, श्री. रामभाऊ चव्हाण यांनी आठ दिवसांपूर्वी कोल्हापूरमध्ये आंदोलन केले होते. त्यांचे आंदोलन मी टी.व्ही. वर पाहिले त्यावेळी त्यांनी जे निवेदन दिलेले आहे ते मी मागवून घेतले. त्या निवेदनात असे म्हटले आहे की, कोल्हापूरच्या 8 ते 10 हजार मिळकत धारकांच्या 7/12 वर महसूल खात्याने सरकारी बोजा नोंद केला होता. रयतावा न करता इनामी जमिनी प्लॉट पाडून विकल्या गेल्या आहेत त्या इनामी जमिनीवर आज बऱ्याच ठिकाणी घरे, बंगले उभे राहिले आहेत व असे व्यवहार होऊन आज 25 ते 30 वर्षे झालेली आहेत व आता शासनाला जाग येऊन चालू बाजारभावाच्या 75 टक्के रकमेचा बोजा नोंद करण्यात आलेला आहे व महसूल खात्याने सदर रक्कम वसुल करण्यासाठी दबाव तंत्र सुरु केले आहे. सदर दबाव तंत्र करताना मार्च 2008 च्या तारखा टाकूनसंबंधित मिळकतधारकांना नोटीस काढल्या व 7/12 वर चालू बाजारभावाच्या 75 टक्के एवढा बोजा नोंद करण्यात आला आहे. सरकारी बोजा नोंद केल्यामुळे या जागांची खरेदी, विक्री कर्ज, घरबांधणी हे सर्व थांबले आहे त्यामुळे 8 ते 10 हजार मिळकत धारकांमध्ये असंतोष माजला आहे. सदरच्या जागा नाममात्र कर घेऊन नियमित कराव्यात असा

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

निर्णय प्रलंबित असताना अचानक महसूल खात्याने व स्थानिक अधिकाऱ्यांनी गोरगरीब कष्टकरी लोकांना त्यांच्या जागांवर बोजा नोंद करुन कोंडीत पकडले आहे असाच प्रकार ग्रामीण भागात सुध्दा चालू केला आहे त्याचेच एक उदाहरण म्हणजे पाडळी खुर्द या ठिकाणी 1978 साली महसूल खाते व ग्रामपंचायत यांनी मिळून 220 प्लॉटचे वाटप केले हे करताना ग्रामपंचायतीच्या सामान्य पावतीने त्यांचे 75 रुपये भरुन घेतले व त्यानंतर आता 2 ते 3 वर्षांपासून म्हणजे तब्बल 28 ते 30 वर्षानंतर सदरचे महसूल खाते जागे झाले.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

सर्व मिळकतीधारकांना चालू रेडीरेकनर प्रमाणे तब्बल 44 हजार रुपये रक्कम भरण्यासाठी तलाठयांमार्फत तगादा लावलेला आहे. अशा प्रकारे सामान्य जनतेला वेठीस धरयास आलेले आहे.

सभापती महोदय, यासंदर्भात कोल्हापूरमध्ये मोर्चे सुध्दा निघालेले आहेत. या विधेयकामध्ये हस्तांतरी नवीन भोगवटदाराकडून अविभाज्य शर्तीवर धारण करण्यात येईल अशा तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. असा भोगवटा व उच्च सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर अशा जमिनीच्या चालू बाजारभावाच्या मूल्याच्या पन्नास टक्के इतकी रक्कम शासनाला प्रदान करुन जुन्या शर्तीमध्ये जो भोगवटदार आहे ( भोगवटादार वर्ग एक ) रुपांतरीत करता येईल, आणि अशा रुपांतरानंतर संहितेच्या तरतुदीनुसार अशी जमीन भागवटादार वर्ग एक म्हणून भोगवटादाराकडून धोरण करण्यात येईल.

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, समजा अरविंद सावंत साहेबांच्या खापर पणजोबांनी वतनाची जमीन घेतली व ही जमीन नंतर मी विकत घ्यावयास गेलो तर ती जमीन मला बाजारभावाप्रमाणे दिली गेली पाहिजे. परंतु अरविंद सावंताच्या खापरपणजोबांच्या नावावर असलेली जमीन आपण आता रेग्युलराईज करण्याकरिता बाजारभावाच्या मुल्याप्रमाणे लावावयास निघाला आहात. खरे म्हणजे हाच विषय या विधेयकात आहे. जिल्हाधिका-यांच्या किंवा अन्य कोणत्याही अधिका-याच्या पूर्वपरवानगीशिवाय नाहरकत प्रमाणपत्राशिवाय कृषीतर जमिनीचे हस्तांतर करता येणार नाही. आपण त्यावेळच्या भोगवटदाराकडून आजच्या बाजारभावाप्रमाणे पैसे घेण्यास निघाला आहात. पूर्वपार जमीन चालत आलेली आहे त्यासंदर्भात हा विषय आहे.

सभापती महोदय, अगोदर जो व्यवहार झालेला आहे अशा भोगवटादारांकडून शासन पैसे घेण्यासाठी निघाले आहे. भोगवटदारांच्या देण्या-घेण्यामध्ये किंवा त्यांच्या अज्ञानामुळे हे राहून गेलेले आहे. या सर्व तरतूदीमध्ये हस्तांतर नियमित करण्यासाठी या अधिनियमात कोणत्याही प्रकारच्या तरतूदी नाहीत. म्हणून सुधारणा अधिनियमाच्या प्राभरंाच्या दिनांकापासून म्हणजे आपण त्याला 2002 म्हटलेले आहे. कृषी संबधिच्या प्रयोजनासाठी केलेल्या जमिनीचे असे हस्तांतर विक्री

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

खत, बक्षीस पत्र इत्यादीसाठी नोदंणीकृत संकेत सादर केलेल्या नियमित करण्यासाठी तरतूद करण्यात यावी यासाठी आपण हे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे. माझे एवढेच म्हणणे आहे की, सभापती महोदया, या विधेयकाच्या संदर्भात आतापर्यंत 6 सुधारणा झाल्या असून आता ही सातवी सुधारणा या ठिकाणी आलेली आहे. त्यामुळे खरे म्हणजे हा विषय संपलेला आहे.या विषयाला 60 वर्षे होऊन गेलेली आहे. हा विषय काही विदर्भ आणि मराठवाडयाच्या संदर्भात नाही कारण मराठवाडा आणि विदर्भामध्ये निजामशाही होती. हा विषय मर्यादीत भागापुरताच आहे. त्यामुळे हा विषय आपण ठामपणे धोरणात्मक रित्या संपवला पाहिजे. मुंबई शहराप्रमाणे उपनगरांना सुध्दा कायमस्वरुपी एन.ए.टॅक्स, बीन शेत जमीन असा कर निर्माण करावा आणि बदला-बदली, ट्रान्सफर व एनओसीची पध्दत बंद करा एवढी या निमित्ताने विनंती करतो. यासंदर्भातील मुलगामी संपूर्ण महाराष्ट्राच्या सर्वसामान्यांकडे ज्या जमिनी आहेत त्यांचा निर्णय एकदाचा लावून टाकावा अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र

-------------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधान परिषद विधेयक क्रमांक 4 मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी जे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे त्यावर बोलत असतांना सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. हे विचार व्यक्त करीत असतांना मुंबई आणि महाराष्ट्रात वेगवेगळया इनाम जमिनीच्या संदर्भात पूर्वीच्या कायद्यात आणि आताच्या कायद्यात सुधारणा करुन संपूर्ण इनाम वतने असतील किंवा त्या संदर्भातील ज्या जमिनी आहेत त्यांच्या बाबतीत एक सारखेपणा असावा अशा प्रकारचे विवेचन त्यानी या ठिकाणी केलेले आहे. या विधयेकावरील चर्चेत भाग घेत असतांना त्यांनी अतिशय उपयुक्त अशा सूचना केल्या आहेत. या जमिनीच्या संदर्भात खरेदी विक्रीचे व्यवहार, करीत असतांना किंवा शेतीच्या प्रयोजनासाठी एखादी जमीन असेल व त्या जमिनीचे एन.ए.करीत असतांना लोकांना अडचणी येत होत्या. त्याचबरोबर त्या संदर्भात काही ठिकाणी बेकायदेशीर कामे होतात याबाबतीत सुध्दा सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपली मते व्यक्त केली आहेत .व अत्यंत उपयुक्त अशा सूचना केल्या आहेत त्याबद्दल मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, मुंबई परगणना व कुलकर्णी वतने नाहीशी करण्याबाबत, मुंबई सेवा इनामे रद्द करण्याबाबत, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशी करण्याबाबत , मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहीशी करण्याबाबत आणि महाराष्ट्र मुलकी पाटील पद रद्द करण्यासंबंधीचे विधेयक मांडत असतांना मी सांगितले होते की, दिनांक 6.5.2002 ला या संदर्भातील विधेयकात सुधारणा करण्यात आली होती. ही सुधारणा करीत असतांना या जमिनी शेतकऱ्यांना रि ग्रॅन्ट होऊन मिळालेल्या आहेत त्या जमिनी सरकारच्या असून वर्ग दोनच्या आहेत. वर्ग दोनच्या जमिनी बाबत जर व्यवहार करावयाचा असेल किंवा या जमिनीची विक्री करावयाची असेल तर त्याबाबत जिल्हाधिका-यांची, सक्षम अधिका-याची परवानगी घ्यावी लागते. ही परवानगी दिल्यानंतर अशा प्रकारच्या जमिनीची खरेदी विक्री होत असे. 2002 ला त्यात सुधारणा करुन त्यांना मिळालेल्या जमिनी इतर सर्वसामान्य जमिनी प्रमाणे याही जमिनीचे व्यवहार असले पाहिजेत तसेच ही जमीन विकत असतांना कोणाच्याही परवानगीची गरज असू नये असे घोरण शासनाने ठरविले होते. दिनांक 6.5.2002 ला हा बदल करण्यात आला होता परंतु त्या अगोदर संपूर्ण वतनाच्या जमिनीच्या संदर्भात मोठया प्रमाणावर व्यवहार झाले होते व त्यासंबंधी मोठा प्रश्न



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे ...

निर्माण झाला होता. कोण कोणत्या कारणामुळे या जमिनीच्या व्यवहाराची नोंद सात बाराच्या उता-यामध्ये करावयाची राहून गेली होती. याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात उल्लेख केला होता . अनेक ठिकाणी खरेदीची नोंद करावयाची राहून गेल्यामुळे आज देखील अनेक शेतक-यांना त्रास होत आहे. अनेक जमिनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार झाले असतील वा बक्षिसपत्र केले असेल वा अन्य माध्यमातून कोणी जमीन दिली असेल परंतु त्या बदलाची नोंद सात बाराच्या उता-यावर झालेली नाही. त्या अगोदर आपण 50 टक्के दंड करीत होतो आणि "बेकायदेशीर हस्तांतरण" अशा प्रकारचा शिक्का मारत होतो. "अवैध नोंद " अशा प्रकारची नोंद केली जात होती. त्यामुळे अनेक शेतक-यांना त्रास व्हावयाचा. वतन जमिनी असलेल्या राज्यातील सर्व शेतक-याना या विधेयकामुळे फायदा होणार आहे. या व्यवहाराची नोंद सात बाराच्या
उता-यावर झालेली नव्हती ती नोंद येथून पुढच्या काळात होणार आहे. हे विधेयक मंजूर
झाल्यानंतर 2002 पूर्वी जे व्यवहार झालेले असतील तर त्या व्यवहाराची नोंद करण्यास सुरुवात होणार आहे.

सभापती महोदय,वर्ग दोनच्या या जमिनी असून रि ग्रॅन्ट केलेल्या या जमिनी आहेत. क्लास वन दर्जाच्या जमिनीबाबत आपण हा बदल करीत नाही. वर्ग दोनच्या जमिनी असताना जर
शेतक-याला बिगर शेतीच्या प्रयोजनासाठी या जमिनी द्यावयाच्या असतील तर त्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. शेतीच्या जमिनीला आज अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे हे आपणा सर्वांना माहीत आहेच. आज शहरीकरण मोठया प्रमाणावर होत आहे . जवळजवळ 47 ते 48 टक्के शहरीकरण होत असतांना शहरा भोवती जी जमीन आहे तिला वेगळी किंमत आज आलेली आहे हे आपल्याला माहीत आहे.अशा प्रकारे क्लास टूच्या ज्या जमिनी आहेत, ज्या जमिनी सरकारने दिलेल्या आहेत त्या जर बिगर शेती प्रयोजनासाठी कोणाला विकत घ्यावयाची असेल तर ती एन.ए. करुन घ्यावी लागणार आहे. त्यासाठी बाजार भावाच्या 50टक्के रक्कम भरुन ती जमीन एन.ए. करण्याची परवानगी आपण आता देत आहोत. ज्याला या जमिनीचे हस्तांतरण करुन हवे आहे त्याला या विधेयकाच्या माध्यमातून कोणतीही अडचण येणार नाही. शेतक-याला कोणताही त्रास होणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सुरुवातीलाच विचार मांडत असतांना मुंबई शहरातील जमिनी बाबत काही बाबी सांगितल्या आहेत.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. शिंगणे ....

ते ज्या जमिनींचा उल्लेख करीत होते तो प्रश्न मुंबईतील भाडेपट्ट्याने दिलेल्या, लीजने दिलेल्या जमिनींच्याबाबतचा होता. या जमिनींशी त्या प्रश्नाचा काहीही संबंध नाही. मात्र ज्या जमिनींचे लीज संपलेले होते त्यांना आपण नव्याने लीज ठरवून दिले आहे, नवीन भाडे त्यासाठी आकारण्यात येत होते आणि आजच्या बाजारभावाने ते मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे काही लीजधारक त्या विरोधात कोर्टामध्ये गेले होते आणि त्यांनी कोर्टाकडून शासनाच्या निर्णयावर स्टे आणला होता. त्यामुळे आपण हा निर्णय रद्द केला होता आणि जुन्याच लीजप्रमाणे आता आपण लीज घेत आहोत. सभापती महोदय, वतन इनामाच्या बाबतीतील जो कायदा आहे त्यापुढे 'मुंबई' असे लिहिले असले तरी हा कायदा संपूर्ण महाराष्ट्रासाठी लागू होतो आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्यावेळी मुंबई राज्य असल्याने 'मुंबई' असा उल्लेख त्या कायद्याच्या सुरूवातीस केलेला आहे. अनेक सन्माननीय सदस्यांची अशी भूमिका आहे की, यातील 'मुंबई' हा शब्द काढून 'महाराष्ट्र' असे नाव आले पाहिजे. शासन याबाबत निश्चितपणे विचार करील एवढेच मी या प्रसंगी आपल्याला सांगू इच्छितो. सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी मुंबई शहराचा नकाशा मिळण्याबाबत उल्लेख केला होता. हे खरे आहे की, त्यांनी सांगितल्याप्रमाणे आपण नागपूर मधील एका संस्थेला सॅटेलाईटमार्फत नकाशा काढून देण्याचे काम दोन वर्षापूर्वी दिले आहे. त्याबाबत कारवाई होत आहे. मी आपल्याला आश्वासन देतो की, लवकरात लवकर मी स्वत: याबाबत पुढाकार घेईन आणि मुंबई शहराचा नकाशा कशा पद्धतीने मिळविता येईल याचा निश्चितपणे विचार करून कार्यवाही करीन.

सभापती महोदया, कोल्हापूर शहरातील जमिनींच्या संदर्भात देखील सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. कोल्हापूर येथील ज्या भूखंडधारकांच्या 7-12 वर जो बोजा लावला होता त्या जमिनी शासनाने काही अटींवर दिलेले होते त्या शासनाच्या जमिनी आहेत. त्यांचे शिष्टमंडळ मला देखील भेटले आहेत आणि काही आमदार देखील मला या संदर्भात भेटले आहेत आणि मी तात्पुरती स्थगितीदेखील दिलेली आहे. त्याबाबत चौकशी करून तेथील शेतकऱ्यांना आणि शहरातील नागरिकांना कशा प्रकारे दिलासा देता येईल याचा मी निश्चितपणे प्रयत्न करीन. सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी असाही उल्लेख केला की, मुंबई शहरासाठी लागू असणारे कर आपण एकदाच घेतो. तेव्हा मुंबई, नवी मुंबई, ठाणे शहर असेल वा उपनगर

...... क्यूक्यू 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असेल तेथे आपण मुंबईप्रमाणेच एकदाच एनए कर वसूल करावा अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केली आहे. त्यांची ही सूचना खरोखरी चांगली आणि नागरिकांच्या हिताची असल्याने शासन जरूर त्याबाबत सकारात्मक दृष्टीने विचार करून निर्णय घेईल आणि मी आपल्याला सांगेन की, या संदर्भात एक विधेयक देखील आपण पुढील अधिवेशनामध्ये किंवा विधी व न्याय विभागाच्या सल्लाने कसे आणता येईल याचा प्रयत्न जरूर केला जाईल. सभापती महोदया, या ठिकाणी सन्माननीय सदयांनी अनेक चांगल्या सूचना केल्या आहेत आणि त्यांचा आदर करून त्यानुसार महसूल खात्याच्या बाबतीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने एक राज्यमंत्री म्हणून मी निश्चितपणे प्रयत्न करीन एवढीच खात्री मी या प्रसंगी आपल्याला देतो आणि सभागृहाने हे विधेयक संमत करावे अशी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. विधेयक आता खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 8 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 4 संमत करावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 4 संमत झाले आहे.

( यानंतर सौ. रणदिवे .... 2आर 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 14:10

औचित्याच्या मुद्याबाबत

श्री.विक्रम काळे : सभापती महोदया, मी याठिकाणी आपल्या परवानगीने महत्वाच्या बाबीकडे लक्ष वेधू इच्छितो. जुन्या अभ्यासक्रमाच्या डी.एड.कृती समितीच्या वतीने उपोषण सुरु आहे आणि पाच विद्यार्थी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झालेले आहेत, गंभीर परिस्थिती आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदया, हा विषय गंभीर स्वरुपाचा असल्याने आपण तो मांडण्यासाठी परवानगी द्यावी.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलता)

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : मी याठिकाणी उभी आहे. त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी सांगितले की, पाच विद्यार्थी ॲडमिट झालेले आहेत. खरे म्हणजे माननीय सभापतींच्या पूर्व परवानगीने आपण शुक्रवारी औचित्याचे मुद्दे मांडतो. परंतु हा विषय गंभीर आहे,

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, तो अतिशय महत्वाचा आहे. कारण शासनाचे त्यांच्याकडे लक्ष नाही. उपोषणासाठी बसलेले विद्यार्थी मरणासन्न झालेले आहेत. त्यामुळे माननीय सभापतींच्या परवानगीने येथे निवेदन करणे आवश्यक आहे.

**तालिका सभापती** : सदरहू विषय महत्वाचा असल्यामुळे मी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना हा विषय मांडण्यासाठी परवानगी देते.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदया, मी आपला आभारी आहे. राज्यामध्ये जुन्या अभ्यासक्रमाव्दारे पास झालेले डी.एड.चे विद्यार्थी आहेत. गेल्या महिन्यामध्ये महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदेमध्ये शिक्षक भरतीबाबत प्रक्रिया सुरु केली. त्यामुळे सगळीकडे गोंधळ निर्माण झाला आहे. नवीन अभ्यासक्रमानुसार ज्यांनी डी.एड.ची पदविका परीक्षा पास झालेले आहेत, ती परीक्षा पास केलेल्या विद्यार्थ्यांना या वर्षापासून आंतरवासियता लागू केलेली आहे आणि ती सहा महिन्यांनी पूर्ण होणार आहे. तसेच त्यांच्या गुणपत्रिकेवर स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे की,"तुमची ही गुणपत्रिका तुमची इंटर्नशीप पूर्ण झाल्यानंतर म्हणजे सहा महिन्यांनी ग्राह्य धरली जाईल. म्हणजे ते विद्यार्थी आता सुरु असलेल्या भरती प्रक्रियेसाठी पात्र नाहीत असा त्याचा स्पष्ट अर्थ होतो. असे

. . . .2 आर-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे . . . .

असताना सुध्दा महाराष्ट्र शासनाने गेल्या आठवडयामध्ये आदेश काढले की, नवीन अभ्यासक्रमानुसार पास झालेल्या पदविकाधारक विद्यार्थ्यांना, डी.एड.झालेल्या विद्यार्थ्यांना सुध्दा या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करता येतील. अशा प्रकारचे परिपत्रक काढल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ निर्माण झालेला आहे. तसेच यामुळे जुन्या विद्यार्थ्यांवर अन्याय होणार आहे. कारण जुन्या आणि नव्या विद्यार्थ्यांच्या मार्कींग पॅटर्नमध्ये सुध्दा बदल आहे. जुन्या अभ्यासक्रमानुसार ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा दिलेली आहे, त्यांची 1200 मार्कांची परीक्षा होती आणि जे नवीन विद्यार्थी आहेत, त्यांची 1040 मार्कांची परीक्षा होती म्हणजे यामध्ये सुध्दा 160 मार्कांची तफावत आहे. त्यामुळे जुन्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा देऊन ज्यांनी पदविका घेतली आहे, त्यांना नवीन अभ्यासक्रमानुसार पास झालेल्या विद्यार्थ्यांपेक्षा 160 मार्क जास्त मिळवावे लागले आहेत. त्यामुळे त्यांना जास्त अभ्यास करावा लागला आहे. आता आपण भरती प्रक्रियेसाठी ज्या विद्यार्थ्यांना पात्र समजत आहोत, त्यांचे डी.एड.च्या गुणावर, त्या मेरिटच्या आधारावर सिलेक्शन होणार आहे. त्यामुळे आपण या भरती प्रक्रियेमध्ये नवीन विद्यार्थ्यांना समाविष्ट केले तर जुन्या विद्यार्थ्यांवर अन्याय होणार आहे. म्हणून माझी आपल्यामार्फत माननीय शिक्षण मंत्र्यांना विनंती आहे की, आपण या भरती प्रक्रियेमध्ये फक्त जुन्या विद्यार्थ्यांनाच समाविष्ट करावे. जर नवीन विद्यार्थ्यांना इंटर्नशीप लागू केली असेल तर........

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

DVG/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 14:15

श्री. विक्रम काळे..

यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, 6 महिने पूर्ण केल्याशिवाय व प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय विद्यार्थ्यांचे गुण पत्रक ग्राहय धरले जाणार नाही. त्यामुळे हे कायद्याने चुकीचे आहे. माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी याबाबत मी विनंती केली आहे की, अशा प्रकारचे परिपत्रक रद्द करण्यात यावे. तसेच भरती करण्याकरिता जुन्या विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी जी मुदत ठरविण्यात आली होती ती मुदत आता वाढविण्यात यावी. ही मुदत आता संपलेली आहे. त्याचा पुर्नविचार करुन ही मुदत वाढविण्यात यावी. तसेच ही भरती प्रक्रिया आता थांबविण्यात यावी. याबाबत माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : हा विषय कार्यक्रम पत्रिकेवर देण्यात आलेला नाही. तरी देखील हा विषय महत्वाचा असल्यामुळे, सन्माननीय सदस्यांनी केवळ सूचना द्यावी.

श्री.शरद पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी या ठिकाणी जी मागणी केलेली आहे त्यास मी पाठींबा देतो. गेल्या 8 दिवसापासून या संदर्भात संप व उपोषण सुरु आहे. त्याची दखल शासनाने घ्यावी. ज्या विद्यार्थ्यांनी इंटर्नशीप पूर्ण केलेली नाही त्यांचा समावेश करण्याचा प्रयत्न सुरु झालेला आहे. यामुळे सुमारे 44 हजार डी.एड. पदवीकाधारकांवर अन्याय होणार आहे. शासनाने आता जी प्रक्रिया सुरु केलेली आहे, ती प्रक्रिया थांबवून ही निवड प्रक्रिया सीईटी परीक्षेच्या माध्यमातून घेण्यात यावी. यामुळे सर्व विद्यार्थ्यांना संधी मिळू शकेल व त्यांना आपापली गुणवत्ता दाखवता येईल. अशा प्रकारी नवीन प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात येईल काय या संबंधी माननीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन करावे.

**( सभापतीस्थानी : माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : या बाबत शासनाने लक्ष द्यावे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, 4 ते 5 दिवसांपासून मी या विद्यार्थ्यांच्या गटाला भेटत आहे. शासनाला नवीन व जुने विद्यार्थी असा भेदाभेद करता येणार नाही. ठराविक टक्के असणाऱ्या मुलांना प्रवेश द्यावा असा नियम आपल्याला करता येणार नाही. सीईटी परीक्षेच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांचा समावेश देता आला तर याबाबत निश्चितपणे विचार करण्यात येईल. या संदर्भात एक

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके ..

बैठक घेऊ. सध्या या सर्व विद्यार्थ्यांची भेट मी रात्री 10 ते 11 वाजेपर्यंत घेत आहे. स्वतंत्र सीईटी परीक्षा घेण्याबाबत शासनाकडून विचार करण्यात येईल. तसेच ही प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करण्यात येणार आहे.

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.50 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 2.18 ते 2.50 मध्यंतर )

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.** : संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान (2005-2006) राज्यस्तरीय स्पर्धेचा निकाल जाहीर करणे

**मु.शी.**: संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान (2005-2006) राज्यस्तरीय स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यासंबंधी माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. रणजित कांबळे ( पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करीत आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कृषि उत्पन्न पणन ( विकास व विनियमन) ( सुधारणा ) विधेयक

L.A. BILL NO. II OF 2008

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE.

( विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव पुन: प्रस्तुत करण्यात आला.)

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, आपण आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.दिवाकर रावते (बसून) : सभापती महोदय, 4 विधेयके मंजूर करण्यासाठी आम्ही शासनाला सहकार्य केलेले आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 4 विधेयके मंजूर करण्यासंबंधी सहकार्य केले आहे तसेच हे विधेयक मंजूर करण्यासाठीही मला सहकार्य करावे अशी मी या आसनावरुन आपल्याला विनंती करीत आहे.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकाद्वारे कलम 35-क हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले आहे. त्यासंबंधी मी माझे विचार मांडत होतो. "सहायक निबंधक, सहकारी संस्था या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या पदावर नसेल अशा कोणत्याही अधिका-याची, कोणत्याही बाजार समितीचा सचिव म्हणून नियुक्ती करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे." असे या कलमामध्ये नमूद केले आहे. त्यावेळी मी माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारला होता की, हेच सर्व आमदार होते आणि आपणच राज्यमंत्री होता. 2005 मध्ये या सदनामध्ये वि.स.वि.68 क्रमांकांचे विधेयक आणण्यात आले होते. सचिव पदाचे कॅडर निर्माण करण्यासंबंधीची तरतूद असलेले विधेयक मंजूर करुन घेतले होते. परंतु ते

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

विधेयक तेवढयासाठी आणण्यात आले नव्हते. त्याच्या पाठीमागे मूळ उद्देश असा होता की, जागतिक करारानुसार बाजारपेठा सुरु करावयाच्या आहेत. त्यासंबंधीच्या मॉडेल ॲक्टप्रमाणे बाजार समित्या सक्षम व्हाव्यात आणि त्या बाजार समित्यांमध्ये आपला शेतकरी पोहोचला पाहिजे. त्यासाठी सक्षम सचिव द्यावा असे शासनाचे म्हणणे होते. त्यावेळी चर्चेअंती ते विधेयक मंजूर झाले. नंतर दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची चिकित्सा समिती नेमली होती त्या समितीमध्ये जवळजवळ 6 महिने सखोल चर्चा झाली. त्या विधेयकात अनेक त्रुटी होत्या. परंतु प्रत्येक वेळी केंद्र सरकारचा धाक दाखववावयाचा. हे विधेयक आणण्यापूर्वी केंद्र सरकार करार करुन मोकळे झाले. हा कायदा करु असे या सदनाला गृहित धरुन तो करारनामा कसा केला असा माझा आक्षेप होता तो संयुक्त समितीमध्ये नोंदविलेला आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 3.00

(श्री. दिवाकर रावते....)

सभापती महोदय, या सरकारला, या सदनाला गृहीतच धरण्याची सवय लागलेली आहे. आता विधानसभेमध्ये काय झाले ते मी येथे सांगावे अशातला भाग नाही. परंतु एका विधेयकावर बोलत असताना मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री महोदय असे बोलून गेले की, तुम्हाला जे काही करायचे ते करा, आम्ही बहुमताच्या जोरावर हे करुन घेऊ. काल एका दुस-या विषयावर बोलत असताना या बहुमतासंबंधी मी माझे मत व्यक्त केले होते. या सदनामध्ये कायदा करीत असताना त्या कायद्याच्या संदर्भातील सर्वंकष आणि सखोल चर्चा होणे हे लोकशाहीला आणि घटनेला अभिप्रेत आहे. लोकांच्या जाणिवानेणिवांचे प्रतिबिंब या सदनामध्ये उमटत असते. कुठे खून झाला, बलात्कार झाला, अन्याय अत्याचार झाला तर त्याबाबतीत लोकप्रतिनिधी सभागृहामध्ये तो प्रश्न उपस्थित करुन सरकारशी भांडून न्याय मिळवून देतात अशी लोकांची भावना असते. म्हणून या सदनामध्ये जेव्हा राज्यावर दूरगामी परिणाम करणारे असे कायदे संमत केले जात असतात त्यावेळी त्यावर सखोल चर्चा झाली पाहिजे.

सभापती महोदय, मला अतिशय खेदाने सांगावेसे वाटते की, काल या सभागृहामध्ये अतिशय चुकीचे काम झाले. आम्ही एखादी गोष्ट पोटतिडिकीने सांगितल्यानंतर ती स्वीकारण्याचे मोठेपण सरकारने दाखवायला पाहिजे. पायदळी तुडविल्या जातील अशा त-हेच्या तरतुदी कायद्यात करण्यात येत असतील तर न्यायालयामध्ये आपण फसतो. काल आम्ही उपस्थित केलेल्या कोणत्याही मुद्याचे माननीय मंत्री महोदय उत्तर देऊ शकले नाहीत. आता मी क्षमता वगैरे विषय येथे काढू इच्छित नाही. आपण केलेल्या कायद्याचे दूरगामी परिणाम राज्यावर होत असतात. मग आम्ही सत्तेवर आल्यानंतर हे कायदे तुम्ही केलेत आणि तुम्ही सत्तेवर आल्यानंतर हे कायदे आम्ही केले असे येथे सांगितले जाते. पणनच्या कायद्यामध्ये शेतक-याला जागतिक बाजार पेठेत नेऊन बसविण्यासंबंधीच्या तरतूदी होत्या.काल माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेले निवेदन आपण सर्वांनी वाचले असेल, महागाईला तोंड देण्याकरिता आम्ही थेट खरेदी करु आणि माल दुकानावर घेऊन जाऊ, असे त्यांनी सांगितले. सभापती महोदय, माझ्याकडे असलेला अहवाल या ठिकाणी संपूर्णपणे वाचण्याची आवश्यकता आहे. परंतु माननीय उपसभापतींनी सुरुवातीलाच माझ्यावर निर्बंध घातल्यामुळे तसे करणे अप्रस्तुत होईल. "इंडियन प्रोडक्टस् डिस्ट्रिब्यूशन सिस्टिम टुवर्डस इंटिग्रेटेड ॲग्रीकल्चर" या अहवालामध्ये पणनच्या संदर्भात केलेला संपूर्ण सर्व्हे दिलेला आहे. पणन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 3.00

(श्री. दिवाकर रावते....)

व्यवस्थापनासाठी काय करायचे यासंबंधात या अहवालातील दोन पाने मी येथे उद्‌धृत करणार आहे.... माझ्यामागे 33चा अंक लागलेला आहे. त्यामधील एक अंक उलटा केला की तो आकडा ३६ होतो. " Lack of Transparency- Unacceptable Inequity in Farmer's Remuneration." ...या अहवालामध्ये असे सांगितलेले आहे की, टोमॅटोचे उत्पादन केले तर शेतक-याला 2 रुपये किंमत मिळते आणि रिटेल दुकानामधून ती किंमत 8 रुपये असते.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सदर माल ग्राहकांपर्यंत जाईपर्यंत त्याची किंमत 4.1 रुपयाने वाढते. बटाटा उत्पादक शेतक-यांला प्रति किलो 6.6 रुपये मिळतात. पर्यंत तो बटाटा ग्राहकांना मिळेपर्यंत त्याची किंमत 12 रुपये एवढी होते. केळी उत्पादक शेतक-याला 5 रुपये भाव मिळतो. ग्राहकांना मिळेपर्यंत केळीचा दर 9 रुपये होतो. कोबी फ्लॉवरचे शेतक-यांना 5 रुपये मिळतात, ग्राहकांपर्यंत तो 12 रुपये दर होतो. उत्पादक शेतक-यांना त्यांच्या उत्पादनास अतिशय कमी पैसे मिळतात आणि ते होलसेल कडून किरकोळ विक्रेता आणि त्यानंतर ग्राहकांना मिळेपर्यंत त्या मालाच्या किंमतीत प्रचंड वाढ होते. आताची पणनची पध्दत काय आहे यासंबंधीचा पूर्ण अभ्यास दिलेला आहे. त्याप्रमाणे एखाद्या शेतमालाची किंमत 2 रुपये असेल तर त्याच्यात वेस्टेज 20 टक्के धरलेले आहे. शेतमाल होलसेलरकडे जातो त्यावेळी दलालाचे कमिशन 10 टक्के, त्यात पुन्हा वेस्टेज 8 टक्के ॲड होते. तो माल नंतर बाजार समितीमध्ये येतो, तेथे एक ते दोन टक्के एजन्टला कमिशन द्यावे लागते. बाजार समितीमधून तो शेतीमाल शेतीमाल प्रोसेसला जातो आणि काही शेतीमाल हा होलसेलर मार्केटकडे जातो. ज्यावेळी हा शेतीमाल होलसेलरकडे येतो त्यावेळी त्या मालाची किंमत 2 रुपये 50 पैसे एवढी होते. त्यात पुन्हा 5 टक्के वेस्टेज ॲड होते. अशी ही पध्दत आहे. त्यांनतर तो माल सेमी होलसेलरकडे येतो, त्या ठिकाणी त्या मालाची किंमत 3 रुपये 33 पैसे होते. त्यात 5 टक्के वेस्टेज ॲड होते. त्या ठिकाणाहून किरकोळ दुकानदाराकडे माल येतो तो माल ग्राहकाला 8 रुपये 20 पैसे दराने खरेदी करावा लागतो. शेतमाल उत्पादक शेतक-यांना एक पट दर मिळतो, परंतु ग्राहकांना तो माल मिळेपर्यंत त्याची किंमत चार पटीने होते. मॉडर्न ॲक्टमध्ये नवीन सुधारणा सुचविलेली आहे. यासंबंधीचा अहवाल कृषि विभागाकडे आलेला आहे. त्यानंतर तो अहवाल सहकार विभागाकडे येईल. "Suggested Improvements: Disintermediation and participation of organised players." शेतमालाची मूळ 2 रुपये किंमत आहे,नवीन पध्दतीप्रमाणे तो माल एक तर प्रोसेसला जाईल. सदर माल प्रथम खरेदी केला जातो त्या ठिकाणी 10 टक्के कमिशन दिले गेले असेल तो माल त्या ठिकाणी तरी जाईल. तेथून किंवा शेतक-यां कडून तो माल वाटप व्यवस्थेकडे जाईल. काल माननीय मुख्यमंत्र्यांनी म्हटले की, आम्ही शेतक-यांकडून शेतमाल डायरेक्ट खरेदी करु आणि वाटप व्यवस्थेकडून दुकानात नेऊ. अशी पध्दत स्वीकारली तर शेतक-यांना शेती मालाची किंमत 3 रुपये 33 पैसे एवढी मिळेल. तो

2...

श्री. दिवाकर रावते...

शेतमाल ज्यावेळी रिटेलरला येईल त्यावेळी त्या मालाची किंमत 6 रुपये 50 पैसे एवढी होईल. शेतक-यांकडचा शेती माल खरेदीदारास 6 रुपये 50 पैसे दराने मिळेल. शेतकरी जो शेतमाल उत्पादन करतो तो माल ग्राहकांना मिळेपर्यंतची सिस्टीम देण्यात आली आहे. मार्केटींगच्या नवीन पध्दतीमध्ये मधल्या दलालांना काटछाट देण्याचा संदर्भातील उल्लेख अहवालात केलेला आहे. परंतु त्या संपूर्ण अहवालामध्ये न जाता विशेष वस्तुंचा बाजार घोषित करणे, आणि खाजगी ग्राहक बाजार स्थापन करणे अशा तरतुदीसाठी या सदनाचे कायदा केला. कृषि उत्पन्नाचे बाजार समित्यांचे व्यवस्थापन, प्रशासन सुधारण्यासाठी आणि कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये व्यावसायीक व्यवस्थापन आणण्यासाठी अधिनियमात या तरतुदीचा समावेश करण्यात आला आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ 15.10

श्री. दिवाकर रावते ....

आज आमच्यासमोर जे विधेयक ठेवण्यात आलेले आहे त्यामध्ये बाजार समित्यांच्या कामकाजाचे व्यवस्थापन कसे करावयाचे याचा उल्लेख आहे. व्यवस्थापन हा शब्द त्यामध्ये आला आहे. व्यवस्थापन करताना सचिव निर्माण करावयाचा होता तो केला काय ? हे विधेयक मंजूर केल्यानंतर बाजार समित्या सक्षम करणे हा विधेयक आणण्याचा जो मूळ उद्देश होता तो सफल होणार आहे काय असा माझा प्रश्न आहे. संयुक्त चिकित्सा समितीकडे मॉडेल ॲक्टचे बिल होते तेव्हा पडद्यावर एक प्रेझेंटेशन केले आणि केंद्र सरकारबरोबर शासनाने करार केला आहे असे सांगितले. जागतिक बँकेकडून पैसे येणार आहेत असे सांगितले. तीन महिन्यात 282 कोंटीचे प्रस्ताव मंजूर केले. प्रस्ताव मंजूर करण्यासाठी एवढी घाई का झाली होती ? मूळ उद्देश काय होता ? एकूण 265 बाजार समित्या आहेत. संगणकीकरणाच्या माध्यमातून, ई-मेलच्या माध्यमातून आणि इंटरनेटच्या माध्यमातून या बाजार समित्यांचे आधुनिकीकरण करावयाचे आहे. बाजार समित्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान आणि सॉफ्टवेअर बसवावयाचे आहे. शेतकऱ्याचा माल जागतिक बाजारापर्यंत पोहोचेल अशा प्रकारचे व्यवस्थापन निर्माण करावयाचे आहे. कुठल्याही देशात ई-मेलवरुन माहिती मिळणार आहे. बारामती किंवा पुणे मार्केटमध्ये बटाटे चांगल्या पध्दतीचे आले आहेत तर ते खरेदी कसे करावयाचे आणि ई-मेलवरुन खरेदी कसे करणार त्याचे पॅकींग कसे करणार याचे व्यवस्थापन होणार आहे. पुण्यामध्ये इंपोर्ट एक्सपोर्टची व्यवस्था आहे. ही सगळी हे विधेयक आणण्यामागची संकल्पना आहे. परंतु बाजार समित्या झालेल्या आहेत काय ? मी मागील वेळी सर्व बाजार समित्यांची यादी वाचून दाखविली होती. 50 लाखाच्या खाली एकही बाजार समिती नाही. सगळया कोटींमध्ये आहेत. 45 प्रकरणावर ज्यावेळी मी बोलेन त्यावेळी कल्याण बाजार समितीचा विषय मी घेणार आहे. याबाबत कोर्टाचा आज निकाल लागला आहे.

सभापती महोदय, एका ठिकाणी मान्यता देत असताना सचिवांची कॅडर कायद्यात तरतूद करुन सुध्दा निर्माण केली नाही. याचा फायदा घेऊन खाजगी बाजारपेठांना मान्यता दिली त्याची यादी मी वाचायला घेतली होती. ती यादी मी वाचून दाखविणार आहे आणि यादी वाचत असताना पुढे काय घडते तेही सांगणार आहे. बाजार समित्यांचे व्यवस्थापन करण्याकरिता सचिव पाहिजे. त्या सचिवाचे काम काय ? व्यवस्थापन काय आहे ? मॉर्डन ॲक्टप्रमाणे बाजार समित्यांमधून थेट माल ग्राहकापर्यंत पोहोचेल. त्याचा सेस पुण्याला पणन मंडळाकडे येईल आणि तेथून बाजार

......2

SSK/ 15.10

श्री. दिवाकर रावते ...

समित्यांकडे जाईल. बाजार समित्यांमधून काही ट्रक थेट जाणार. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीशी त्याचा संबंध नाही. त्या बाजार समितीचा संबंध आहे. त्यांचा सेस जमा करण्याचे अधिकार पणन मंडळाला आहेत. परतावा न देता तिकडे जाणार नाही. या सर्व गोष्टींचे व्यवस्थापन कसे करणार हा यक्ष प्रश्न निर्माण झालेला आहे. संशय निर्माण करता येईल इतकी गंभीर परिस्थिती आहे. या विधेयकाचा फायदा घेऊन आम्ही जर तुम्हांला ही सवलत दिली तर या सवलतीचा फायदा घेऊन आतापर्यंत जी मान्यता दिली त्यांची मी यादी वाचून दाखवितो. कष्टकरी महिला खरेदी विक्री संघ, भाजीपाल्यासाठी. वसई तालुका शेतकरी पंचायत उत्पादक विक्रेता महासंघ, भाजीपाल्यासाठी. पाटण तालुका भाजीपाला आणि फळेफुले महासंघ.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

म्हणजे शेतीच्या मालाचा प्रकार आहे. कृषि युवक मंडळ नेंबाळे-भाजीपाला, शिवसाई सहकारी फळे व भाजीपाला मर्यादित-भाजीपाला, संगमनेर तालुका ॲग्रो प्रॉडक्ट मार्केट कमिटी-भाजीपाला. शेतकऱ्यांच्या संस्था आहेत त्यांना किरकोळ काही तरी दिले आहे. मे.ॲग्रो फूडस् लिमिटेड यांना गोठविलेला वाटाणा, मे.वाडिलाल इंडस्ट्रीज, मे.सेफ फ्रोजन फूड प्रा.लि., मे.चंबल फर्टिलायझर ॲंड केमिकल्स लिमिटेड, मे.सुगम बायो फूडस प्रा.लि., मे.रोलीव्हॅली मशरुम्स कॉर्पोरेशन, मे.जिओजित इन्फ्रास्ट्रक्चर, मे.इस्कॉन फूड रॅलीव्हॅली फाऊंडेशन, मे.पॅराडाईज अशा प्रकारची नावे आहेत. पटलावर ठेवण्याचे अधिकार असते तर मी ही माहिती पटलावर ठेवण्यास तयार आहे. परंतु तो अधिकार माननीय मंत्रीमहोदयांना आहे. मे.इको व्हॅली फार्म फूडस्, मे.सिका ॲग्रीकल्चर, मे.विरा एंटरप्राईजेस, मे.इन्फ्रान प्रा.लि., मे.युनिव्हर्सल प्रोसेस फूडस् प्रा.लि., मे.रिव्हरसाईड मशरुम्स प्रा.लि. अशा कंपन्यांना परवानगी दिली गेली. कंपन्यांच्या यादीत दोन महत्वाच्या कंपन्यांचे नाव नाही. मे.रिलायन्स आणि मे.आयटीसी चौपाला, वाशिम यांचे नाव नाही. त्यांना स्वतंत्र स्वत:ची बाजारपेठ स्थापन करण्यास परवानगी दिली गेली. उद्या रत्नागिरीच्या बाजार समितीच्या हद्दीत माल उचलला तर थेट मुंबईच्या मार्केट कमिटीमध्ये न आणता मुंबईत आणायचा. तो थेट आणलेला माल आहे त्यावरील सेस रत्नागिरीच्या मार्केट कमिटीने पणन मंडळाला द्यायचा आणि पणन मंडळाने तो तुम्हाला द्यायचा अशी व्यवस्था आहे. 2005 च्या बिलाप्रमाणे हे करण्यात आले आहे. पहिल्यांदा या कंपन्यांना परवानगी दिली. सचिवांची कॅडर शासनाने निर्माण केली नाही. त्यांची यादी तयार केलेली नाही. शासन हे जे सचिव नेमणार आहे, त्या माध्यमातून व्यवस्थापनेचा टेंबा मिरविणार आहात. कशासाठी हे विधेयक आणले आहे? बाजार समित्यांच्या कामकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी विधेयक आणले आहे. मग रत्नागिरीमधून थेट आणलेल्या आंब्याचे ट्रक किती याची नोंद कोण ठेवणार आहे? हे सांगणार की, 25 ट्रक माल आणला, त्यावर एवढा सेस होतो. तो सेस पुण्याला पणन मंडळाकडे भरला जाईल आणि पणन

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अरविंद सावंत)**

मंडळ त्या सेसचा चेक देणार. हे 25 ट्रक माल आणला म्हणून सांगतील. दुर्दैवाने हिंदुस्थानातील व्यापारी प्रामाणिक आहेत, यावर कोणाचा विश्वास नाही. व्यापारी प्रामाणिक आहेत

..2..

श्री.दिवाकर रावते.......

यावर कोण विश्वास ठेवायला तयार नाही. उद्या 25 ऐवजी 100 किंवा 150 ट्रक माल आणला तर त्यावरील सेस कोटी रुपयात होईल. यावर नियंत्रण कोणाचे राहणार आहे? आयटीसी चौपाला यांचा कारभार कौतुकास्पद आहे. आयटीसीने वाशिममध्ये बाजारपेठ सुरु केली. सन्माननीय शिक्षणमंत्री त्या जिल्हयाचे पालकमंत्री आहेत. त्यांना माहिती आहे का? त्या कंपनीने गावागावामध्ये संगणक पुरविले. गावागावामधील संगणकाबाबत वैज्ञानिक माहिती असलेली मुले तयार केली.

(नंतर श्री.खर्चे.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

आणि रात्री शेतकऱ्याला कळविणार की, उद्याच्या बाजारामध्ये आपल्या सोयाबीनला अमुक इतका भाव मिळणार. ही बातमी त्या गावात सर्वांना सांगणर की, आयटीसी मार्फत उद्याच्या बाजारात अमुक इतका भाव मिळणार. मग शेतकरी आपला माल तिकडे घेऊन जातो व रोकड पैसे घेऊन जातो, हीच बाब शेतकऱ्यांना या कायद्याच्या माध्यमातून अभिप्रेत होती पण ते फक्त एकाच भागात सुरु आहे. त्याचे अनेक चांगले कंगोरे आहेत. त्यात बाजारपेठ कशी असावी आणि जी जागा जागतिक बँकेने जी अपेक्षा केली आहे त्या कराराच्या अंतर्गत आम्ही बाजारपेठ अद्ययावत करु असे आम्हाला सांगण्यात आले, परंतु त्यासंदर्भात कुठलाही उल्लेख यात दिसत नाही. जरा विदर्भात जाऊन पहा, शेतकयाला आपल्या मालाचा उद्याचा भाव कळतो. एवढेच नव्हे तर शेतकरी बाजारात गेल्यानंतर कँटीनपासून चहापर्यंत, कृषीची सर्व अवजारे तसेच आवश्यक बाबी सुध्दा तेथेच त्याला या आयटीसी बाजारपेठेतच मिळतात. वेळ पडल्यास कर्जही मिळते. ट्रॅक्टरपासून सर्व शेतीच्या उपयोगाच्या वस्तू तिकडे मिळतात. अशा प्रकारची अद्ययावत बाजारपेठ या मॉडेल ॲक्टअंतर्गत अभिप्रेत आहे. आणि अपेक्षाही अशीच आहे की, राज्यातील संपूर्ण बाजारपेठा अशाच चांगल्या प्रकारच्या निर्माण करावयाच्या. परंतु आपल्या बाजारपेठेत तर शेतकऱ्याच्या पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्था नाही, शेतकऱ्यासाठी हॉलची व्यवस्था नाही. कायदा आणताना मात्र त्याला एक गोंडस नाव देण्यात आले आणि सांगितले गेले की, शेतकरी आपला माल घेऊन आल्यानंतर आजुबाजूच्या कंपाऊंडमध्ये बसला तरी त्याला आपला माल विकता येईल. परंतु त्या अनुषंगाने कुठल्या प्रकारचे व्यवस्थापन आपण बाजारपेठांच्या बाबतीत आणणार आहात याचा खुलासा मात्र केलेला नाही. मुंबईत ज्यावेळी बाजारात माल विकला जातो त्यावेळी बाजाराची फी म्हणून शेतकऱ्याकडून प्रत्येक 100 रुपयासाठी 75 पैसे आणि देखरेखीसाठी 5 पैसे अशी आकारणी केली जाते. मुंबई बाजारसमितीचा व्यवहार वर्षासाठी 5 हजार कोटीच्या आसपास आहे. पण प्रत्यक्षात व्यवहार मात्र जवळपास 1.50 लाख कोटीचा आहे. मसाल्याची एक नंबरची बाजारपेठ ही मुंबई बाजार समिती आहे. या ठिकाणी प्रचंड प्रमाणात भाजीपाल्याचे ट्रक येतात त्यात वर भाजीपाला आणि खाली मात्र सुका मेवा व मसाला रचलेला असतो. बाजारात गाडी आल्यानंतर भाजीचा ट्रक असल्याचे दाखवून ट्रक पुढे नेण्यात येतो. अशा प्रकारे अधिकृतपणे हे सर्व चालते. कोणाचीही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ..........

हिंमत नाही की ती गाडी अडविणार. दुसरी गँग परवडली परंतु ही गँग अशी भयानक आहे की, रिव्हॉल्वर वगैरे घेऊन हे ट्रक आणले जातात व कोणीही त्यांना अडवू शकत नाही. शासनाने दिलेल्या परमिशनमुळेच ही परिस्थिती आहे. त्यांनी लिहून दिल्याप्रमाणे आमच्या कंपनीचे अमुक इतके ट्रक येतील पण आम्ही त्यांना अडवू शकत नाही अशा प्रकारे प्रचंड प्रमाणात व्यवहार होतो. या सर्व बाजारपेठेत हा माल नियमितपणे येतो. हे सर्व खरे असेल तर त्या मालाचा सेस स्थानिक बाजारपेठेला मिळाला असता. रिलायन्सच्या बाबतीत तर विचारायलाच नको. काही दिवसांनी तर या देशाला रिलायन्सचा देश म्हणूनच ओळखले जाईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

नागपूर अधिवेशनामध्ये सामूहिक शेतीचे विधेयक आणले गेले होते. या विधेयकाच्या संदर्भात माननीय कृषी मंत्र्यांनी सांगितले होते की, यामध्ये बाजार समितीचा थेट संपर्क असेल, शेती शेतक-यांचीच राहील, शेती शेतक-यांच्या 7/12 वरच राहील. शेतीसाठी जे कोणी येतील मग ते 100,200,300 हेक्टर जमीन घेतील व शेतक-याला पाणी, बी-बियाणे, खते, औषधे सर्व व्यवस्था पुरवतील. थोडक्यात शेतमालकाला गुलाम करण्याचा हा प्रकार आहे. व्यापारी शेती घेईल व्यापार करेल, स्वत:च्या शेतात शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग करेल यामध्ये त्यालाशासनाकडून करामध्ये सूट मिळेल. 1 हजार कोटी रुपयांचा सेस मध्ये सवलत मिळेल. सेस कसा बुडवला जातो याची माहिती मी अगोदर दिलेलीच आहे. एकाधिकार कापूस खरेदीमध्ये किती कोटी रुपयांचे नुकसान होत आहे याची सुध्दा माहिती मी अगोदर दिलेली आहे. थेट बाजार पध्दतीच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदय अधिक माहिती सभागृहाला देणारच आहे. त्यामुळे या ठिकाणी मी जे विचार मांडत आहे त्यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी मला मार्गदर्शन केले तर मला खूप आवडेल व माझ्या अज्ञानात भर पडेल. या ठिकाणी मी जे अज्ञान व्यक्त केले त्याबद्दल दिलगीरीही मागेन परंतु दिलगिरी मागण्याची वेळ माझ्यावर येणारच नाही असे मला वाटते. महाराष्ट्राचा मोठया प्रमाणात सेस बुडवून ट्रक जात आहेत परंतु त्यावर शासनाकडून कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. सेस वसूल व्हावा यासाठी शासनाकडे कोणत्याही प्रकारचे नियोजन नाही किंवा शासनाकडे अशा प्रकारची कोणतीही यंत्रणा आहे असे मला वाटत नाही. मापाडीचा विषय तर अजून वेगळा आहे. खरे म्हणजे बाजार समितीमध्ये आलेला प्रत्येक ट्रक खाली करुन त्या मालाची मोजमाप करुन दुस-या ट्रकमधून तो माल मुंबईत आला पाहिजे परंतु असे होत नाही तर जो ट्रक माल घेऊन बाजार समितीमध्ये येतो तोच ट्रक तसाच मुंबईत जातो. यासंदर्भात शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही ही वस्तुस्थिती आहे. या विधेयकाद्वारे बाजार समितीवर सचिव नेमणार आहात. परंतु आपण या ठिकाणी सचिवांची नेमणूक कशासाठी करीत आहात? यापूर्वीही आपण अशाच प्रकारचे सचिव नेमलेले होते. नागपूरला श्रीकांत जठार, श्री. काशीकर यांची नेमणूक करण्यात आली होती. पुणे बाजार समितीवर श्री. अशोक गोटे होते, नवी मुंबई बाजार समितीवर श्री.जंत्रे यांची नेमणूक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

करण्यात आली होती आता नवी मुंबई बाजार समितीवर श्रीकांत जेदे यांची नियुक्त करण्यात आलेली आहे. काल परवा नवी मुंबई बाजार समितीच्या संदर्भात कोर्टाने ही बाजार समिती रद्द करुन त्या ठिकाणी प्रशासक नियुक्तीचे आदेश दिलेले आहेत परंतु यासंदर्भात मला अधिक कल्पना नाही. सचिव पदासाठी प्रमोशन निर्माण करण्याकरिता आपण हे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

सभापती महोदय, केवळ प्रमोशन देण्यासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. संबंधित व्यक्तीला प्रमोशन दिल्यानंतर पुढे काय होणार आहे यासंबधी या विधेयकात तरतूद करण्यात आलेली आहे त्यानुसार कलम 45 मध्ये जी सुधारणा करण्यात आलेली आहे त्यात असे म्हटलेले आहे की, " बाजार समितीच्या ज्या सदस्याला, तो सक्षम नाही किंवा तो त्यांची कर्तव्ये बजावण्यात कसूर करीत आहे. इत्यादी कारणामुळे काढून टाकण्यात आले असेल तो सदस्य, त्यास ज्या आदेशाव्दारे अशा प्रकारे काढून टाकण्यात आले असेल त्या आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षाचा कालावधी संपेपर्यत, बाजार समितीचा सदस्य म्हणून पुन्हा निवडून येण्यास, पुन्हा नियुक्त केला जाण्यास, पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास, स्वीकृत केला जाण्यास किंवा पुन्हा स्वीकृत केला जाण्यास पात्र असणार नाही अशी तरतूद करण्यासाठी आणि बाजार समिती बरखास्त करण्यात आल्यावर बाजार समितीचे कार्य पार पाडण्यासाठी प्रशासक किंवा प्रशासक मंडळ नेमण्याबाबत तरतूद करण्यासाठी उक्त कलमामध्ये सुधारणा करण्यात आली आहे "

सभापती महोदय, आपला ग्रामीण भागातील अनुभव काय आहे ? कायदा करीत असतांना आपल्याला जो काही अनुभव आलेला असतो त्याचा लाभ हा कायदा करीत असतांना झाला पाहिजे. महानगरपालिकेमध्ये महिलांना राखीव जागा देण्यासबंधी तरतूद करण्यात आली होती. युतीचे शासन असतांना ही तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार नांदेड महानगरपालिकेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर महिला सदस्या नगरसेवक पदासाठी उभ्या राहिल्या होत्या आणि त्या निवडून आल्या होत्या ही चांगली गोष्ट आहे. आपण महिलांना नगरसेवक बनवले होते परंतु प्रत्येक महिला नगरसेवकाच्या बाजूला आणखी एक खुर्ची ठेवलेली असावयाची , त्यावर त्या नगरसेविकेचे पती बसलेले असावयाचे आणि ते कामकाजातसुध्दा भाग घ्यावयाचे. या संदर्भात आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती आणि त्यांना या बाबतीत सर्व माहिती सांगितली त्यानंतर शासनाने आदेश काढला आणि महिला नगरसेविकेच्या पतीला सभागृहात बसता येणार नाही अशा प्रकारचा आदेश काढला गेला. त्यानंतर नगरसेविकेचा पती सभागृहात न बसता संबंधित अधिका-यांबरोबर बाहेर चर्चा करु लागले त्यानंतर शासनाने पुन्हा आदेश काढले की, नगरसेविकांच्या पतीला अधिका-यांशी कामकाजाबद्दल बोलता येणार नाही तसेच कोणताही व्यवहार करता येणार नाही.

2..

श्री.दिवाकर रावते..

अशा प्रकारचे आदेश काढल्यानंतर सुध्दा ग्रामीण भागतील स्थितीमध्ये फरक पडलेला नाही. महिला सदस्यांच्या कार्यक्षमतेवर, कर्तृत्वावर आपण विश्वास ठेवतो काय याबद्दल अजूनही प्रश्नचिन्ह आहे.सभापती महोदय, एखाद्या संस्थेतील सभासद बाद झाल्यानंतर त्या ठिकाणी तो दुस-या सदस्याला आणि खास करुन स्वत:च्या पत्नीला आणून बसवितो आणि कारभार मात्र् स्वत:च्या हातात ठेवतो. या कायद्यात कलम आणत असतांना विधी विभागाचे अधिकारी असे सांगतील की घटनेप्रमाणे असे करता येत नाही. घटनेप्रमाणे अशा प्रकारची तरतूद कायद्यात टाकता येणार नाही. परंतु एखाद्या सदस्याने पत्नीला आणून बसविले व कारभार तो स्वत: करीत राहणार असेल तर त्यावर निर्बंध आणण्याच्या दृष्टीने मात्र कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. सभापती महोदय, या विधेयकावर बोलत असतांना मला असे सांगावयाचे आहे की ही तरतूद करण्याची वेळ आज शासनावर आलेली आहे त्याचे कारण काय आहे याचा विचार करण्याची गरज आहे.महाराष्ट्रातील सगळया बाजार समित्यांचा कारभार स्वच्छ आहे काय ? जर कारभार स्वच्छ नसेल तर संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे काय ? कलम 45 प्रमाणे नागपूर कृषी उत्पन्न बाजार समितीची चौकशी करण्यात आली होती, त्याचप्रमाणे पुणे, अकोला, जालना इत्यादी कृषी उत्पन्न बाजार समित्यांची चौकशी करण्यात आली होती त्या चौकशीमध्ये आरोपही सिध्द झाले होते परंतु अजून पर्यंत कोणावरही कारवाई करण्यात आलेली नाही.सहा आठवडयाकरता नव्हे तर सहा दिवसासाठी देखील कोणत्याही सदस्याला काढून टाकण्यात आलेले नाही. केवळ सबंधित सदस्याला वाचविण्याकरिताच राज्य सरकार यामध्ये हस्तक्षेप करीत असते असा माझा आरोप आहे. सभापती महोदय, आजच्या सामना या वर्तमानपत्रात एक बातमी प्रसिध्द झाली आहे. कल्याणच्या कृषी उत्पन्न बाजार समितीसंबंधी सामना या वर्तमानपत्रात वृत्त प्रसिध्द झाले असून तेथे काय घडलेले आहे ? त्या ठिकाणी सहकारी संस्थेच्या सहाय्यक निबंधकाच्या दर्जा पेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिका-याला सचिव म्हणून नेमावयाचे आहे. कल्याण येथील बाजार समितीची स्थापना 1982 साली झाली होती.

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

नंतर श्री.सुंबरे

**( सभापतीस्थानी - माननीय उपसभापती )**

श्री. रावते ....

आणि मग या बाजार समितीमध्ये भाजीवाल्यांना बेकायदेशीर परवाने देण्यापासून सुरूवात झाली ती अगदी बेकायदेशीर बांधकाम करण्यापर्यंत मजल गेली. सभापती महोदय, या कल्याणच्या बाजार समितीबाबत आजच्याच वर्तमानपत्रात बातमी आलेली आहे. त्या बाबत हायकोर्टाने चपराक बसविली आहे. ही चपराक कशासाठी आहे ? तर तेथे आमचे बोरीकर नावाचे ठाणे जिल्ह्याचे उपनिबंधक आहेत त्यांनी शासनाच्या जीआर प्रमाणे मागासवर्गीयांची 16 पदे भरण्यासाठी पत्र पाठविले. त्या जीआर नुसार मागासवर्गीयांची 16 पदे या बाजार समितीमध्ये भरायची असताना तेथे 16 ऐवजी 31 पदे भरली गेली. तो जीआर मान्य करून या श्री.बोरीकर साहेबांनी पुढे पाठविले. ही गोष्ट सगळी कोर्टामध्ये गेली. न्यायालयामध्ये दोन वर्षे ही बाब चालली. त्या दोन वर्षांच्या काळामध्ये श्री.प्रतापराव पाटील यांना आपण नियुक्त केले. तुम्हाला तुमच्या मर्जीतील सचिवांच्या ज्या नियुक्त्या करावयाच्या आहेत त्यातीलच हे एक. तर या श्री.प्रतापराव पाटील यांनी दोन वर्षाच्या कालावधीत असे प्रताप गाजविले आहेत की विचारता सोय नाही. त्यांनी दोन कोटी रूपये मार्केट बांधण्यासाठी व्यापाऱ्यांकडून घेतले इतकेच नाही तर व्यापाऱ्यांनी हे पैसे द्यावेत म्हणून त्यांना दमबाजी केली. त्यामुळे व्यापाऱ्यांनी सोसायटीकडून 18 टक्के व्याजाने पैसे काढले, कोणी आपली शेतजमीन विकून पैसे उभे केले आणि अशा प्रकारे व्यापाऱ्यांनी हे पैसे भरले आहेत. याची चौकशी आपल्याला करावी लागणार आहे. या इतके सारे झाल्यानंतरही तेथे मार्केट काही तयार झाले नाही तरीही गाळे ताब्यात घ्या म्हणून व्यापाऱ्यांना सांगण्यात आले. असे हे तुमचे सचिव आहेत. सभापती महोदय, या पतपेढीच्या कर्जातील पूर्ण पैसाही तेथे वापरण्यात आला नाही आणि त्यामुळे दोन वर्षामध्ये या बाजार समितीमध्ये त्यांनी प्रचंड कर्ज करून ठेवले आहे की आता ते कर्ज कसे फेडायचे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. तेव्हा अआता आपण जे सचिव म्हणून नेमू इच्छित आहात त्या कॅडरमधीलच हे श्री.बोरीकर आहेत आणि त्यांना आता तुरूंगात का पाठवू नये असा हायकोर्टाने शेरा मारला आहे. आपल्याला त्या ठिकाणी सहाय्यक निबंधक, सहनिबंधक वगैरेंच्या नियुक्त्या तेथे करावयाच्या आहेत ना ? ज्यांची चौकशी करायची ते सोडून यांची चौकशी करण्याची पाळी आता तुमच्यावर आली आहे. आता तुम्ही हे कलम 45 आणले आहे, पण त्याची अमलबजावणी आपण कशी करणार आहात ? आता तेथे असा घोळ झालेला आहे की, त्यांचा कार्यकाळ संपला आहे आणि जे निवडून

...... 3सी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

आले आहेत त्यांच्या ताब्यात सगळा कारभार दिला पाहिजे, तसा तो देणार नाही का ? यामध्ये पक्षीय राजकारण कसे आहे तेही मी सांगू शकेन. कोणत्या झेंड्याच्या मारामाऱ्या आहेत तेही मी सांगू शकेन, पण मी ते सारे येथे सांगत बसत नाही. परंतु कल्याण बाजार समितीचा कसा बेंडबाजा वाजला आहे आणि आपल्याच मॉडेल ॲक्टप्रमाणे बोलायचे तर ही बाजार समिती आता कर्जबाजारी करून ठेवली आहे., दोन कोटी रूपये मार्केट बांधण्यासाठी म्हणून व्यापाऱ्यांकडून घेतले पण मार्केट बांधून झालेले नाही आणि मग अशा त्या माणसाला जेलमध्ये का पाठवू नये अशी कोर्टाने विचारणा केली आहे. त्यावर आपले उत्तर काय आहे तेही येथे आपण सांगितले तर बरे होईल. सभापती महोदय, हे कलम 45 वर बोलत असताना या सगळ्या बाजार समितीची चौकशी सुरू झाली त्याबद्दल आपण काय केले आहे हे विचारीत असताना हे जे आणलेले कलम आहे ते खरोखरी अमलात येणारच नाही अशी मला शंका नव्हे माझा दावा आहे. ....

( सभापतीस्थानी - माननीय तालिका सभापती श्री.उल्हास पवार )

( यानंतर सौ. रणदिवे ....3डी 1 ....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

तुम्ही कायद्यातील तरतुदी अंमलात आणत नाही हे मी तुम्हाला एकेका कलमाच्या अनुषंगाने सांगितले आहे. माझ्याकडे वाशिम येथील रिसोडच्या संदर्भातील एक ताजे प्रकरण आहे आणि मी येथे तुमच्या मंत्र्यांचे कर्तृत्व मांडत आहे आणि असे करीत असताना मला खूप वाईट वाटत आहे. सदनामध्ये या विधेयकावर चर्चा सुरु असून, त्यामध्ये शास्ती काय असेल ते सांगितलेले आहे. आम्ही गैरकारभार करणाऱ्यांना कोणत्या पध्दतीने वागविणार आहोत ? हे तुम्ही सांगत आहात. सहा वर्षासाठी घरी पाठविण्यात येईल, निवडणूक लढविण्यासाठी अधिकार देणार नाही, अमुक नाही-तमुक नाही इ.मी मघाशी वाचून दाखविले आहे. माझ्या शिवसेनेच्या एका कार्यकर्त्याने रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भ्रष्टाचाराबाबत चौकशी व्हावी म्हणून चार दिवस उपोषण केले. मग मला फोन आला की, रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भ्रष्टाचारासंदर्भात उपोषण सुरु आहे. त्यानंतर मी तेथील जिल्हा प्रमुखांना सांगितले की, संबंधितांना उपोषण थांबविण्यास सांगावे. आपण याबाबतीत चौकशी करण्यास सांगू. परंतु संबंधितांनी उपोषण कशासाठी केले आहे ? तर जी चौकशी झालेली आहे, त्यावर पांधरुण घालण्याचा मंत्र्यांनी निर्णय घेतला म्हणून उपोषण करण्यात आले. त्याने माहितीच्या अधिकारानुसार त्या संदर्भातील भ्रष्टाचार बाहेर काढला. या भ्रष्टाचाराची चौकशी व्हावी यासाठी जे आदेश दिले होते, ते थांबविण्यासाठी माननीय मंत्री महोदय आदेश देतात, त्या विरोधात उपोषण केले. त्याचा मुद्दा काय होता ? मी जर ते वाचले तर तुम्हाला धक्का बसेल. जवळजवळ सात कोटी रुपयांचा भूखंड गिळंकृत केला. या मार्केट कमिटीने भ्रष्टाचार केला आहे. रिसोड कृषी उत्पन्नाच्या खरेदी आणि विक्रीच्या प्रयोजनार्थ किंवा कृषी उत्पन्नाच्या खरेदीशी आणि विक्रीशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित असेल अशा इतर प्रयोजनार्थ वाटप केलेले किंवा भाडयाने लिजवर दिलेले कोणतेही दुकानगाळे व भूखंड किंवा इतर कोणतीही परिवस्तु यांचा वापर ज्या प्रयोजनार्थ तिचे वाटप केले होते, त्या प्रयोजनाकरिता करण्यात आला नसेल तर तो गैरवापर होतो. पण बाजार समितीने काय केले ? खरे म्हणजे शेतकऱ्यांसाठी असलेल्या भूखंडावर शेतीविषयक व्यवहार होणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने हा भूखंड दिला होता. माझ्याकडे दि.28 मार्च 1989 चे आदेश आहेत. त्यावेळी आयुक्त, अमरावती विभाग, आता वाशिम नवीन जिल्हा झालेला आहे. मात्र पूर्वी रिसोड अकोल्यामध्ये होते. आयुक्तांनी हा भूखंड देताना असे म्हटलेले आहे की,"सर्व्हे क्रमांक 441 व 463 रिसोड कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोड यांना

. . . .3डी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

शेती मालाच्या खरेदी विक्रीसाठी देणेबाबत" शासनाचे ज्ञापन क्र.एलएनडी-4588/22608/ग-5, दिनांक 4 मार्च 1989 अन्वये अकोला जिल्हा, रिसोड तालुका रिसोड गाव येथील सर्व्हे क्र.441 व 463 पैकी 20 गुंठे (2000 चौ.मीटर) इतकी शासकीय जमीन कृषि उत्पन्न बाजार समिती,रिसोड यांना शेती मालाच्या खरेदी विक्रीसाठी देण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे." पुढे असे म्हटलेले आहे की, "जमीन घेणारा हा भोगवटदार वर्ग दोन म्हणून जमीन धारण करील." याचा अर्थ स्पष्ट आहे. ही जमीन आयुक्त, अमरावती विभाग यांनी दिली आहे आणि हे आदेश दि.28 मार्च 1989 रोजीचे आहेत. ही जमीन रिसोड बाजार समितीच्या ताब्यात आल्या नंतर जिल्हाधिकाऱ्यांनी दि.4 मार्च 1989 अन्वये शासकीय जमीन कृषि उत्पन्न बाजार समिती, रिसोड यांना शेती मालाच्या खरेदी विक्रीसाठी देण्यास शासनाने मंजूरी दिली आहे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

आयुक्तांचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांकडून देण्यात आलेला आहे. जमीन घेणारा भोगवटदार वर्ग 2 म्हणून जमीन धारण करील. असे त्यामध्ये म्हटले आहे. जिल्हाधिकारी,विभागीय आयुक्त यांचा आदेश आहे. तसा करार झालेला आहे. त्या कराराप्रमाणे, जमीन त्यांच्याकडे आली. नंतर या जमिनीविषयी तक्रार करण्यात आली. या जमिनीवर गाळे बांधण्यात आले होते. खरे म्हणजे नियमाप्रमाणे या जमिनीवर गाळे बांधता येत नाहीत. ही जमीन 2 ब अंतर्गत येणारी जमीन आहे. आमच्या अटी व शर्थीचा भंग झालेला आहे अशी तक्रार करण्यात आली होती. या चौकशीच्या संदर्भात तलाठयाने तहसिलदाराला एक अहवाल दिलेला आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती,रिसोड यांनी मिळालेल्या जागेचा अटी व शर्थीचा भंग केल्या बद्दल असा विषय आहे. ही सर्व शासकीय कागदपत्रे आहेत. " निवेदन देण्यात येत आहे की, शासनाचे ज्ञापन क्रमांक अमूक अमूक 4 मार्च अन्वये रिसोड येथील सर्व्हे क्रमांक 441 मधील 20 गुंठे जमीन कृषी उत्पन्न बाजार समिती यांना शेती मालाच्या विक्रीसाठी अटी व शर्थीस अधीन राहून देण्यात आली होती. सदर जमिनीवर सद्य:स्थितीची पाहणी केली असता कृषी उत्पन्न बाजार समिती, रिसोड यांनी सदर जागा भाडे पट्टयाने दिलेली आली असल्याचे दिसून आले. या जागेवर सध्या व्यावसायिकांची दुकाने आहेत. 1 ते 28 दुकाने सुरु झालेली आहेत. " त्यांची नावे मी आता येथे वाचून दाखवित नाही. ही दुकाने कशा करिता वापरण्यात येणार होती याची माहिती देखील देण्यात आलेली आहे. प्रत्येक दुकानामागे कृषी उत्पन्न बाजार समितीने 5 लाख रुपये जमा केलेले आहेत. आता आपणय गणित करावे. 1 कोटी 40 लाख रुपये कृषी उत्पन्न बाजार समितीने दुकानदारांकडून घेतले आहेत. तसेच बांधकाम खर्च देखील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अंदाजपत्रकामध्ये दाखविलेला आहे. दुकानदारांकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे देखील घेतले आहे. त्यामुळे करारामध्ये गैरव्यवहार झाल्याचे दस्तऐवज तयार झाला. प्रॉपर्टी रजिस्ट्रेशनमध्ये याची नोंद नाही. या समितीने अशा प्रकारे दुकानदारांकडून पैसे वसूल केले आहेत. शेकडो दुकाने आता बेकायदेशीर बांधलेली आहेत त्यांच्याबाबत चौकशी व्हावयाची आहे. त्यांच्याकडून 12 लाख रुपयांचे भाडे थकीत आहे.

सभापती महोदय, संचालकांच्या नातेवाईकांना अनधिकृतपणे गाळा विकलेला आहे. तसेच संचालकांच्या, अध्यक्षांच्या मुलांना देखील गाळा दिलेला आहे. या संदर्भात तलाठयांनी अहवाल

श्री. दिवाकर रावते..

दिलेला आहे व त्यामध्ये असे म्हटले आहे की, " सदर संस्थेने जागेचा वापर सुरु करुन अटी व शर्थींचा भंग केलेला आहे. उक्त जागेपासून 28 दुकानांसाठी 9105 चौ. फूट म्हणजेच 845.88 चौ.मी जागा भाडे पट्टयाने दिलेली आहे. तसेच आदेशामध्ये जमीन घेणारा हा भोगवटादार 2 म्हणून जमीन धारण करील अशी अट असताना देखील 7/12 वर भोगवटादार 1 असे दर्शविले आहे." हा भ्रष्टाचार महसूल खात्यापर्यंत पोहचला आहे. दिलेल्या जमिनीची नोंद देखील बदलवून घेण्यात आली आहे. माझा प्रश्न आहे की, अशा प्रकारे नोंदी बदलणारे, महसूल खात्याचे कोण अधिकारी आहेत ? त्यांच्यावर कोण कारवाई करणार आहे ? येथून हा विषय सुरु झाला होता. शासनाच्या जमिनीचे 7/12 बदलणारा कोणता अधिकारी आहे ?

सभापती महोदय, या संदर्भात तहसीलदार उप विभागीय अधिकारी वाशीम, एसडीओ यांनी अहवाल दिला होता. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "अटी व शर्थीचा भंग केल्यामुळे, सदर प्रकरणी स्थळ निरीक्षण करण्यात आले असून या सोबत स्थळ निरीक्षण अहवाल सादर करण्यात येत आहे."

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

जो गैरप्रकार झाला तो एस.डी.ओ. पर्यंत पाठवला. ही सर्व शासकीय कागदपत्रे आहेत. माहितीच्या अधिकारात मिळालेल्या या अधिकृत प्रती आहेत. त्यामुळे ही कागदपत्रे कोठून आणली हा विषय नाही. हल्ली सर्व उपलब्ध होते. या स्थल निरीक्षण अहवालामध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोड यांनी 29 व्यक्तींना व्यवसाय करण्यासाठी सदर जमीन भाडेपट्टयाने दिल्याचे आढळले. सदर जागेचे कच्चे रेखाचित्र /चतु:सीमा खालील प्रमाणे आहेत. त्यांनी सीमा दिलेल्या आहेत. पुढे असे म्हटले आहे की, एकूण 29 दुकाने असून त्याचे एकूण क्षेत्रफळ 9855 चौ.मी. आहे. सदर संस्थेला जागा वाटप केल्यापासून संस्थेने सदर व्यवसायिकांना जागा भाडेपट्टयाने देऊन जागेचा वापर करीत आहेत अशा तऱ्हेचा अहवाल दिला आहे. हा तहसिलदाराचा अहवाल एस.डी.ओ. ला गेला. या प्रकरणामध्ये एक दवंडी पिटण्यात आली. आमच्या तेथील कार्यकर्त्यांनी तक्रार केली त्यानंतर हे सगळे चालू झाले. त्यानंतर जे पत्र आहे त्यामध्ये श्री. पी.एस. कांबळे, उपविभागीय अधिकारी, वाशीम यांचे कार्यालय असा यामध्ये उल्लेख केलेला आहे. हे अधिकृत डॉक्युमेंट्स आहेत. यामध्ये श्री. पी. एस. कांबळे असे जे लिहिले आहे त्याबाबत त्यांच्यावर पहिल्यांदा कारवाई करावी. कारण आपल्या नियमाप्रमाणे, मराठी भाषेबाबत निघालेल्या आदेशाप्रमाणे त्यांना "पी.एस." असे लिहिता येत नाही. त्याला बंदी आहे. ते आपल्या खात्याचे आहेत म्हणून पहिली शो कॉज नोटीस त्यांना आजच गेली पाहिजे. मराठी भाषेच्या संदर्भामध्ये भंग केला म्हणून पहिली नोटीस त्यांना द्यावी. श्री. पी.एस.कांबळे उपविभागीय अधिकारी, वाशीम यांचे कार्यालय असा यामध्ये उल्लेख आहे. दिनांक 6.2.2008 अशी तारीख आहे. हे जुने असते तर बोललो असतो की, यासंदर्भात जी चर्चा झाली ती माहीत नसेल. या सदनामध्ये मला अधिकृतरित्या सांगण्यात आले की, यापुढे असे होणार नाही. तरीही ते वारंवार होत आहे. शासनाला, सरकारला, मंत्र्यांना अधिकाऱ्यांना मराठी भाषेबाबत काही वाटेनासे झाले आहे. कंबरड्यात लाथा घातल्याशिवाय सरळ होणार नाहीत असे शब्द मला दुर्दैवाने वापरावे लागत आहेत. रोज वर्तमानपत्र उघडले की तेच बघावयास मिळते. अजूनही महाराष्ट्र शासनाच्या विविध खात्यांच्या जाहिराती इंग्रजीत येतात. मी रोज पत्र पाठवतो. पोस्टमनगिरी करावयाची हा एकच उद्योग मला आहे. रोज एक पत्र लिहावयाचे आणि ती जाहिरात त्या खात्याला पाठवावयाची. आता तर जाहिराती निर्लज्जपणाने येत आहेत. मराठीचे ज्ञान आवश्यक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. दिवाकर रावते .....

नाही, इंग्रजीचे ज्ञान आहे काय असे लिहिले जाते. मला वाईट वाटते. त्याही जाहिराती मी काढून ठेवलेल्या आहेत. जेव्हा हक्कभंग आणणार तेव्हा मी त्या काढणार आहे. एवढे सगळे झाल्यानंतरही आमचे अधिकारी अशा पध्दतीने वागत आहेत. पी.एस. कांबळे असे लिहिणारे कोण आहेत ? त्यांना आधी त्या नियमाप्रमाणे आणि शासनाच्या आदेशाप्रमाणे नोटीस काढावी.

सभापती महोदय, मी आपल्याला एक छोटी गोष्ट सांगतो. मला एक पत्र आले होते. माझ्याच मराठीतील पत्राची पोचपावती म्हणजे शासकीय मराठीमध्ये ॲक्नॉलेजमेंट आली होती. त्यावर जो शिक्का मारला होता त्याच्या खालची तारीख इंग्रजीमध्ये होती तसेच सचिवांची सही इंग्रजीमध्ये होती. मी तशीच त्याची झेरॉक्स पाठवली आणि सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांना विचारले की, मराठीचा अमल आपणच करत नसाल तर लोक कशाला करतील ? आपला शिक्काच अजून मराठीत नाही. आपल्या मुख्य सचिवांचे पत्र आहे. त्यावर सुध्दा इंग्रजीमध्ये शिक्का आहे. त्यांनाही पत्र पाठवले. आज सचिवालयामध्ये वरपासून खालपर्यंत त्याचा प्रचार झाला आणि सगळे आता काळजीपूर्वक कार्यवाही करीत आहेत. सही सुध्दा मराठीत करीत आहेत. काय कपाळकरंटेपणा आहे ? आपल्याला जशी आई दिली तशी आईची भाषा दिली. मग हे कशासाठी सर्व चालते ? मला अजून कळत नाही. प्रत्येकाचा तो विषय आहे. प्रत्येकाला घटनेने सगळे अधिकार दिले आहेत. नागडे फिरण्याचा सुध्दा अधिकार घटनेने दिला आहे. मी उद्या कपडे काढून इथून निघालो तर आपण मला थांबवू शकत नाही. हा अधिकार मला घटनेने दिला आहे. नागडे फिरण्याचा अधिकार आहे. कपडे घालून फिरले पाहिजे असे घटनेमध्ये कोठेही म्हटलेले नाही. हा स्वेच्छाधिकार आहे. एवढी दुर्दैवी पाळी या महाराष्ट्रामध्ये मराठीवर आली आहे. मराठीची विटंबना करण्यात येते. हे पी.एस.कांबळे कोण आहेत ? त्यांनी "पी.एस."असे लिहिले त्याबद्दल त्यांना नोटीस गेली पाहिजे. रोज रोज एकच व्यवहार आहे. सारखे 100 फोन येतात. सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील परवा या ठिकाणी मला बोलले. त्या गाडीचे काय आहे ते बघतो असे म्हणाले. आता माझ्या बॅगेत पत्र आहे. या सरकारच्या मंत्र्यांना कोणी कुत्रे विचारत नाही अशी परिस्थिती आहे. सभापती महोदय, मला एका शिवसैनिकाचे पत्र आले आहे. त्या ठिकाणी गाडी अडवली. त्यांनी लायसन्स घ्या असे सांगितले. त्यांनी पैसे भरले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

ते म्हणाले की, मी आबा वगैरे कोणाला ओळखत नाही. हे पत्र काल परवाचे आहे. दुर्दैव असे आहे, त्याला दंड झाला आहे ते मी बघून घेईन. पण सरकारचा दंडाचा फॉर्म सुध्दा इंग्रजी भाषेत आहे. सन्माननीय माननीय मंत्री महोदय श्री.पुरके यांना मी सांगतो की, शब्द तुमचा फॉर्म इंग्रजीमध्ये आहे. या विधिमंडळामध्ये मी पगाराच्या देयकावर सही करतो त्याचा फॉर्म सुध्दा इंग्रजीत आहे. इंग्रजी भाषेबद्दल येथे चर्चा करण्यात आली होती. माणूस मेल्यानंतर त्याच्या अंगावर किती किंमती वस्त्रे आहेत ते पाहिले जात नाही त्याचे नातेवाईक ते सुध्दा भावनेपोटी त्याच्याबरोबर पाठवितात. परंतु छापलेले फॉर्म आहेत जाळून नवीन फॉर्म का छापले जात नाहीत ? छापले आहेत म्हणून ते वापरावयाचे काय ? सगळी कपाळ करंटी माणसे आहेत. शरम वाटावी अशा बाबी समोर येतात म्हणून आम्हाला या सभागृहात उद्वेगाने बोलावे लागते. माननीय श्री.पुरके यांनी मला लिहिलेले आश्वासन मी लॅमिनेट करुन ठेवले आहे. दुर्दैवाने आपण मला चिठ्ठी लिहून कळविले की, 'आम्ही हे करुन देतो, आपण आपले भाषण आवरावे.' मी हक्कभंगाची सूचना देईन त्यावेळी मला त्याचा उपयोग होईल. मंत्रिमहोदयांची इच्छा असेल पण खालचे अधिकारी आपले ऐकत नाहीत. मराठीचा विषय आला म्हणून मी हे सर्व बोललो. श्री.पी.एस.कांबळे यांच्यामुळे माझ्या भाषणातील 10 मिनिटांचा वेळ वाया गेला आहे. त्यांना एकदा सरळ करावे आणि मला ते कळले पाहिजे.

सभापती महोदय, उपविभागीय अधिकारी, वाशिम यांनी जाहीरनाम्यासंबंधी दवंडी पिटली. "याद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, कसबे, रिसोड येथील सर्वे न.445 व 463 मधील 20 गुंठे शासकीय जमीन कृषि उत्पन्न बाजार समिती, रिसोड यांना शेत मालाच्या खरेदी व विक्रीस अटी व शर्तीस अधिन राहून मिळालेली जागेत कृषि उत्पन्न बाजार समिती,रिसोड यांना दुकाने बांधून व्यावसायिकांना भाडेपट्टयावर दिली आहे. याबाबत शर्त भंगाची कार्यवाही करिता प्रकरण सुरु आहे. याबाबत कोणास आक्षेप वा हरकती सादर करावयाच्या असतील त्यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय, वाशिम येथे दिनांक 21.2.2008 रोजी किंवा त्यापूर्वी आपले अटी व हरकती

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

लेखी स्वरुपात या कार्यालयास सादर कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती वा आक्षेपाचा विचार केला जाणार नाही, हा जाहिरनामा दिनांक 6.2.2008 रोजी प्रसिध्द करुन लोकांना सावध केले आहे की, हे बेकायदेशीर आहे. या बेकायदेशीर बाबीबद्दल महसूल विभागाकडून व्यवस्थित कार्यवाही सुरु आहे. या क्षणाला रिसोडच्या जिल्हाधिका-यांच्या मेजावर ती फाईल आहे. दुकाने नियमित करण्यासाठी नाही तर त्या बाजार समितीचा बेकायदेशीरपणे वापर केला त्याबद्दल 28 लाखाचा दंड निश्चित करण्याची नस्ती जिल्हाधिका-यांच्या मेजावर आहे. हे प्रकरण चालू असल्यामुळे कदाचित या क्षणाला सही झाली असेल. हा वेगळा विषय आहे. मंत्रिमहोदय, आजच्या आज 28 लाखाचा दंड भरण्यासाठी त्यांना फोन करणार काय ? या लोकांना दंड व्हावा असे आपण सांगावे. दुर्दैव असे की, हे केले जात नाही म्हणून श्री.प्रकाश जयंतराव देशमुख यांनी उपोषण केले, फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांचा आक्षेप काय होता ? त्याठिकाणी कसली दुकाने काढली होती तर कापड दुकान, दवाखाना, बूट हाऊस, कटिंग हाऊस, ड्रेसिंग हाऊस आणि हे सगळे कमी पडले म्हणून की काय दारुचे दुकान त्या बाजार समितीच्या आवारात काढण्यात आले आहे. मी त्या दुकानांचे ई-मेलवरुन फोटो मागवून घेतले आहेत.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 16:00

(श्री. दिवाकर रावते ...)

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

हे फोटो मी माननीय मंत्री महोदयांना दाखवतो. शेतक-यांना बाजारहाट करण्यासाठी दिलेल्या भूखंडाचा गैरवापर करण्यात आला, गाळे काढण्यात आले. ते गाळे बी-बियाणे विकण्यासाठी, खते विकण्यासाठी शेतीची अवजारे विकण्यासाठी न देता कुठे हेअर कटिंग सलून, कुठे बुटवाला, कुठे पॉलिशवाला आणि दारुचे दुकान, अशा प्रकारे हे गाळे देण्यात आले. सभापती महोदय, मी हे सगळे सांगण्याचे कारण असे की, या तक्रारीच्या संदर्भातील प्रकरण पेटले, दवंडी पिटल्या आणि आक्षेप आल्यानंतर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वाशिम यांनी दिनांक 13.3.2008 रोजी आदेश काढले. ते पुढील प्रमाणे आहे "वाचा :- माननीय विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती, यांचेकडील दिनांक 11.3.2008चे पत्र क्रमांक पणन 2374/08. ज्या अर्थी, कृषी उत्पनन बाजार समिती रिसोडच्या कामकाजातील दोषा संबंधी सतत तक्रारी प्राप्त होत आहेत आणि प्राप्त तक्रारी तालुका सहाय्यक निबंधक, रिसोड यांच्याकडे प्रशासकीय चौकशीसाठी वेळोवेळी पाठविण्यात आल्या आहेत. त्या पैकी एका तक्रारी संबंधी कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्लॉटस/जमिनी भाडयाने देणे, विक्री करणे किंवा लिजवर देणे या कार्यास दिनांक 16.2.2008च्या पत्रानुसार प्रतिबंध घालण्यात आला आहे, उर्वरित तक्रारी संबंधी तालुका सहाय्यक निबंधक रिसोड यांच्याकडे दोन तालुक्यांचा अतिरिक्त पदभार आहे व त्यांच्या कार्यालयातील एक सोडून अन्य सर्व वर्ग-3ची पदे रिक्त आहेत. त्यामुळे सदर तक्रारी त्यांच्याकडे प्रतिक्षाधिन दिसत असल्याने या कामास प्राधान्य क्रम द्यावा. तक्रारकर्त्याच्या तक्रारीची रीतसर चौकशी व्हावी या हेतूने पणन कायद्यांतर्गत तरतुदी नुसार कलम 40 नुसार वैधानिक चौकशी करणे आवश्यक झाले आहे, असे माझे मत झालेले आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे वैधानिक आदेश पारित करण्यात आले आहेत.

"-आदेश -

आदेश देण्यात येतो की, महाराष्ट्र कृषी पणन कायदा 1963चे कलम 40 नुसार कृषी उत्पन्न बाजार समिती रिसोडच्या कामकाजातील आक्षेपासंबंधी चौकशी करण्यासाठी श्री.डी.यु.शेकोकार, सहकारी अधिकारी श्रेणी-1 अंतर्गत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाशिम

..2..

(श्री. दिवाकर रावते...)

यांना याद्वारे चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येत आहे. त्यांनी सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद असलेल्या आक्षेपासंबंधी प्राधान्याने चौकशी करुन या कार्यालयास 30 दिवसाच्या आत अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश आज दिनांक 13.3.2008 रोजी माझे सहीशिक्यानिशी निर्गमित केला आहे." या आदेशावर श्री. पी.एम.पदमावार, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, वाशिम यांची सही आहे.

सभापती महोदय, माननीय आमदार श्री. इंगळे यांनी पणन मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना पत्र लिहिले आहे. पत्रातील विषय पुढील प्रमाणे आहे :- माननीय जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, वाशिम यांचा आदेश ना.क्र.पणन/क, उ.बा.स./रिसोड/कलम 40/चौकशी/1114/80 दिनांक 13.3.2008, कलम 40 ला स्थगिती देऊन खारीज करण्याबाबत. पत्रातील मजकूर पुढीलप्रमाणे आहे :- महोदय, उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास विनंती करण्यात येते की, श्री. दिलीप बोरकर व श्री. प्रकाश देशमुख यांच्या तक्रारीनुसार माननीय जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम यांनी त्यांचा आदेश दिनांक 13.3.2008, महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न पणन, कायदा, 1963 कलम 40 अन्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाशिम यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ती नियुक्ती राजकीय दबावाखाली केली आहे. तरी विनंती की, माननीय जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था वाशिम यांचा आदेश दिनांक 13.3.2008 ला स्थगिती देऊन खारीज करण्यात यावा."

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

ही नियुक्ती राजकीय दबावाखाली आहे असे पत्र आमदार साहेबांनी दिले. आमदार साहेबांनी पत्राच्या शेवटी असे म्हटले आहे की, तरी विनंती आहे की, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, यांचा आदेश क्रमांक 3 ला स्थगिती देऊन खारीज करण्यात यावा. मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, सरकार म्हणून आपली जबाबदारी आहे म्हणून काम करता की पक्ष सदस्य आहात म्हणून काम करता ? कोणाला तरी सांभाळण्यासाठी सहकार खात्याचा वापर कशाला करता ? सामान्य शेतक-यांच्या हिताकरीता पणन महामंडळाच्या माध्यमातून, बाजार समित्यांच्या माध्यमातून शेतक-यांना लाभ मिळाला पाहिजे यासाठी आपणाकडे सहकार विभाग देण्यात आला आहे. बाजार समितीमध्ये निवडून आलेल्या सदस्यांनी केलेल्या भ्रष्टाचारास संरक्षण देण्यासाठी आपणाकडे हे खाते सोपविण्यात आलेले नाही. भ्रष्टाचार करणाऱ्या सदस्यांना संरक्षण देणार असाल, त्यांना पाठिशी घालणार असाल, त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई करणार नसाल, या गोष्टींना आळा घालण्यासाठी तुम्ही सक्षम नसाल तर तुम्हाला या पदावर राहण्याचा अधिकार नाही. बाजार समित्यांमध्ये नव्याने निवडून आलेल्या सदस्यांनी मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केला आहे, त्या गोष्टीचा मी उल्लेख या ठिकाणी करणार नाही. 100 टक्के गैरव्यवहार झाले आहेत त्याबाबतचे सुतोवाच करीत नाही. यासंदर्भात माझ्याशी कोणी आव्हान दिले तर त्यासंदर्भात मी बरेच पुरावे सादर करण्यास तयार आहे. परंतु मला या चर्चेत कुठेही अपवित्रता आणावयाची नाही. परंतु आमदारांच्या पत्रावर डी.डी.आर.वाशिम यांना पणन मंत्र्यांनी आदेश दिले आहेत की,चौकशी स्थगित करावी. सदर आदेश कोणत्या अधिकारात दिले आहेत. मंत्री झालात म्हणून भ्रष्टाचारी लोकांना पाठिशी घालण्याचा अधिकार कोणी दिला ? भ्रष्टाचार झाला आहे असे तहसीलदार यांनी शिक्कामोर्तब केले. या प्रकरणाची दंडाची फाईल जिल्हाधिकारी यांच्या टेबलावर पडलेली आहे. यासंदर्भात विभागीय आयुक्तांनी चौकशीचे आदेश काढले. परंतु या भ्रष्टाचाराला पाठिशी घालण्याकरिता माननीय पणन मंत्री महोदयांनी डी.डी.आर.वाशिक चौकशी स्थगित करावी. परत इंग्रजीमध्ये लिहिले आहे की, "रिपोर्ट करावा". रिपोर्ट हा शब्द इंग्रजीत लिहिला आहे. माननीय मंत्री महोदयांना साधा शेरा मराठी भाषेत लिहिता येत नाही काय ? अहवाल सादर करावा असे लिहिण्यास काय हरकत होती. परंतु श्री. हर्षवर्धन पाटील, दिनांक 25.3.2008 रोजीच्या पत्रात इंग्रजीत लिहिले आहे की, "रिपोर्ट करावा". आपण आमच्यापुढे विधेयक मान्यतेसाठी

2...

श्री. दिवाकर रावते...

आणलेले आहे. अधिवेशन चालू आहे. संबंधितांना 6 वर्षासाठी शास्ती करा आणि त्यांना घरी पाठवा असे आपल्याकडून सांगितले जाते आहे. दोषी व्यक्तींना निवडणुकीसाठी उभे राहता येणार नाही असे देखील आपणाकडून सांगितले जात आहे. आमच्या समोर विधेयक मंजुरीसाठी आणले जात आहे. कलम 45 प्रमाणे काय असेही सांगितले जाते आहे. परंतु अशा भ्रष्टाचारी प्रकरणास माननीय मंत्री महोदय स्थगिती देता आहेत. तुम्हाला हे विधेयक मंजूर करुन घेण्याचा कोणता नैतिक अधिकार आहे यासंबंधीची माहिती मला या ठिकाणी सांगण्यात यावी. मी या ठिकाणी भ्रष्टाचाराचे अनेक प्रकरणे सांगू शकतो, परंतु ती प्रकरणे ऐकून घेण्याची तयारी सभागृहाने ठेवली पाहिजे. भ्रष्टाचाराची 25 प्रकरणे माझ्याकडे उपलब्ध आहेत. मी फक्त भ्रष्टाचाराची प्रकरणे मांडण्यासाठी या सभागृहात आलो आहे काय ? मी काही तुमचे खरकटे उचलण्यास आलो आहे काय ? कायदा कसा असावा हे सांगण्यासाठी मी उभा आहे. कायदा करीत असताना तुम्ही अनैतिक माणसांच्या मागे उभे राहणार असाल तर, भ्रष्टाचार करणा-या लोकांना संरक्षण देणार असाल, भ्रष्टाचार उघडकीस आणणा-या अधिका-यांवर गैरविश्वास दाखविणार असाल तर त्या गोष्टी योग्य नाहीत. महसूल विभागाने सदर भ्रष्टाचार उजेडात आणला आहे, त्या भ्रष्टाचाराला माननीय मंत्री महोदय स्थगिती देणार असतील तर कोणत्या अधिकारात आपण या विधेयकास माझी मंजुरी मागता आहात त्यासंबंधीचे उत्तर मला मिळाले पाहिजे. सभापती महोदय, या विधेयकाला आपणाकडून संरक्षण मिळाले पाहिजे. संसदीय कार्य पध्दतीमध्ये कामकाज करण्यासाठी मंत्री महोदय हे शपथ घेऊन बसलेले असतात. भ्रष्टाचारास संरक्षण देण्याचा माननीय मंत्र्यांना कोणता नैतिक अधिकार आहे याचा खुलासा होणे गरजेचे आहे. खरे तर या एकाच प्रकरणात शासनाने हे विधेयक मागे घेतले पाहिजे. विधेयक मंजूर करुन घेण्याचा या शासनाला कोणत्याही प्रकारचा अधिकार नाही. एकीकडे शास्ती देण्याचे मत मांडता आहात आणि दुसरीकडे मात्र भ्रष्टाचाराला संरक्षण देण्यात येत आहे. सभापती महोदय, अशी प्रकरणे सभागृहात मांडताना अतिशय वेदना होतात. पुणे ,नागपूर, येथील बाजार समित्यामध्ये देखील मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. कोणत्या ठिकाणच्या बाजार समित्याचे भ्रष्टाचाराचे प्रकरण या ठिकाणी मांडू हा माझ्या पुढे प्रश्न निर्माण झाला आहे. मी या भ्रष्टाचारासंदर्भात पणन मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांना सांगितले. या प्रकरणांमध्ये काहीही नाही

3...



ABG/ KTG/ SBT/ प्रथम श्री. शिगम 16:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

असे ते सहज बोलून गेले. सभापती महोदय, मी या ठिकाणी एक गोष्ट मुद्दाम मांडू शकत नाही. मी खालच्या पातळीवर जाऊ शकत नाही. तो माझा पिंड नाही. मी माझ्या जीवनात असे कधीही केलेले नाही. सभापती महोदय, मी एक गुप्त माहिती आपल्याकडे पाठवितो, ती माहिती आपण देखील वाचू नका. ती माहिती फक्त माननीय सभापतींना वाचण्यास सांगावी. माननीय सभापतींचे वाचून इ ाल्यानंतर ती माहिती माझ्याकडे परत पाठवा.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

सभापती महोदय, माझ्याकडे एक पत्र आहे. मंत्रीमहोदयांनी भ्रष्टाचाराला स्थगिती दिलेली आहे. त्यानंतर चौकशी अधिकारी यांनी पत्र लिहिले ते मी वाचून दाखवितो त्यात त्यांनी माझी जबाबदारी नाही असे सांगितले. त्यांनी आपल्या पत्रात असे म्हटले आहे की, सदरबाबत पुढील आदेश होईपर्यंत संदर्भ क्रमांक 3 चे अनुसार दूरध्वनीवरुन दिलेल्या सूचनेनुसार चौकशीचे कामकाज थांबविले आहे. यातील संदर्भ-1 चे आदेशानुसार विहित मुदतीत अहवाल सादर न केल्याबद्दल कृपया मला जबाबदार धरण्यात येऊ नये. दारुची दुकाने देणाऱ्यांना मंत्रीमहोदय वाचवत असतील तर कशा पध्दतीने याठिकाणी बोलायचे आणि कोणत्या गोष्टीवर बोलायचे हा माझ्यापुढे प्रश्न निर्माण झाला आहे. हे विधेयक मांडत असताना ज्या बेकायदेशीर बाबी आहेत त्यावर मी बोलत आहे. सभापती महोदय, हे विधेयक मांडण्याचा नैतिक अधिकार मंत्रीमहोदयांना नाही. विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना आणि या विधेयकावर चर्चा चालू असताना मी असे सांगू इच्छितो की, बाजार समित्या सक्षम होणार आहेत काय किंवा ते त्यांचे कर्तव्य पार पाडण्यास सक्षम नाहीत काय ?मी आता आणखी उदाहरणे देऊ इच्छित नाही. माननीय सभापतींनी मला विनंती केली आहे. शितावरुन भाताची परीक्षा होत असल्यामुळे मी याबाबत आणखी बोलू इच्छित नाही. दु:ख एवढेच होते की, बाजार समित्या सक्षम होत नाहीत. बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांची व्यवस्था नाही, त्यांचे व्यवस्थापन नाही. मॉडेल ॲक्टच्या माध्यमातून 262 कोटींची कोणती कामे केली त्याची यादी माझ्याजवळ आहे. परंतु ती सांगण्याकरिता मी उभा नाही आणि मला काय माहीत आहे हे दाखविण्याकरिता मी उभा नाही. कायद्याच्या तरतुदीमध्ये ज्या उणिवा भासतात त्या सांगण्याकरिता मी उभा आहे. या बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांची व्यवस्था नाही, शेतकऱ्यांचे व्यवस्थापन नाही, शेतकऱ्यांची सोय नाही. यामधून अडत्यांचे भले होणार आहे. या कायद्यातून शेतकऱ्यांचे हित साधण्याऐवजी व्यापारी आणि अडते यांचे हित साधले जाणार आहे. बाजार समित्या सक्षम व्हाव्यात म्हणून आपण धडपडत होतो. शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले. शेतकरी कर्ज भरु शकत नाही. या विधेयकाच्या माध्यमातून मूळ कलम 57 मध्ये जी सुधारणा आणली आहे ती आणली कशी हा माझा प्रश्न आहे. पुण्याच्या पणन मंडळावर विश्वास नसावा किंवा त्यांच्या कार्यक्षमतेवर विश्वास नसावा. जाचक त्रास निर्माण करण्यासाठी आणि बाजार समित्यांना वेसण घालायची अशा प्रकारचे हे कलम आहे. कलम 57 मध्ये म्हटले आहे की, बाजार समितीकडून राज्य कृषि पणन मंडळाला येणे

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

असलेली रक्कमसुध्दा जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल अशी तरतूद करण्यासाठी या कलमामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 16:15

श्री.दिवाकर रावते........

कशासाठी हे केले? सभापती महोदय, राज्य कृषि पणन मंडळाला विशेष अधिकार आहेत. कलम 38(2) प्रमाणे प्रत्येक कृषि उत्पन्न बाजार समितीने ठराविक तारखेला आपला अर्थसंकल्प राज्य कृषि पणन मंडळाला सादर करावयाचा आहे. राज्य कृषि पणन मंडळाने तो एका महिन्याच्या आत मंजूर करुन परत पाठवावयाचा आहे. त्यात काही सुधारणा करावयाची असेल तर मंडळाला करता येते. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार राज्य कृषि पणन मंडळाला आहे. तो अर्थसंकल्प एका महिन्यात मंजूर करावयाचा आहे. तो एका महिन्यात मंजूर केला नाही तर तो जशास तसा मंजूर झाला आहे असे समजले जाते. ज्यावेळी अर्थसंकल्प मंजुरीसाठी येतो अशा वेळी आतापर्यंतची प्रॅक्टिस अशी आहे की, आपला अर्थसंकल्प मंजूर व्हावा म्हणून शक्यता कृषि पणन मंडळाची देणी कृषि उत्पन्न बाजार समित्या देत असतात असा अनुभव आहे.

उपसभापती महोदय, मी आपल्या विनंतीचा मान ठेवतो आणि माझे अनेक मुद्दे मांडावयाचे असले, माझ्या पध्दतीने मांडावयाचे असले, अनेक बाबींचा उलगडा करावयाचा असला तरी सुध्दा आपण केलेल्या विनंतीचा सन्मान ठेवून मी माझे विचार थांबविणार आहे. तत्पूर्वी मी एक गोष्ट नमूद करु इच्छितो. मी अत्यंत व्यथित झालेलो आहे. आम्ही या सदनामध्ये माननीय सभापतींकडे, माननीय सभापतींच्या आसनाकडे, माननीय सभापतींच्या दालनाकडे आणि व्यक्तिश: माननीय सभापतींच्या कृतीकडे या सदनाचे, लोकशाहीचे संरक्षक म्हणून पहात असतो. या सदनामध्ये काय घडते, ते कायद्यातील तरतुदीप्रमाणे घडते की नाही, नियमात बसून घडते की नाही, हे सगळे करीत असताना घटनेच्या चौकटीत राहून सरकार काम करते की नाही, करीत नसेल तर त्याला जर कोणी अडविणार असेल तर त्याला संरक्षण देणे आणि सरकारला वठणीवर आणण्यासाठी विरोधी पक्षाला खास करुन संरक्षण देणे, हे माननीय सभापतींचे खास करुन आम्हाला अपेक्षित असलेले काम आहे. माननीय सभापतींबाबत मी एक समजू शकतो, ज्या सत्तारुढ पक्षाने त्यांना निवडून दिले, त्यामुळेच ते सभापती होऊ शकले, विरोधी पक्षामुळे होऊ शकत नाहीत, परंतु लोकशाहीमध्ये ब्रिटिश पार्लमेंटरी सिस्टिम अंमलात आणली, कौल आणि शकधरचे मी उदाहरण देणार नाही. अन्यथा आणखी दोन तास मी बोलू शकतो. सभापती म्हणजे काय? त्यांची कशी निवड केली जाते यावर खूप बोलता येईल. प्रगल्भ लोकशाहीचे रक्षण करण्याची जबाबदारी

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

निवडून आलेल्या सरकारची असताना ते सरकार सक्षमतेने काम करणाऱ्या अशा व्यक्तिची सभापतीपदी निवड करते, जेणेकरुन सरकारला अडचण येणार नाही आणि विरोधकांवरही अन्याय करणार नाही. सदनाचे कामकाज व्यवस्थित चालवून सर्वांना संरक्षण आणि न्याय देतील हा महत्वाचा भाग आहे. मी काल अत्यंत व्यथित झालो. माननीय सभापतींनी मला लवकर भाषण संपवावे असे सांगितले. मी भाषण संपविणार आहे. मी विक्रम करण्यासाठी उभा राहिलेलो नाही. या विधेयकामध्ये ज्याचा उल्लेख केला आहे त्या बाहेरचा एकही शब्द बोललो नाही. तरतुदीच्या बाहेरचे काहीही बोललो नाही. असे संकेत आहेत की, विधेयकावर कितीही बोलता येते. एक शब्द घेऊन संपूर्ण जग फिरुन येता येते. कोणाला अडविता येत नाही. परंतु मी तसे केले नाही. या विधेयकावर मला बोलायचे होते म्हणून मी यापूर्वीच्या वि.प.वि.क्रमांक-4 मुंबई परगणा व कुळकर्णी वतने नाहीशी करण्याबाबतच्या बिलावर थोडक्यात माझे विचार मांडले होते. त्या बिलावर खूप बोलण्यासारखे मुद्दे होते. खोती पध्दतीविषयी खूप बोलण्यासारखे होते.

उपसभापती महोदय, मला खेद होतो की, काल मी भाषण करीत असताना माननीय सभापतींनी हसत सांगितले, रागाने सांगितले नाही........

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

ते रेकॉर्डवर आले आहे की, सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर आटोपते घ्यावे, अन्यथा कलम 33 प्रमाणे....अडथळा.....मला आश्चर्य वाटले होते, कारण माझा समज असाच होता की, माननीय सभापती असे बोलू शकत नाहीत. कारण एखाद्या विधेयकावर बोलत असतांना सन्माननीय सदस्यांना थांबविता येत नाही. परंतु एक-दोन-तीन किंवा चार सदस्य तेच तेच मुद्दे घेऊन बोलत असतील आणि सभागृहात तशा प्रकारचे वातावरण तयार झाले की, जाणीवपूर्वक तेच तेच मुद्दे उपस्थित करुन सभागृहाचा वेळ घेतला जात आहे, अशा वेळी सभागृहाचे नेते या 33 व्या कलमानुसार अशी चर्चा थांबविण्याची मागणी करतात. आणि अशा प्रकारे केवळ मागणी केली म्हणून भागत नाही तर त्यासंदर्भात विरोधी पक्ष सहभागी होऊन कशा प्रकारे चाललेली चर्चा योग्य आहे हे सांगण्याचाही प्रयत्न करतात. परंतु मला माननीय सभापतींनीच असे सांगितल्यानंतर मात्र आश्चर्य वाटले आणि त्यावेळेस मी मागील रेकॉर्ड पाहण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मला असे आढळून आले की, 5 ऑगस्ट रोजी सकाळी 11 ते रात्री 9.35 वाजेपर्यंत म्हणजेच एकूण 9.55 मिनिटे याच सभागृहात विधेयकावर चर्चा झालेली आहे. दिनांक 27 मार्च, 1984 रोजी दुपारी 2.00 ते रात्री 11.00 वाजेपर्यंत एकूण 9.07 तास, मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक नगरपालिका सुधारणा विधेयकावर चर्चा झालेली आहे. त्यानंतर दि. 19 मार्च 1993 रोजी सकाळी रात्री 10 ते सकाळी 7.55 वाजेपर्यंत, एकूण 9.12 तास पूरक मागण्यांच्या विवरण पत्रावर ही चर्चा झाली होती. त्यानंतर नामांतराच्या विधेयकावर प्रदीर्घ अशी 21 तास चर्चा झालेली आहे. अशा प्रदीर्घ चर्चा सभागृहात झालेल्या असताना देखील मी असा काय गुन्हा केला होता हेच मला समजत नाही. या सभागृहात मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार तयार होणाऱ्या कायद्याच्या अनुषंगाने ग्रामीण भागातील वंचित लोकांच्या वेदना घेऊन मी फिरत असतो, शेतकऱ्यांना मालाचा भाव मिळाला नाही म्हणून आत्महत्त्या होतात, त्यांना कुठल्याही प्रकारचे व्यवस्थापन मिळत नाही म्हणून शेतकऱ्याच्या वेदना घेऊन आम्ही येत असतो, व्यापारी शेतकऱ्यांना लुटत आहे हे आम्ही उघड्या डोळयांनी पाहत असतो आणि त्याबाबतीत ज्या भावना असतात त्याच मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. आज सकाळी माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, सभागृहात विधेयकावर चर्चा करीत असतांना यापूर्वीचे रेकॉर्ड किती तासाचे आहे. पण मी एक सदस्य म्हणून सभागृहात विधेयकावर

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ..........

विचार मांडण्याचा प्रयत्न करतो, कदाचित ते अभ्यासपूर्ण होत नसेल, इकडचे-तिकडचे असेल, सरळ भाषेत बोलायचे तर बेअकलीपणाचे असेल पण ज्या संवेदना आहेत त्या मांडण्याचा मी या माध्यमातून प्रयत्न केला. परंतु अशा प्रकारे चर्चा थांबविण्याचा विचार होत असेल तर मला कळत नाही की, हे विधानभवन कशासाठी आहे, सभागृह कशासाठी आहे ? असेच करायचे असेल तर मग सभागृहात विधेयक चर्चेलाच आणू नका. फक्त बलात्कारच बघा, केस कापणे बघा, अमुक बघा. अशा प्रकारे एखाद्या विधेयकावर प्रदीर्घ व गंभीर चर्चा ज्यावेळी होत असते त्यावेळी ते सदनाचे वैभव असते. पण ही चर्चा सुरु असतांना मात्र तसे कोणालाच वाटले नाही म्हणून सभापतींनीच हे सांगावे हे वेदनादायी होते, एवढेच मला नम्रपणे सांगावयाचे आहे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी माननीय सभापतींना धन्यवाद देतो. भविष्यात अशीच कृपादृष्टी ठेवावी अशीही नम्र विनंती करतो. आणि या विधेयकावरील चर्चा थांबवित असतांना ज्या कारणासाठी हे सर्व बोललो, ज्या उपसूचनेसाठी मी बोललो ती उपसूचना म्हणजे हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे जाणे कसे योग्य आहे हे देखील सांगण्याचा प्रयत्न केला. म्हणून हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे, अशी पुन्हा विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. जयहिंद. जय महाराष्ट्र.

--------------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी पणनच्या विधेयकावर मांडलेले विचार चिंतन करणारे होते. सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाच्या संदर्भात अत्यंत पोटतिडकीने विचार मांडलेले आहेत याची नोंद मी मुद्दाम घेतो.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, या ठिकाणी सन 2008 चे विधानसभा विधेयक क्रमांक 2. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन( विकास व विनियमन ) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडलेले आहे. या विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विधेयकातील पृष्ठ क्रमांक 2 वरील कलम 2 मध्ये म्हटले आहे की, "महाराष्ट्र कृषि उत्पन्न (विकास व विनियमन) अधिनियम,1963 (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या मलक 13 मध्ये (क) पोट कलम (1) मधील खंड (क) मध्ये, " बाजार क्षेत्रात राहणारे " या मजकुराने सुरु होणा-या व "पंधरा शेतकरी," या मजकुराने संपणा-या मजकुंराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल, असे म्हटले आहे. पुढील मजकुरामध्ये असे म्हटले आहे की बाजार क्षेत्रात राहणारे ( ज्याची संबंधित मतदारसंघाच्या मतदारयादित नावे असतील असे आणि जे जिल्हाधिका-याने किंवा यथास्थिति जिल्हा उप निबंधकाने याबाबतीत वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास एकवीस वर्षाहून कमी वयाचे नसतील असे) खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पंधरा शेतकरी. अशा प्रकारची सुधारणा करण्यात येत आहे.परंतु या विधेयकात कुठल्याही प्रकारचा सुस्पष्टपणा नाही. मला या विधेयकाच्या निमित्ताने सांगावयाचे आहे की, विशेषत: जे 15 शेतकरी असतील त्यातील 11 शेतकरी विविध कार्यकारी सोसायटयांमधून निवडून आलेले संचालक असतील परंतु शेतकरी नसतील तरी ते बाजार समितीची निवडणूक लढविण्यास पात्र असतील, कारण संबंधित मतदारसंघाच्या मतदार यादीत त्यांचे नाव आहे. म्हणजे जवळ जमीन असली तरी निवडणूक लढविण्याचा अधिकार प्रत्येक शेतकऱ्याला असेल, असे नाही, तर त्या शेतकऱ्याचे नाव मतदारसंघाच्या मतदारयादीत असले पाहिजे. विविध गटातून निवडून आलेले शेतकरी की ज्यांचे नाव मतदारसंघाच्या मतदारयादीत असेल तेच कृषि उत्पन्न बाजार समितीचा नॉमिनी फॉर्म भरण्यासाठी या कायद्याने पात्र ठरणार आहेत. आधीच्या कायद्याप्रमाणे 7/12 शिवाय त्याला उमेदवारी मिळत नव्हती. परंतु या कायद्याने उमेदवार यादीत नाव आले तर त्यांना समितीची निवडणूक लढविता येईल. सन्माननीय सदस्य

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर.....

श्री. रावते साहेबांनी या विधेयकाच्या संदर्भात जे विचार मांडलेले आहेत त्यानुसार या विधेयकात सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. मतदारयादीत नाव नसेल परंतु त्यांच्याकडे 7/12 च्या उतारा असेल त्यांना सुध्दा समितीची निवडणूक लढविण्यास पात्र ठरविण्यात यावे, अशी तरतूद असण्याची आवश्यकता आहे. सध्या असलेल्या तरतुदीनुसार ओबीसी, एस.सी, एन.टी, कमकुवत, महिला कोणीही निवडणूक लढविण्यास पात्र आहे. ते संचालक होऊ शकत होते. पंचायत समितीचे सदस्य होऊ शकत होते. परंतु आता ते मतदार होऊ शकतात. परंतु संबंधित मतदारसंघाच्या मतदारयादीत त्यांचे नाव नसतील तर ते बाजार समितीची निवडणूक लढविण्यास पात्र होऊ शकत नाहीत. सध्याच्या तरतुदीनुसार आपण या 4 लोकांना ग्रामपंचायतीचे प्रतिनिधीत्व दिलेले आहे.परंतु या कायद्यामुळे ग्रामपंचायतीमधून निवडून येणा-याला पात्र समजण्यात येईल मग तो शेतकरी असो किंवा नसो. हे 11 शेतकरी समितीवर जाणार आहेत. ग्रामपंचायतीमधून निवडून आलेला माणूस शेतकरीच असेल असे नाही. त्यामुळे त्यांना सुध्दा 7/12 ची अट लावली पाहिजे. ग्रामपंचायतीच्या घटकामध्ये एस.सी.,एस.टी.आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील माणूस निवडून येतो व निवडून आलेल्यांमधून 4 संचालक होतात. ग्रामपंचायतीच्या मतदारयादीत नाव असेल व ज्याचे उत्पन्न 20 हजार रुपयांच्या आत असेल तर तो नियमानुसार निवडणूक लढविण्यास पात्र ठरणार आहे. या नवीन तरतुदीनुसार त्याचे संबंधित मतदार सघातील मतदार यादीत नाव असल्यावर त्याला समितीची निवडणूक लढविता येईल मग त्यासाठी शेतकरी असण्याची गरज नाही त्यामुळे माझा आक्षेप असा आहे की, 7/12च्या यादीत ज्या व्यक्तीचे नाव असेल त्या व्यक्तीला सुध्दा समितीची निवडणूक लढविण्यास पात्र समजण्यात यावे, त्याचे नाव संबंधित मतदार यादीत नाही म्हणून त्यला अपात्र समजण्यात येऊ नये.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर ...

या विधेयकातील मूळ रचनेमध्ये अनेक उणिवा आहेत त्या दूर करण्यासाठी हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले पाहिजे असे मला वाटते. हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आल्यानंतर तेथे विचारविनिमय होऊन यामध्ये योग्य त्या सुधारणा सुचविल्या जातील आणि त्यानंतर सुधारणा विधेयक या ठिकाणी मांडण्यात येईल. मतदार यादीबद्दल सांगावयाचे म्हणजे या मतदारयादीमध्ये हमाल आहेत आणि तो सुध्दा लहान शेतकरी असू शकतो. बाजार समित्यांचे लायसन्स हमाल घेत असतो .त्यामुळे तो हमाल असे म्हणू शकतो की बाजार समितीच्या मतदारयादीमध्ये माझे नाव आहे मला बाजार समितीच्या निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार आहे. त्यामुळे तो देखील या निवडणुकीस उभा राहू शकतो त्याचप्रमाणे एखादा व्यापारी हा शेतकरी असू शकतो त्यामुळे त्याच्याकडे सात बाराचा उतारा असल्यामुळे तो सुध्दा असे म्हणू शकतो की बाजार समितीच्या निवडणुकीमध्ये उमेदवार म्हणून उभा राहण्यास मी पात्र आहे.कारण माझे नाव सुध्दा मतदार यादीमध्ये आहे. म्हणून मला असे सांगावयाचे आहे की, या विधेयकामध्ये मतदार यादीची जी रचना केलेली आहे त्यात योग्य ती सुधारणा केली गेली पाहिजे. त्याच बरोबर सात बाराचा उतारा लावल्याशिवाय ती व्यक्ती शेतकरी आहे हे सिध्द होत नाही म्हणून ती व्यक्ती जो पर्यंत शेतकरी असल्याचे सिध्द होत नाही तोपर्यत ती व्यक्ती उमेदवारीस पात्र असल्याचे समजण्यात येऊ नये अशा प्रकारची या विधेयकात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्या शिवाय ही बाजार समिती शेतक-यांची होऊ शकत नाही ही विशेष बाब मला या ठिकाणी सांगावयाची आहे.

सभापती महोदय, मॉडेल ॲक्टच्या अनुषंगाने हे निर्णय घेण्यात आलेले आहेत. महाराष्ट्रात 239 बाजार समित्या आहेत. त्यातील एका बाजार समित्ीचे मी प्रतिनिधित्व करीत आहे.एका बाजार समितीचा मी सभापती आहे.कै. वसंत दादा पाटील यांनी पुणे येथे जो सहकारी संघ स्थापन केलेला आहे त्या सहकारी संधाचा मी संचालक आहे. त्यामुळे बाजार समितीमधील सर्व व्यवहार मला माहीत आहेत. या ठिकाणी जे विधेयक मांडण्यात आलेले आहे त्यातील तरतुदीचा सर्वकष विचार करण्याची गरज आहे. घाई घाईने बाजार समित्यांच्या निवडणुका घ्यावयाच्या आहेत म्हणून तातडीने माननीय राज्यपालांच्या अनुमतीने अध्यादेश काढण्यात आला होता त्या अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर करण्यासाठी हे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे .



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर ...

.ख-या अर्थाने जर हे विधेयक मंजूर झाले नाही तर होणा-या निवडणुकीबाबत हायकोर्टात व सुप्रीम कोर्टात चॅलेंज केले जाईल म्हणून ही बाब जोपर्यन्त क्लिअर होत नाही , कायद्याचे स्वरुप जोपर्यत प्राप्त होत नाही तोपर्यंत बाजार समित्याच्या निवडणूका होणे देखील अवघड आहे. मध्यंतरी बाजार समित्यांच्या निवडणुका घेण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांकडून काढून डी.डी.आर.कडे देण्यात आले होते. त्यावेळी आम्ही असे म्हटले होते की, सहकार विभागामध्ये पुरेसे कर्मचारी नाहीत तेव्हा हे कर्मचारी भरण्यासंबंधी असे आश्वासन देण्यात आले होते की, तीन महिन्यात सर्व कर्मचा-यांची पदे भरण्यात येतील परंतु अजूनही ही पदे भरण्यात आलेली नाहीत त्यामुळे डी.डी.आर.कडे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. अशा परिस्थितीमध्ये निवडणुका होतील किंवा नाही याबाबतीत आम्ही साशंक आहोत. पुढची जी दुरुस्ती सुचविण्यात आलेली आहे ती दुरुस्ती याचेच द्योतक आहे जास्त वेळ न घेता मला एकच मुद्दा मांडावयाचा आहे.

सभापती महोदय, कलम 15 - क मध्ये जी सुधारणा सुचविण्यात आली आहे. त्यात असे म्हटलेले आहे की," या कलमामध्ये सदस्यांचा नेहमीचा किंवा वाढीव पदावधी संपल्यानंतर ,बाजार समितीच्या कामकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी,प्रशासक नेमण्याची तरतूद होती. उक्त कलमामध्ये, प्रशासक किंवा प्रशासकीय मंडळ नियुक्त करण्याची तरतूद करण्यासाठी सुधारणा करण्यात आली आहे" अशा प्रकारे प्रशासक नेमण्याची तरतूद आहे ही गोष्ट खरी आहे. त्यानुसार प्रशासक नेमण्यात आले होते परंतु प्रशासक नेमत असताना त्याबाबतीत कधी विचार करण्यात आला नाही. हे प्रशासक कसे असतात आणि त्यांनी बाजार समित्यांचे वाटोळे कसे केले आहे या बाबतीत शासनाने कधी विचार केला आहे काय ? सभापती महोदय, आमगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मी मागच्या वेळी सभापती होतो. त्यावेळी तेथे प्रशासक नेमण्यात आला होता. पहिल्यांदा सरकारी अधिकारी प्रशासक म्हणून नेमण्यात आला होता नंतर अशासकीय प्रतिनिधीला प्रशासक म्हणून नेमण्यात आले होते. त्यांनी बाजार समितीचे वाटोळे केले. त्याने प्लॉटच विकून टाकला होता. बाजार समितीचा काहीही सबंध नसतांना त्याने सुप्रीम कोर्टाच्या नावाने पैसे लुबाडले. या सर्व गोष्टी बाजार समितीच्या रेकॉर्डवर आलेल्या आहेत. अजूनही या बाजार समितीच्या प्रशासकाच्या कारभारासंबंधीच्या कोर्ट केसेस चालू आहेत. प्रशासक कसा असावा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर ...

यासंबंधी देखील नियम असले पाहिजेत असे मला वाटते. मधल्या काळात मी सभापती असतांना प्रशासक नेमण्यात आला होता. राजकीय हेतूने तेथे माझ्या ऐवजी प्रशासक नेमण्यात आला होता परंतु पणन संचालकांनी मला पुन्हा सभापती पदावर नेमणूक केली होती . कायद्याने माझी बाजू बरोबर होती म्हणूनच ती नेंमणूक झाली. परंतु जेव्हा सहकार क्षेत्रातील प्रथम श्रेणीचा अधिकारी तेथे प्रशासक म्हणून नेमण्यात आला होता त्याने बाजार समितीचे वाटोळे केले. कृषी उत्पन्न बाजार समितीची योजना शेतक-यांसाठी आहे त्या योजनेचे त्याने बटयाबोळ केला होता.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मानकर ....

आणि आम्ही पुन्हा आल्यानंतर त्यांनी केलेले सारे व्यवहार रद्द केले. पैशाच्या चिरीमिरीसाठी हे प्रशासक बाजार समित्यांचे वाटोळे करतात. येथे येणारा प्रशासक असेल किंवा प्रशासक मंडळ असेल त्याबाबत स्पष्टता यात केलेली नाही. येणारा प्रशासक कोणीही असला तरी हे स्वयंस्पष्ट आहे की, हा संपूर्ण निर्णय राजकीय स्वरूपाचा आहे. हा प्रशासक कोण नेमणार आहात ? तो शेतकऱ्यांचा प्रतिनिधी असणार आहे की शासनाचा प्रतिनिधी असणार आहे म्हणजे तो राजकीय सोय म्हणून नेमला जाणार आहे की शासकीय माणूस नेमणार आहात ? अशी कोणतीही स्पष्टता यात नाही. तसेच प्रशासक मंडळ असेल तर त्यात किती सदस्य असावेत हेही यात स्पष्ट केलेले नाही. ज्याप्रमाणे बाजार समितीची रचना आपण सांगितलेली आहे त्याप्रमाणे प्रशासक मंडळाची रचना काय असेल याचा उल्लेख यामध्ये नाही. ते कोणत्या पक्षाचे राहील याचाही उल्लेख नी. तेव्हा हे सारे अधिकार शासनाने आपल्याकडे घेतलेले आहेत किंवा आपल्यासाठी राखून ठेवले आहेत. तेव्हा या संबंधात जी सुस्पष्टता यायला पाहिजे होती तीच यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासकाला या बाजार समित्यांवर थोपणे म्हणजे एक प्रकारे बाजार समित्यांवर अन्याय करणारे आहे, तो प्रशासक शेतकऱ्यांचा कधीही राहू शकणार नाही. या प्रशासकामुळे बाजार समितीचे काही भले होणार आहे काय ? तर आजवरच्या अनुभवावरून तसेही वाटत नाही. सभापती महोदय, या बाजार समित्यांचे जे उत्पन्न होते त्या संबंधित विवेचन केले तर आपल्या लक्षात येईल की, या बाजार समितींची 12 ते 15 टक्के रक्कम ही शासनाच्या तिजोरीत जाते. मात्र बाजार समितीला त्यातून काहीही मिळत नाही. अंशदान 5 टक्के, सुपरविजन टॅक्स, इमारत टॅक्स, अमुक टॅक्स, तमुक टॅक्स अशा प्रकारे अनेक कर लावले जातात. आपल्या मॉडेल ॲक्टमध्ये म्हटले आहे की, 50 टक्के खर्च कर्मचाऱ्यांवर केला तर उर्वरित रक्कममध्ये पाणी, वीज, बांधकाम दुरूस्ती, रस्ते इत्यादी सारे काही करायचे, कसे पैसे पुरणार आहेत ? तेव्हा मी याबाबत एकच सांगू इच्छितो की, शासनाने सुचविलेल्या या बाजार समित्या शेतकऱ्यांचा उद्धार करू शकत नाहीत, शकणार नाहीत. कोठलाही मॉडेल ॲक्ट आपण आणला तरी त्यातून शेतकऱ्यांचा उद्धार होणार नाही. मॉडेल ॲक्टमध्ये म्हटले आहे की, विकासाची कामे करा. ती आम्ही करतोच आहोत. त्यासाठी बँकेकडून कर्ज घेतो. मात्र नाबार्डकडून अजून एकही पैसा येत नाही. बाजार समितीला सबसिडीचा काडीमात्र फायदा होत नाही. मात्र या बाजार समित्यांकडून नेहमीच तुम्ही घेत असता, देत काही नाही. तेव्हा

..... 3ओ 2 ...

श्री. मानकर ....

यामध्ये प्रशासक एक किंवा प्रशासक मंडळाची निश्चित अशी व्याख्या असली पाहिजे. प्रशासक एक असेल पण प्रशासक मंडळ किती सदस्यांचे असले पाहिजे, त्यामध्ये कोण कोण तज्ज्ञ राहणार आहेत, राजकीय सदस्य राहणार आहेत की कृषी विभागातील कोणी विशेषज्ञ राहणार आहेत हे यामध्ये आपण स्पष्ट केले पाहिजे. याबाबत निश्चितपणे निर्णय घेतला पाहिजे. सभापती महोदय, कलम 45 ची सुधारणा आहे त्याबाबत मला सांगितले पाहिजे की, बाजार समितीच्या बाबतीत लोकांचा आज असा समज आहे की, या बाजार समित्या म्हणजे खाण्या-पिण्याचा अड्डा आहे. लोकांची अशी धारणा झालेली आहे, अगदी शेतकऱ्यांची देखील अशीच धारणा झालेली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्माण केल्या गेलेल्या या बाजार समित्यांपासून शेतकऱ्यांना काहीही सोयी-सुविधा मिळत नाहीत. तेथे शेतक-यांसाठी कोणतीही व्यवस्था नसते. निवासाचीही व्यवस्था नसते. शेतकऱ्यांना या बाजार समितीच्या माध्यमातून कर्ज देखील उपलब्ध करून दिले जात नाही. इतकी वाईट अवस्था या बाजार समित्यांची झालेली आहे. आता या बाजार समित्यांचे आपण अ, ब, क, ड असे ग्रेडेशन केलेले आहे.

( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )

( यानंतर सौ. रणदिवे. .... 3पी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . . .

"क" श्रेणीमध्ये 6 कर्मचाऱ्यांसाठी मान्यता दिलेली आहे. बाजार समित्या कशा चालतील ? प्रशासकीय मंडळ कसे चालेल ? तेथे सहा कर्मचाऱ्यांच्या भरवशावर कामकाज करणे शक्य नाही. अगोदर 29 कर्मचाऱ्यांचा पॅटर्न होता, पण त्याऐवजी आता 6 कर्मचाऱ्यांनी बाजार समिती चालवावयाची आहे, ही अत्यंत शोकांतिका आहे. पण याबाबतीत कायदा करताना तेथील बाजार समितीची भौगोलिक परिस्थिती कशी आहे ? तेथे आवार आहे की नाही ? कुंपण आहे की नाही ? तेथे सर्व व्यवस्था आहे की नाही ? याचा विचार केला जात नाही. तसेच कर्मचाऱ्यांचा पॅटर्न ठरविताना उत्पन्न किती आहे ? याचाही विचार केला पाहिजे. 25 ते 50 लाख उत्पन्न असेल तर "क" वर्गामध्ये, 50 लाखाच्या वर असेल तर "ब"वर्गामध्ये आणि कोटी मध्ये उत्पन्न असेल तर "अ" वर्गामध्ये अशा प्रकारे आपण श्रेणी तयार करतो. परंतु अशा प्रकारे प्रशासन चालू शकत नाही. आपण प्रशासक मंडळामध्ये जो प्रशासक नियुक्त करणार आहोत, त्याचा पगार तरी ठरविलेला आहे काय ? त्यांना वेतन व भत्ते काय देणार आहोत ? आम्ही यापूर्वी प्रशासकांच्या वेतनाच्या संदर्भात शासनाकडे निवेदन दिलेले आहे आणि त्यामध्ये उल्लेख केलेला आहे की, प्रशासकाला जे वेतन दिले जाते, त्यासंदर्भात निश्चित असे कोणतेही धोरण नाही. याबाबतीत डीडीआर यांनी सांगितले की, सभापतींना जेवढे वेतन मिळते, तेवढे द्या. पण ही कोणती पध्दत आहे ? खरे म्हणजे यासंदर्भात निश्चित ठरविले पाहिजे आणि विधेयकाच्या माध्यमातून त्याला मंजूरी दिली पाहिजे. तसेच यासंबंधात सांगितले पाहिजे की, प्रशासकाला अमुक इतके वेतन व भत्ते दिले पाहिजेत, त्याचे क्वॉलिफीकेशन इतके असले पाहिजे. परंतु असा कुठेही उल्लेख केलेला नाही. यामध्ये फक्त प्रशासक आणि प्रशासक मंडळ असा उल्लेख केलेला आहे. पण त्याचे क्वॉलिफीकेशन काय असावे? याला वेतन व भत्ते किती दिले जाणार आहेत ? त्याला किती अनुज्ञेय रहाणार आहे ? यासंबंधात या विधेयकामध्ये कोणताही उल्लेख नाही. खऱ्या अर्थाने प्रशासक आणि प्रशासक मंडळ नियुक्त करीत असताना त्याच्या संबंधातील सर्व कायदे केले पाहिजे आणि तद्नंतरच हे विधेयक सदनामध्ये आणावयास पाहिजे. असे झाले तरच खऱ्या अर्थाने बाजार समितीला न्याय मिळणार आहे, नाहीतर मिळणार नाही. अशा परिस्थितीत कोणीही प्रशासक होईल आणि मन मानेल त्याप्रमाणे आपला पगार घेईल. मनमानी भत्ते घेईल, त्याच्यावर नियंत्रण रहाणार नाही. कलम 45 अन्वये कारवाई करण्याबाबत जी सुधारणा आणलेली आहे, ती कदाचित यामुळे आणली असेल तर

. . . .3 पी-2

श्री.केशवराव मानकर . . . .

मला माहिती नाही. याठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समितीवर सचिवाची नियुक्ती करणे. मॉडेल ॲक्टनुसार ठीक आहे. नवीन बाजार समिती स्थापन झाली तर सहाय्यक निबंधक या पदावर जो अधिकारी असेल, त्याला आपण सचिव म्हणून नियुक्त करु शकतो. पण ज्या जुन्या बाजार समित्या आहेत, तेथील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीव्दारे बढती मिळत असते. परंतु आता या कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या पदोन्नतीचे काय होईल ? हा खरा प्रश्न आहे. तसेच बाजार समिती नियुक्त करीत असताना आपण प्रमोशनचा कायदा रद्द केला आहे काय ? तर हा कायदा रद्द केलेला नाही. मग तुम्ही या ग्रेडच्या अधिकाऱ्यांना सचिव पदावर कशा प्रकारे नियुक्त करणार आहात ? यासंबंधातील बाब शासनाने आपल्या हातामध्ये ठेवलेली आहे. आता सरकार ही नियुक्ती करणार आहे. याबाबतीत संचालक मंडळाकडे हा अधिकार राहिलेला नाही, त्यामुळे ते ही नियुक्ती करु शकत नाहीत. ज्यादिवशी हा कायदा अंमलात आला, त्या दिवसापासून . ...

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण थोडक्यात करावे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदया, मला या विषयासंबंधात भरपूर बोलावयाचे आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांनी खूप विस्ताराने सर्वकाही सांगितलेले आहे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदया, मी थोडक्यातच बोलत आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यापासून रोखू शकत नाही हे मला माहिती आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांनी विस्ताराने भाषण केलेले आहे. तरी सुध्दा शक्य झाले तर सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात बोलावे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदया, मी शक्यतो लवकर भाषण संपविण्याचा प्रयत्न करतो. मला जास्त बोलावयाचे नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांनी विस्ताराने सांगितलेले आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल भाषण करणार आहेतच.

सभापती महोदया, बाजार समितीचा जो सचिव नियुक्त केला जाणार आहे, त्याची पात्रता काय असेल ? तर सहाय्यक निबंधकाच्या पदावरील अधिकारी. त्यासाठी किती क्वॉलिफिकेशन लागणार आहे ? त्याला किती वर्षाचा कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे ? त्यांनी सहकाराच्या

. . . .3 पी-3



APR/ 16:40

बाबतीत किती घडे घेतलेले असावेत ? त्यांनी किती ट्रेनिंग घेतलेले असावे ? याबाबतीत विधेयकामध्ये कुठेच उल्लेख केलेला नाही. आम्हाला सहाय्यक निबंधकाची पात्रता काय आहे हे माहिती नाही. कदाचित तो पूर्वी क्लार्क म्हणून काम करीत असेल आणि मग त्याला प्रमोशन मिळाल्यानंतर या पदापर्यंत आला असेल, मला त्याबाबतीत कल्पना नाही. बाजार समितीतील प्रत्येक कर्मचारी प्रमोशनव्दारे पुढच्या पदावर जात असतो, अशा वेळी त्यांच्यावर एक प्रकारे हा आघात आहे. या नेमणुकीच्या संबंधातील निर्णय घेण्याचे काम शासनाने स्वत:कडे ठेवलले आहे. याबाबतीत सांगावेसे वाटते की, मुळामध्ये बाजार समितीच्या रचनेमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. तसेच कायद्यामध्ये बदल करण्याची गरज आहे. नाहीतर असे होण्याची शक्यता आहे की,शासनाने एखाद्या व्यक्तीला सचिव पदावर नियुक्ती केल्यानंतर, ज्याला प्रमोशन मिळावयाचे होते, ती व्यक्ती कोर्टामध्ये गेली तर याबाबतीत भांडणे सुरु होण्याची शक्यता आहे आणि या दोघांच्या भांडणामध्ये बाजार समितीचा चुराडा होईल.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ..

यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीचे नुकसान होणार आहे. त्यामुळे हे विधेयक आणून काही उपयोग होणार नाही. सचिवांची जी पदे आहेत ती पदे भरीत असताना याबाबत विचार होणे आवश्यक आहे. यासंबंधी नियम व कायदे करुन शासनाने निर्णय घ्यावा. याबाबत आम्हाला काही हरकत नाही. बाजार समितीमध्ये शासनाचा कर्मचारी येत असेल तर ती आनंदाची बाब आहे. ही जबाबदारी शासनाची राहील.

सभापती महोदय, कलम 45 ला सुधारणा येथे केलेली आहे. या सुधारणेनुसार आता कृषी उत्पन्न बाजार समितीची जबाबदारी सचिवावर असणार आहे. सभापती, उपसभापती, सचिव हे सर्व संचालक मंडळास जबाबदार असतात. या ठिकाणी जी सुधारणा आणण्यात आलेली आहे, त्याबाबत हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवून त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याची आवश्यकता आहे असे मी या ठिकाणी सांगू इच्छितो. या ठिकाणी सभापती, उपसभापती, संचालक, प्रशासक यांच्यावर भूर्दंड आणलेला आहे. सरकारी माणसाला निवडणूक लढण्याची गरज नाही. त्यांना 6 महिन्यासाठी निष्कासित केले तरी देखील काही फरक पडणार नाही. कोणी गुन्हा केला तर बाजार समितीचे वाटोळे होईल. सचिव भ्रष्टाचार करीत असेल तर त्याला दंडीत केले पाहिजे. त्याला पुनश्च संधी मिळता कामा नये हे खरे आहे. यामध्ये अन्याय होण्याची शक्यता आहे. म्हणून संचालक, सभापती, उपसभापती यांना नैसर्गिक न्याय मिळण्याची आवश्यकता आहे...

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीची माहिती राहू नये म्हणून मी एक बाब आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सन्माननीय सदस्यांना न्याय मिळण्याची आावश्यकता आहे असे म्हणायचे आहे.

श्री. केशवराव मानकर : सभापती, उपसभापती, संचालक यांच्यावर अन्याय होणार आहे. त्यांना नैसर्गिक न्याय मिळण्याची आवश्यकता आहे. त्यांना पुरेपूर संधी दिली गेली पाहिजे. या बाबत कायदे आहेत, अधिकार आहेत. सरळ बरखास्त करुन 6 वर्षासाठी निष्कासित करुन टाकले तर त्यांना पुढची निवडणूक लढता येणार नाही. त्यामुळे या विधेयकामध्ये मजबूत सुधारणा आणण्याची आवश्यकता आहे. यामुळे त्यांना पुनश्च संधी प्राप्त होता कामा नये. त्यांना दंडीत करण्याची आवश्यकता आहे.

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर..

सभापती महोदय, कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकऱ्यांची आहे. परंतु तेथे शेतकऱ्यांकरिता काहीही केले जात नाही. मी जवळजवळ 13 वर्षापासून कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कार्यरत आहे. परंतु या बाजार समित्यांमधून एकाही शेतकऱ्याचे भले झाले आहे असे माझ्या निदर्शनास अजूनपर्यंत आलेले नाही. शेतकरी होरपळत आहे. केवळ अडते, व्यापारी यांना फायदा होत आहे. शेतकरी मात्र मजेत राहिला नाही. या विधेयकाला या ठिकाणी जी सुधारणा आणण्यात आली आहे ती सुधारणा अत्यंत वाईट आहे असे म्हटल्यास काही वावगे होणार नाही. या संबंधी शासनाने पूरेपूर विचार करुन हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवण्याची गरज आहे असे मी आपणास सांगू इच्छितो. कायद्याची, नियमांची अंमलबजावणी अत्यंत काटेकोरपणे झाली पाहिजे. खरे तर यासंदर्भात कडक कायदे करण्याची आवश्यकता आहे. ज्या बाजार समितीने शेतकऱ्यांचे भले केलेले नाही अशा बाजार समितीच्या कार्यकारी मंडळावर कारवाई झाली पाहिजे. अशा प्रकारे कडक कारवाई करण्यास मी तयार आहे. मी स्वच्छ कारभार केलेला आहे. माझ्या इतका स्वच्छ कारभार अन्य कोणी करु शकणार नाही असे मला येथे सांगावेसे वाटते. या ठिकाणी पणन विभागाने खऱ्या अर्थाने नांगी टाकली आहे असे दिसून येत आहे.

सभापती महोदय, पणन मंडळ बरखास्त करणार काय असा प्रश्न मी आपणास विचारु इच्छित आहे. खरे तर पणन मंडळ सक्षम आहे. महसूल विभागाकडून कशाची वसुली करण्यात येणार आहे ? कलम 57 च्या सुधारणेस माझा निश्चित रुपाने विरोध आहे. अप्रत्यक्षपणे सभापती, उपसभापती, व संचालक यांच्या मंडळावर कारवाई करणार आहे काय ? ही सर्व प्रॉपर्टी शासनाची आहे. शासनानेच बाजार समितीस जमीन दिलेली आहे. बाजार समित्यांचे सुपरव्हिजन आपल्याकडे जमा होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्या कर्ज देतच नाहीत. कर्ज दिल्यास अत्यंत अल्प मुदतीकरीता दिले जाते. बँकेकडून कर्ज धेण्यास सांगितले जाते. पणन मंडळाकडे बाजार समित्यांना कर्ज पुरविण्याची क्षमता असताना देखील सध्या त्यांना बँकेकडून कर्ज घ्यावे लागत आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ....

कारण आम्हाला विकासाच्या कामासाठी कर्ज घ्यावयाचे आहे. शेड बांधावयाची आहे, गोडाऊन बांधावयाचे आहे, टपरी बांधावयाची आहे, शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधावयाचा आहे. कोणतेही काम करावयाचे असेल तर पणन मंडळ बँकेकडे जा आणि बँकेकडून कर्ज घ्या असे सांगते. शेतकऱ्यांच्या योजनेमध्ये आपण 5 टक्के दराने कर्ज दिले. मग बाकीच्या योजनांसाठी 5 टक्के दराने कर्ज का देत नाही ? बँकेकडून 11-12 टक्के दराने कर्ज घ्ध्यावयास लावतात. त्याशिवाय सबसिडी मिळणार नाही असे सांगतात. बँकेकडून नाबार्डकडे प्रस्ताव जातो. त्यामध्ये अनेक अडचणी येतात. आमच्या आमगावच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये काम होऊन अनेक वर्षे झाली परंतु सबसिडीचा निधी अद्याप प्राप्त झालेला नाही. मी नाबार्डच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. मी पुण्याला आणि मुंबईला संपर्क साधला. केंद्राचा निधी आला नाही म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीला सबसिडी मिळाली नाही हे यातील खरे कारण आहे. पणन मंडळ शेतकऱ्यांना आणि कृषी उत्पन्न बाजार समितीला आमिष दाखवते काय ? आमिष न दाखवता प्रत्यक्ष कृती करुन ती व्यवहारात आणावी आणि बाजार समितीवर होणारा अन्याय थांबवून त्यांना न्याय द्यावा.

सभापती महोदय, वसुलीच्या बाबतीत सांगू इच्छितो. पणन मंडळाने वसुली करण्याची गरज नाही. कृषी उत्पन्न बाजार समिती आपल्याकडे अंदाजपत्रक मंजुरीसाठी पाठवते. आपण अंशदानाची रक्कम भरली तरच त्याला मंजुरी देतात नाही तर अर्थसंकल्प मंजूर करीत नाहीत. मी पूर्ण निधी पाठवला. त्यानंतर आमच्या बजेटला मंजुरी प्राप्त झाली. हे सर्व आपल्या हातामध्ये आहे. हे पणन विभागाच्या हातामध्ये आहे. महसूल विभागाकडून वसुली करण्याची गरज नाही. त्यानंतर अकृषक आकारणीच्या संदर्भात एक मुद्दा सांगतो. बाजार समितीला जी अकृषक आकारणी केलेली आहे त्यामध्ये रिकाम्या जागेवरसुध्दा अकृषक आकारणी केलेली आहे. ज्या ठिकाणी इमारत बांधली असेल त्याबाबत अकृषक आकारणी करणे ठीक आहे. यासंदर्भात हायकोर्टाचा जो निर्णय झाला आणि हायकोर्टाने जे आदेश दिले होते त्याचे पालन सहकार विभाग आणि राजस्व विभाग करणार की नाही ? 31 तारखेला अधिकारी आले होते. मी त्यांना विचारले की, आपण हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही का करीत नाही ? आम्ही डीएलआरकडून मोजणी करुन रिपोर्ट पाठवला.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. केशवराव मानकर .....

त्या अनुषंगाने तेवढी आकारणी करुन आपला सेस घेऊन जा असे सांगितले. आम्ही हे करु, ते करु असे सांगतात पण काही करत नाहीत. बाजार समितीकडून जेवढे जास्त पैसे अकृषक आकारणी करुन वसूल करता येतील त्यादृष्टीने प्रत्येक जण बाजार समितीला राबविण्याचे काम करीत आहे, हे निर्विवाद सत्य आहे. हायकोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये झाली पाहिजे. अकृषक आकारणीच्या नावाखाली जो जास्त कर वसूल केला जातो ते थांबवले पाहिजे. याबाबत शासनानेच निर्देश दिले पाहिजेत. जेवढी इमारत असेल तेवढ्यापुरतीच अकृषक आकारणी घेतली पाहिजे. खऱ्या अर्थाने कलम 57 ची सुधारणा मागे घेण्याची गरज आहे. आपण पणन विभागाच्या माध्यमातून काम करीत आहात. पणन मंडळ शेतकऱ्यांसाठी चांगले काम करीत आहे आणि खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या पाठीमागे उभे आहे. विदेशामध्ये चांगला दर्जेदार माल विकण्यासाठी पणन मंडळ मदत करते. अशावेळी त्यावर अशा प्रकारची नाचक्कीची वेळ आणणे चांगले नाही. महसूल विभागाकडून आपण वसुली केली तरी महसूल विभाग सभापती, उपसभापती, संचालक मंडळ यांची प्रॉपर्टी विकून वसुली करणार आहे काय ? तेथील शॉपिंग कॉम्प्लेक्स विकणार काय ? त्यांची जमीन विकणार काय ? कार्यालय विकणार काय ? तेथील टेबल खुर्च्या विकून वसुली करणार काय ? हे बाजार समितीचे विधेयक कशासाठी आणले आहे ? कशासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती प्रस्तापित केली हे कळत नाही. जर या बाजार समित्या शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी असतील तर शेतकऱ्यांना न्याय मिळणार की नाही ? यामध्ये शेतकऱ्यांचे 15 प्रतिनिधी आणि अन्य 5 प्रतिनिधी असे म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या या 15 प्रतिनिधींना आपण कोर्टात पाठविणार काय ? त्यांची प्रॉपर्टी लिलाव करुन महसूल विभागाकडून वसुली करणार काय ? कलम 57 ची सुधारणा अत्यंत खेदजनक आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

ती थांबविली पाहिजे. हे जे पणन संबंधीचे विधेयक आहे त्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत जो प्रस्ताव मांडला आहे त्याचे मी समर्थन करतो आणि या सर्व दुरुस्तींसह पुनश्च सभागृहासमोर सादर करावे अशी विनंती करुन मी याठिकाणी थांबतो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/ KGS/ KTG/

श्री.पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक 2, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन ( विकास व विनियमन ) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक आणले आहे त्याला विरोध करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकाद्वारे कलम 13 मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यात असे म्हटले आहे की, तत्कालीन विद्यमान तरतुदी अनुसार, बाजार क्षेत्रामध्ये राहणारा प्रत्येक शेतकरी समितीची निवडणूक लढविण्यास पात्र होता. परंतु आता संबंधित मतदार संघाच्या मतदार यादीत ज्यांचे नाव असेल असेच शेतकरी केवळ निवडणूक लढविण्यास पात्र असतील, अशी तरतूद करण्यासाठी उक्त कलमात सुधारणा करण्यात आली आहे. याचा अर्थ असा आहे की, जर त्या मतदार संघामध्ये नाव नसेल तर त्या शेतक-यास उमेदवारी मिळणार नाही. म्हणजे "घोडे ऐकत नाही आणि शिंगरु काम करीत नाही " या म्हणीप्रमाणे त्यांची अवस्था झाली आहे. सभापती महोदया, नुकतीच राष्ट्रपती पदासाठी निवडणूक झाली. अशीच तरतूद राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी केली तर एखाद्या नागरिकाचे नाव मतदार यादीत नसेल व त्यांनी समजा राष्ट्रपती पदाची निवडणूक लढवावयाची ठरविली तर त्यांना निवडणूक लढविता येणार नाही. खासदार व आमदार यांना सुध्दा राष्ट्रपती पदाचा उमेदवार होता येणार नाही. मग राष्ट्रपती पदासाठी ही सुधारणा का करण्यात आली नाही ? दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, स्थानिक स्वराज्य संस्था या मतदार संघात कोणाची नावे आहेत ? त्यात नगरसेवक, जिल्हा परिषदेचे सदस्य यांची नावे आहेत. आपल्या सभागृहात त्या मतदार संघातून निवडून आलेले सदस्य आहेत. जे नगरसेवक नव्हते. ते सुध्दा आमदार झाले आहेत. काही सदस्य पदवीधर नसलेले, थम्स अप म्हणजे अंगठे बहाद्दर आहेत ते सुध्दा पदवीधर मतदार संघातून निवडून आले आहेत. तेव्हा ही बाब लक्षात घेऊन मोठमोठया मतदार संघात ख-या अर्थाने सुधारणा केली पाहिजे होती. तेथे न करता आमच्या नादाला कशाला लागता ? कोणी ऐकत नाही म्हणून शेतक-यांना दाबायचे काय ? बाजार समितीतील अडते आणि शेतक-यांमधील संबंध चिखल पाण्यासारखा असतो. सभापती महोदया, गावाकडे एक म्हण आहे ती मी सांगतो. "अडत्याच्या घरी माल आणि साडूच्या घरी बायको कधी ठेवू नये ".



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : बायको ही ठेवण्याची वस्तू नाही.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदया, आमच्या गावाकडील म्हण आहे. शेतकरी आणि अडते यांच्याशी संबंधित ही म्हण आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छिते की, आपण शेतकरी चळवळीतून आला आहात. एखादे उदाहरण वा म्हण म्हणत असताना महिलांचा उल्लेख वेगळया पध्दतीने येत असेल तर तो टाळला पाहिजे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी म्हटलेल्या म्हणीचा अर्थ वेगळया मार्गाकडे नेतो. त्यामुळे माझी त्यांना विनंती आहे की, महिलांची प्रतिष्ठा राहील असे वक्तव्य करावे.हे वरिष्ठ सभागृह आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या सद्सद्विवेकबुध्दीला पटेल अशीच म्हण म्हणावी. त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या वक्तव्यामध्ये दुरुस्ती करण्यात यावी.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : चुकीचा अर्थ निघणारी म्हण कार्यवृत्तातून काढून टाकण्यात येईल.

श्री. पाशा पटेल : तालिका सभापती महोदया माझ्या म्हणण्याचा अर्थ तसा नाही. मी गावातील एक सर्वसामानय कार्यकर्ता आहे. मी वापरलेल्या म्हणीतून काही फुटवे फटणार असतील तर त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. तालिका सभापती महोदया, माझ्या बोलण्याच्या स्टाईलप्रमाणे मी बोलतो.... गावामध्ये कंदुरीचा नाडा हत्तीला बांधत नाही, सिंहाला बांधत नाही, वाघाला बांधत नाही तर तो फक्त कोंबडयाला आणि बक-यालाच बांधला जातो. म्हणजे दुर्बलालाच बळी दिले जाते. सर्वच ठिकाणी असे का होते हे मला कळत नाही. कोणी कोणाचे ऐकत नाही. एक गोष्ट चांगली होती की, मी त्या मार्केट कमिटीच्या भागामध्ये राहाणारा शेतकरी आहे, माझे 7/12वर नाव आहे, तर मला निवडणूक लढविता येत होती. आता आमचा असा छळ केलेला आहे की, एका गावातील मुलगा वकील असेल, डॉक्टर असेल तो तालुक्याच्या ठिकाणी राहात असेल आणि त्याला ग्रामपंचायतीची निवडणूक लढवायची असेल तर गावातील लोक त्या वकिलाला किंवा डॉक्टरला म्हणतील की, साहेब तुम्हाला वेड लागले आहे काय ? राजकारणात एवढे दिवाळे निघाले म्हणून तुम्ही ग्रामपंचायतीची निवडणूक लढवित आहात काय ? गावातील लोक त्या वकिलाला किंवा डॉक्टरला ग्रामपंचायतीची निवडणूक लढवू देत नाहीत. तालिका सभापती महोदया, गावातील शेतक-याची माती करण्यासाठी हे विधेयक येथे आणलेले आहे. वकील, डॉक्टर यासारख्या प्रतिष्ठीत माणसाला ग्रामपंचायतीची निवडणूक लढविता येऊ नये आणि ग्राम पंचायतीचा सदस्य असल्यामुळे मार्केट कमिटीची निवडणूक लढविता येऊ नये अशा प्रकारचा बंदोबस्त करण्यात आलेला आहे. प्रस्थापित राजकारण्यांच्या लक्षात आले आहे की, त्यांच्या बरोबरीचा कोणी असता कामा नये. मार्केट कमिटी म्हणजे सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे. एकदा निवडून आल्यानंतर 5 वर्षे मग फूर्...र फूर्...र. (अडथळा).. तुमचा बेस तोच आहे. तुम्हाला जर पारदर्शकता आणयची असेल तर या छोट्या छोट्या गोष्टींकडे पहाण्याची काय गरज आहे ?

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

श्री. पाशा पटेल...

मनातील भीतीपोटी हा कायदा शासनाने आणला आहे. आपल्या बरोबरीचे दहा,पंधरा कार्यकर्ते आपल्या विभागात अथवा आपल्या मतदार संघात असतील आणि उद्या ते बाजार समित्यांमध्ये निवडून आल्यानंतर ते आपल्या बरोबरचे होऊन, विधानसभा, लोकसभा निवडणुकीच्या तिकिटाचे वाटेकरी होणार असतील तर त्यांचा वेळीच बंदोबस्त केला पाहिजे म्हणून अशा प्रकारचे विधेयक आणून हा खेळ शासनाने सुरु केला आहे काय ? मला तर एका गोष्टीची कमाल वाटते की, इंदापूरमध्ये निवडणूक झाली. लातूरमध्ये निवडणूक झाली. लातूरच्या निवडणुकीतील उमेदवारांचे फॉर्म ग्रामपंचायतीच्या यादीमध्ये नाव नाहीत म्हणून रिजेक्ट झाले. परंतु इंदापूरमध्ये निवडणूक झाली. महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांच्या मतदार संघाला एक न्याय आणि पणन मंत्र्यांच्या मतदार संघात मात्र दुसरा न्याय ही गोष्ट मला तरी योग्य वाटत नाही. या निवडणुका आपापल्या सोयीने घेतल्या जात आहेत. या क्षेत्रात तुम्हाला पारदर्शकता आणावयाची असेल तर बाजार समितीच्या कामकाजांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. मार्केटमध्ये 20 टक्के खर्च आहे आणि 80 टक्के नफा आहे. त्यामुळे मार्केट कमिटीच्या निवडणुकांवर मोठया प्रमाणात उमेदवार खर्च करतात. शेतक-यांचे भले करण्यासाठी बाजार समित्यांमध्ये कोणी उमेदवार निवडून येत नाही. बाजार समितीमध्ये जमा झालेल्या मालावर डल्ला मारण्यासाठी उमेदवार निवडून जात असतात. या मार्केट कमिटयांकडे बघण्याची दृष्टी दिवसेंदिवस बदलत चालली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाले. या देशातील शेतक-यांना न्याय मिळावा म्हणून बाजार समित्या निर्माण केल्या गेल्या. त्या बाजार समित्यांमध्ये दुकाने बांधावयाची, अंतर्गत रस्ते करावयाचे, सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या होत्या, त्यासाठी बाजार समितीने शेकडा 80 टक्के सेस जमा केला. बाजार समित्यांचे आकर्षण संपवावयाचे असेल तर मोबाईल कंपन्यांचे उदाहरण सर्वांनी डोळयासमोर ठेवावे. या देशात सुरुवातीला मोबाईल आले, त्यावेळी इन कमिंग कॉलचा दर 9 रुपये होता आणि आऊट गोईंग कॉलचा दर 22 रुपये होता. दूरध्वनी करण्यास पैसे आणि आलेला दूरध्वनी घेतला तर त्यासाठी देखील पैसे लागत होते. इन कमिंग कॉल आणि आऊट गोईंग कॉलमुळे मोबाईल कंपन्यांकडे प्रचंड पैसा जमा झाला. आता मोबाईल कंपन्या खूप शहाण्या झाल्या. कॉल आला तर पैसे नाही, परंतु कॉल केला तर पैसे घेतले जातात. आता या कंपन्यांची जाहिरात ऐकावयास

2....

श्री. पाशा पटेल....

मिळते आहे की, जाणे पण फुकट आणि येणे पण फुकट. बाजार समित्याकडे जमा होत असलेला सेस शेतक-यांकडूनच घेतला जातो. गेल्या तीस ते चाळीस वर्षात हा सेस काही प्रमाणात बाजार समित्यांनी कमी करावयास पाहिजे होता. आज तिळाचा भावा 7500 रुपये प्रति क्विंटल आहे. एक तिळाच्या पोत्याला 75 रुपये सेस जमा होतो. एक शेंगदाण्याचे पोते बाजारात आले तर 50 रुपये सेस जमा होतो. या सेसच्या बदल्यात काय देण्यात आले आहे याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा. गेल्या वीस, पंचवीस वर्षामध्ये शेतक-याच्या जमिनीत एक पोते धान्य होत नव्हते तेथे आता दहा पोते धान्य निघावयास लागले आहे. पूर्वी बाजार समितीमध्ये 100 पोते धान्य येत होते आता 1000 पोते धान्य यावयास लागले आहे. बाजार समित्यांमध्ये धान्याची मोठया प्रमाणात आवक झाली, पर्यायाने सेस मोठया प्रमाणात जमा होऊ लागला आहे. त्यामुळे मला असे म्हणावयाचे आहे की, मोबाईल कंपन्यांनी देशात चमत्कार घडवून आणला आहे, तसा चमत्कार बाजार समित्यांनी का घडवून आणला नाही या गोष्टीचा देखील खुलासा होणे आवश्यक आहे. आपल्याला यामध्ये पारदर्शकता आणि विविध सुविधा आणावयाच्या असतील तर बाजार समित्यांच्या व्यवस्थापनाकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. सभापती महोदय, लातूर बाजार समितीकडे 8 लाख रुपये सेस जमा होतो.(अडथळा) मी सन्माननीय सदस्य श्री. सप्रा यांना सांगू इच्छितो की, तुमच्या शासनाने अतिशय चांगला खेळ केला आहे. या ठिकाणी मी एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आय.टी.सी. कंपनी, टिना कंपनी या कंपन्या बाजार समित्यांची माती करण्याचे काम करीत आहे. आता डायरेक्ट लायसन्स देण्याची पध्दत सुरु झाली आहे. टिना ऑईल नावाची कंपनी लातूर बाजार समितीला 80 लाख रुपयांचा सेस देत होती.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ....

सभापती महोदय, मॉडेल ॲक्ट आला आणि माल डायरेक्ट खरेदी करण्याची परवानगी मिळाली. लातूरमध्ये मार्केट कमिटीच्या बाजूला टीना ऑईल नावाची कंपनी आहे. त्या कंपनीने 80 लाख रुपयांचा सेस बुडविला. एका बाजूने तुमच्या सरकारची पुण्याई चालू आहे. मार्केट कमिटया उद्‌वस्त करण्यासाठी हात घातला. आता रिलायन्स कंपनी आली, आयटीसी कंपनी आली. सरकारने त्याची काळजी करु नये. तुम्हांला मारण्यासाठी त्या आल्या आहेत. तुम्ही मेले म्हणून रडाल मारल म्हणून रडणार नाही. सभापती महोदय, कमाल अशी आहे की, एकाच वस्तूवर दोन वेळा सेस कसा ? एकदा माल नागपूरवरुन खरेदी केला आणि लातूरला आणला तर नागपूरला सेस आणि लातूरला देखील सेस भरावा लागतो. सभापती महोदय, या बिलातील सुधारणा सोडून एक चकार शब्दही मी बोलणार नाही. मी आमदार होण्यासाठी जन्मलो नव्हतो. शेतकरी जे भोगतो ते बोलायला रस्त्याशिवाय दुसरा मार्ग नाही. रोज अनेक गोष्टींवर सदनात चर्चा होते पण मी त्यावर बोलत नाही. मुंबईचा विषय असला की मी बोलत नाही. पण ज्याच जळत त्यालाच कळत. जळायला लागले आहे म्हणून मी बोलतो आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांची आणि माझी बरोबरी जन्मात होणार नाही. मी पाशा पटेल आहे माझ्याबरोबर कोणीही नाही. मी मीच आहे. रावते साहेब साडेचार तास बोलले.

सभापती महोदय, शेतकऱ्यांकडून सेस घेतला जातो. बाजार समित्यांमध्ये खऱ्या अर्थाने शासनाला सुधारणा करावयाची आहे काय ? शेतकरी एवढे पैसे देतात त्याचा काय उपयोग केला जातो. एका क्विंटलला 75 रुपये सेस शेतकरी देतो. मार्केट कमिटयांमध्ये शेकडा 80 पैसे सेस जमा केला जातो. आमच्याकडे 80 पैसे आहे बाकीच्या ठिकाणी 1 रुपया आहे. एवढे पैसे शेतकरी भरतो त्याला काय मिळते ? शेतकऱ्याला मार्केट यार्डामध्ये राहण्याची वेळ आली तर त्याला रहायला जागा नाही. रस्त्यावरची डुकरे आणि गाढव रस्त्यावर झोपतात त्याप्रमाणे शेतकऱ्याला झोपावे लागते. त्याला रहायला जागा नाही. सकाळी प्रातर्विधीसाठी जागा नाही. नवीन मार्केट कमिटया आल्या. त्यांनी सुलभ शौचालयाची संकल्पना राबविली. पण मार्केट कमिटीच्या संचालकांनी रात्रीत सुलभ शौचालये उचलून त्याठिकाणी घरे बांधली. एक तर सुलभ शौचालये बांधत नाहीत आणि बांधली तर ठेवत नाहीत.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..........

या चोरट्या लोकांनी गोंधळ घातला आहे. एवढा पैसा देणारा जो शेतकरी मालक आहे त्याची सकाळी प्रात:र्विधीची सोय होत नसेल तर ती अडचण दूर करण्यासाठी सुधारणा करणारे विधेयक आणा. तिकडे तुम्ही बघत नाही. फक्त तुमच्या बरोबरीचे कोणीतरी मार्केट कमिटीमध्ये अंगाला तेल लावून येईल आणि तुम्हाला पाडेल म्हणून सुधारणा करणार असाल तर देव तुमचे भले करो.

सभापती महोदय, लातूरला गूळ मार्केट आहे. काय अवस्था आहे? आज जर त्या गूळ मार्केटमध्ये जाऊन बघितले तर रोज एक कोटी रुपयांचा गूळ लातूरसारख्या बाजारात येतो. या गूळ मार्केटच्या बाजूला मार्केट कमिटीने दुकाने बांधली. ही दुकाने कशाच्या नावाने बांधावी? कढई, खोडं, खुरपं याची दुकाने असणे अपेक्षित होते. परंतु तेथे सलून उघडले. काय काय भानगडी? जी गोष्ट पाहिजे तीच गोष्ट नाही. कसे जमेल? सरदारजीच्या गल्लीमध्ये न्हाव्याचे दुकान. दुकान उपयोगाचे आहे का? ही आमच्या गावातील म्हण आहे. सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांना उद्देशून मी बोललेलो नाही.

श्री.चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उल्लेख केलेले वाक्य रेकॉर्डवरुन काढून टाकावे अशी माझी विनंती आहे.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, आपल्याला जे जे रेकॉर्डवरुन काढायचे असेल ते काढून टाकावे. एवढी मोठी गूळ बाजारपेठ, तेथे मी जाऊन बघितले. तुम्ही गुळाला संरक्षण दिले का? एवढा पैसा घेतला परंतु काहीही संरक्षण दिले नाही. वाईट एका गोष्टीचे वाटते, ते म्हणजे खऱ्या अर्थाने या मार्केट कमिटीमध्ये गेल्या 50 वर्षात शेतकऱ्यांकडून वसूल झालेला पैसा इमानदारीने वापरला गेला असता तर आज मार्केट कमिटीची ताकद काय राहिली असती? मार्केट कमिटी फायर ब्रिगेडचे काम करु शकली असती. आज मी पिकवित असलेल्या सोयाबीनचा भाव 3 हजार रुपये क्विंटल आहे. व्यापाऱ्यांनी ठरवून माझा भाव पाडला. अडीच हजार रुपयावर भाव आला. परवाच्या दिवशी सण आहे, माझ्या मुलीचे लग्न आहे. व्यापारी आणखी चार दिवस थांबला तर क्विंटलला 500 रुपये अधिक भाव मिळेल हे माहित असताना मजबुरीपोटी अडीच हजार रुपये देऊन जातो. एवढा सेस आतापर्यंत वसूल झाला तो मार्केट कमिटीकडे राहिला असता तर मार्केट कमिटी जिल्हयातील सगळ्या शेतकऱ्यांचा एक-एक वर्षाचा माल खरेदी करुन पैसे द्यायची ताकद त्या मार्केट कमिटीची राहिली असती. परंतु नाही. तुम्ही तिथे डुकरं सोडली. हिशोब केला नाही.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..........

त्यांच्याकडे बघितले नाही. 20 टक्के खर्च आहे, 80 टक्के उत्पन्न आहे. काय काय जाहिराती आहेत? कोणाचा मुलगा जन्माला आला त्याचा वाढदिवस म्हणून जाहिरात केली जाते. आमचा संबंध नसलेले लेकरु जन्माला आले त्याच्या नावे जाहिरात. कोणाचे तोंड बघण्यासारखे असो किंवा नसो, त्यांनी जाहिरात दिली. कशा कशासाठी पैसा खर्च केला?

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

कोणा-कोणाचा सत्कार केला ? आज एवढा शेतकरी मरायला लागला, शेतकऱ्याने कष्ट केलेला पैसा जर मार्केट कमिटीमध्ये राहिला असता तर काहीच्या काही चमत्कार झाला असता. म्हणून जर शासनाला सुधारणाच करावयाची होती तर या मार्केट कमिटीत कशा प्रकारे पैसा राहील यासंबंधीची सुधारणा करायला पाहिजे होती. जेवढा पैसा गावागावातील शेतकऱ्यांनी भरलेला होता त्यापैकी एकही पैसा अशा प्रकारे चोरीच्या मार्गाने जाता कामा नये अशी दुरुस्ती करायला पाहिजे होती. कारण शेतकरी वाचविला तर गाव वाचेल आणि गाव वाचविले तर देश वाचेल ही भावना आपण सर्वांनी ठेवली तर 60 वर्षात अशा प्रकारचा चमत्कारही आपल्याला करता आला असता. अशा काही चमत्कारिक गोष्टी शासनाला करता आल्या असत्या, की लोकांचा जमा झालेला पैसा चोरीच्या मार्गाने गेला नसता व तसाच उद्देश यामागे ठेवण्याची गरज होती. परवा एका मार्केट कमिटीच्या संचालकाला मी विचारले की, आमच्याकडे बराच पैसा जमा झालेला आहे त्याचे तुम्ही काय करता ? पण त्यावर तो म्हणाला की, त्यासाठी डीडीआरची परवानगी घ्यावी लागते. गेल्या वर्षी एका मार्केट कमिटीने अशी परवानगी मागितली की, आमच्याकडे भरपूर पैसा व त्यातून शेतकऱ्यासाठी बी-बियाणे व खते कमी किमतीत अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी देण्याचा आमचा विचार आहे. किती उदात्त विचार आहे. शेवटी पैसा आहे आणि तो कोणी तरी खाणारच मग आपण खाण्यापेक्षा गावातील शेतकऱ्याला अशा प्रकारे द्यावयाचा. अशा प्रकारे एखाद्या मार्केट कमिटीच्या संचालक मंडळाची भावना झाली परंतु त्यासाठी डीडीआरने त्यांना परवानगी दिली नाही. दुसऱ्या बाजूला मात्र एका मार्केट कमिटीने दुकाने बांधली, गाळे बांधले. माझ्या गावात तर अशा प्रकारे 250 गाळे बांधण्यात आले पण त्यापैकी एकाही गाळ्याचा लिलाव झाला नाही. हपापाचा माल गपापाने हाणला. मार्केट कमिटीच्या संचालकांनी झटपट ही दुकाने आपल्याच नावावर घेतली आणि दुसऱ्या दिवशी ती दुकाने तिसऱ्यालाच विकून टाकली. आपण जरा मार्केट कमिटीमध्ये जाऊन बघा, मार्केट यार्डाच्या कॅम्पसमध्ये बघा. आपल्याला तेथे दिसून येईल की, या यार्डात अडत्याच्या ठिकाणी राहण्याची घरे झालेली आहेत. म्हणून जर शासनाला खऱ्या अर्थाने सुधारणा करावयाची असती तर एक गोष्ट करायला पाहिजे होती की, बाबा रे, शेतकऱ्याला या निमित्ताने दोन पैसे कसे मिळतील आणि ते मिळावयाचे असतील तरच यात सुधारणा करायला पाहिजे. मी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

माझ्या एका मित्राला विचारले की, काय केल्यावर या मार्केट कमिट्या फायद्यात राहतील, त्यावर त्याने सांगितले की, संचालक जो उचल उचलतात तो उचल घेतल्यानंतर त्यांचे सदस्यत्व रद्द होईल अशा प्रकारची तरतूद कायद्यात केली तरच या मार्केट कमिट्या फायद्यात राहतील. कारण हे संचालक आपल्या मतदारसंघातील शेतकऱ्यांचा टूर काढण्यासाठी मार्केट कमिटीतून पैसा उचलतात. किती मजा आहे या संचालकांची ? शेतकऱ्यांचे अशा प्रकारे पैसे खाऊन जातात हो. त्याचं काहीच नाही. अशा प्रकारे किती संचालकांनी किती पैसा उचलला हे काढून बघा, आपल्या लक्षात येईल की खऱ्या अर्थाने यावर निर्बंध आणणे आवश्यक आहे. अशा प्रकारचा कायदा करायला पाहिजे होता परंतु तसा कायदा शासन करीत नाही, तशी दुरुस्ती करण्याचा विचारही करीत नाही. मला एका गोष्टीचे वाईट वाटते की, आज लातूर शहरात मार्केट यार्डात शेतकऱ्यांनी मोर्चा काढला होता, त्या मोर्चात 200 शेतकरीच आले होते. मी त्या ठिकाणी फोन करुन विचारले तर मला समजले की, या ठिकाणी एकारात्रीतून सोयाबीनचा भाव कमी झाला, तुरीचा भाव कमी झाला, हरभऱ्याचा भाव दर क्विंटलमागे 300 रुपयांनी कमी झाला. असे झाले तर मार्केट कमिटीमध्ये शेतकरी रडणार नाही तर काय करणार आहे ? पण भाव कशामुळे पडला, एका रात्रीतून भाव का पडला, कैक लोक म्हणाले की महागाई वाढली, मग महागाई फक्त तुरीचीच वाढली काय, महागाई फक्त हरभऱ्याचीच वाढली काय, महागाई फक्त शेंगांचीच, कारळ्याचीच वाढली काय ? अरे महागाई स्टीलची, सिमेंटची, सोन्याची, पावडरची अशा गोष्टींपैकी कशाचीच दिसत नाही. तर येऊन जाऊन शेतकऱ्यालाच धरले जाते. कधी नाही तो शेतकऱ्याला दोन पैसे मिळायला लागले परंतु तुमच्या मनात आले की, तुम्ही शेतकऱ्याची कशी माती करता याचे हे उदाहरण आहे.

यानंतर श्री. जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. शेतीमालाचे भाव वाढले होते त्यामुळे यांच्याच नेत्यांनी शेतमालाच्या वस्तूंचे स्टॉल लावले होते, असे असतांना सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल शेतक-यांच्या मालाचे दर कमी झाले आहेत हे असे कसे काय म्हणू शकतात.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यंना माझी विनंती आहे की, माझे लक्ष विचलीत करण्याचा कोणी प्रयत्न करु नये. मी गुळाच्या संदर्भात बोलत होतो. गुळाचे भाव पडल्यामुळे आम्ही मार्केट कमिटीमध्ये मोर्चा काढला होता. आमच्याकडून जो सेस घेतला जातो त्याचे आपण काय करता असाही आमचा प्रश्न होता. काही दिवसापूर्वी काळया गुळावर बंदी आणली गेली. सभापती महोदय, गूळ काळा राहील की, गोरा राहील हे काय शेतक-याच्या आमच्या हातात असते? मार्केट कमिटीने सांगितले की, शासनाने काळया गुळावर बंदी आणलेली असल्यामुळे शेतक-याने काळा गूळ मार्केमध्ये आणू नये. शेतक-याने काळा गूळ मार्केटमध्ये विक्रीसाठी आणला तर तो घेतला जाणार नाही. सगळीकडून गुळाची गूळचेपी केली जात आहे. गूळ काळा व्हावा हे कशावर अवलंबून असते तर ते जमिनीच्या गुणधर्मावर, तिच्या प्रतवारीवर अवलंबून असते. मुलगा काळा होईल की, गोरा होईल हे कसे काय सांगता येईल, ते निसर्गावर अवलंबून आहे. तशीच परिस्थिती गुळाच्या संदर्भात देखील आहे. कोल्हापूर जिल्हयात जो गूळ तयार होता तो पिवळा तयार होत असतो व आमच्याकडील गूळ काळाच तयार होतो. गूळ पिवळा व्हावा यासाठी हायड्रोस पावडरचा उपयोग केला जातो. परंतु आम्ही हायड्रोस पावडर 8-8 वेळा मारली तर आमचा गूळ दोन दिवस गोरा राहतो आणि तिस-या दिवशी परत हा गूळ काळा पडतो. सभापती महोदय, गळ काळा पडणे हा जमिनीचा दोष आहे, पाण्याचा दोष आहे तो दोष काही आमच्या शेतक-यांचा नाही. परंतु शासन सर्व दोष आमच्या शेतक-यांच्या माथी मारत असते. काळया गुळाच्या संदर्भात मार्केट कमिटीने आम्हाला परेशान केलेले आहे. त्यामुळे सरकारने काळया गुळाच्या संदर्भात शेतक-यांना फायद्याचे कसे होईल यासाठी कायदा तयार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, काही दिवसापूर्वी हायब्रीड ज्वारीची जात मार्केटमध्ये आली. ही हायब्रीड ज्वारी जास्त वाढत नाही, त्यांनतर एक नंबर हायब्रीड ज्वारी आली, त्यानंतर 2 नंबर हायब्रीड



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल......

ज्वारी आली, 5 नंबर हायब्रीड ज्वारी मार्केटमध्ये आली. या ज्वारीचे कणीस भरदार व दाण्यांनी गच्च भरलेले असते परंतु थोडा जरी पाऊस आला तरी ही ज्वारी एकदम काळी पडते. ही काळी ज्वारी मग मार्केट कमिटी घेत नाही. जेव्हा काळी ज्वारीची खरेदी होत नव्हती त्यावेळेस महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री सुध्दा काळेच होते. आम्ही सांगितले की, आमची काळी ज्वारी आपल्याला चालत नसेल तर आम्हाला काळा मुख्यमंत्री चालणार नाही. मग सरकार जागे झाले आणि त्यानंतर काळी ज्वारी खरेदी करण्यास सुरुवात झाली.

सभापती महोदय, ख-या अर्थाने आपल्याला पारदर्शकता आणावयाची असेल तर त्यासाठी चांगले कायदे तयार करावे लागतील. परंतु आपण पारदर्शक कायदे तयार करीत नाहीत. बहुमताच्या जोरावर आपण विधेयक पास करुन घेतात. आपण जर बहुमताच्या जोरावर अशा प्रकारचे कायदे करणार असाल तर ते योग्य होणार नाही एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, नवीन वायदे बाजाराची गोष्ट मी या ठिकाणी सांगणार आहे. मालाचे भाव कशा प्रकारे ठरले जातात हे मी येथे सांगणार आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 17.30

श्री.पाशा पटेल..

शेती मालाचे भाव हातावर रुमाल टाकून आत ठरविले जातात. रुमालाच्या आत काय काय भाव ठरविले जातात हे बाहेरच्याला काही कळत नाही. हा प्रकार बंद होत नाही. सोन्या पेक्षा सुध्दा आंब्याला जास्त भाव आहे आणि एवढया मौल्यवान आंब्याचे भाव मात्र रुमालाच्या आत ठरविले जातात.शासनाच्या हातामध्ये सत्ता आहे तेव्हा रुमालाच्या आत भाव ठरविण्याचे प्रकार शासनाने बंद केले पाहिजेत. आपल्या बरोबरीच्या कार्यकर्त्याचे पाय कलम करण्यासाठी आणि एखाद्या व्यक्तीला राजकीय आयुष्यातून बदबाद करण्यासाठी कार्यकर्त्याच्या जीवाशी खेळ खेळण्याचे पाप शासनाच्या हातून घडत आहे त्या ऐवजी शेतकऱ्यांच्या भल्याच्या गोष्टी शासनाने कराव्यात असे मला या निमित्ताने शासनाला सांगावयाचे आहे.

( वेळ संपत आल्याची घंटी वाजविण्यात येते )

सभापती महोदय, मार्केट यार्डाच्या बाबतीत पहिल्यांदा अशी व्यवस्था होती की ज्या रस्त्याने अडत्याचे दुकान आहेत त्या ठिकाणी दररोज वेगवेगळया रस्त्याने शेती मालाचे भाव ठरत असे. ज्या रस्त्याने आज बाजार येणार आहे त्या रस्त्यावर शेती मालाचे भाव ठरविले जाऊन क्विंटलमागे 50 रुपये जास्त मिळत होते. त्यानंतर मार्केट कमिटया स्थापन करण्यात आल्यामुळे एकाच ठिकाणी भाव ठरू लागले. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये 400 व्यापारी सौद्यामध्ये राहत असतांनासुध्दा कधीही न्याय मिळत नाही. आता सौदे बंद झाले असून वायदे सुरु झालेले आहेत. वायदे बाजारामध्ये ज्वारीच्या पोत्याची गरज भासत नाही. वायदे बाजारामध्ये कोटयावधी रुपयांचे व्यवहार होत असतात. ही काय भानगड आहे ? सर्व सामान्य व्यक्तीच्या समजण्याच्या पलीकडील ही बाब आहे.आज व्यापा-यांवर धाडी टाकण्याचे काम सुरु आहे त्याबाबतीत मी विचारु इच्छितो की,. कोठूनही माल खरेदी करा, कितीही माल खरेदी करा यासाठी व्यापा-यांना परवानगी देण्यात आलेली आहे. त्यासाठी त्यांना लायसन्स देण्यात आलेले आहे. त्यानुसार या व्यापा-यांनी माल खरेदी केला आहे व आता त्यांच्या दुकानावर धाडी घालण्यात येत आहेत. ही गोष्ट जर पहिल्यांदाच शासनाच्या निदर्शनास आली असती तर बरे झाले असते. अगोदर व्यापा-यांना कितीही माल खरेदी करण्याची परवानगी देण्याची काही गरज होती काय ? अशा प्रकारे शासनाने व्यापा-यांना कितीही माल खरेदी करण्याची व कोठूनही खरेदी करण्याची परवानगी द्यावयास नको होती परंतु शासनाने त्यांना ही परवानगी दिली ही शासनाची चूक झाली आहे. एखाद्या व्यापा-याची डाळमिल नसतासुध्दा त्याला तूर घेण्याची परवानगी दिली गेली..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..

( वेळ संपल्याची धंटी वाजविण्यात येते )

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे. ते मुद्दा सोडून बोलत नाहीत.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, मी जास्त वेळ बोलणार नाही. मला ज्या पाच गोष्टीवर बोलावयाचे आहे तेवढयाच गोष्टीवर मी बोलणार आहे.त्यापेक्षा मी जास्त बोलणार नाही. सभापती महोदय, परवा मी लातूरची कृषी उत्पन्न बाजार समिती किती दिवस बंद राहते हे पाहिले होते .त्यावेळी मला असे दिसून आले की 365 दिवसा पैकी 162 दिवस लातूरची कृषी उत्पन्न बाजार समिती बंद होता. गावामध्ये कोणतीही जत्रा आली की 3 दिवस बाजार बंद राहतो. त्याचबरोबर हमाल, मापडी, अडत्या यांचे निधन झाले की बाजाराला सुट्टी दिली जाते. इतकेच नव्हे तर त्याच्या सासूचे निधन झाले तरी बाजाराला सुट्टी दिली जाते. ज्याचा संबंध नाही त्याचे निधन झाल्यामुळे बाजाराला सुट्टी दिली जाते.अशा प्रकारे 365 दिवसा पैकी 162 दिवस बाजार बंद ठेवण्यात आला होता. शेतक-याच्या मुलाने बिस्कीट घेण्यासाठी एक रुपया मागितला तर तो शेतकरी जनावराला मारतात तसे आपल्या पोटच्या मुलाला मारत असतो.एक दिवस बाजार बंद झाला तर शेतक-याला बाजारात माल ठेवून पुन्हा घरी जाण्यासाठी 100 रुपये खर्च येतो. अचानक कृषी उत्पन्न बाजार समितीला सुट्टी का दिली जाते ? शेतक-यांना याबाबतीत अगोदर सूचना का दिली जात नाही ? कमीत कमी दिवस बाजार बंद ठेवण्याच्या बाबतीत शासन बंधन का आणत नाही.? शेतक-याच्या हिताच्या दृष्टीने जर शासनाने बदल करावयाचा ठरविला तर महाराष्ट्रातील शेतकरी तुमचे फोटो कपाळावर गोंदून घेईल. शेतक-यांचा ज्यामुळे फायदा होईल अशा प्रकारे शासनाने बदल केला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.सुंबरे

KBS/ KGS/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 17:35

श्री. पाशा पटेल ....

मरेपर्यंत लोक तुमचे नाव काढतील. आता काही काही माजी मंत्री आहेत, त्यांच्याकडे रस्त्यावरचा भिकारीदेखील बघत नाही, त्यांना ओळखत नाही. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात काही केलेच नाही तर लोकांनी त्यांना लक्षात कशासाठी ठेवायचे ? तेव्हा तुम्ही असे काही कार्य करा की, 100-200 वर्षे झाली तरी लोक तुम्हाला विसरणार नाहीत. पुतळे उभारून देखील काही होणार नाही हे आपण लक्षात ठेवावे. सभापती महोदय, मला आपल्याला असे सांगावयाचे आहे की, बाजार समित्यांना एवढ्या रजा असण्याचे काही कारण आहे काय ? तेव्हा या रजा कमी करता आल्या असत्या तर त्या केल्या गेल्या पाहिजेत. म्हणून मला विनंती करायची आहे की, अजूनही हा कायदा पास झालेला नाही तरीही माझ्या गावचे 75 अर्ज फेटाळले गेले आहेत. सुप्रीम कोर्टामध्येदेखील फेटाळले आहेत. तेव्हा अशा या सगळ्या गोष्टी आहेत. तरी आपल्याला काही बदल करावयाचे असतील तर बेशक असे बदल करा. मी माझ्या डोळ्याला चष्मा लावलेला नाही. पण मला आपल्याला सांगावयाचे आहे की, नवीन समिती स्थापन होईल त्याप्रमाणे बेशक विभागणी करा. यामध्ये आपली जी खालची ओळ आहे त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही पण वरची जी ओळ आहे तिला मात्र माझी हरकत आहे. तुमच्यामध्ये सद्सद् विवेकबुद्धी असेल, तुम्ही खऱ्या अर्थाने ग्रामीण भागाचे प्रतिनिधीत्व करणारे असाल तर ही जती वरची ओळ आहे त्या जागी जुनेच ठेवा. नवीन असे काही करणार असाल तर आमचा त्याला विरोध राहील आणि लोकांनाही आम्ही सांगू, लोक तुमची मान कापतील. तुम्हाला माहिती आहे की, लोकांचा काही भरवसा नाही. थोडा जरी बदल त्यांच्या मनाविरूद्ध झाला तर तुम्ही तिकडून इकडे याल आणि आम्ही इकडून तिकडे जाऊ. हे होऊ शकते एवढेच लक्षात ठेवा आणि याबाबत विचार करा.

सभापती महोदय, त्यानंतर कलम 15-क संबंधात मी बोलणार आहे. या कलम 15 क ची सुधारणा काय आहे ? या कलमामध्ये आपण म्हटले आहे की, ".... सदस्यांचा नेहमीचा किंवा वाढीव पदावधी संपल्यानंतर, बाजार समितीच्या कामकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रशासक नेमण्याची तरतूद होती. उक्त कलमामध्ये, प्रशासक किंवा प्रशासक मंडळ नियुक्त करण्याची तरतूद करण्यासाठी सुधारणा करण्यात आली आहे." आता यामध्ये तुमचे राजकारण आहे. तुम्ही परवानगी काय घेत आहात तर 6-6 यवर्षे नेमलेलेच तुम्ही तेथे ठेवणार आहात. परंतु 6 महिन्यापेक्षा जास्त नियुक्ती केलेला प्रशासक किंवा प्रशासकीय मंडळ असता कामा नये. ही चांगली

..... 4ए 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल .....

गोष्ट आहे. परंतु 6 महिन्यांचे काय ? मी आपल्याला सांगू इच्छितो की, तुम्ही कोणतीही चांगली गोष्ट करणार असाल तर जरूर आम्ही त्याचे समर्थन करू पण चुकीचे काही करणार असाल तर त्याला निश्चितपणे विरोध करणारे आम्ही आहोत आणि आम्ही तसा विरोध करण्याची हिंमत दाखवितो. तेव्हा ज्या गोष्टी करणे आवश्यक आहे त्या गोष्टी तुम्ही जरूर केल्या पाहिजेत. आता नवीन कलम 35-क मध्ये आपण काय म्हटले आहे ? यात आपण म्हटले आहे की, "... बाजार समित्यांच्या कार्यामध्ये निश्चितपणे प्रशासकीय कार्यक्षमता यावी यासाठी, सहकार विभागातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, या पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या पदावर नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याची, कोणत्याही बाजार समितीचा सचिव म्हणून नियुक्ती करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे. सभापती महोदय, यामध्ये दोन गोष्टी गंमतीच्या आहेत. त्यातील एक मी पाशा पटेल म्हणून आपल्याला सांगणार आहे. एक गोष्ट म्हणजे एखादा मार्केट कमिटीचा सचिव म्हणून लागला की, तो मरेपर्यंत तेथून हटतच नाही. कोणाकडे पांढरी पट्टी आहे, कोणाकडे तांबडी पट्टी आहे, सेस लपविण्यामध्ये एवढ्या भानगडी आहेत की यामुळे सांगलीच्या मार्केट कमिटीमध्ये सत्तांतर झाले. तेथील कार्यकर्ता निवडून आला आणि गेल्या वर्षी अडीच कोटी सेस होता आता या वर्षी तो 5 कोटीवर नेला असे तो आता अभिमानाने सांगत होता. ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर सौ. रणदिवे.... 4बी 1 ..

श्री.पाशा पटेल . . . .

म्हणजे यामध्ये सगळयात मोठा खेळ कसला आहे, तर तो असा आहे की, तेथे एकच सचिव कायम राहिला तर सर्व अडत्यांचे गुणधर्म, सवयी सगळे काही त्याला माहिती होईल. परंतु एक गोष्ट करावयास पाहिजे की, या सचिवांच्या बदल्या करावयात, म्हणजे इकडचा सचिव तिकडे आणि तिकडचा सचिव इकडे. म्हणजे नवीन जागेवर गेल्यानंतर दोन-तीन वर्षे तेथील अडत्यांचा स्वभाव कळेपर्यंत तरी तो कसली चोरी करणार नाही. एकदा स्वभाव कळल्यानंतर तो तसे करणारच. परंतु मुंबईवरुन सचिव पाठविण्याची जी पध्दत आहे, ती फार खतरनाक आहे. ठीक आहे, ते देखील करा. मला त्याबाबतीतही काही म्हणावयाचे नाही. परंतु एखाद्या बोर्डाने मागणी केली की, आमच्या येथे केवळ मॅट्रीक पास झालेला सचिव आहे आणि त्याला येथील काम झेपत नाही. 30 वर्षापूर्वी नोकरीला लागलेला आहे, आता त्याच्याकडून काम होत नाही. पण आम्हाला दोनशे एकरामध्ये नवीन मार्केट कमिटीची उभारणी करावयाची आहे. त्यामुळे आम्हाला एक तज्ञ सचिव देण्यात यावा. अशी मागणी आली तर मग त्यांना द्यावा. तुम्ही कशासाठी हात खुपसत आहात ? एकतर शासन मार्केट कमिटीला काही देत नाही. उलट पुणे येथील जे सहकार मंडळ आहे, ते दहा टक्के घेऊन येते, पण देत काहीच नाही. त्यांनी आपापल्या पध्दतीने करावयाचे. सहकारी संस्थांमध्ये एकमेव संस्था अशी आहे की, या संस्थेला एक रुपयाही दिला जात नाही.उलट त्यांच्याकडूनच काढून घेतला जातो. सभापती महोदया, आपल्या माधमातून मला शासनाला विनंती करावयाची आहे की, जर या मार्केट कमिट्यांमध्ये एखादी सुधारणा करावयाची असेल तर बेशक सचिवांच्या बदल्या करण्याबाबत कायदा करावा. मी असे कैक बिग बूल सचिव पाहिलेले आहेत की, मार्केट कमिटीमध्ये नवीन संचालक मंडळ निवडून आल्यानंतर जर सचिव मार्केट कमिटीमध्ये उपस्थित असेल तर त्या सचिवाच्या भीतीने चेअरमनची मार्केट यार्डमध्ये जाण्याची सुध्दा हिंमत होत नव्हती. या बिग बूल सचिवांनी ढेकणाइतके देखील काम केले नाही, शेतकऱ्यांची परिस्थिती देखील सुधारली नाही, तसेच मार्केट यार्डमधील परिस्थिती देखील सुधारली नाही. फक्त तो एकटाच गबरु झाला. पण तुम्हाला हे सर्वकाही एवढे दिवस कसे दिसले नाही ? तुम्हाला एवढया दिवसामध्ये समजावयास हवे होते की, एक माणूस एवढया दिवस राहिल्यानंतर घाण करणारच आहे. म्हणून जर बदल करावयाचा असेल तर बेशक बदल करावा. हा बदल म्हणजे सचिवांच्या बदल्या करा आणि समजा जर एखाद्या मार्केट कमिटीने नकार दिला तर त्यांना वरुन लादू नका. तुम्ही सचिव

. . . .4 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल . . . .

देणार आहात, त्याचा पगार कोण देणार आहे ? कारण सगळेच कारभारी आहेत. मग देणार कोण आणि घेणार कोण ? खरे म्हणजे सगळया मार्केट कमिट्यांची परिस्थिती बरी नाही. याबाबतीत उदाहरण द्यावयाचे तर माझ्या लातूर जिल्हयामध्ये रेणापूर नावाची मार्केट कमिटी आहे. या मार्केट कमिटीमध्ये एक सचिव आणि तीन कर्मचारी आहेत. जोपर्यंत तेथे श्री.भूतडा नावाचे व्यापारी सोयाबीन खरेदी करीत होते, तोपर्यंत संबंधितांचा पगार होत होता. पण पुढे त्यांना डायरेक्ट लायसन्स् मिळाल्यामुळे मार्केट कमिटी आऊट झाली. त्यामुळे तेथील सचिवांचा पगार होत नाही, कर्मचाऱ्यांचाही पगार होत नाही. तसेच तेथे चाकूर नावाची मार्केट कमिटी आहे. या मार्केट कमिटीमध्ये 17 कर्मचारी आहेत. त्यांना पगार मिळत नाही. तुमच्याकडे पैसेवाल्या मार्केट कमिट्यांकडे पहाण्याची एक पध्दत आहे. परंतु या लुळया-पांगळयांकडे कोणी पहावयाचे ? लुळया-पांगळया सोसायट्याच्या बाबतीत कोण जबाबदार आहे ? त्यांचा मालक कोण आहे ? येथील कर्मचारी 3-3 वर्षापूर्वी नोकरीला लागलेले आहेत. पण त्यांना खूप नाडवतात. माझ्या गावापासून 11 कि.मी.अंतरावर अवराशिवजी नावाची बाजार समिती आहे. परवा सचिवाच्या पदाची जाहिरात निघाली. पण त्यापूर्वी तेथे उप सचिव काम करीत होते आणि सगळे काही व्यवस्थित सुरु होते. परंतु काय झाले ? कोणाच्या लक्षात आले ? हे माहिती नाही. परंतु सचिव पदाची जाहिरात निघाल्यानंतर सर्व सुशिक्षित बेरोजगारांना वाटले की, सचिव पदासाठी जाहिरात आली आहे. चला, तेथे जाऊ. पण आतमध्ये जाण्यासाठी काय केले ? तोबा, तोबा, मला माफ करा. मी वापरलेले शब्द काढून टाकावयाचे असतील तर काढून टाका. मला त्या पोरांनी सांगितले की, सात लाख रुपयांची जमीन विकली तेव्हा या खूर्चीवर बसलो आहे. तेव्हा मी म्हटले की, अरे, आता पहिल्या सारखे काहीच वैभव राहिलेले नाही. तू कशासाठी 7 लाख रुपये खर्च केलेस ? पण त्याला असे वाटले होते की, पहिल्या सारखीच अजून मार्केट यार्डमध्ये मजा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल..

सचिव पदाच्या आकर्षणामुळे त्यांनी 7 लाख रुपयांचे शेत विकले आणि निवडून येण्याकरिता खर्च केला. सचिव पदापर्यंत पोहचण्याकरिता प्रयत्न केला. परंतु आता परिस्थिती बदलली आहे.

**उपसभापती** : आता आपण या विधेयकावरील रिप्लाय सुरु करु या.

श्री. पाशा पटेल : मला आणखी तीनच बाबी येथे मांडावयाच्या आहेत.

**उपसभापती** : आपल्याला बोलण्याची भरपूर संधी देण्यात आलेली आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, येथे या विधेयकावर एक शेतकरी बोलत आहेत. ते स्वत:चे अनुभव मांडीत आहेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : विधेयकावर बोलण्यास आमची काहीच हरकत नाही. आपण सुरुवातीलाच दोन तास, तीन तास बोलायचे आहे असे ठरवतो. मग त्याप्रमाणे तितका वेळ सन्माननीय सदस्यांनी बोलायचे काय ?

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य विधेयकावर सेक्शन वाईज बोलत आहेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : विधेयकावर बोलण्यास आमची काहीच हरकत नाही. बिलावर बोलत असताना ते स्वत:चे अनुभव सांगत आहेत. हे सभागृह आहे.

श्री. कपिल पाटील : सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे विधेयकावर बोलत आहेत. त्यामुळे त्यांना बोलत असताना आपल्याला अडविता येणार नाही. त्यांना अर्निबंधपणे बोलता येईल. त्यांना हवे तितका वेळ बोलण्यास वेळ देण्यात यावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य हे विधेयकातील कलमाच्या बाहेर काहीही बोलत नाही. त्यामुळे आपण त्यांना येथे बोलू दिले पाहिजे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, आपण माझे भाषण तपासून पहावे. मार्केट याडर्याच्या कार्य क्षेत्राच्या विषयाच्या बाहेर मी एकही शब्द बोललो असेल तर आपण मला एका शब्दाकरिता एक चाबूक मारा. मी आपल्याला चुकून विरोध केला असे सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी हसून कबूल केले आहे त्यांनी असे सांगितले आहे की, आपल्यासाख्या एका चांगल्या माणसावर मी अन्याय केला आहे. आपल्याला बसवावे असे कोणीच कसे काही बोलले नाही म्हणून ते बोलले. जाऊ द्या

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल..

सभापती महोदय, सचिव पदावर निवडून येण्यासाठी एका शेतकऱ्याने 7 लाख रुपयांचे शेत विकले. त्यावर नंतर स्टे आणला. जुने माझ्याकडे येऊन रडत आहेत व नवीनही माझ्याकडे येऊन रडत आहेत. एकाचे पोट भरत नव्हते आता दोघांचे पोट कसे काय भरणार ? मी त्यांना सांगितले आता दोघांनीही आत्महत्या करा. शासनाकडून तुम्हाला लाख रुपये तरी मिळतील. सर्व चक्रच उलटे झालेले आहे. यावर कोणीही बंधन आणलेले नाही. आपल्या माध्यमातून मला शासनाला विनंती करावयाची आहे. उपसचिवांच्या संदर्भातील विषय सुरु असताना दुसरा उप सचिव कशाकरिता नेमण्यात येत आहे ? अशी तरतूद करण्यापूर्वी त्याची आर्थिक कुवत किती आहे हे तरी शासनाने पाहिले पाहिजे होते. आता पूर्वीसारखे काही राहिले नाही हे आपल्याला देखील माहीत आहे. हे कशासाठी करण्यात येत आहे ? एका उप सचिवावर सर्व काम होत आहे. मग दुसरा सचिव नेमण्याची काय गरज आहे ? आपण याबाबत पूर्वीच कार्यवाही केली असती तर आज एका शेतकऱ्याची 4 एकर जमीन वाचली असती. शेतकऱ्याचे भले करावयाचे असेल, त्यांच्या मुलांचे भले करावयाचे असेल त्याला उद्ध्वस्त होण्यापासून वाचवायचे असेल तर या बाबत यापूर्वीच काही तरी करणे आवश्यक होते. त्यामुळे एक घर बरबाद होण्यापासून वाचले असते. एका घराचे नुकसान टळले असते.

सभापती महोदय, खरेदीचे डायरेक्ट लायसन्स जर नसते तर त्यामुळे दोनच काय पण तीनही सचिव पोसले गेले असते. मात्र आता तशी मजा राहिलेली नाही. जिल्हा परिषदेमध्ये आता आयटीसी आलेली आहे. त्यामुळे दणादण खरेदी होत नाही. तेथे कोणतीही स्पर्धा नाही. त्यांना कोणीही टोकणारे नाही. आता हे सर्वच नवीन आहेत म्हणून नीट वागत आहेत. सभापती महोदय, या संदर्भात मी सांगू इच्छितो की, पूर्वी खाजगी वाहतूक व्यवस्था नव्हती. त्यावेळी बसचे कंडक्टर प्रवाशांना शिव्या द्यावयाचे. त्यावेळी मी बसने प्रवास करायचो. उतरायचे असेल तर उतरा, जागा नाही. असे कंडक्टर सांगायचे. परंतु आता परिस्थिती बदलली आहे. खाजगी बस वाहतूक सुरु झाल्यामुळे, मजा सुरु आहे. या, या बसा असे कंडक्टर प्रवाशांना सांगत आहेत. कोठेही बस थांबवत आहे. काय कमाल आहे ही ? आता जी चूक झालेली आहे, त्या चुकीचे भोग कोणाला तरी भोगावे लागणार आहेत.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )**

यानंतर श्री. बरवड..

अप्रुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ...

आपण अशा पध्दतीचा काही तरी निर्णय केला असता तर माझ्यासारख्या कार्यकर्त्याला आनंद वाटला असता. सचिवांचे पगार कोण देणार हे आपण सांगावे. डीडीआरच्या पातळीवरचा माणूस असे काही तरी तांत्रिक वाक्य यामध्ये घातलेले आहे. असा मोठा माणूस जर त्या ठिकाणी दिला तर त्याच्या पगाराची जबाबदारी सुध्दा आपणच घ्यावी. आपण ती जबाबदारी घेणार आहात काय ? आपण ती जबाबदारी घेणार नाही. आपण देणार काही नाही. आपण फक्त घेणाराम. देनाराम कुछ नही. आपल्याला फक्त घ्यायचच आहे. जर आपल्याला काही द्यावयाचे नसेल तर अशी माणसे सुध्दा आमच्या डोक्यावर लादण्याची चूक आपल्या हातून होऊ नये अशी मला आपल्याला विनंती करावयाची आहे.

सभापती महोदया, कलम 45 ची जी सुधारणा आहे त्या सुधारणेप्रमाणे एखाद्याला अपात्र करणार, सहा वर्षासाठी त्याला घरी पाठवणार. मला अशी विनंती करावयाची आहे की, आपण यामध्ये सुधारणा करावयास पाहिजे होती. सगळेच कार्यकर्ते आपणहून ही शिक्षा भोगत नाहीत. काही लोक त्यांना शिक्षा भोगावयास लावतात. रात्री कशावरही सह्या घेतात. मार्केट कमिटीमध्ये रात्रीच लई चालते. परवा मी मार्केट कमिटीचा खर्च बघितला. 11 चिकन, 25 उकळलेली अंडी, 12 मच्छी यावर खर्च केला होता. अशा खर्चामध्ये जर आपण चुकून एखाद्या सदस्याची सही घेतली आणि त्या सदस्याला जर आपण अपात्र ठरविले तर त्याला कोर्टात जाण्याची परवानगी देणार की नाही ? निलंबित करणे, त्याचे सदस्यत्व रद्द करणे या गोष्टी यामध्ये असणे गरजचे आहे हे मला माहीत आहे पण जाणीवपूर्वक जर एखाद्यावर अन्याय होणार असेल तर त्याला कोर्टात जाण्याची परवानगी असली पाहिजे. समजा 21 पैकी एकच सदस्य निवडून आला आणि त्याचा सगळ्या चांगल्या कामामध्ये अडसर होऊ लागला आणि समजा आपल्याला त्याच्यावर कारवाई करावयाची असेल तर बेशक त्याचे निलंबन करा. परंतु त्याला कोर्टात जाण्याची सुध्दा परवानगी ठेवावी. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, तशी परवानगी आहे. तशी परवानगी असेल तर फारच चांगली गोष्ट आहे. मला तशी परवानगी दिसली नाही म्हणून मी बोललो. त्याला आपण कोर्टात जाण्याची परवानगी जर देणार असाल तर माझा त्याला विरोध नाही.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. पाशा पटेल .......

सभापती महोदया, शेवटची कलम 57 ची सुधारणा महत्वाची आहे. कलम 57 ची सुधारणा अशी आहे की, बाजार समितीकडून राज्य कृषी पणन मंडळाला येणे असलेली रक्कम सुध्दा जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल अशी तरतूद करण्यासाठी कलमामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. ही वसुली कशी करणार. हे वरुन फार सोपे दिसते पण मध्ये फार बेकार आहे. एखाद्या मार्केट कमिटीने आपला 10 टक्के वाटा दिला नाही किंवा घेतलेले कर्ज परत दिले नाही तर त्यांचा जमीनजुमला विकून आपले कर्ज वसूल करण्याचे अधिकार राज्य सरकारने आपल्या हातामध्ये घेतले आहेत असाच याचा अर्थ आहे की नाही ? याबाबत माननीय सहकार मंत्र्यांनी सांगावे. कारण मला ते कळले पाहिजे. मला जर ते कळले नाही तर मी लोकांना काय सांगणार ? प्रत्येक गोष्ट मला कळली तरच मी लोकांना सांगेन. कार्यकर्ता म्हणून प्रत्येक गोष्ट समजून घेतली पाहिजे यासाठीच त्यांनी मला या ठिकाणी पाठवले आहे. या कायद्याची गरज आताच आपल्याला का पडली ? ज्यावेळी गरज होती त्यावेळी कायदा केला नाही. आता तालुका पातळीवरच्या सगळ्या मार्केट कमिट्या डबघईला येणार आहेत. हे आपल्याला कळले आहे. त्या कमिट्या डबघाईला आल्यानंतर आपले पैसे वसूल करावयाचे असतील तर तेथील मार्केट कमिटीचे चंबूगबाळे बांधून मोकळे व्हावयाचे, त्यांची जी जमीन आहे ती विकावयाची आणि पैसे घ्यावयाचे. मग त्या तालुक्यातील लोकांनी कोठे जावयाचे ? त्यांना काय पर्याय आहे ? म्हणजे येनकेनप्रकारेन आपली सगळ्या गोष्टींची जी दिशा आहे ती सिस्टीम मोडून काढण्याची आहे. ही फार चांगली सिस्टीम आहे. मार्केट यार्डाचे काम काय तर मालाचे वजन बरोबर होते की नाही, त्याची तोलाई बरोबर होते की नाही, व्यापारी त्याचे पैसे देतो की नाही या सगळ्या गोष्टी यामध्ये होत्या. ज्या गोष्टी आहेत त्या केल्याच पाहिजेत असे नाही. मला एक कमाल वाटली. त्या ठिकाणी तोलार नावाचा एक माणूस असतो. हा मार्केट कमिटीचा जो माणूस असतो तो अडतीवर, व्यापाऱ्यांकडे शेतकऱ्यांच्या ज्या मालाचे वजन करणे चालू आहे ते वजन व्यवस्थित करतात की नाही हे पाहण्यासाठी तोलार असतो. त्यासाठी सुध्दा वेगळे 25 पैसे किंवा 30 पैसे आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.....

आमच्याकडे तोलार नाही. तो नसल्यामुळे एका पोत्याचे वजन कोण करणार ते कळत नाही. यासंदर्भात सभागृहाचे नेते आणि राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याकडे गेलो होतो. लातूरमध्ये तोलार नसल्यामुळे एक व्यापारी एक क्विंटल तुरीमागे 10 किलो कमी वजन मोजत होता. तो किती वर्षापासून हा प्रकार करीत आहे ते माहीत नाही, किती दिवसापासून करीत आहे ते माहीत नाही. त्या व्यापा-याचा प्रकार उघडकीस आल्यावर त्याबाबतची बातमी वर्तमानपत्रात छापून आली होती. त्यामुळे मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी गेलो होतो. मला असे वाटले होते की, नेहमी सोलून काढतो, फोडून काढतो असे बोलणारा गबरु माणूस आहे, या गैरप्रकाराबाबत काही तरी करील अशा भोळया आशेने मी गेलो होतो. त्या शेतक-याने अनेक वर्षे लुटले असल्यामुळे त्याला काही तरी शिक्षा झाली पाहिजे होती. त्याला काय शिक्षा झाली तर त्याचा केवळ 15 दिवसासाठी परवाना रद्द करण्यात आला होता. त्याला सोलले नाही, फोडले नाही की तोडले नाही. सभापती महोदया, माननीय उपमुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी मी लाईनमध्ये एक तास थांबलो होतो. मी लहान असताना बाजार समितीमध्ये माल नेला होता. पण माझा माल 2-3 किलोने कमी निघाल्यामुळे मला सर्व अडत्यांनी मिळून मारले आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुरेशदादा देशमुख यांना विचारु इच्छितो की, आपण अडत्यांचा कधी मार खाल्ला आहे काय ? आपण त्यांचा मार खाल्ला नसेल, कारण आपण सधन शेतकरी आहात. त्यामुळे तुमचा मुकादम माल विकण्यासाठी जात असेल. तुमच्यात आणि आमच्यात अंतर आहे. पूर्वी देशमुखांच्या वाडयासमोरुन जात असताना पायातील जोडे बगलेमध्ये मारुन जावे लागत होते. आता तशी परिस्थिती बदलली आहे. पण जुनी पध्दत तशी होती. सभापती महोदया, या मार्केट कमिटयांची अवस्था वाईट झाली आहे. त्या मातीत जन्माला आलो असल्यामुळे त्यात सुधारणा व्हावी असे आम्हाला वाटते. त्यासाठी ही सुधारणा आणली असती तर आम्ही मंत्रिमहोदयांचे अभिनंदन केले असते, कौतुक केले असते. परंतु एकेक प्रकार पाहिले तर मनाला वेदना होतात.

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : सभागृहाची वेळ अर्धा तासाने वाढविण्यात येत आहे.

श्री.पाशा पटेल : सर्व सन्माननीय सदस्यांची सदिच्छा असल्यामुळे मी आणखी काही वेळ माझे मनोगत व्यक्त करणार आहे. नाशिकमध्ये सर्व वर्तमानपत्रात बातमी छापून आलेली आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल...)

काल " ॲग्रोवन" या दैनिक "सकाळ"च्या पुरवणीमध्ये दोन-तीन ठिकाणी शेतक-यांना मारल्याच्या बातम्या छापून आल्या आहेत. मार्केट यार्डात शेतक-याला मारले. सभापती महोदय, मालाच्या चो-या होतात त्याकडे कोणी पहात नाही. मापामध्ये बदमाशी केली जाते त्याकडे कोणी पहात नाही. दुकाने फुकट वाटली जातात त्याकडे कोणी पहात नाही. शौचालय बांधलेल्या जागा विकून तेथे घरे बांधली गेली त्याचे तुम्हाला काही देणेघेणे नाही. अशा ज्या गोष्टी घडत आहेत त्यानुषंगाने कायद्यामध्ये बदल केला जात नाही. मार्केट कमिटीचे उत्पन्न निम्म्यापेक्षा कमी व्हायला लागले आहे त्याकडे कोणी पहात नाही. मार्केट कमिटया लवकरात लवकर कशा मरतील याची चिंता लागलेली आहे. यामध्ये तुम्हाला खरोखरच बदल करावयाचा असेल तर संपूर्ण सिस्टिमला मारुन बदल करण्यापेक्षा दोन भागामध्ये समोरासमोर स्पर्धा कशी होईल हे बघायला पाहिजे. परंतु ते बघितले जात नाही. सेस कमी कसा करता येईल हे पाहिले जात नाही. एखाद्या मालाची किंमत पडत असेल तर ती किंमत कशी पडणार नाही हे मार्केट कमिटीने पहाणे गरजेचे आहे आणि त्यासंदर्भाने या विधेयकामध्ये तरतूद असावयास पाहिजे. हा विषय केवळ सभागृहामध्ये भाषणे करुन मिटायचा नाही. आपण सर्व ग्रामीण भागातील लोक आहोत. मला एका गोष्टीचे दु:ख वाटते की 80 टक्के शेतक-यांची मुले या सभागृहामध्ये असून देखील उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी ही कन्सेप्ट विचारात घेतली गेली नाही. मुंबई, ठाणे, पुणे या शहरातील 81 आमदार हे 7/12वाले राहाणार नाहीत, ते शेतकरी राहाणार नाहीत आणि आपल्या आडनावाचेही राहाणार नाहीत. आपण बहुमतात आहात. नांगर ही शेतक-याची निशाणी होती. आता शेतकरी म्हणजे लिंबाचे झाड आणि कासरा ...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी मुंबई, ठाणे, पुणे येथील 81 आमदार शेतकरी नाहीत असा उल्लेख केला. या 81 आमदारांमध्ये कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या ग्रामीण भागातील आमदार देखील आहेत.

श्री. उल्हास पवार : आमदार हा सर्वांचाच लोकप्रतिनिधी असतो. तो मुंबईतून निवडून आला काय, पुणे शहरातून निवडून आला काय किंवा खेडयातून निवडून आला काय तो शेवटी लोकप्रतिनिधी असतो. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यानी शहरी ग्रामीण असा





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल...

भेदभाव करणे म्हणजे त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल, त्याच्या विचाराबद्दल शंका निर्माण करण्यासारखे होईल. शहरातील आमदार सुध्दा शेती विषयक प्रश्न अत्यंत पोटतिडिकीने मांडू शकतात. त्यामुळे शहर आणि खेडे अशा भेदभावाच्या आशयाचे विधान करणे हे लोकशाहीमध्ये अभिप्रेत नाही.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य माझ्या भावनाच समजून घेत नाहीत. सन्माननीय सदस्यांनी कृपया माझ्या भावना समजून घ्याव्यात. मी अतिशय सदसद्‌विवेकबुध्दीने सांगतो की, मी या विधेयकाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचे राजकारण आणत नाही. मला अक्कल आल्यापासून, मला कळावयास लागल्यापासून, शेती करावयास लागल्यापासून मी कोणाचे खाचखळगे काढीत नाही. मी कोणाचेही दोष या ठिकाणी काढत नाही. मी कधीही खोटे बोलत नाही. प्रत्येकाला देवाघरी जावयाचे असते. देवाच्या घरातून परत कोणालाही येता येत नाही. ती एक माणसाची शेवटची जागा आहे. परंतु काही सन्माननीय सदस्य माझी नरडी दाबून माझा आवाज सभागृहात बंद करण्याचा प्रयत्न करील असतील तर ती बाब योग्य नाही असे मला वाटते.

श्री. उल्हास पवार : या सभागृहात लोकशाहीच्या माध्यमातून निवडून आलेले सदस्य आहेत. मुंबईच्या आमदारांना शेतीचे काही कळत नाही असा सन्माननीय सदस्यांच्या विधानाचा अर्थ होतो. मुंबईच्या आमदारांना शेती विषयक काही कळत नाही असा समज सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी करुन घेऊ नये.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, जर माझ्या विधानाचा असा अर्थ होत असेल तर ते विधान मी मागे घेतो. मी आतापर्यंत जे काही भाषण केले आहे ते मागे घेऊ काय ? सन्माननीय सदस्यांची तशी इच्छा असेल ते भाषण देखील मी मागे घेण्यास तयार आहे. मी मघाशी माझ्या भाषणात उल्लेख केला की, उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी ही कन्सेप्ट सन्माननीय सदस्यांनी विचारात घेतली नाही. ही कन्सेप्ट सन्माननीय सदस्यांनी आचरणात आणावी अशी माझी विनंती आहे. या विधेयकातील कलम 57 मध्ये सुधारणा सुचविली आहे. त्या सुधारणेची तुम्हाला रास्त भीती वाटावयास लागली आहे. बाजार समित्यांचे दिवसें दिवस उत्पन्न कमी कमी होत चालले आहे व पुढेही उत्पन्न कमी कमी होणार आहे. खरे म्हणजे हे विधेयक आणण्याची आज काहीही गरज नव्हती. हा कायदा शेतक-यांच्या हिताचा नाही. तसेच तो कायदा अतिशय जाचक ठरणारा आहे म्हणून या विधेयकास विरोध करतो आणि हे विधेयक संयुक्त चिकित्सा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे अशी मी विनंती करतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी अतिशय उत्कृष्टपणे चार ते पाच तास विचार मांडले. मी त्यांच्या विषयी चांगले बोलतो आहे. कोणी सदस्यांनी माझ्या शब्दाचा किस काढू नये अशी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. सदर विधेयकावर विचार मांडताना त्यांनी अनेक भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा उल्लेख केला. त्यांनी त्या प्रकरणांचे पुरावे देखील सभागृहात आणले होते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे मुंबई शहराचे महापौर होते. ते मुंबई शहरातील असून त्यांनी पणन खात्यावर चार ते पाच तास आपले विचार मांडले ही अभिमानास्पद बाब आहे. शेतक-यांच्या आत्महत्येच्या विषयाच्या बाबतीत देखील अतिशय जिव्हाळयाने या ठिकाणी बोलले. राज्यात शेतक-यांच्या आत्महत्या होत होत्या त्यावेळी त्यांनी आपल्या पायात चिलखे घालून आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या घरी सात्वन करण्याचा प्रयत्न केला. पायात चिलखे घालून आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या भागात फिरण्यास ते काही वेडे नाहीत. शेतक-यांबद्दल खरोखरच त्यांना आत्मीयता आहे म्हणून त्यांनी त्यावेळी दौरा केला. परंतु या सभागृहात सगळे श्री. रावते होऊ शकत नाही. सगळेच श्री. उल्हास पवार होऊ शकत नाही. या विधेयकातील दोन, चार गोष्टी सोडल्या तर हे विधेयक ग्रामीण भागातील शेतक-यांवर अन्याय करणारे आहे अशी माझी भावना झाली आहे.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ SBT/ 18:10

श्री. पाशा पटेल ....

सभापती महोदया, हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो. मी जे भोगलेले आहे ते मी माझ्या भाषणात सांगितले. मी माझी अनुभूती सांगितली आहे. माझ्या भाषणाला बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी पाठिंबा दिला. सन्माननीय सदस्य कोणत्याही पक्षाचे असले म्हणजे शेतकऱ्यावर अन्याय करणाऱ्या पक्षाचे असले तरी शेतकऱ्याला न्याय देणाऱ्या पक्षाचे असले तरी माझ्या भाषणाला पाठिंबा दिलेला आहे. गेली 60 वर्षे सगळयाच भानगडी तुम्ही केलेल्या आहेत त्या लक्षात आलेल्या नाहीत आणि आता लक्षात येण्याची शक्यता नाही. या विधेयकाचा पुनर्विचार करावा यासाठी मी माझे मत मांडले आहे. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी माननीय सभापती महोदयांचे आभार मानतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदया, महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन व विकास विनियमन यात सुधारणा करण्यासाठी विधेयक सभागृहात चर्चेला आलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याचा जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदया, या विषयाच्या संदर्भात मी लांबलचक भाषण करणार नाही. माझ्या दृष्टीने महत्वाचे असे फक्त दोन-तीन मुद्दे मी याठिकाणी मांडणार आहे. मी उपस्थित करणार असलेल्या सर्व मुद्यांच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी त्यांच्या भाषणात उल्लेख करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, याठिकाणी जे दुरुस्ती विधेयक आणलेले आहे ते दुरुस्ती विधेयक या सदनात येण्यापूर्वी याबाबतीत शासनाने दिनांक 22 जानेवारी 2008 रोजी एक अध्यादेश काढला होता. महाराष्ट्र कृषी उत्पन्न,पणन विकास व विनियमन अध्यादेश 2008 काढून त्याच दिवसापासून म्हणजे 22 जानेवारी 2008 पासून तो अध्यादेश राज्यामध्ये लागू करण्यात आलेलाआहे. मला याठिकाणी हे जाणून घ्यावयाचे आहे की, महिनाभरात अधिवेशन सुरु होणार होते म्हणजे 10 मार्चला अधिवेशन सुरु होणार होते तरीसुध्दा अशी कोणती तातडी होती की हा अध्यादेश काढणे शासनाला जरुरीचे वाटले. या सदनात विधेयक मांडून आणि सर्वंकष चर्चा होऊन तसेच सभागृहाच्या भावना विचारात घेऊन त्यावर निर्णय होऊ शकला असता. परंतु अशी कोणती तातडीची गरज होती की शासनाला अध्यादेश काढून त्याची अंमलबजावणी करावी लागली. शासनाने 22 जानेवारीपासून अध्यादेश लागू केलेला आहे. 10 मार्च 2008 पर्यंत शासन थांबू शकले असते. यासंदर्भात मला मंत्रीमहोदयांकडून उत्तर हवे आहे की अशी कोणती तातडीची गरज होती की 22 जानेवारीला अध्यादेश काढून तो लागू केलेला आहे. सभापती महोदया, अपात्रतेच्या संदर्भात जी काही सुधारणा सुचविली आहे त्या अपात्रतेसंबंधी निर्णय घेतल्यानंतर त्याठिकाणी प्रशासक नेमण्याची किंवा प्रशासक मंडळ नेमण्याची तरतूद केलेली आहे. परंतु या सुधारणा विधेयकामध्ये कोठेही सांगितले नाही की, प्रशासक किंवा प्रशासक मंडळ किती दिवसासाठी असणार आहे. प्रशासक किंवा प्रशासक मंडळ एक वर्षासाठी किंवा दोन वर्षासाठी असेल अथवा त्याची कमाल मर्यादा किती दिवसांची असण्याची शक्यता आहे यासंदर्भात कोणताही उल्लेख या विधेयकामध्ये नाही. त्याचा याठिकाणी खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे. या सुधारणा विधेयकाच्या निमित्ताने शासनाकडून आणि मंत्रीमहोदयांकडून जाणून घेऊ इच्छितो की, अशा प्रकारे

......2



SSK/ KTG/ SBT/ 18:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ...

जर कृषी उत्पन्न बाजार समित्यांवर प्रशासक नेमणार असाल आणि त्यांचे अधिकार काढून घेणार असाल किंवा प्रशासक मंडळ नियुक्त करणार असाल .....

(सभापती स्थानी माननीय उपसभापती).

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते........

आणि अशा प्रकारे आज कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये जे काही घोटाळे किंवा भ्रष्टाचाराची प्रकरणे घडली आहेत त्या संदर्भात काय कारवाई करणार आहात? जळगावचे प्रकरण सध्या गाजत आहे. जळगाव कृषि उत्पन्न बाजार समितीची अनेकवेळा या ठिकाणी चर्चा झालेली आहे. अद्यापही शासनाने या संदर्भात कोणतीही कारवाई केलेली नाही. या संदर्भात कोणती कारवाई करणार आहात? एक-दोनदा नव्हे तर पुन्हा पुन्हा त्या घटना त्या ठिकाणी घडतात. या संदर्भातील माहिती सभागृहाला कळणे अत्यंत आवश्यक आहे. मी आजच वृत्तपत्रात बातमी वाचली. कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भात राजकीय गटतट एकत्र येतात. एका गटाने दुसऱ्या गटाविरुध्द तक्रार करायची. अ गटाने ब गटाविरुध्द आणि ब गटाने अ गटाविरुध्द तक्रार करायची आणि शासनाकडे अशाप्रकारे तक्रारी प्राप्त झाल्यानंतर कोणत्याही नियमांचा अभ्यास न करता तातडीने त्या ठिकाणी प्रशासक नेमण्याचे आदेश शासनाकडून काढले जातात. कृषि उत्पन्न बाजार समितीवर प्रशासक नेमण्यात आल्यानंतर शेवटी प्रकरण न्यायालयात रेंगाळते. कल्याण कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भात हेच झाले आहे. नियमाप्रमाणे कारवाई न करता केवळ एका गटाने तक्रार केली. दुसऱ्या गटाचे म्हणणे ऐकून न घेता शासनाने प्रशासकाची नियुक्ती केली. शेवटी न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला. अशा प्रकारे अवैध पध्दतीने प्रशासक नेमण्याचा जो निर्णय शासनाने घेतला होता, हा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाला रद्द करावा लागला आणि पुन्हा एकदा कृषि उत्पन्न बाजार समितीवर संबंधित जे संचालक मंडळ होते, त्या संचालक मंडळाच्या ताब्यात कारभार सोपविला आहे. ज्या कारणासाठी प्रशासक नेमण्यात आला, संचालक मंडळाकडून कारभार काढून घेण्यात आला, त्यांनी काही अनुशेष भरला नाही, नियमबाह्य पध्दतीने भरती केली वगैरे कारणामुळे दोन वर्षे कल्याणच्या कृषि उत्पन्न बाजार समितीवर प्रशासक होता. या प्रशासकाच्या कालावधीत ज्या काही घटना घडल्या, जे प्रताप या प्रशासकाने केले त्याची चौकशी कोण करणार? संचालक मंडळाने काही गडबड केली तर त्यांना अपात्र ठरविणार आहात. हाकलून देणार आहात. जे प्रशासक नेमणार आहात, जे प्रशासक मंडळ नेमणार आहात त्यांनी जर भ्रष्टाचार केला, गैरव्यवहार केला तर त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करणार आहात या संदर्भातील माहिती या विधेयकामध्ये दिलेली नाही. या संदर्भात खुलासा होणे आवश्यक आहे. या कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये जे शेतकरी आपला माल घेऊन येतात त्यांच्यासाठी होणारा खर्च

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते........

आहे तो खरे म्हणजे व्यापाऱ्यांनी देण्याची आवश्यकता आहे. त्यांच्याकडून खर्च वसूल करण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात शासनाने कायदा केलेला आहे. परंतु त्या कायद्याची अंमलबजावणी होत नाही. अनेक कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये आजही शेतकऱ्यांकडून पैसे वसूल केले जात आहेत. व्यापाऱ्यांकडून ते घेणे आवश्यक असताना शेतकऱ्यांकडून वसूल होत आहेत. शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. शासनाने कायदा केला, कायद्यामध्ये दुरुस्ती केली, परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. या दृष्टीकोनातून या सुधारणा विधेयकाच्या निमित्ताने मंत्रीमहोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करावा अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो आणि या सुधारणा विधेयकाबाबत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी सूचना मांडली आहे त्या सूचनेला पाठिंबा देतो आणि हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात यावे असे सांगून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कामकाज पत्रिकेवर नियम 260 अन्वये तीन प्रस्ताव चर्चेला दाखविण्यात आलेले आहेत. सकाळी 10.00 वाजता सभागृहाचे कामकाज सुरु झालेले आहे. त्यामुळे आता सभागृहाची बैठक स्थगित करावी अशी विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तीन प्रस्ताव चर्चेला दर्शविण्यात आलेले आहेत. या संदर्भात नियोजन कसे केले जाणार आहे? मुंबईच्या प्रश्नासंबंधी चर्चा होणार असल्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांची उपस्थिती आवश्यक आहे.

**उप सभापती** : मला सभागृहाला विश्वासात घ्यावयाचे आहे. प्रस्तावावरील चर्चा उद्या घ्यावयाची काय?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, उद्या चर्चा घेण्यात यावी.

**उप सभापती** : विधेयकावरील मंत्रीमहोदयांच्या उत्तराच्या भाषणासहित प्रस्तावांवरील चर्चा उद्या घेण्यात येईल. सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून उद्या, गुरुवार, दिनांक 17 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 11.00 वाजता सभागृहाची बैठक पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 19 मिनिटांनी स्थगित होऊन गुरुवार, दिनांक 17 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही